# वैदिक निबंध

९८५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
ग्रं. क्र. ५३५

REFBK-0010277

ना. गो. चापेकर

# वैदिक निबंध


## नारायण गोविंद चापेकर

'बर्कचें चरित्र', 'पैसा', 'निवडक लेख' व 'गच्चीवरील गप्पा' या पुस्तकांचे कर्ते


RFFBK-0010277


बदलापुर ( ठाणें )

शके १८५१

पुस्तकें मागविण्याचा पत्ता :—

१ आर्यसंस्कृतिमुद्रणालय, चिमणबाग, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणें.

२ पैसाफंडवस्तुभांडार, लक्ष्मीरोड, पुणें.

३ चापेकर दुग्धमंदीर, लॅमिंगटन् रोड, मुंबई.

१९८ (१७) सदाशिव पेठ, चिमणबाग, टिळकरस्ता, पुणें येथें सीताराम वासुदेव फडणीस, बी. ए., यांनीं 'आर्यसंस्कृति' मुद्रणालयांत छापिलें व बदलापुर येथें नारायण गोविंद चापेकर यांनीं प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना

प्रस्तुत पुस्तकांत निरनिराळ्या ३ विषयांवरील लेख संग्रहित केले आहेत. ह्यांपैकीं बहुतेक लेख माझें "निवडक लेख" हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर लिहिलेले आहेत. "अष्टपुत्रे आणि दशपुत्रे" हा लेख बऱ्याच दिवसांपूर्वी विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झाला होता. पण त्याचा समावेश निवडक लेखांत केला नव्हता. ऐत-रेय ब्राह्मण व ऐतरेय ब्राह्मणांतील आख्यायिका हे दोन लेख निव-डक लेखांतून काढून सजातीयत्वामुळें या पुस्तकांत समाविष्ट केले आहेत. त्याचकारणानें गणमैत्री हा लेखहि "गप्पां"तून काढून येथेंच घेतला आहे. बाकीचे लेख विविधज्ञानविस्तार व चित्रमय जगत् यांत प्रसिद्ध झाले होते. फक्त "राजसूक्तें" प्रथम याच पुस्तकद्वारा प्रसिद्धीस येत आहेत.

वाचीत असलें म्हणजे लिहावेंसें वाटतें. लिहिलें कीं मासिकें फुकट छापण्यास तयार असतात म्हणून छापलें जातें आणि नंतर त्या प्रसिद्ध झालेल्या लेखांच्या ठिकाणीं आत्मीयत्वाचा अभिनिवेश जडतो; त्याचें पर्यवसान लेखसंग्रहांत होतें. अर्थात् प्रारंभींची सात्विक वृत्ति कांटेरी राजस वृत्तींत रूपांतर पावते. वैदिक निबंध हें पुस्तक या वृत्तीचेंच फल होय. या पुस्तकांतील सर्वच लेखांना निबंध शब्द लावणें उचित होणार नाहीं. स्त्रीसूक्तें व राजसूक्तें हीं अथर्ववेदांतील सूक्तांची भाषांतरें आहेत. समाजशास्त्राच्या दृष्टीनें अथर्ववेदाचें महत्त्व फार आहे. आर्यांचा आर्येतरांशीं असलेला संबंध निश्चित करण्यास

हा चतुर्थ वेद फारच उपयोगी पडणारा आहे. म्हणून अथर्ववेदाचें संपूर्ण भाषांतर मराठींत व्हावयास पाहिजे. हें कधीं घडेल तें घडो. सध्यां स्त्रीसूक्तें व राजसूक्तें हीं मराठींत आणलीं आहेत या सूक्तांचा ऊहापोह तूर्त येथें करीत नाहीं. आणखी बऱ्याच सूक्तांचें भाषांतर झाल्यावर विवेचनात्मक लेखाला हात घालण्याचें योजिलें आहे.

असो. वाचकवर्गाच्या अभावीं मराठीची शोभा म्हणूनच या पुस्तकाचा उपयोग समजावयाचा; आणि हाच हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत मुख्यतः हेतू आहे.

शुद्धलेखनाला सध्यां अस्थिरता प्राप्त झाली आहे. त्यामुळें या पुस्तकांतहि शुद्धलेखनाची धरसोड दिसून येईल. अजागल अनुस्वारांचें उच्चाटन करण्याचा अजागल प्रयत्न जरी या पुस्तकांत आढळला नाहीं तरी ऱ्हस्व इ–उकारांत संस्कृत शब्द मराठींत दीर्घ लिहिण्याची प्रवृत्ति येथें दिसून येईल.

बदलापूर.

ना. गो. चापेकर.

# वैदिक निबंध

## अथर्ववेद

अथर्ववेदाचें प्राचीन नांव अथर्वाङ्गिरसः हें होय. प्रत्यक्ष अथर्वसंहितेंतच ह्या चतुर्थवेदाचा निर्देश अथर्वाङ्गिरसः ह्या संयुक्त शब्दानें केलेला आहे ( काण्ड १० सूक्त ७ ऋचा २० ). अथर्वाङ्गिरसः ह्या नांवानें ग्रंथाची संयुक्तता अथवा विषयभिन्नताहि सूचित होते. गोपथ ब्राह्मणांतील या विषयींची आख्यायिका काल्पनिक भासली तरी ती समजून घेणें अवश्य आहे. ‘ सृष्टि निर्माण करण्याच्या हेतूनें ब्रह्मदेव तपश्चर्या करीत असतां त्याच्या रोमरंध्रांतून स्वेदधारा जमिनीवर पडल्या. त्यांत त्यानें आपलें प्रतिबिंब पाहिलें व लगेच त्याचें रेतःस्खलन झालें. नंतर रेतोयुक्त असें हें जल द्विधा झालें. एक भाग शांत, पेय, स्वादु असा झाला; तर दुसरा खारट, अपेय, अस्वादु असा झाला. ह्या दोन रेतांपासून अनुक्रमें भृगु व अंगिरा हे ऋषि निर्माण झाले व पुढें अथर्वणापासून दहा आणि अंगिरसापासून दहा असे अथर्वन् अङ्गिरस् नामक एकंदर वीस ऋषि निर्माण झाले. भृगूनें उच्चारलेल्या शब्दावरून त्याला अथर्वन् ही संज्ञा प्राप्त झाली. अथर्वऋषींपासून ब्रह्मदेवाला जे मंत्र दृष्ट झाले त्या मंत्रांचा आथर्वण वेद झाला. अङ्गिरा ऋषींपासून दृष्ट झालेल्या मंत्रांचा अङ्गिरस वेद बनला.’ ह्या आख्यायिकेचें तात्पर्य असें दिसतें कीं, आथर्वण व आङ्गिरस हे दोन प्रथम स्वतंत्र वेद असून पुढें ते एकत्र

होऊन अथर्ववेद ह्या नांवानें प्रसिद्धीस आले. अथर्ववेदालाच ब्रह्मवेद असेंहि दुसरें नांव आहे. 'चत्वारो वा इमे वेदा ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदो ब्रह्मवेदः' [ गोपथ ब्राह्मण २–१६ ]. श्रुतीचा अवतार यज्ञाकरतां आहे. यज्ञांत तीन वेदांना स्थान आहे आणि पुष्कळ काळपर्यंत त्रयी विद्या म्हणजे ऋक्, यजुः व साम इतकीच समजली जाई. यज्ञांत होता, अध्वर्यु, उद्गाता आणि ब्रह्मा असे अधिकारी असतात. ऋग्मंत्रांनीं हौत्र, याजुषमंत्रांनीं आध्वर्यव, आणि सामांनीं उद्गीथ साधीत असत. ब्रह्माला निराळा वेद नव्हता हें ऐतरेय ब्राह्मणावरून [ ५–३३ ] उघड होतें. पण "अथर्वाङ्गिरोभिर्ब्रह्मत्वं" असें पुढें ठरविण्यांत आलें. अर्थात् ब्रह्मत्याचें काम करण्यास अथर्ववेदी ब्राह्मण पाहिजे असें मानण्यांत येऊं लागलें [ गो. ब्राह्मण २–२४ ]. पण यज्ञाला उपयोगी पडणारा असा अथर्ववेदांत फारच थोडा भाग आहे. हा भाग वगळला म्हणजे बाकीचा अथर्ववेद एथून तेथून अश्रौत आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. अभिचारमंत्र, रोगनिवारक मंत्र, वशीकरण-मंत्र ह्यांसारख्या मंत्रांनीं हा वेद भरलेला आहे. पण विशेषतः शांतिसूक्तें व अघोरसूक्तें असा भेद या वेदाचा मानतात. पहिलीं आथर्वणिक व दुसरीं आङ्गिरस. पहिल्या सूक्तांस भेषज हेंहि नांव आहे. "येथर्वाणस्तद्भेषजं" [गो. ब्रा. ३–४]. तसेंच "याः कृत्या आङ्गीरसीः" असें प्रत्यक्ष अथर्ववेदांतच म्हटलें आहे ( ८ . ५. ९. ). कृत्या म्हणजे चेटूक. अङ्गिरा ऋषीनें केलेलें चेटूक. नांवांच्या अनेकत्वामुळें ह्या ग्रंथांतील ऋचांना अथवा मंत्रांना वेदामध्यें स्थान प्राप्त झालें नव्हतें हें व्यक्त होतें. चिवडा-भज्यांच्या दुकानाला आश्रम हें नांव जसें हल्लीं देतात तसाच कांहींसा प्रकार प्रस्तुत वाङ्मयासंबंधानें झाला

असावा. ह्या मंत्रांना प्रथम वेद हें नांव देण्यांत आलें. पण नुसत्या वेद शब्दानें महत्त्व व श्रेष्ठत्व येणें शक्य नव्हतें. कारण सर्पवेद, पिशाचवेद, असुरवेद, पुराणवेद, इतिहासवेद असे दुसरे वेद होतेच. वेद म्हणजे विद्या अथवा वाङ्मय. तेव्हां श्रौतामध्यें स्थानापन्न झाल्याशिवाय ह्या मंत्रांचें वेदत्व मान्य होणें शक्यच नव्हतें. म्हणून विखुरलेले मंत्र एकत्र करून चतुर्थवेद म्हणून त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यांत आली. कारण आथर्वण व आङ्गिरस हे दोन स्वतंत्र वाङ्मयभाग प्रथम होते यांत संशय नाहीं. उ. आथर्वणीराङ्गिरसीर्दैवीर्मनुष्यजा उत। ओषधयः प्रजायन्ते यदा त्वं प्राण जिन्वसि ॥ ( ११. ६. १६. ). यज्ञांत ब्रह्मयाचें काम म्हणजे यज्ञावर देखरेख ठेवण्याचेंच होतें. कोठें कांहीं चुकत नाहीं हें ब्रह्मयानें पहावयाचें. अर्थात् त्याला सर्व वेद अवगत असणें अवश्य होतें व पूर्वी ऋक्, यजुः व साम ह्यांचें अध्ययन त्याचें झालेलें असे. घरच्या उपाध्याप्रमाणें ब्रह्मयाची स्थिती असावी. अथर्ववेदांतील मंत्रांचा गृह्यांशींच संबंध विशेष असल्यामुळें ब्रह्मा अथर्ववेदी असावा असा हक्क प्रस्थापित करण्यांत आला. पौरोहित्य अथर्ववेदानेंच करावयाचें असतें.

शान्तिपुष्ट्यभिचारार्था एकब्रह्मर्त्विगाश्रयाः
क्रियन्तेऽथर्ववेदेन त्रय्येवात्मीयगोचराः ॥

अथर्ववेदाचीं पांच सूत्रें आहेत तीं : "नक्षत्रकल्पो वैतानस्तृतीयः संहिताविधिः। तुर्य आङ्गिरसः कल्पः शान्तिकल्पस्तु पञ्चमः।" संहिताविधि म्हणजेच कौशिकसूत्र. संहितामंत्रांचा शान्तिक व पौष्टिक कर्मांकडे विनियोग कसा करावा हें ह्या सूत्रांत सांगितलें आहे. नित्य, नैमित्तिक व काम्य कर्मांना अथर्ववेदाचाच आधार होय.

जातकर्मादि नित्य, दुर्दिन—अशनिनिवारणादि नैमित्तिक आणि मेधाजननादि काम्य कर्मे होत. रुद्रभाष्यकाराच्या मताप्रमाणें नित्य-कर्मे घरींच करावयाचीं असतात. बाकीचीं कर्मे गांवाबाहेर नदीच्या कांठीं उत्तर दिशेला करावीं असा निर्देश कौशिकसूत्रांत आढळतो. पण आभिचारिक कर्मे गांवाबाहेर दक्षिणदिशेला कृष्णपक्षांत कृत्तिका नक्षत्रावर करावीं. आज्यतंत्र व पाकतंत्र जो पाकयज्ञ तो सर्व आथर्वण विधीनेंच करावयाचा. हें सर्व सांगण्याचा हेतू इतकाच कीं, तीन वेदांहून अथर्ववेदाचें वैशिष्ट्य व आथर्वण आणि आंगिरस ह्या दोन वेदांची असमता निदर्शनास यावी. ऋक्, यजुः आणि साम ह्यांची रचना झाली तेव्हां सुद्धां दुसरें छांदस वाङ्मय निर्माण झालें होतें व होत होतें. "तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानि जज्ञिरे। छंदांसि जज्ञिरे तस्माद्यजुस्तस्मादजायत।" ह्यांत ऋक्, यजुः व साम ह्यांशिवाय दुसरे छंद यज्ञापासून निर्माण झाले असें स्पष्ट ह्मटलें आहे. वैदिक कालीं सर्व वाङ्मय छंदांतच असलें पाहिजे. आश्वलायन गृह्यसूत्रांत क्षुद्र सूक्तें व महासूक्तें असा द्विविध निर्देश केलेला आढळतो. "क्षुद्रसूक्तास्तृप्यंतु। महासूक्तास्तृप्यंतु।". तेव्हां अथर्ववेदासारखीं सूक्तें "त्रयी विद्ये' च्या कालांत अस्तित्वांत होतीं असें मानण्यास हरकत दिसत नाहीं. हीं निरनिराळीं सूक्तें एकत्र करून एक प्रचंड वेद बनला. एवढेंच नव्हे तर त्याला श्रौतांतहि स्थान मिळवून दिलें. हें कोणीं केलें? आथर्वण परजातीय असून, त्यांनींच खटपट करून हिंदूंचें पुरोहितत्व पटकावलें ह्या परमताचा अनुवाद ज्ञानकोशकारांनीं केला आहे आणि त्यास आधार काय तर पारशांचा अथ्रवन् आणि हिंदूंचे आथर्वण ह्यांमधील शब्दसादृश्य. असो. समाजशास्त्राच्या अभ्यासकाला व प्राचीन संस्कृतीचें अध्ययन करणा-

रास अथर्ववेद म्हणजे एक भांडारच लाभलें असें वाटतें. वैद्य-शास्त्रांतील प्रगती, स्त्रीपुरुषसंबंध, देवघेव, लौकिक समज इत्यादि अनेक मनोरंजक गोष्टींचें ज्ञान अथर्ववेदाच्या अध्ययनानें उपलब्ध होतें. सायणाचार्यांनीं आपल्या उपोद्घातांत अथर्ववेदप्रतिपाद्य कर्मांची लांबलचक यादी दिली आहे ती नुसती वाचली तरी वरील म्हणण्याची यथार्थता दिसून येईल. सुखप्रसूति, उत्तम शेती, निकोप प्रकृती, राष्ट्रलाभ, ज्वरातिसार, बहुमूत्र, हृद्रोग, राजयक्ष्मा, गंडमाळा, जलोदर इत्यादि रोगनिवारण वगैरे नानाप्रकारच्या गोष्टी साधण्यास अथर्ववेदाचें साहाय्य सांगितलें आहे. तसेंच मृताच्या पुनर्जीवनाकरितां आणि अशाच दुसऱ्या कारणांकरितां अनेक शांती सांगितल्या आहेत. कांहीं उदाहरणें दिलीं असतां या वेदाचें महत्त्व व्यक्त होईल.

मूत्रावरोधानें पीडिलेल्या रोग्यावर शस्त्रक्रिया करतांना खालील मंत्र ह्मणतात. प्र ते भिनद्मि मेहनं वर्त्रं वेशन्त्या इव । एवा ते मूत्रं मुच्यतां बहिर्बालिति सर्वकम् ।. जलाशयाचा बांध फोडला म्हणजे जसें पाणी बाहेर निघून जातें त्याप्रमाणें मी तुझ्या मूत्रनालाचें विदारण करतों, तुझें सर्व मूत्र 'बाल्' असा आवाज करीत बाहेर पडो. मूत्रमार्गाचें विदारण करण्याकरितां लोखंडाच्या काडीचा उपयोग करीत.

दुसरी ऋचा पहा. अभि त्वा मनुजातेन दधामि मम वाससा । यथासो मम केवलो नान्यासां कीर्तयाश्चन ॥ ( ७--३७ ). ह्यांत स्त्री आपल्या पतीला म्हणते, मनुनिर्मित वस्त्रानें मी तुला बांधून टाकतें म्हणजे तूं केवळ माझ्या एकटीचाच होशील, दुसऱ्या स्त्रियांचें नांवहि काढणार नाहींस. हा मंत्र फार महत्त्वाचा आहे. ह्यावरून

स्त्रीचें पुरुषावर वर्चस्व दिसतें. मनुनिर्मित वस्त्र म्हणजे केंस तर नसतील अशी शंका व्हिटनेनें प्रदर्शित केली आहे व ती अगदींच अयोग्य आहे असें दिसत नाहीं. हल्लीं वधूवरांच्या वस्त्राला गांठ मारतात. केंसांना मारीत नाहींत. पण वस्त्र घेतल्यास सायणाचार्योंनीं दिलेला अर्थ--मंत्रपूर्वक परिधान केलेलें--असाच स्वीकारला पाहिजे. दुसरी एक ऋचा पहा : ये त आसीद् भूमिः पूर्वा यामद्धातय इद् विदुः । यो वै तां विद्यान्नामथा स मन्येत पुराणवित् ॥ (११-१०-७) हल्लीं भूमी आहे हिच्याहून प्रथम दुसरी भूमी होती. विद्वान् ऋषींना ती ठाऊक होती. ज्याला ती [ भूमी ] नांवानें ठाऊक असेल तो पुराणवेत्ता समजावा. ही ऋचा उत्तरध्रुववादासंबंधानें फार उपयुक्त आहे. ह्या मंत्राची रचना हिंदुस्थानांत झाली. तेव्हां हिंदुस्थानच्या व्यतिरिक्त जी थोडक्याच लोकांना माहीत आहे अशी दुसरी भूमी उत्तरध्रुवाकडील नसेल कशावरून ?

असो. ह्याप्रमाणें अथर्ववेदांत मोठी मनोरंजक माहिती आहे. ती समजून घेणें हें प्रत्येक पुराणजिज्ञासूचें कर्तव्य आहे.

[library stamp]

१०२६५

# अथर्ववेदांतील

## स्त्रीविषयक अभिचारमंत्र.

### पती मिळण्याकरितां. २–३६

हे अग्ने, नवरामुलगा आमच्या पसंतीला येवो. या आमच्या मुलीकडे ( तो ) भाग्य घेऊन येवो. वराच्यासंबंधानें हर्षयुक्त असलेली, लग्नसमारंभांत सुंदर दिसणारी ( अशी ही मुलगी आहे ). पतीच्या द्वारानें तिला लौकर सौभाग्य प्राप्त होवो. ( १ )

सोमानें उपभोगिलेलें, ब्रह्मदेवानें उपभोगिलेलें, अर्यमानें संपादन केलेलें ( असें हें कन्यारूपी ) भाग्य ( आहे. )

जगत्कर्त्या देवाची शपथ घेऊन मी ( या मुलीला ) पतिलाभ करून देतों. ( २ )

हे अग्ने, या स्त्रीला पती मिळो. कारण राजा सोम ( हिला ) भाग्यसंपन्न करितो.

पुत्र प्रसवून ( ती ) श्रेष्ठ भार्या होवो. पतीकडे गेल्यावर भाग्यशाली ( अशी ही स्त्री ) स्वामिनी होवो. ( ३ )

हे इन्द्र, ज्याप्रमाणें पशूंचें हें मनोहर निवासस्थान ( त्यांना ) प्रिय ( व ) सुखानें राहण्याला योग्य असें होतें, त्याप्रमाणें ही भाग्यवान् स्त्री पतीला प्रिय व न दुखविणारी अशी होवो. ( ४ )

( हे कन्ये, ) तूं भगाच्या पूर्ण आणि कमतरता न पावणाऱ्या नावेंत वस.

तिनें, जो उलट तुझ्यावर प्रीती करील त्या वराकडे ( आपल्याला ) घेउन जा. ( ५ )

हे धनपते, ( ही मुलगी माझी भार्या होवो असें ) वराला मोठ्यानें म्हणावयाला लाव. मुलीकडे मन लागेल असा त्याला कर. जो वर इष्ट असेल, त्याला सर्व प्रदक्षिणा घालतील असें कर. ( ६ )

हें सर्व सुवर्ण, गुग्गुळ, हें उटणें, त्याचप्रमाणें भग, यांनीं तुझ्यावर प्रेम करणारा पती मिळावा म्हणून तुला पतींना दिलें. (७)

सविता तुझ्याकडे ( पती ) घेऊन येवो. जो पती तुजवर उलट प्रेम करणारा असेल, तो तुला घेऊन जावो. हे वनस्पते, हिच्यासाठीं पती कर. ( हिला पती दे. ) ( ८ )

( प्रस्तुत सूक्त हें पतिलाभकर्मांगभूत आहे; म्हणजे पतीचा लाभ व्हावा या उद्देशानें केल्या जाणाऱ्या कर्माकडे या सूक्ताचा विनियोग कौशिकसूत्रांत सांगितला आहे. ( कौ. ३४-१२ ते १६ )

अतिथीकरितां खिचडी करितात तशी तांदूळ व तीळ यांची खिचडी करून ती विवाहेच्छू मुलीला खावयास देतात व खावयाच्या वेळीं तिनें हें सूक्त म्हणावयाचें असतें. त्याचप्रमाणें वनपशू राहतात अशा गुहेंतून माती आणून त्या मातीची वेदी करितात. त्या वेदीवर सातव्या ऋचेंत सांगितलेले पदार्थ म्हणजे सोनें, गुग्गुळ व अंजन ठेवितात, व हे पदार्थ पुढें मुलीला देतात. तसेंच रात्रीं हें सूक्त म्हणून जामी या देवतेला तांब्याच्या भांड्यांत तांदुळाची आहुती दिल्यावर त्या मुलीला वेदीभोंवतीं प्रदक्षिणा घालावयास लावतात. याच सूक्तांतील पांचवी ऋचा म्हणत असतां मुलगी नावेमध्यें बसते.

नंतर सात दावीं असलेल्या दोरखंडाला सात वासरें बांधतात, व मुलीकडून तीं सोडवितात. तिनें जर तीं डावीकडून उजवीकडे सोडून दिलीं, तर तिला पतिलाभ होईल असें समजावें.

[ ऋ. १–संभल हा शब्द अथर्ववेदांत दोन तीन ठिकाणींच आला आहे. संभृत आणि संभल हे संबंधी शब्द असावे, निदान त्यांचा सहोपयोग केलेला आढळतो. (उदा. १४–१–३१). संभल शब्दाचा अर्थ वर अथवा नवरामुलगा हाच असावा; व त्याच अर्थानें त्याचा उपयोग १४–२–६६ व ६७ यांत केलेला आढळतो.

आमच्या भाग्यासह, असा "सह नो भगेन" याचा अर्थ इंग्रजी भाषांतरकारानें केलेला आहे. आम्ही "नो" हा शब्द मुलीकडे लावून तो नवरा मुलगा भाग्य घेऊन येवो, असा अर्थ केला आहे.

" जुष्टा वरेषु समनेषु वल्गुः" याचा अर्थ सायणाचार्यांनीं "एक मतानें कन्यावरणार्थ वरपक्षाकडून आलेले जे लोक त्यांना संमत व प्रिय असलेली" असा केला आहे. परंतु 'समन' या शब्दाचा अर्थ विवाहोत्सव असा करणेंच अधिक प्रशस्त दिसतें. कारण ६–६०–२ या ठिकाणीं लग्नसमारंभ अशाच अर्थानें समन हा शब्द वापरलेला दिसतो. तेव्हां 'वरेषु जुष्टा' व 'समनेषु वल्गुः' असा अन्वय केलेलें इंग्रजी भाषांतर सायणाचार्यांपेक्षां अधिक मान्य होण्याजोगें आहे.

ऋ. २-- या मंत्रांत विवाहाच्यापूर्वी सोम, ब्रह्मा आणि अर्यमा या तिघांनीं कन्येला उपभोगिलें, असें म्हटलें आहे. परंतु ऋग्वेदांत ( १०--८५--४० ) सोम, गंधर्व आणि अग्नी या तीन देवतांनीं उपभोग घेतल्यानंतर कन्येचा मानुषपतीबरोबर विवाह होतो असें म्हटलें आहे. या ऋग्मंत्राला अनुसरून सायणाचार्यांनीं ब्रह्म म्हणजे

गंधर्व आणि अर्यमा ह्मणजे अग्नि असा अर्थ केला आहे. आम्हांस मुळचेच शब्द ठेवणें बरें वाटलें. धात्याचा विवाहाशीं संबंध असल्याचे उल्लेख अनेक ठिकाणीं येतात. धाता तुला गर्भ देवो, असा ऋग्मंत्र आहे. ( १०--१८४--१ )

अथर्ववेदांतहि पतीची इच्छा करणाऱ्या मुलीला धाता योग्य पती मिळवून देवो अशा अर्थाचा एक मंत्र आहे. ( ६--६०--३ ). "देवस्य सत्येन" याचा अर्थ 'देवाची शपथ घेऊन' असा आम्ही केला आहे.

इंद्राच्या जोडीला भगाचा उल्लेख बहुधा येतोच (६--८२)

ऋ. ५--हा मंत्र बराच महत्त्वाचा असावा. हा मंत्र म्हणत असतां विवाहोत्सुक कन्येला नावेमध्यें बसवावयाची असे. या मंत्रांतील नावेचें नुसतें रूपक नसावें. प्रत्यक्ष नावेमध्यें बसून एका ठिकाणचें लोक दुसऱ्या ठिकाणीं कन्येला बरोबर घेऊन जात असावे व ती चाल ह्या मंत्रांत प्रतिबिंबित झाली असावी.

प्रतिकाम्य म्हणजे उलट प्रीती करणारा असाच अर्थ असावा.

ऋ. ६-- धनपती या नांवानें इंद्राचाच निर्देश केला असावा असें ब्लूमफील्ड म्हणतो. पण तें निर्विवाद दिसत नाहीं. परंतु ५--२३--२ ह्या मंत्रावरून इंद्र आणि धनपती एकच असावे असें म्हणतां येण्यासारखें आहे.

ऋ. ७--औक्ष म्हणजे अंजन हा शब्द अक्षन् म्हणजे बैल ह्या शब्दावरून झाला असावा व त्यामुळें औक्ष म्हणजे बैलाची चरबी असावी असा अर्थ ब्लूमफील्डनें केला आहे. परंतु उक्ष--शिंपडणें ह्या क्रियापदावरून औक्ष शब्द झाला असल्यास ब्लूमफील्डचा अर्थ चुकला असावा. औक्ष म्हणजे प्रलेपनद्रव्य असें सायणाचार्य ह्मणतात.

## पती मिळावा ह्मणून ६--६०

या मुलीला पती मिळावा, तसेंच स्त्री नसलेल्याला स्त्री मिळावी, अशी इच्छा धरून हा बद्धकेश अर्यमा पूर्वेकडून येत आहे. (१)

हे अर्यमन्, दुसऱ्याच्या लग्नसमारंभास जाऊन ही कंटाळली आहे. आतां हे अर्यमन्, हिच्या लग्नसमारंभाला दुसऱ्या स्त्रिया येवोत. (२)

धाता पृथ्वीचें नियंत्रण करितो. धाता द्युलोकाचें आणि सूर्याचें नियंत्रण करितो. या मुलीला धाता तिच्यावर प्रीती करणारा पती देवो. (३)

आकाशांत कावळे संचार करूं लागण्यापूर्वी म्हणजे पहाटेस पतिलाभकर्मांत हें सूक्त म्हणून अग्नींत आहुती द्यावयाची असते. ( कौ. ३४--२२ ते २४ )

[ऋ. १–पुरस्तात् म्हणजे 'पूर्वेच्या दिशेला' असा सायणाचार्यांनीं अर्थ केला आहे व इंग्रजी भाषांतरकारानें "पुढच्या बाजूस मोकळे आहेत केस ज्याचे" असा अर्थ "पुरस्तात् विषितस्तुपः" याचा केला आहे. आम्ही सायणाचार्यांचा अर्थ ग्राह्य धरला.

ऋ. २–आयति हें एकवचन आहे, परंतु येथें अनेकवचन पाहिजे. 'व्यत्ययेन एकवचनं' असें सायणाचार्य म्हणतात. आयति म्हणजे येवोत असा अर्थ आम्ही केला आहे. ]

## भार्यालाभार्थ. ६–८२

नियमस्थ असा मी येणाऱ्याचें, आलेल्याचें नांव उच्चारितों. शंभर यज्ञ करणारा, वसू ज्याची उपासना करितात असा, वृत्राला मारणारा, अशा इन्द्राची मी याचना करितों. (१)

ज्या मार्गानें सूर्यानामक सवित्याच्या मुलीबरोबर अश्विनीकुमार विवाहबद्ध झाले, त्याच (मार्गानें) (तूं) जायेशीं विवाह कर असें मला भग म्हणाला... (२)

हे इन्द्रा, जो तुझा सुवर्णमय, संपत्ती देणारा, अंकुशासारखा हात त्यानें, हे शचीपते, स्त्रीची इच्छा करणाऱ्या मला भार्या दे...(३)

( ह्या सूक्ताचा विनियोग कौ. ५९–११ व ७८–१० ह्यांत सांगितला आहे.)

## वधूवरांना आशीर्वाद. ६–७८

त्या (प्रसिद्ध) समृद्धिकारक हवनानें हा (पती) पुनः (पुनः पुनः?) समृद्ध होवो.

जिला ह्याच्याकरतां पत्नी म्हणून आणली ती दुभत्यानें समृद्ध होवो. (१)

दूधदुभत्यानें समृद्ध होवो; राष्ट्रानें समृद्ध होवो; सहस्रतेजांच्या संपत्तीच्या योगानें हें दांपत्य ज्यांना कांहीं उणें नाहीं असें असो.(२)

त्वष्ट्यानें जाया निर्माण केली, हिच्याकरितां त्वष्ट्यानें तुला पती (म्हणून निर्माण केलें);

त्वष्टा तुम्हां दोघांना हजार आयुष्यें (देवो), दीर्घ आयुष्य करो. (३)

(ह्या सूक्ताच्या विनियोगाकरतां कौ. ७८–१० व १४ ते १६ पहा.)

(विवाहहोमांत तुपाची आहुती देऊन अवशेष वधूवरांच्या मस्तकावर सोडतात. तसेंच ह्या तीन ऋचांनीं अन्न मंत्रून तें वधूवरांस देतात. मग तीं एकत्र बसून तें भक्षण करतात. शेवटीं घृतमिश्र यवांची पूर्णाहुती देतात.)

ऋ. १ चौथ्या पादांत "ता" च्या ऐवजीं "सा" कल्पून भाषांतर केलें आहे. पैप्पलादाचा पाठ तसाच आहे. सायणांनीं 'छन्दस्युभयथा" असें म्हणून 'अभिवर्धताम्' हें प्रयोजक क्रियापद मानलें आहे व कर्ता अग्नी धरला आहे. दूधदुभतें देऊन अग्नी तिला पुष्ट करो असा त्यांचा अर्थ. ब्लूमफील्डनें पती हा कर्ता मानून पत्नीपेक्षां पती सरस होवो असा अर्थ केला आहे. ऋग्वेदांतील एका ऋचेला अनुसरून (ऋ. १–१०५–२) रस म्हणजे रेत असेंहि त्यानें सुचविलें आहे.

ऋ. २– राष्ट्राच्या योगानें सामान्य माणसाची अभिवृद्धी कशी होणार तें नीट समजत नाहीं. कारण त्याला राष्ट्र कसें मिळावें ? मूळ हा मंत्र राजाच्या संबंधानें म्हटला असेल.

## वधूवरांचें प्रेमदर्शक. ७–३७

मधासारखे (तेजस्वी) आपले डोळे होवोत. आपला (डोळयांचा) अग्रभाग एकदमच अंजनयुक्त होवो. मला अंतर्हृदयांत ठेव. आपलें मन समान असो.

(सदरहू ऋचा लग्नाच्या चौथ्या दिवशीं वधूवर परस्परांच्या डोळयांत अंजन घालीत असतांना म्हणतात.–(कौशिक ७९-२) तसेंच मधुप नांवाच्या मण्याचें चूर्ण करून डोळयांमध्यें तें टाकतात. नंतर अभिमंत्रण करून वधूवर परस्परांना आलिंगन देतात.)

## वधूनें वराला म्हणावयाचा मंत्र. ७–३८

मनुष्यानें केलेल्या माझ्या वस्त्रानें मी तुला बांधतें म्हणजे (तूं) माझ्या एकटीचा होशील. दुसऱ्या स्त्रियांचें नांवहि काढणार नाहींस.

(हाहि मंत्र विवाहाच्या चौथ्या दिवशींच म्हणावयाचा असतो.

कौशिकसूत्राप्रमाणें (७९–७) हा मंत्र म्हणत असतां वधू पतीला आपल्या वस्त्रानें आच्छादिते.)

"मनुजातेन" म्हणजे मनूनें केलेलें असा अर्थ इंग्रजी भाषांतरकारांनीं केलेला आहे, तो चुकीचा असावा असें आम्हांस वाटतें. मनु म्हणजे मनुष्य. मानवांचा पूर्वज जो मनु तो नव्हे. म्हणून मनु या शब्दाचा अर्थ मनुष्य असा आम्ही केला आहे.

ह्याला कौशिकसूत्रांतच आधार आहे (कौशिकसूत्र १०६); तेथें देवांनीं असुरांना, यातूंना, मनूंना, गंधर्वांना आणि राक्षसांना निर्माण केलें असें म्हटलें आहे.

"याभिर्देवा असुरानकल्पयन्यातून् मनून् गंधर्वान् राक्षसांश्च।"

ह्याशिवाय, देवांचें वस्त्र व मनुजांचें वस्त्र असा फरक इतरत्रहि आढळतो. (अ. १४--२--४१)

देवांनीं तशींच मनुष्यांनीं दिलेलीं वधूचीं वस्त्रें जो विद्वान ब्राह्मणांना दान करतो तो राक्षसांचा वध करूं शकतो असा त्या मंत्राचा सारांश आहे.

## गर्भधारणार्थ ६--८१

( तूं ) नियंता आहेस; हात उचल, राक्षसांना हाकलून लाव.
हा परिहस्त (गंडा) प्रजा व धन घेणारा झाला. (१)

हे परिहस्त, गर्भधारणेसाठीं ( ह्या स्त्रीची ) योनी विवृत कर.
गर्भाशयांत पुत्राधान कर; ( योग्य ) कालीं तूं त्याला बाहेर काढ. (२)

पुत्राच्या इच्छेनें ज्या परिहस्ताला अदितीनें धारण केलें
तो त्वष्ट्यानें (हिनें) पुत्र उत्पन्न करावा म्हणून हिच्या (हाताला) बांधला. ( ३ )

( गर्भाधानाच्या वेळेस ह्या सूक्तानें कंकण, गंडा वगैरे अभिमंत्रून नवरा बायकोच्या हातांत बांधतो. ( कौ. ३५--११ ) गृह्यसूत्रांत असला विधी सांगितलेला नाहीं.)

[ ऋ. १--हा मंत्र अग्निदेवतेला उद्देशून आहे असें सायणाचार्य म्हणतात. पण परिहस्तालाच उद्देशून कां नसावा ?

ऋ. २--'मर्यादे' ह्या शब्दाचा अर्थ संदिग्ध आहे. मर्यादा ह्या शब्दाचें तें संबोधनहि असूं शकेल. पण मग मर्यादा म्हणजे परिहस्त समजणें अवश्य आहे. मर्य म्हणजे मरणशील असे मानव. त्यांनीं उत्पत्यर्थ जिचा अंगिकार केला आहे अशी योनी अथवा गर्भाशय असा अर्थ सायण करतात. आह्मी भाषांतरांत तोच स्वीकारला आहे.]

### पुत्र व्हावा म्हणून, ३--२३

ज्याच्या योगानें तूं वंध्या झाली आहेस तें तुझ्यापासून ( दूर काढून टाकून ) मी नष्ट करतों.

तें हें मी तुझ्याहून अन्य ठिकाणीं दूर फेकून देतों. (१)

बाण भात्यांत येतो त्याप्रमाणें पुरुषगर्भ तुझ्या योनींत येवो.

ह्या ठिकाणीं दहा महिन्यांचा वीरपुत्र तुला उत्पन्न होवो. (२)

पौरुषयुक्त पुत्र (तूं) उत्पन्न कर; त्याच्यामागून पुत्र (च) जन्मास येवो. जन्मास आलेल्या पुत्रांची (तूं) माता हो; ज्यांना (पुढें) (तूं) जन्म देशील (त्यांचीहि माता हो). (३)

जीं अमोघवीर्य बीजें बैल उत्पन्न करतात त्यांनीं तूं पुत्र प्राप्त करून घे; तीं तूं प्रसवणारी धेनू (च) हो. (४)

(मी) तुझ्यासंबंधीचें प्रजापतीचें कर्म करतों. तुझ्या योनींत गर्भ येवो.

हे नारि, जो तुला कल्याणकारक होईल असा पुत्र तूं संपादन कर; त्याला तूं सुखावह हो. (५)

ज्या लतांचा पिता द्यौ, माता पृथ्वी, मूळ समुद्र झाला त्या दिव्य ओषधी पुत्रप्राप्तीकरतां तुझें संरक्षण करोत. (६)

[पुंसवन कर्मांत बाणाचें अभिमंत्रण करून तो बाण स्त्रीच्या मस्तकावर मोडतात; बाणाचा एक तुकडा घेऊन तो तिच्या शरीरावर बांधतात. तसेंच नांगराच्या फाळाचा चमस करतात. त्यांत ज्या गायीचें वासरू तिच्याच रंगाचें असेल अशा गायीचें दूध (अन्य सूत्रांत दहीं सांगितलें आहे) ओततात, त्यांत नंतर यव आणि तांदूळ टाकून कालवतात आणि अध्यंडा झाडाचीं दोन पानें मिसळतात, अथवा पलाश आणि विदारी ह्या दोन वनस्पती एकत्र कुटून झालेलें चूर्ण ह्या सूक्तानें अभिमंत्रित करतात. मग उजव्या हाताच्या अंगठ्यानें तें स्त्रीच्या उजव्या नाकपुडींत घालतात. (कौ. ३५; १ ते ४).

ऋ. २– चान्द्रमासाप्रमाणें गणना केली म्हणजे दहा महिनेच गर्भधारणकाल असतो.

ऋ. ५–मी तुझ्या संबंधानें प्रजापतीचें कर्म करतों. ह्या वाक्यावरून हा मंत्र पतीनेंच म्हणावयाचा असला पाहिजे. आणि असें असेल तर निरनिराळ्या ऋचा संकलित केल्याचें उघड होतें. पतिव्यतिरिक्त मांत्रिकाच्या तोंडांत हा मंत्र चांगलासा वाटत नाहीं.

ऋ. ६–ह्यांतील पहिला चरण पुढें आला आहे. (८-७-२ पहा)].

## पुत्र व्हावा म्हणून. ६–११

अश्वत्थवृक्ष शमीच्या झाडावर आरूढ झाला; तेथेंच पुत्रोत्पादन कर्म केलें.

अशानेंच पुत्राची प्राप्ती होते. आम्ही स्त्रियांच्या ठिकाणीं तेंच करतों. (१)

पुरुषाच्या ठिकाणीं रेतोत्पत्ती होते; तें (रेत) स्त्रीच्या ठिकाणीं अनुषिक्त करतात; ह्याच रीतीनें पुत्रप्राप्ती होते. असें प्रजापती म्हणाला. (२)

स्त्रीगर्भ अन्य ठिकाणीं करून येथें पुरुषगर्भच करून प्रजापती, अनुमती आणि सिनीवाली ह्यांनीं (गर्भाला) आकार दिला. (३)

(ह्याहि सूक्ताचा पुंसवन संस्कार करतांना उपयोग करितात.)

अश्वत्थ आणि शमी ह्यांच्या मंथनानें अग्नी उत्पन्न करतात. नंतर गोऱ्हा असलेल्या गायीच्या दुधापासून केलेल्या तुपांत तो अग्नी टाकतात. मग गर्भवती स्त्रीच्या उजव्या नाकपुडींत हाताच्या अंगठ्यानें तें तूप घालतात. तसेंच मधुमिश्र पेयांत अग्नी टाकून तें पेय स्त्रीला प्यावयास देतात. ह्याशिवाय काळी अथवा बैलाची लोकर अग्नीभोंवतीं पसरून नंतर ती ताइताप्रमाणें स्त्रीच्या हाताला बांधतात. (कौ. ३५-८ ते १०).

ऋ. १--तैत्तिरीय ब्राह्मणांत अशी आख्यायिका आहे कीं, देवांपासून अग्नी निघाल्यावर त्यानें अश्वरूप धारण केलें आणि अश्वत्थवृक्षावर तो एक संवत्सरपर्यंत राहिला. म्हणून त्या वृक्षाला अश्वत्थ म्हणूं लागले. (तै. ब्रा. १. १. ९. १) पुत्रप्राप्तीसाठीं पिंपळाला प्रदक्षिणा घालण्याच्या चालीचा उगम ह्या मंत्रांत आढळतो.

ऋ. २--पुरुषामध्यें प्रथम गर्भधारणा होते असें ऐ. ब्राह्मणांत सांगितलें आहे. (ऐ. ब्रा. २. ५. १)

ऋ. ३--प्रजापती म्हणजे संवत्सरात्मक देवता, अनुमती म्हणजे पौर्णमासी देवता, आणिं सिनीवाली म्हणजे अमावास्या देवता, असें

सायणाचार्य म्हणतात. कौशिकसूत्राचा व गोपथ ब्राह्मणाचा त्याला आधार आहे. (कौ. १-२९ व ३० गो. ब्रा. २-१-१०)

### संतति होऊं नये म्हणून. ७–३६

हे जातवेद, (तूं) आमच्या दुसऱ्या शत्रूंचा एकदम पराभव कर; जन्मास न आलेल्यांचा (पुढें उत्पन्न होणाऱ्यांचा) (तूं) समाचार घे. हें राष्ट्र भाग्यानें भरून टाक; सर्व देव याला पाठबळ देवोत. (१)

ह्या ज्या तुझ्या शंभर नाड्या व हजार धमन्या त्या तुझ्या सर्वांचें मुख मी दगडानें बंद करतों. ( २ )

तुझ्या योनीचा वरचा भाग ( मी ) खालीं करतों; तुला संतती अथवा मुलगा न होवो; ( मी ) तुला वांझ आणि संततिहीन करतों; तुझ्या ( गर्भाशयाला ) दगडाचें झांकण करतों. ( ३ )

शत्रूंच्या स्त्रियांना संतती न होऊन त्यांचें संख्याबल कमी व्हावें ह्या कारणास्तव ह्या सूक्तांतील मन्त्रांचा उपयोग करतात. ( कौ. ३६–३३ व ३४ ).

पुत्र होऊं नये असें वाटत असल्यास "अग्ने जातान्" हा मंत्र ( ७–३५ ) म्हणतात. ह्या मन्त्राचा अर्थ असा:—हे अग्ने, उत्पन्न झालेल्या माझ्या शत्रूंचा नाश कर; हे अग्ने, जन्मास न आलेल्यांचा नाश कर; ( आमच्याशीं ) युद्ध करण्याची इच्छा करणारांना पाया-खालीं घाल. आम्ही अदितीच्या दृष्टीनें निष्पाप असावें.

मुळींच संतती होऊं नये म्हणून ७–३६ ह्या सूक्तांचा उपयोग सांगितला आहे. दोन्ही ठिकाणीं खेचरीचें मूत्र दोन दगडांत घांसून तें भातांत घालतात व तो भात स्त्रीस खावयास देतात किंवा एखादा अलंकार त्या मूत्रांत भिजवून तो स्त्रीच्या अंगावर घालतात. अभि-चारमन्त्र म्हणत असतां मन्त्रकार स्त्रीच्या भांगाकडे बघत असतो.

खेचरी गर्भधारण करीत नाहीं असा समज आहे. अग्नीनें आपल्या रथास खेचरी लावल्या. शेपूट धरून जोरानें हांकीत असतां त्यांची योनी पीडित झाली. म्हणून खेचरी गर्भधारणा करीत नाहीं अशी ऐतरेय ब्राह्मणांत आख्यायिका आहे. ( ४-९-१ )

ऋ. १— खालील दोन ऋचांशीं ही ऋचा सुसंगत दिसत नाहीं. हा मन्त्र युद्धविषयक आहे.

ऋ. २— शत व सहस्र ह्यांचा अर्थ पुष्कळ, अनेक असाच घेतला पाहिजे.

## गर्भपात टाळण्याकरितां. ६–१७

ज्याप्रमाणें ह्या मोठ्या पृथ्वीनें प्राणिमात्राचा गर्भ धारण केला त्याप्रमाणेंच तुझा गर्भ पुत्रप्रसूतीसाठीं (गर्भाशयाला) धरून राहो.(१)

ज्याप्रमाणें ह्या मोठ्या पृथ्वीनें ह्या वनस्पतींना धारण केलें, त्याप्रमाणेंच तुझा गर्भ पुत्रप्रसूतीसाठीं (गर्भाशयाला) धरून राहो.(२)

ज्याप्रमाणें ह्या मोठ्या पृथ्वीनें पर्वत, (व) डोंगर धारण केले (करते), त्याप्रमाणें तुझा गर्भ पुत्रप्रसूतीसाठीं (गर्भाशयाला) धरून राहो (३)

ज्याप्रमाणें ह्या मोठ्या पृथ्वीनें विविध जग धारण केलें, त्याप्रमाणेंच तुझा गर्भ पुत्रप्रसूतीसाठीं (गर्भाशयाला) धरून राहो.(४)

गर्भपात होऊं नये, गर्भ स्थिर रहावा म्हणून जें कर्म केलें जातें त्यांत ह्या सूक्ताचा उपयोग करतात.

धनुष्याच्या दोरीला तीन गांठी मारून ती दोरी स्त्रीला बांधतात. गर्भाला बांधतात हें ब्लूमफील्डचें म्हणणें अव्यवहार्य व निराधार दिसतें. तसेंच ह्या सूक्तांतील मंत्रांनीं शेतांतील माती मन्त्रून ती

गर्भिणीस खावयास देतात. आणि काळी रेती मन्त्रून गर्भार स्त्रीच्या अंथरुणाभोंवतीं पसरतात. (कौ. ३५-१२ ते १५).

## सुखप्रसूतीसाठीं. १ – ११

हे पूषन्, ह्या प्रसूतींत अर्यमा, (आणि) ब्रह्मदेव होत्याचें काम करून तुला वषट्करोत.

जिवंत मूल उपजलें आहे जिचें अशी होत्साती (ही) स्त्री (सुखरूप) सुटो; (सुख-प्रसवार्थ) (हिचे) सांधे शिथिल होवोत. (१)

आकाशाच्या चार दिशा व पृथ्वीच्या चार दिशा (ह्यांनीं—दिक्पालांनीं, व देवांनीं) गर्भ पाठविला; त्याला (ते) प्रसूतीकरतां आच्छादनांतून बाहेर काढोत. (२)

सूषा निराच्छादित करो, (आम्ही) (योनी) मार्ग उघडतों. सूषणे, तूं (योनी) शिथिल कर, बिष्कले तूं (गर्भाला) खालीं सोड. (३)

मांसांत न (खिळलेली), चरबींत न (खिळलेली), मगजांत न (खिळलेली), शेवाळीसारखी दिसणारी रंगीबेरंगी नाळ कुत्र्याला खाण्याकरितां खालीं पडो; नाळ खालीं पडो. ( ४ )

( मी ) तुझें मूत्रद्वार, योनी (व) गवीनिका (गर्भाशयाखालच्या दोन नाड्या ) ह्यांचा फाड करतों. माता आणि पुत्र ह्यांना ( वेगळीं करतों. ) नाळेपासून बालकाला ( वेगळा करतों ). नाळ खालीं जमिनीवर पडो. ( ५ )

जसा वायू, जसें मन, जसे पक्षी पडतात तसा तूं हे दशमास्य नाळेसकट खालीं पड, नाळ पडो. ( ६ )

ह्या सूक्ताचा विनियोग कौशिक सूत्र ३३ मध्यें सांगितला आहे. तथापि प्रयोग व ऋचा ह्यांचा मेळ घालतां येतोच असें नाहीं. सुखप्रसूति व्हावी म्हणून जें कर्म केलें जातें त्यांत बराचसा भाग गर्भि-

णीच्या जीवाला धोका आहे कीं काय, तिला पुत्र होईल कीं कन्या होईल, ह्यासंबंधीं आहे. आतां बाळंतिणीला मुलगा होऊन तिची बिनधास्त सुटका होणें इतक्या व्यापक अर्थानें सुखप्रसव हा शब्द आपण समजलों, तर मात्र विसंगती वाटण्याचें कारण नाहीं.

सूक्तांतील ऋचा म्हणत असतां जलपात्रांत आज्य ओतून गर्भिणी स्त्रीच्या मस्तकावर पूर्वेकडे अग्र करून चार मुंज गवताच्या काड्या कापून ठेवतात. ह्या काड्या मोडल्या तर ( मुलाला, कोणाच्या मतें स्त्रीला ) संकट आहे म्हणून समजावें. मांत्रिक उष्णोदकानें गर्भिणी स्त्रीला स्नान घालतो. नंतर सूतिकागृहाचे बंद तोडतात ( वगैरे. )

ऋ. १–प्रसवकर्म म्हणजे एक प्रकारचा यज्ञ आहे अशी येथें कल्पना केली आहे.

"ऋतं प्रजाता" ह्याचा सायणाचार्यांनीं केलेला अर्थ बरा दिसतो. व तोच भाषांतरांत मान्य केला आहे. इंग्रजी भाषांतरकार भलताच अर्थ करतात.

ऋ. २—"तं"च्या ठिकाणीं "तां" घेऊन ब्लूमफील्डनें भाषांतर केलें आहे. पण त्याची मुळींच अवश्यकता नव्हती.

ऋ. ३—बिष्कलि म्हणजे सूतिमारुत (वायु) असें सायण म्हणतात. सूषा, सूषणा व बिष्कलि ह्या कवीच्या काल्पनिक देवता असाव्या.

ऋ. ४—"मज्जसु" ह्याला अनुरूप "मांसे न" अशीं पदें पाडणें सयुक्तिक दिसतें. सायणाचार्य "मांसेन" असें वाचतात. "शेवलं" ह्याच्या ऐवजीं "केवलम्" मानण्याचें कांहीं कारण नाहीं.

## स्त्रीचें प्रेम बसावें म्हणून. १—३४

हा वेल माधुर्याकरतां निर्माण झाला आहे. आम्ही तुला माधुर्यानें खणतों.

ऋ. २--कामिनी म्हणजे कामिनौ असें समजून तें आश्विनींचें विशेषण मानतां येईल. पण या सगळ्याच मंत्राचा अर्थ इंग्रजी भाषांतरकारांना सोडून, पण सायणाचार्यांना धरून केला आहे. दुसऱ्या ओळीमध्यें अश्विनींचें भाग्य, त्यांचा विचार व त्यांचीं कर्में या सर्वांचा विनियोग माझ्या कार्याकडे होवो, अशी अश्विनींची प्रार्थना मंत्रकार करितो.

ऋ. ३--या मंत्रापासून चांगलासा अर्थबोध होत नाहीं.

विश्वरूपाणाम् याचा अर्थ 'सर्व प्रकारचीं रूपें धारण करणाऱ्या' असा केला आहे. सायणाचार्यांनीं 'संपूर्ण अवयव आहेत ज्यांना' असा केला आहे. तोहि अग्राह्य म्हणतां येणार नाहीं.

## स्त्रीवशीकरणार्थ ६--८

ज्याप्रमाणें लता वृक्षाला सर्व बाजूंनीं वेढून टाकते त्याप्रमाणें तूं मला वेढून टाक ( आलिंगन दे. ) म्हणजे तूं मजवर प्रेम करणारी होशील, तसेंच तूं माझ्यापासून पराङ्मुख होणार नाहींस. (१)

ज्याप्रमाणें गरुडपक्षी उड्डाण करतांना आपले पंख जमिनीवर आपटतो, त्याप्रमाणेंच मी तुझें मन पीडित करतों. कारण कीं, तूं माझ्यावर प्रेम करणारी व्हावीस व माझ्यापासून पराङ्मुख होऊं नयेस. (२)

ज्याप्रमाणें सूर्य, आकाश व पृथ्वी एकदम व्यापून टाकतो, त्याचप्रमाणें मी तुझें मन व्यापतों. अशाकरितां कीं तूं माझ्यावर प्रेम करणारी व्हावीस व माझ्यापासून पराङ्मुख होऊं नयेस. (३)

२--३० या सूक्ताप्रमाणेंच प्रस्तुत सूक्ताचा विनियोग स्त्रीवशीकरणकर्माकडे करतात.

## स्त्रीवशीकरणार्थ ६-९

माझ्या शरिराची इच्छा धर, पायांची इच्छा धर, डोळे आणि मांड्या यांची इच्छा धर. माझ्यावर आसक्त झालेल्या तुझे डोळे आणि केश कामानें शुष्क होवोत. (१)

( माझ्या ) बाहूंना कवटाळणारी, ( माझ्या ) हृदयाला आलिंगन देणारी अशी तुला मी करतों. अशाकरितां कीं, तूं माझ्या क्रुतींत असशील, माझ्या चित्ताप्रत येशील. (२)

ज्यांचें चाटण म्हणजे नाभि, (ज्यांच्या) हृदयांत प्रेम लावलें आहे, त्या तूप देणाऱ्या गायीं हिला माझ्यावर प्रेम करावयास लावोत.

ह्या सूक्ताचाहि विनियोग ६--८ प्रमाणेंच आहे.

ऋ. १--तुझें शोभिवंत केश व नेत्र मला शुष्क करोत, असा सायणाचार्य अर्थ करतात. ( ३-२५-३,४ पाहा. )

ऋ. २--दुसरी ओळ वारंवार येणारी आहे. ( १--३४--२; ३--५--५ पाहा. )

ऋ. ३--"यासां म्हणजे ज्या स्त्रियांचें असा सायण अर्थ करतात. पण इंग्रजी भाषांतरकारांनीं तो शब्द खालच्या ओळींतील गायीकडे घेतला आहे. त्याचप्रमाणें आम्ही भाषांतर केलें आहे. गायीचें प्रेम सर्वश्रुतच आहे.

## स्त्रीवशीकरणार्थ ६--१०२

हे अश्वी, ज्याप्रमाणें हा शिकलेला घोडा ( हांकलणाराकडे ) आनंदानें येतो, आणि त्याच्या इच्छेप्रमाणें वागतो त्याप्रमाणें तुझें मन माझ्याकडे येवो, आणि मला अनुरूप असें होवो. (१)

राजाश्व कंठाळी घोडीला ओढीत नेतो, त्याप्रमाणें मी तुझें मन ओढून घेतों.

वायूनें छिन्न झालेल्या गवताप्रमाणें तुझें मन माझ्याभोंवतीं घिरट्या घालो. (२)

अंजन, जेष्ठीमध, कोळींजन, उशीर, यांची उटी, शीघ्रगति असा जो भग त्याच्या हातांनीं मी आणतों. (३)

याहि सूक्ताचा उपयोग स्त्रीवशीकरणाकडेच केला जातो.

ऋ. १--शेत नांगरण्यास घोडे वापरीत असत व त्यावरूनच या मंत्रांतील घोड्याची उपमा सुचलेली दिसते. ( ३--१७--६ पाहा. ) अश्विनींचा शेतकीशीं संबंध आहेच, ( ऋग्वेद १-११७-२१ )

ऋ. २-'पृष्ठ्यः' हा शब्द भारतामध्यें कंठाळी घोडें या अर्थी आलेला आहे. ( भा. १--२२१--५१ ). पृष्ठ्या हें पृष्ठ्यः याचें स्त्रीलिंगी रूप. पृष्ट्यः व पृष्ठ्यः हे एकच शब्द असावेत.

## स्त्रीवशीकरणाकडे. ३—२५

उत्तुद देव ( कामदेव ? ) तुला पीडित करो, आपल्या शयनावर मला धारण कर;

कामदेवाचा जो तापदायक बाण त्यानें ( तुझ्या ) हृदयांत तुला वेधतों. ( १ )

ज्याचीं पिसें म्हणजे मानसिक व्यथा, ज्याचें शल्य म्हणजे काम, ज्याचा दांडा म्हणजे संकल्प असा जो बाण तो (धनुष्यावर चांगल्या रीतीनें चढवून कामदेव ( तुझ्या ) हृदयांत तुला खुपसो. ( २ )

( धनुष्यावर ) चांगल्या रीतीनें चढवलेला कामदेवाचा बाण, जो प्लीहा शोषून टाकतो, ज्याचे पंख पुढें आहेत, जो दाह उत्पन्न करतो, त्यानें मी ( तुझ्या ) हृदयांत तुला भोकसतों. ( ३ )

शुष्क करून सोडणाऱ्या, दाहोत्पादक ( बाणानें विद्ध झालेली, ) सुखटलेल्या तोंडाची तूं मजकडे ये. मार्दवयुक्त, क्रुद्ध न होणारी

माझ्यावरच आसक्त असलेली, प्रिय भाषण करणारी, माझ्या अनुरोधानें वागणारी ( अशी तूं हो. ) ( ४ )

मी तुला आईपासून तसेंच बापापासून दोरीनें खेंचून पुढें घालतों. कारण कीं, तूं माझ्या ताब्यांत राहावेंस, माझ्या मर्जीप्रमाणें वागावेंस ( ५ )

हे मित्रावरुणौ, हिच्या अन्तःकरणांतून (सर्व ) विचार काढून टाका. नंतर हिला कर्तृत्वहीन करून मलाच वश झालेली ( अशी तिला करा.) ( ६ )

स्त्रीवशीकरणकर्माकडे ह्या सूक्ताचा विनियोग करतात.

हें सूक्त म्हणत असतां स्त्रीला वश करूं इच्छिणारा त्या स्त्रीला आंगठ्यानें पुढें ढकलतो. हें सूक्त म्हणत घृतमिश्र अशा २१ बोरीच्या कांट्यांची आहुती अग्नींत द्यावी. ह्या सूक्तानें लोणी लावलेलें कोळिंजन त्रिकाल अग्नींत टाकून हवन करावें. तसेंच हें सूक्त मुखानें म्हणत चटईची खालची बाजू खालीं करून ती चटई खाटेवर पसरून तीन रात्र त्या खाटेवर निजावें. ( मूळ सूत्र " दीर्घोत्पलेऽवगृह्य संविशति " असें आहे. त्याचा अर्थ नीट समजत नाहीं. दारिल आणि केशव ह्यांना अनुसरून चाचपडत अर्थ केला आहे. खट्वाया अधोमुखपट्टिकां गृहीत्वा त्रिरात्रं स्वप्यात् (सायण). ह्याचा अर्थ बाजेवरच्या अंथरुणांतलें अगदीं शेवटलें म्हणजे प्रथम घातलेलें वस्त्र घेऊन त्रिरात्र निजावें असा होईल काय ? )

तिपायी शिंक्यामध्यें उष्णोदक बांधून स्त्रीवशीकरणेच्छू तोंडानें सूक्त म्हणतो आणि पायांच्या आंगठ्यांनीं त्याचें मर्दन करीत पडून राहतो.

तसेंच, जिला वश करावयाचें तिची मातीची प्रतिकृती ( चित्र )

करून तिचा सूक्तांत सांगितलेल्या लक्षणांनीं युक्त अशा बाणानें वेध करतो. ( कौ. ३५; २२ ते २८ ).

ऋ. १—मा म्हणजे मां असें समजून येथें अर्थ केला आहे. सायण व युरोपियन भाषांतरकार दुसऱ्या चरणाचा अर्थ आपल्या शयनाला चिकटून राहूं नको असा करतात.

ऋ. ५—ह्यावरून ही लग्न झालेली स्त्री नसावी असें वाटतें.

[ह्यांतली दुसरी ओळ पुनः पुनः इतरत्रहि आलेली आहे. उ. ६--४२--३; ६--४३--३. ]

## वशीकरणाच्या कामीं ६—१३९

हे न्यस्तिके, माझें कल्याण करणारी ( अशी ) तूं वाढली आहेस; तुझ्या ऊर्ध्वमुखी अशा शंभर फांद्या आहेत. ) तेहतीस अधोमुखी ( आहेत ). त्या हजार पानांच्या झाडानें ( हे कामिनी, ) मी तुझें हृदय शोषून घेतों. ( १ )

माझ्याकरतां तुझें हृदय सुकून जावो, तसेंच मुख सुकून जावो; माझ्यामुळें कामवासनेनें तूं शुष्क हो, तसेंच म्लानमुखी होत्साती माझ्या मागोमाग ये. ( २ )

हे पीतवर्णे, कल्याणी, वशीकरणशीले, ( ओषधे, ) तूं फलवती होत्साती ( त्या स्त्रीला ) माझ्याजवळ आण; तिला व मला एकत्र कर, समान अंतःकरण कर. ( ३ ).

जसें पाणी न प्यालेल्याचें तोंड सुकतें, तसें माझ्यापायीं कामवासनेनें तूं शुष्क हो, व म्लानमुख होत्साती माझ्या मागोमाग ये. ( ४ )

ज्याप्रमाणें नकुल सर्पाला फाडून पुनः सांधतो, त्याप्रमाणें हे वीर्ययुक्त वनस्पते, कामानें विच्छिन्न झालेल्याला सांध. (५)

ह्याहि सूक्ताचा विनियोग स्त्रीवशीकरणाच्या कामीं करतात. ( कौ. ३६--१२ ) ज्या वनस्पतीला उद्देशून हे मन्त्र रचले, त्या वनस्पतीचा नामनिर्देश कोणत्याहि ऋचेंत नाहीं. त्यावरून पाहिल्याच मन्त्रांतील न्यस्तिका हें वनस्पतीचें नांव असावें असा संशय येतो.

ऋ. ५—मुंगूस सापाचे तुकडे करून पुनः ते जोडतो ह्या लौकिक समजुतीचें बीज ह्या मन्त्रांत आहे.

## पुरुषाचें प्रेम बसावें म्हणून ७-३९

माझ्याकडे पाहणारी, डोळ्यांतून पाणी आणणारी ही वनस्पती मी खणतों. दूर जाणाराला परत फिरविणारी जवळ येणाराचें अभिनंदन करणारी ( अशी ही वनस्पती आहे.) (१)

ज्याच्या योगानें आसुरीनें देवांकडून इंद्राला ओढलें; त्यानें मी तुला ओढून घेतें म्हणजे तुला मी सुप्रिय अशी होईन. (२)

तूं सोमाभिमुख आहेस, तूं सूर्याभिमुख आहेस; तूं सर्व देवांच्याकडे तोंड करून आहेस, त्या तुझी आम्ही स्तुती करितों. (३)

मी बोलतें. तूं ( बोलूं ) नकोस, तूं सभेमध्यें बोल; तूं केवळ माझाच हो, दुसऱ्या स्त्रियांचें नांवहि काढूं नकोस. (४)

तूं लोकांना दिसणार नाहीं असा अस किंवा नदीच्या पलीकडे अस; ही औषधी तुला बांधून माझ्याकडे आणील. (५)

ह्या सूक्ताकरतां कौ. ३६-१२ पाहा. सायणांप्रमाणें 'इदं खनामि' ह्या सूक्तानें सुवर्चला वनस्पतीचें मूळ खणून अभिमंत्रण करून बांधावें. तसेंच ह्या सूक्तानें शंखपुष्पीचें फूल मंत्रून स्त्रीच्या मस्तकावर बांधावें. त्याचप्रमाणें ह्या सूक्तानें सुवर्चला वनस्पतीचें पांढरें फूल डोक्यावर ठेवून गांवांत प्रवेश करावा.

ऋ. १— पश्यम् हें धातुसाधित विशेषण—पाहातो तें-- पाहाणारें,

भेषजं ह्याचें विशेषण, अभिरोरुदम् ह्यांत रुद् धातु आहे असें समजून भाषांतर केलें आहे. सायणाचार्यांप्रमाणें रुध् धातू घेतला नाहीं.

ऋ. २—आसुरीनें इन्द्राला पळवून नेलें ही आख्यायिका काठकसंहितेंत आहे. ( १३–५ )

ऋ. ४—घरामध्यें माझाच शब्द चालला पाहिजे, असा आशय. सभेमध्यें पुरुषांनीं बोलावें. घरांत बायकाच बोलणार.

### वशीकरणाकरितां ६–१३०

रथानें जिंकणाऱ्या (व) रथानें जिकणारांच्या अप्सरांचा हा काम आहे. हे देवांनो! कामाला पाठवा. माझ्याकरतां हा शोकविव्हल होवो. (१)

हा माझें स्मरण करो, मला प्रिय असलेला माझें स्मरण करो म्हणून, हे देवांनो! कामाला पाठवा, माझ्याकरतां हा शोकविव्हल होवो. (२)

हा माझें असें स्मरण करो, कीं मी त्याचें कधींहि करणार नाहीं. हे देवांनो! कामाला पाठवा, माझ्याकरतां हा शोकाकुल होवो. (३)

हे मरुत् हो, (ह्या पुरुषाला) उन्माद आणा, हे अंतरिक्ष, उन्माद आणा; हे अग्ने! तूं उन्माद आण, हा माझ्यामुळें शोकाकुल होवो.(४)

वशीकरणकर्मांकडे या सूक्ताचा विनियोग. रथजितादि चार मंत्रांनीं उडीद अभिमंत्रून फेकावयाचे असतात. दारिलाच्या मताप्रमाणें अभिप्रेत जनाच्या मस्तकावर हे मंतरलेले उडीद टाकतात. पण केशव म्हणतो, ते अभिप्रेत जनाच्या शय्येवर, गृहावर अथवा बैठकीवर फेकावे, आणि सायणाचार्यांच्या मतें अभिप्रेत जनाच्या जाण्यायेण्याच्या रस्त्यावर टाकावे. तसेंच, वशीकरणकर्मांत बाणांचीं अग्रें प्रज्वलित करून तीं हे मंत्र म्हणत प्रत्येक दिशेकडे फेकतात. शिवाय अभिप्रेत जनाची प्रतिकृती करून हे मंत्र म्हणत बाणांनीं त्या प्रति-

कृतीला हृदयामध्यें वेध करितात. ( कौ. ३६--१३--१४. )

### वशीकरणाकरितां, ६—१३१

मस्तकापासून, पायापासून ( आरंभ करून) तुझ्या (शरीरांत) मी कामपीडा पेरतों; हे देवांनो ! कामदेवाला पाठवा, हा माझ्याकरितां व्याकूळ होवो. ( १ )

हे अनुमते ! ह्याला तूं संमति दे. हे आकूते, तूं ह्याला नमन कर ( अनुकूल हो ). हे देवांनो ! कामदेवाला पाठवा. हा माझ्याकरतां व्याकूळ होवो. ( २ ) तूं तीन योजनें, पांच योजनें, घोड्यानेंच जातां येईल इतकें अंतर धांवत गेलास तरी, तूं तेथून परत ये, आपल्या मुलांचा पिता ( पालन करणारा ) हो. ( ३ )

६ - १३० प्रमाणेंच ह्या सुक्ताचा विनियोग.

ऋ. १ पुरुषाला उद्देशून स्त्री म्हणत आहे.

### वशीकरणार्थ ६—१३२

देवांनीं अंगाची लाही होत असलेल्या ज्या कामाला आधी-सहवर्तमान जलांत स्नान घातलें; त्याला मी तुझ्याकरतां वरुणाच्या नियमानुसार तापवितों. ( १ )

विश्वेदेवांनीं अंगाची..................वगैरे ( २ )

इंद्राणीनें अंगाची.................. वगैरे ( ३ )

इंद्राग्नीनें अंगाची .................. वगैरे ( ४ )

मित्रावरुणांनीं अंगाची ...............वगैरे ( ५ )

कौ. ३६—१३ व १४ ह्यांत सांगितलेला विधीच हें सूक्त म्हणतांना करावयाचा असतो. ६—१३० ची प्रस्तावना पाहा.

ऋ. १ काम म्हणजे गंधर्व आणि आधि म्हणजे अप्सरा असें तै. संहितेंत ( ३. ४, ७. ३ ) म्हटलें आहे.

---

# तक्मन्

अथर्ववेदांत बऱ्याच रोगांचा उल्लेख केलेला आढळतो. त्यांपैकीं कांहींवर मान्त्रिक उपाय सांगितले आहेत तर कांहींवर औषधी उपचारहि वर्णिले आहेत. पण त्या सर्वांचा एका निबंधांत परामर्श घेणें अशक्य आहे. शब्दांचे अर्थ अनिश्चित असल्यामुळें मूळमंत्र देऊन अर्थाची थोडीबहुत चर्चा करणें भाग पडतें. यूरोपिअन पंडितांनीं वैदिकवाङ्मयावर फार परिश्रम केले आहेत. ते इतके कीं, कोणीहि मनुष्य त्यांचें कौतुकच करील. तथापि चर्चात्मक बाबीहि अद्यापि पुष्कळच आहेत. मराठींत आथर्वणमंत्रांचें भाषांतर फारसें कोणीं केलेलें नाहीं. त्यामुळें आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ ऋचा व अर्थ देण्याची आवश्यकता जास्तच वाटते. म्हणून ह्या लेखांत "तक्मन्" ह्या एका रोगाचीच माहिती दिली आहे.

## तक्मन्.

अथर्ववेदांत ह्या रोगाचा उल्लेख अनेक ठिकाणीं केलेला आढळतो. पांच स्वतंत्र सूक्तें ह्या रोगानिमित्त खर्चीं पडलीं आहेत.[१] हा कोणता रोग असावा ह्याविषयीं अनेकांनीं अनेक तर्क केले आहेत. कोणी म्हणतात हा क्षयरोग असावा तर दुसऱ्या कित्येकांच्या मतें महारोगहि असूं शकेल. परंतु सध्यां ह्या दोनहि कल्पना विद्वानांना मान्य नाहींत. संहितेंतील ह्या रोगाच्या वर्णनावरून हा एक प्रकारचा ज्वर होता असें दिसतें व हेंच मत सांप्रत ग्राह्य झालें

---

१. १-२५; ५-२२; ६-२०; ७-१२१; १९-३९

आहे. आमच्याकडील परंपरागत समज अशाच प्रकारचा आहे हें कौशिकसूत्रावरून सिद्ध होतें. कारण ह्या सूक्तांचा विनियोग ज्वरभैषज्य-कर्माकडे सांगितला आहे. केशव, दारिल, सायण वगैरे भाष्यकार तक्मन् आणि ज्वर एकच समजतात. 'कृच्छ्रजीवनहेतुर्ज्वरस्तक्म-शब्दवाच्यः' अशी सायणाचार्यांनीं तक्मन् शब्दाची व्याख्या केली आहे [४-९-८][१].

तक्मन् हा शब्द अथर्ववेदाव्यतिरिक्त आढळत नाहीं हें मोठेंच गूढ आहे. प्राचीन अर्वाचीन कोणत्याहि वैदिकग्रंथांत ह्या शब्दाचा मागमूसहि नाहीं. तक्मन् शब्द संस्कृत अथवा वैदिक नसावा. तो मूळचा कोणत्या भाषेंतला असावा हें ठरविण्यास सध्यां साधन उप-लब्ध नाहीं. तक्मज्वर वन्य आहे असें त्याचें वर्णन आहे; तेव्हां वन्य लोकांच्या भाषेंतील तर हा शब्द नसेल ?

महावृष, मूजवान् आणि बल्हिक ह्या लोकांत तक्मरोगाचा प्रथम प्रसार झाला असें खालील मंत्रावरून दिसतें.

**ओको॑ अस्य॒ मूज॑वन्त॒ ओको॑ अस्य महावृ॒षाः**
**याव॑ज्जा॒तस्त॑क्म॒ंस्तावा॑नसि॒ बल्हि॑केषु न्यो॒चरः ( ५-२२-५ )**

**अर्थ**—मूजवान् हें ह्याचें घर; महावृष हें ह्याचें घर; हे तक्मन् तूं जन्मास आल्यापासून बल्हिकामध्यें घर करून राहिला आहेस.

आणि म्हणून ज्या लोकांकडून हा रोग आला त्यांच्याकडे तो परत जावो अशी प्रार्थना ऋषी करतो.

**तक्म॒न् मूज॑वतो गच्छ॒ बल्हि॑कान् वा पर॒स्त॒राम् ( ५-२२-७ )**

---

१. कंसांतील आंकडे अनुक्रमें ( अथर्ववेदांतील ) कांड सूक्त व मंत्र ह्यांचे आहेत.

**अर्थः**--हे तक्म तूं मूजवानांकडे अथवा पलीकडच्या बल्हिकांकडे चालता हो. एवढेंच नव्हे तर पलीकडे जाऊन त्यांच्याच मध्यें तुझा धुडकूस चालूं दे. अशा अर्थाचीहि प्रार्थना केली आहे.

**महावृषान् मूजवतो बन्ध्वद्धि परेत्य** ( ५-२२-८ )

**अर्थः**—दूर जाऊन महावृष व मूजवान् हे जे तुझे बंधू त्यांना खाऊन टाक.

तसेंच आणखी

**गन्धारिभ्यो मूजवद्भयोऽङ्गेभ्यो मगधेभ्यः**
**प्रैष्यन् जनमिव शेवधिं तक्मानं परिदद्मसि** (५-२२-१४)

**अर्थः**—पैसे मागण्यास येणाऱ्या दूतांच्या हवालीं ज्याप्रमाणें आपण पैसे करतों तद्वत् तक्म्याला, गांधार, मूजवान्, अंग आणि मगध ह्यांच्या स्वाधीन आम्ही करतों. मूजवंत, बल्हिक, गांधार, अंग, मगध आणि महावृष हे सर्व निरनिराळे लोक होते ह्यांत संशय नाहीं. महावृष हे देशाचें अगर लोकांचें नांव नसावें हें ब्लुमफील्डचें म्हणणें चुकीचें दिसतें. छान्दोग्य उपनिषदांत महावृष देशाचा स्पष्ट उल्लेख आहे. तो असा.

**"ते हैते रैक्कपर्णा नाम महावृषेषु यत्रास्मा उवास तस्मै होवाच."**
( ४—२—५ )

ह्या वर दिलेल्या लोकांच्या यादीवरून ते आर्य नसावे असेंहि अनुमान करण्यास जागा आहे; नाहींतर प्राणनाशक रोग त्या लोकांत जावो असें म्हटलें नसतें.

असो. "गन्धारिभ्यो" वगैरे मंत्रांतील प्रैष्यन् जनमिव शेवधिं ह्याचा अर्थ मी थोडा वेगळा केला आहे. म्हणजे इंग्रजी भाषांतराशीं तो जुळणारा नाहीं. प्रैष्यन्च्या ठिकाणीं अर्थ करतांना

प्रैष्यं हा पाठभेद स्वीकारला आहे. पण प्रस्तुत विवेचनाला त्याची मातब्बरी नाहीं. हिंदुस्थानच्या पूर्वेस व पश्चिमेस हा रोग अगोदर पसरलेला असावा असें दिसतें तथापि मनन करण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, अथर्वसंहितेंत पांचव्या कांडाच्या बावीसाव्या सूक्तावांचून इतरत्र महावृष, बल्हिक, मगध, मूजवान् अथवा अंग ह्यांचा कोठेंहि नामनिर्देश नाहीं.

तक्मन् ह्याला एके ठिकाणीं ऱ्हूडु असेंहि म्हटलें आहे. उ.

> यद्यर्चिर्यदि वासि शोचिः शकल्येषि यदि वा ते जनित्रम्
> ऱ्हूडुर्नामासि हरितस्य देव स नः संविद्वान् परि वृङ्ग्धि तक्मन् (१–२५–२)
> यदि शोको यदि वाभिशोको यदि वा राज्ञो वरुणस्यासि पुत्रः
> ऱ्हूडुर्नामासि हरितस्य देव स नः संविद्वान् परि वृङ्ग्धि तक्मन् (१–२५–३)

ऱ्हूडु च्या ऐवजीं हूडु असाहि पाठभेद आहे.

**अर्थः**—हे तक्मन्, तूं ज्योत असोस, शेक असोस अथवा अग्नीनें तुला जन्म दिला असो. तूं आग असोस, दाह असोस अथवा राजा वरुणाचा पुत्र असोस, हूडु हें तुझें नांव आहे. ( अथवा तूं वस्तुतः हूडु आहेस ). पिंवळेपणा उत्तम जाणणाऱ्या तूं देवा आम्हांला सोड.

वरील मंत्रांत ऱ्हूडु अथवा हूडु याचा अर्थ काय ? हा शब्द दुसऱ्या कोणत्याहि वैदिक वाङ्मयांत आलेला नाहीं. अथर्ववेदांत सुद्धां एकेच ठिकाणीं हा शब्द योजलेला आहे. ह्यावरून तो अवैदिक भाषेंतलाच असावा असें वाटतें; पण मराठीमध्यें हुडहुडी म्हणुन जो शब्द आहे तो व हूडु हे समानस्वरूपी व समानार्थी दिसतात. हिंव-

तापाची थंडी वाजूं लागली म्हणजे हुडहुडी आली म्हणतात. आणि ह्या अर्थानें वरील मंत्रांत हूडु शब्द योजण्यांत औचित्य आहे व थोडें काव्यहि आहे. हे तक्मन्, तूं जरी अंगांत उष्णता उत्पन्न करतोस तरी पण तसें करतांना अंगांत हुडहुडी अगर थंडी वाजते म्हणून तुला हूडुच म्हटलें पाहिजे. अझून सुद्धां अशिक्षित लोक ताप आला म्हणजे हुडहुडी आली म्हणतात. म्हणजे हुडहुडी हा तापाचा समानार्थक शब्द म्हणून योजला जातो. कांहीं वैदिक शब्द अनार्यांच्या भाषेंत सापडतात त्याचाच हा मासला आहे.

जंगलापासून ह्या तापाचा उद्भव होतो असा योग्य समज त्या वेळीं असल्यामुळें ह्याला वन्य हें विशेषण लावलें आहे. उ.

**नमः कृणोमि वन्याय तक्मने** ( ६–२०–३ ).

तक्मन् हा जंगलांत राहणाऱ्या लोकांना छळणारा ज्वर असावा असें अनुमान करण्यास आणखी आधार सापडतो. जंगलांत राहणाऱ्या लोकांना वीज, प्राण्यांचें विष आणि ज्वर ह्यांचीच फार भीती असते म्हणून ह्या तीहींपासून रक्षण करण्याविषयीं प्रार्थना केलेली आढळते. उ.

**मा नो रुद्र तक्मना मा विषेण मा नः संस्रा दिव्येनाग्निना**
**अन्यत्रास्मद् विद्युतं पातयैताम्** ( ११–२–२६ ).

**अर्थः**—हे रुद्र, तक्मन्, विष किंवा वीज ह्यांशीं आमचा संबंध आणूं नकोस. ह्या विजेला आमच्याशिवाय इतरत्र पाड.

## रोगाचीं लक्षणें.

मनुष्याला हा ज्वर फिकट अथवा निस्तेज करतो.

**अयं यो विश्वान् हरितान् कृणोषि** ( ५–२२–२ )

( जो हा तूं सर्वांस फिकट करतोस ).

त्याचप्रमाणें **"विश्वा रूपाणि हरिता कृणोषि** ( ६-२०-३ )

तक्म्याच्या योगानें शरीराची लाही होते. उ. " अयं यो अभिशोचयिष्णुः " ( ६--२०--३ ).

" नमो रूराय " ( ७--१२१--१ ); अभिशोचयिष्णु म्हणजे दाह उत्पन्न करणारा. रूर म्हणजे उष्ण.

शीत आणि पित्त असा दोन प्रकारचा हा ताप असे. उ.

**नमः शीताय तक्मने नमो रूराय शोचिषे कृणोमि**

(१-२५-४)

**यत् त्व शीताथा रूरः** ( ५-२२-१० )

**नमः शीताय पूर्वकामकृत्वने** ( ७-१२१-१ )

ह्या तापांत अंगावर पुरळ उठतो असेंहि वर्णन आहे.

**"यः परुषः पारुषेयोऽवध्वंस इवारुणः"** ( ५-२२-३ )

**अर्थः**—जो तांबड्या चूर्णाप्रमाणें (शरीरावर) ठिबकलेला असतो. तापाच्या बरोबर खोकलाहि असतो. तसेंच कफ अगर क्षय ह्यांच्या भावनेचीं चिन्हेंहि ह्या रोगांत दृग्गोचर होतात. आणि डोकेंहि दुखत असतें.

**यस्त्वं शीतोथो रूरः सह कासा वेपथः** ( ५-२२-१० )

**अर्थः**— तूं शीत अगर उष्ण असोस खोकल्याला बरोबर घेऊन येणाऱ्या त्वां ( रोग्याला ) कांपावयास लावलेंस.

**मास्मैतान्त्सर्वान् कुरुथा बलासं कासमुद्युगम्**

( ५-२२-११ )

(हे तक्मन्) तूं बलास, कास आणि उद्युग ह्यांच्याशीं सख्य करूं नको.

तक्मन् भ्रात्रा बलासेन स्वस्रा कासिकया सह
पाप्मा भ्रातृव्येण सह गच्छामु मरणं जनम् ( ५-२२-१२ )

**अर्थः**-- हे तक्मन्, भाऊ बलास, बहीण कास, पुतण्या उबाळूं ह्यांच्या सकट तूं पलीकडल्या शत्रूंकडे जा.

भ्रातृव्य म्हणजे चुलतभाऊ असें धरून केलेलें इंग्लीश भाषांतर बरोबर दिसत नाहीं. व्याकरणतः भ्रातृव्य म्हणजे भावाचा मुलगा-असाच अर्थ होतो. व ह्याच कारणाकरतां पुढें भ्रातृव्य शब्दाचा शत्रू असा अर्थ होऊं लागला. बऱ्याचशा समानतेमुळें चुलत भावाला बुडवतां येत नाहीं. पुतण्याला पाण्यांत पाहण्याची प्रवृत्ति सहज होते.

पाप्मा ह्याचाच पाम्ना असा पाठभेद आहे. पामन् म्हणजे खरूज, उबाळूं. हाच पाठभेद घेऊन अर्थ केला आहे. संदर्भाकडे बघतां पाम्ना हाच शब्द पाहिजे. पण तापाचा आणि खरजेचा खोकल्यासारखा संबंध दिसत नाहीं. पाप्मा भ्रातृव्येण ह्यांचा नीट अर्थ लागत नाहीं. आणि पाम्ना घेऊन त्याचा अर्थ निश्चित होत नाहीं. पुरळ ह्या अर्थी पामन् येथें वापरला असल्याचाहि संभव आहे.

उद्युग हा शब्द अथर्ववेदांत इतरत्र आढळत नाहीं. हा एक जातीचा रोग असावा असें कांहीं मानतात. वरील मन्त्राचा अर्थ करतांना ह्या मताला अनुसरून अर्थ केला आहे. पण उद्युग ह्याचा धात्वर्थ घेऊन व कास ह्याचें विशेषण करून हाडें खिळखिळीं करून सोडणारा खोकला असा अर्थ करतां येईल.

बलास म्हणजे कफ असा कित्येकांनीं अर्थ केला आहे. पण वैद्यक ग्रंथांत बलास म्हणजे क्षय म्हणून समजतात. संस्कृतांत बलासी म्हणजे क्षयी असा अर्थ होतो, कफक्षयाचा आणि खोकल्याचा निकट

संबंध असल्यामुळें "कासश्वासादि" असा सायणाचार्यांनीं केलेला अर्थ बरोबर असावा.

ह्या तापांत मनुष्य बेशुद्ध होऊन बडबडूं लागतो व अखेरीस त्यांतच त्याचा अंत होतो असें कित्येकांचें म्हणणें आहे व त्याला आधार म्हणून खालील ऋचा देतात.

अग्नेरिवास्य दहत एति शुष्मिण उतेव मत्तो विलपन्नपायति
( ६–२०–१ )

'उतेव मत्तो विलपन्नपायति' ह्या पादाचा अर्थ उन्मत्त माणसाप्रमाणें बडबड करीत ( रोगी ह्या जगांतून ) जातो, असा करण्यांत येतो. पण असा अर्थ केलाच पाहिजे असें नाहीं. शिवाय बडबड आणि देहावसान हें ह्या तापाचें पर्यवसान आहे असें दुसऱ्या कोठेंहि वर्णन नाहीं. तसेंच ह्या ऋचेचा अर्थ कांहीं केलें तरी नीट लागणें शक्य नाहीं. अपअयति व एति ह्या दोन क्रियापदांचा एकच कर्ता मानणें गैरवाजवी होणार नाहीं. म्हणजे तक्मन् हाच अध्याहृत कर्ता घेतला पाहिजे. तेव्हां ताप येतो आणि जणूं काय विव्हळत (विलपन्निव) परत जातो. लपचा अर्थ बडबडणें होईल पण विलपचा अर्थ शोक करणें असा होतो. हा अभिचार मंत्र आहे. मांत्रिक असें म्हणतो कीं, हा ज्वर प्रखर व जळजळीत अग्नीपासून जणूं काय ह्याला ( रोग्याला ) येतो पण हा उन्मत्त ( अखेरीस ) जसा काय वाईट तोंड करून मागें पाऊल काढतो. सायन, व्हिटने किंवा ब्लुमफील्ड ह्यांनीं केलेल्या अर्थापेक्षां वर दिलेला अर्थ अधिक सयुक्तिक आहे असें वाटतें. तात्पर्य ह्या मंत्रावरून तक्मज्वरांत उन्मादवायु होतो अगर मनुष्य मरतो असें म्हणण्यास भरपूर आधार मिळत

नाहीं. मांत्रिक जर आपणच, ताप रोग्याचा बळी घेतो असें म्हणेल तर मग मंत्राचा तरी उपयोग काय ?

हा ताप सर्व ऋतूंत व दररोज किंवा दिवसाआड, दो दिवसाआड असा येतो.

यो अ॒न्ये॒द्युरु॒भय॒द्युर॒भ्येति॑ तृ॒तीय॑काय॒ नमो॑ अस्तु त॒क्मने॑ ( १-२५-४ )

तृ॒तीय॑कं वितृ॒तीयं॑ स॒दन्दिम॒ुत शा॑र॒दम् ।
त॒क्मानं॑ शी॒तं रू॒रं ग्रैष्मं॑ नाशय॒ वार्षि॑कम् ( ५-२२-१३ )

ग्रीष्म, वर्षा आणि शरत् ह्या तीनहि ऋतूंत उद्भवणारा हा ज्वर आहे, असें वरील मंत्रांत सांगितलें आहे.

शी॒र्ष॒लो॒कं तृ॒तीय॑कं स॒दन्दि॒र्यश्च॑ हाय॒नः ( १९-३९-१० )

अन्येद्युः = दुसऱ्या दिवशीं येणारा. ह्यांत ताप रोज भरतो आणि निघतो.

तृतीयकः = एकदिवस टाकून तिसऱ्यादिवशीं येणारा.

अन्येद्युष्कः प्रतिदिनं; दिनं क्षिप्त्वा तृतीयकः
दिनद्वयं यो विश्राम्य प्रत्येति स चतुर्थकः ( चरकसंहिता )

उभयद्युः = हा चातुर्थिक ज्वराचा विपर्यय असावा. ह्या ज्वरांत दोन दिवस ताप सतत राहतो आणि तिसऱ्यादिवशीं निघतो.

द्व्यहं ज्वरयति दिनमेकं तु मुंचति (वाग्भट निदानस्थान अ. २)

सामान्यतः कालानुसार ह्या ज्वराचे पांच प्रकार होतात.

"सन्ततः सततोऽन्येद्युस्तृतीयकचतुर्थकौ"
( चरक चिकित्सितस्थान. )

अन्येद्यूच्या उलट सतत ज्वर. म्हणजे पहिल्यामध्यें अहोरात्रांत

एकदां ज्वर येतो व निघतो तर दुसऱ्या प्रकारांत अहोरात्रांत ताप दोनदां येतो आणि निघतो.

"अहोरात्रस्य स द्विः स्यात् सकृदन्येद्युराश्रितः" ( वाग्भट )

संततज्वरामध्यें ताप सारखा अंगांत असतो. हें सर्व येथें सांगण्याचें कारण इतकेंच कीं वरील शब्दांनीं अथर्ववेदाच्या भाषांतरकारांची वरीच तारंबळ उडवून दिलेली दिसते.

सदन्दि हाच संततज्वर असावा. सदन्दि म्हणजे सारादिवस राहणारा.

वितृतीय म्हणजे तृतीयक ज्वराशिवाय दुसरे प्रकार.

अन्येद्युः तृतीयकः इत्यादि शब्दांवरून तक्मन् हा ज्वर होता ह्याविषयीं कांहीं शंका वाळगण्याचें कारण नाहीं.

ह्या रोगाची उत्पत्ति केव्हां व कशी होते हें खालीं दिलेल्या मंत्रावरून समजण्यासारखें आहे.

यद॒ग्निरापो॒ अद॑हत् प्र॒विश्य॒ यत्राकृ॑ण्वन् धर्म॒धृतो॒ नमां॑सि
तत्र॑ त आहुः पर॒मं ज॒नित्रं॒ स नः॑ संवि॒द्वान् परि॑ वृङ्ग्धि
तक्मन् ( १-२५-१ ).

**अर्थ**—जेव्हां, अग्नी प्रवेश करून पाणी तप्त करितो, ज्यावेळीं निसर्गनियम जाणणारे पिकें कापतात; त्याच ठिकाणीं तुझें मोठें उत्पत्तिस्थान आहे असें म्हणतात. हें सर्व जाणणारा तूं हे तक्मन् आम्हांला सोडून जा.

येथें पहिल्या दोन पादांचा अर्थ पाश्चात्य भाषांतरकार अथवा सायणाचार्य ह्यांच्याहून निराळा केला आहे.

हिंवताप कोणत्याहि ऋतूंत आला तरी त्याचा उगम प्रथमतः शरद् ऋतूंतच होतो. आणि म्हणूनच ह्या ज्वराला "विश्वशारदम्" हें विशेषण अथर्वसूक्तांत वारंवार दिलेलें आढळतें. सांचलेल्या पाण्यावर ऊन पडूं लागलें म्हणजे ज्या वाफा निघतात त्यांच्यापासून हा ज्वर उद्भवतो. येथें विजेचा कांहीं संबंध नाहीं. शरद्ऋतु हा कांहीं पावसाळ्याचा आरंभ नव्हे.

धर्म म्हणजे निसर्गाचे नियम. धर्मधृत् म्हणजे हे नियम पाळणारा. धर्मधृत् म्हणजे देव अथवा यज्ञयाग करणारे असें समजण्याचें येथें कारण नाहीं व त्यानें अर्थबोधहि होत नाहीं.

अकृण्वन् ह्याचा कापतात असा अर्थ केला आहे. "कृवि हिंसाकरणयोश्च" नमः. हा अन्नार्थी पण शब्द आहे.

शरद्ऋतूंत भाताचीं पिकें कापतात व तेव्हांच हिंवताप लागतो. हिमालयावरून पूर्वदेशांत हा ताप गेला असा उल्लेख पूर्वी आलाच आहे. हिंदुस्थानाच्या पूर्वभागांत भाताची लागवड होते हें सर्वांस माहीत आहेच.

वरील लक्षणांवरून तक्मन् म्हणजे हिंवतापच असें मानण्यास हरकत नाहीं.

## उपाय

ह्या तापावर आजमित्तीस सुद्धां कोयनेलशिवाय दुसरें औषध नाहीं. अथर्ववेदांत कुष्ठ वनस्पतीशिवाय दुसरी कांहीं सुद्धां योजना ह्या ज्वरावर सांगितली नाहीं. पांचव्या काण्डांतील चौथें सूक्त ह्या वनस्पतीकरतांच रचलें आहे. कुष्ठ म्हणजे कोळिंजन असें समजतात. कुष्ठाला तक्मनाशक असें म्हटलें असून हें झाड पर्वतावर उगवतें असेंहि सांगितलें आहे.

यो गिरिष्वजायथा वीरुधां बलवत्तमः
कुष्ठेहि तक्मनाशन तक्मानं नाशयन्नितः

अर्थः—हे कुष्ठ तूं पर्वतावर उत्पन्न झालास. सर्व वनस्पतींमध्यें तूं बलवान आहेस. हे तक्मनाशक कुष्ठ, ये आणि येथून तक्माचा नाश कर.

हिमालयपर्वतावरून ही वनस्पती पूर्वेकडे नेण्यांत आली असें दिसतें.

उदङ् जातो हिमवंतः स प्राच्यां नीयसे जनम्
तत्र कुष्ठस्य नामान्युत्तमानि विभेजिरे

अर्थ— हिमालयाच्या उत्तरेकडे जन्मास आलेल्या तुला पूर्वेकडील लोकांकडे नेण्यांत येतें तेथें कुष्ठाचीं जीं उत्तम नामें तीं विभागलीं गेलीं.

कुष्ठाचीं निरनिराळीं नांवें खालील मंत्रांत दिलीं आहेत.

त्रीणि ते कुष्ठ नामानि नद्यमारो नद्यारिषः
नद्यायं पुरुषो रिषत् ( १९-३९-२ )

अर्थ— हे कुष्ठ तुझीं तीन नांवें आहेत; नद्यमार, नद्यारिष आणि नद्य.

नदीच्या पाण्यानें उत्पन्न होणारा रोग तो नद्य. त्या रोगाचा नाश करणारी वनस्पती ती नद्यारिष, नद्यमार. सायणाचार्य म्हणतात नद्यांना मारकः स्वयमपि नद्य इत्युच्यते. नद्यरोग नष्ट करणाऱ्याला नद्यच म्हणतात.

ह्यावरून पाण्यामुळेंच तक्मज्वराचा उद्भव होत असे असें दिसतें.

ह्या औषधाचा इतका लौकिक झाला होता कीं वाटेल तें धन देऊन लोक ही वनस्पती विकत घेत.

सुपर्णसुवने गिरौ जातं हिमवतस्परि
धनैरभि श्रुत्वा यन्ति विदुर्हि तक्मनाशनम् ( ५-४-२ )

**अर्थ**–हिमालयावरील सुपर्णसुवन नांवाच्या डोंगरावर तूं झालास. ( तुझी कीर्ति ) ऐकून पुष्कळ द्रव्य (धनैः) घेऊन (लोक) येतात. कारण तूं तक्म्याचा नाश करणारा आहेस हें त्यांना माहीत आहे.

सुपर्णसुवन हें हिमालयाच्या एका टेकडीचें नांव असावें. व्हिटने व ब्लुमफील्ड यांनीं धात्वर्थाला अनुसरून अर्थ करण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यापासून कांहीं बोध होत नाहीं. हिमालयावरील निरनिराळ्या डोंगरांना निरनिराळीं नांवें होतीं. उ.

यदाञ्जनं त्रैककुदं जातं हिमवतस्परि ( ४-९-९ )

त्रिककुद हें डोंगराचें नांव. हिमालयाच्या त्रिककुद नांवाच्या डोंगरावर जें अंजन उत्पन्न झालें.

कुष्ठाप्रमाणें त्रिककुद पर्वतावर होणाऱ्या अंजनामुळेंहि तक्म्याचा उपशम होतो असें वर्णन आहे.

त्रयो दासा आञ्जनस्य तक्मा बलास आदहिः ( ४-९-८ )

**अर्थ**––तक्मन्, बलास आणि सर्प ( सर्पाच्या विषानें होणारे विकार ) हे तीन अंजनाचे दास आहेत. म्हणजे ह्या अंजनानें हे रोग हटकून बरे होतात.

ज्वरशान्त्यर्थं कौशिकसूत्राप्रमाणें ( कौ. ४-२ ) यदग्निरापः ह्या सूक्ताचा (१-२५) जप करावयाचा असतो. नंतर तप्तपरशूनें केलेल्या उष्णोदकाचें सिंचन तापकऱ्यावर करतात.

अग्निस्तक्मानम् (५-२२) हें सूक्त म्हणून तापकऱ्याला लाह्यांची पेज पाजावयाची असते. नंतर तळाशीं राहिलेल्या लाह्या तांब्याच्या भांड्यांतून रोग्याच्या मस्तकावरून पलीकडे ठेवलेल्या दावाग्नींत

( जंगलांतून आणलेला वणव्याचा अग्नी ) ओतावयाच्या असतात. ( कौ. ४-५ ).

काण्ड ६ सूक्त २० ह्याचा उपयोग कसा करावा तें कौशिकसूत्र ४-६ मध्यें सांगितलें आहे.

दावाग्नींत " अग्नेरिवास्य दहतः " हा मंत्र म्हणून तांब्याच्या पळीनें तुपाची आहुती देऊन अवशेष रोग्याच्या मस्तकावर ठेवणें.

**काण्ड ७ सूक्त १२१ ह्याचा विनियोग**—खाटेवर रोगी निजलेला असतो. नंतर दर्भाच्या कांड्याप्रमाणें आहेत रेषा ज्याच्या असा बेडूक घेऊन त्याच्या खाकेंतून निळया व तांबड्या रंगाच्या दोन सुताच्या दोऱ्या घालून त्यांनीं तो बेडूक खाटेच्या पायाला बांधून खाटेखालीं ठेवावयाचा; आणि मग " नमो रूराय " ह्या सूक्तानें अभिमंत्रण केलेलें उदक तापकऱ्याच्या अंगावर शिंपडावयाचें. असें केलें असतां बेडकावर ताप जातो अशी समजूत. हा प्रकार बोहिमियादि कित्येक देशांत असल्याचा उल्लेख ग्रॉहमननें केला आहे. (कौ. ४-८).

हा ज्वर बेडकावर जावो असें एके ठिकाणीं तर स्पष्ट म्हटलें आहे.

**यो अन्येद्युरुभयद्युरभ्येतीमं मण्डूकमभ्येत्वव्रतः(७-१२१-२)**

**अर्थ**—दररोज, एक दिवसाआड, दोन दिवसाआड असा जो नियमित (अव्रतः) ज्वर ह्या (पुरुषाला) येतो तो बेडकावर जावो.

अथर्ववेदांत तक्मन् हा शब्द जसा प्रामुख्यानें येतो तसा ज्वर हा नाहीं. किंबहुना नुसता ज्वर शब्द कोठेंच वापरलेला नाहीं. अङ्गज्वर हा सामासिक शब्द फक्त तीन ठिकाणीं आलेला आहे. उ.

**अङ्गभेदमङ्गज्वरं विश्वाङ्ग्यंऽविसल्पकम्**

**सर्वं शीर्षण्यंऽते रोगं बहिर्निर्मन्त्रयामहे ( ९-१३-५ )**

मा बिभेर्न मरिष्यसि जरदष्टिं कृणोमि त्वा
निरवोचमहं यक्ष्ममङ्गेभ्यो अङ्गज्वरं तव ( ५-३०-८ )
अङ्गभेदो अङ्गज्वरो यश्च ते हृदयामयः
यक्ष्मः श्येन इव प्रापप्तद् वाचा साढः परस्तराम्
( ५-३०-९ )

वरील तीनहि ठिकाणीं अङ्गज्वर हें दुसऱ्या रोगाचें विशेषण म्हणून योजलेलें दिसतें. तसेंच येथें दाह करणारा ह्या अर्थानेंहि ज्वर शब्दाचा उपयोग केलेला नसावा. अङ्गज्वर ह्याचा अङ्ग झिजविणारा असाच अर्थ केलेला आहे आणि तोच बरोबर दिसतो. शेवटच्या दोन मंत्रांत अङ्गज्वर हें यक्ष्म शब्दाचें विशेषण उघड दिसतें. त्याचप्रमाणें तें पहिल्या मंत्रांतसुद्धां विसल्पक ह्या शब्दाचें विशेषण असावें. शिवाय ज्वर म्हणजे जर ताप तर अङ्गज्वर असा समास वापरण्यांत कांहीं विशेष अर्थ नाहीं. ताप हा अंगांतच असावयाचा. अङ्गज्वर हें विशेषण ठरेल तर विसल्पक हा स्वतंत्र रोगच असावा असें अनुमान करणें भाग पडतें. सायणाचार्यांच्या मतें विसल्पक हा एक प्रकारचा व्रण.

**अर्थ**--अंगाचा भेद करणारा, अंग झिजविणारा, सर्व अंगभर पसरणारा असा व्रण व तुझ्या मस्तकांतलि सर्व रोग मंत्राच्या योगानें बाहेर काढून टाकतों.

भिऊं नको; तूं मरणार नाहींस; म्हातारपण येईपर्यंत जगशील असा तुला मी करतों. अंग झिजवणारा क्षय तुझ्या अंगांतून मी काढून टाकला.

अंगभेद करणारा, अंग झिजवणारा जो तुझा हृद्रोग; माझ्या वाणीनें उच्चाटण झालेला (साढः) यक्ष्मा श्येनपक्षाप्रमाणें दूर जाऊन पडला.

# पञ्चजन.

पञ्चजन हा शब्द वैदिक वाङ्मयांत अनेक स्थळीं आढळतो. तथापि ह्या शब्दाच्या अर्थाविषयीं अद्यापि अनिश्चितता आहे. अशा स्थितींत कोणताहि अर्थनिर्णयात्मक प्रयत्न अनवश्यक म्हणून गणला जाणार नाहीं, असें वाटतें. शिवाय, पञ्चजन शब्द बराच महत्त्वाचा आहे हें म्हणणें त्याच्या खऱ्या अर्थावर अवलंबून आहे.

मराठींत रा. राजारामशास्त्री भागवत यांनीं पञ्चजन कोणते असावे ह्याविषयीं विविधज्ञानविस्तारांत पूर्वीं बराच उहापोह केला आहे. पण पञ्चजन म्हणजे पांच निरनिराळे लोकसमूह, असा अर्थ त्यांनीं गृहित धरल्यसारखा दिसतो. तथापि कांहीं पाश्चात्य पंडितांना हा अर्थ मान्य होत नाहीं. रोठ आणि गेल्डनेर यांस पञ्चजन म्हणजे सर्व पृथ्वीवरील मानवजात, हाच अर्थ अभिप्रेत आहे. पञ्चजन शब्दानें पांच लोकसमूहांचा बोध होतो, असें मानणाऱ्या विद्वानांतहि ऐकमत्य नाहीं. कोणी पांच स्वतंत्र मानववंश समजतात, तर कोणी पांच भिन्न समाज समजतात. ह्यांतहि पुनः कोणते पांच लोकसमूह घ्यावयाचे ह्याविषयीं मतभेद आहेच; व हा मतभेद अर्वाचीन नसून प्राचीन वैदिक ग्रंथकारांतच प्रामुख्यानें दिसून येतो. देव, मनुष्य, गंधर्व (ह्यांत अप्सरांचाहि समावेश होतो), सर्प आणि पितर हे पञ्चजन होत, असें ऐतरेयब्राह्मणकार म्हणतो.[1] गंधर्व,

---

१. सर्वेषां वा एतत् पञ्चजनानामुक्थं देवमनुष्याणां गंधर्वाप्सरसाम् सर्पाणां च पितॄणां च। ऐ. ब्रा. ३-३१.

अप्सरा, देव, असुर आणि राक्षस मिळून पञ्चजन होतात, असें कित्येक समजतात. (सायणाचार्य-वेदभाष्य-अथर्ववेद ४।२३।१). निरुक्तकार अप्सरांच्या ऐवजीं पितर घालून पंचजनांची यादी पुरी करतात. औपमन्यवांच्या मतें चार वर्ण व निषाद मिळून पञ्चजन होतात.[१] शंकराचार्यांनीं निरुक्तकारांचाच अनुवाद केला आहे. कैयटाचें म्हणणें चार वर्ण व रथकार मिळून पञ्चजन समजावे. रा. भागवतांचा तर्क असा आहे कीं, देव, सर्प, यक्ष, गंधर्व व राक्षस, अथवा मनुष्य, गंधर्व, असुर, राक्षस आणि सर्प, हे वैदिक पञ्चजन होत. झिमरच्या मतें अनु, द्रुह्यु, यदु, तुर्वश, आणि पूरु ह्या पृथक पांच आर्य समाजांचाच उल्लेख पञ्चजन शब्दानें वेदांत केला असला पाहिजे. आम्हांला रोठचें मत विशेष ग्राह्य वाटतें.

ह्यावर प्रथम अशी शंका येण्यासारखी आहे कीं, अखिल मानव जातीला पञ्चजनच कां म्हटलें? ह्याचें उत्तर असें कीं, पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण व मध्य मिळून पांच दिशा होतात. ह्या पांच दिशांना राहणारे लोक ते पञ्चजन, पञ्चमानव वगैरे. ह्याप्रमाणें वैदिक कालीं सर्व पृथ्वी पंचविभागात्मक होती. पंचदिशांचा उल्लेख वेदांत अनेक ठिकाणीं आला आहे. उदाहरणार्थ,

**त्वं समुद्रो असि विश्ववित् कवे तवेमाः पंच प्रदिशो विधर्मणि ॥**

(ऋ. मं. ९, सू. ८६, ऋचा २९)

**दुह्रां मे पञ्च प्रदिशो** । (अथर्व ३. २०. ९)

---

१. गंधर्वाः पितरो देवा असुरा रक्षांसीत्येके चत्वारो वर्णा निषादः पञ्चम इत्यौपमन्यवः । निरुक्त पूर्वषट्क, अध्याय ३.

**यस्मिन् षडुर्वीः पञ्च दिशो अधिश्रिताः (अथर्व. १३–३–६)**
**पञ्चानां त्वा दिशां धर्त्राय गृह्णामि । इति पञ्च वै दिशो**
**–दिश एवास्मै गृह्णाति...** ( काठकसंहिता. ३२।६ )

वरील उदाहरणांवरून वैदिककालीं प्रथमतः तरी पांच दिशा मानीत, हें निर्विवाद आहे. पांच दिशा आणि पांच लोक ह्यांचें साहचर्य अथर्ववेदावरून तर चांगलें व्यक्त होतेंः—

**इमा याः पञ्च प्रदिशो मानवीः पञ्च कृष्टयः ॥**
( अथर्व. ३–२४–३ )

'मानवीः पञ्च कृष्टयः' म्हणजे पंचजन. ज्या ह्या पांच दिशा व हे पञ्चजन, असा ह्या मंत्राचा अर्थ आहे.

वर दिलेल्या अवतरणांवरून पञ्चजन म्हणजे भूतलावरील अखिल मानव जात – पृथ्वीच्या कोनाकोपऱ्यांतील सर्व लोक – असा अर्थ होणें असंभवनीय नाहीं, हें खास.

ह्याप्रमाणें पञ्चजन शब्दाच्या अर्थाविषयीं भिन्नभिन्न मतें सांप्रत प्रदर्शित केलीं गेलीं आहेत.

पञ्चजनाः, पञ्चकृष्टयः, पञ्चमानुषाः, पञ्चचर्षण्यः, पञ्चाक्षितयः हे समानार्थक शब्द आहेत. पञ्चजनाचें पाञ्चजन्य हें विशेषणहि वेदांत मधून मधून येतें. पञ्चजन शब्दाचा वास्तविक अर्थ समजण्यास तो शब्द ज्या ज्या स्थलीं आला आहे तीं स्थलें उद्धृत करून त्यांतील ऋचांचा अर्थ काय आहे हें पाहाणें अवश्य आहे. म्हणून ह्या दिशेनें आतां प्रयत्न करूं. प्रथम इंद्राला उद्देशून म्हटलेल्या ज्या मंत्रांत पञ्चजन अगर तत्समानार्थक शब्द आहे, ते मंत्र घेऊं.

**य एकश्चर्षणीनां वसूनामिरज्यति इन्द्रः पञ्च क्षितीनाम् ॥**
( ऋ. १–७–९ )

अर्थः—हे इन्द्रा ! मनुष्यांचा, संपत्तीचा, पांची जगांचा तूं एकटा स्वामी आहेस.

ह्यांत चर्षणी ह्या शब्दाचा अर्थ माणूस—मानव जात— असा असल्यामुळें क्षितीनाम् ह्याचा अर्थ मनुष्यांहून ज्याची व्याप्ति अधिक आहे, असा कांहीं तरी करणें भाग आहे. आणि म्हणूनच जग असा अर्थ आम्ही केला आहे; एकदां का सर्व मनुष्यांचा तूं राजा आहेस असें म्हटलें, म्हणजे त्यांतच समाविष्ट असलेल्या पंचजनांचा ( पांच टोळ्यांचा ) तूं राजा आहेस, असें निराळें म्हणण्यांत स्वारस्य नाहीं, कवित्व नाहीं. क्षितयः ह्याचा अर्थ वर केल्याप्रमाणें असला पाहिजे, हें खालील ऋचेवरून दिसून येतें.

**इन्द्र क्षितीनामसि मानुषीणां विशां दैवीनामुत पूर्वयावा ।**

( अथर्ववेद. २०।११।२ )

ह्यांत मानुषीणां ह्या विशेषणानें क्षितीनां ह्याची अतिव्याप्ति सिद्ध होते. निघंटूमध्यें क्षिती शब्द पृथिवीवाचक म्हणून दिला आहे.

मानुषी क्षिती हे शब्द दुसऱ्याहि एका ऋचेंत आले आहेत. उदाहरणार्थ,

**व्युषा आवः पथ्या जनानां पञ्च क्षितीर्मानुषीर्बोधयन्ती ।**

( ऋ. ७--७९--१ )

अर्थः—उषेनें मनुष्यांच्या पांच क्षितींना जागृत करून लोकांचीं निवासस्थानें प्रकट केलीं.

येथें पञ्चक्षिति आणि जन ह्यांची समव्याप्ति आहे. म्हणजे येथें पांच विशिष्ट लोक न समजतां पृथ्वीवरील अखिल मानवजातच समजली पाहिजे. शिवाय उषेमध्यें पांचच जातींवर प्रकाश पाडण्याचें सामर्थ्य आहे, पंचजनेतर लोकांवर उषेचा प्रकाश पडूं शकत नाहीं,

१०२७८

असला कमीपणा कोणता ऋषी आपल्या देवतेवर लादील ?

'य एकश्चर्षणीनाम्...' ह्या ऋचेचा थोडा निराळ्या रीतीनें अर्थ करतां येण्यासारखा आहे.

**यः एकः इन्द्रः पञ्च क्षितीनां चर्षणीनां वसूनां इरज्यति.**

'जो एकटा इन्द्र पांच पृथ्वींतील मनुष्यांच्या संपत्तीचा स्वामी आहे.' येथेंसुद्धां पांचच लोकसमूह समजल्यानें इन्द्राच्या स्वामित्वाला न्यूनत्व येतें. इन्द्राचें आधिपत्य सर्व मानवजातींवर सारखेंच आहे. उदाहरणार्थ,

**य एक इद्धव्यश्चर्षणीनामिन्द्रं तं गीर्भिरभ्यर्च आभिः**

( अ. २०-३६-१ )

**यस्य विश्वानि हस्तयोः पञ्च क्षितीनां वसु ।** (ऋ. १।१७६।३)

'ज्याच्या ( इन्द्राच्या ) हातांत पांचहि लोकांची सर्व संपत्ति आहे.' येथेंहि पञ्चक्षितयः म्हणजे सर्व मानव जात समजणेंच युक्त आहे. कारण सर्व लोकांवर इन्द्राचा अधिकार असल्यामुळेंच आमच्या द्वेष्ट्याला हुडकून काढ आणि विद्युल्लतेच्या धक्यानें मारल्याप्रमाणें त्यास मारून टाक, अशी प्रार्थना पुढल्या पादांत ऋषीनें केली आहे.

**इहि तिस्रः परावत इहि पञ्च जनाँ अति । धेना इन्द्रावचाकशत्॥**

(ऋ. ८-३२-२२)

'हे इन्द्रा, ज्या तूं ( आम्हीं केलेली ) स्तुती पाहिलीस तो तूं दूर तीनहि बाजूंनीं ( मागून, पुढून, बाजूंनीं ) जा; पांचहि लोकांना ओलांडून जा.' येथेंहि पांच लोक म्हणजे सर्व लोक, असा अर्थ करणें सयुक्तिक दिसतें.

**इंद्रियाणि शतक्रतो या ते जनेषु पञ्चसु । इन्द्र तानि त आ वृणे ॥**

(ऋ. ३-३७-९)

'हे इन्द्रा, पांच लोकांत तुझें ( प्रकट झालेलें ) सामर्थ्य मी तुझ्याजवळ मागतों.' येथेंहि पञ्चजनाचा अर्थ आम्हांला संमत असलेल्या अर्थाशीं विसंगत दिसत नाहीं.

**एकं नु त्वा सत्पतिं पांचजन्यं जातं शृणोमि यशसं जनेषु ॥**

(ऋ. ५–३२–११)

सर्व लोकांत मी तुझा असा लौकिक ऐकतों कीं, पंचजनांचा तूं एकटाच सर्वोत्कृष्ट प्रभू अवतीर्ण झाला आहेस.

पांचजन्य = पंचजनांचा

येथेंहि पंचजन म्हणजे सर्व लोक हाच अर्थ विवक्षित आहे.

ह्याच्या पुढील ६ ऋचा अग्नीच्या आहेत.

**यादिंद्र नाहुषीश्वाँ ओजो नृम्णं च कृष्टिपु । यद्वा पंच क्षितीनां द्युम्नमा भर सत्रा विश्वानि पौंस्या ॥** (ऋ. ६–४६–७)

अर्थ—हे इन्द्रा, ह्या नहुष कुलांतील लोकांत जें ओज व तेज आहे, फार काय पण पंचप्रदेशात्मक पृथ्वीवरील लोकांत जें औज्वल्य व पराक्रम आहेत, ते सर्व आम्हांस दे.

**यदिन्द्र ते चतस्रो यच्छूर सन्ति तिस्रः ।**
**यद्वा पञ्च क्षितीनामवस्तत्सु न आ भर ॥**

(ऋ. ५–३५–२)

अर्थ—हे शूर इन्द्रा, तुझ्याजवळ तीन, चार, पांच ( देणग्या?) जें कांहीं असेल तें पृथ्वीवरील जे आम्ही त्या आम्हांला खालीं सत्वर आणून दे.

ह्या मन्त्राचा अर्थ वस्तुतः नीट लागतच नाहीं. तीन, चार, पांच काय? सगळया सूक्तांत देणगी अथवा तत्समान शब्द नाहीं. इन्द्राच्या पराक्रमाचें सर्व वर्णन आहे. पण तीन, चार, पांच पराक्रम

अगर शक्ती ह्याला कांहीं अर्थ नाहीं. तीन चार म्हणजे काय हें जरी सांगतां आलें नाहीं, तरी पंच शब्द चार व तीन ह्यांच्या बरोबरच वाचला पाहिजे, ह्यांत संशय नाहीं. म्हणून पंच शब्द 'क्षितीनां' ह्याचें विशेषण मानतां येत नाहीं. तेव्हां 'पंच क्षितीनां' अथवा पंच-जनांचा ह्या मंत्रांत संबंधच नाहीं. 'क्षितीनां' हा शब्द नः कडे लावतां येईल. अवः म्हणजे अवस्तात्, असें धरून अर्थ केला आहे.

अग्नेर्मन्वे प्रथमस्य प्रचेतसः पाञ्चजन्यस्य बहुधा यमिन्धते
विशोविशः प्रविशिवांसमीमहे स नो मुञ्चत्वंहसः ॥

(अ. ४-२३-१)

अर्थ—ज्या अग्नीला नाना प्रकारांनीं प्रज्वलित करतात असा जो सर्वांत ज्येष्ठ, विद्वान् व पंचजनांना पूज्य असलेला अग्नी, त्याचें ( माहात्म्य ) मी जाणतों. सर्वलोकसंनिविष्ट असा अग्नी त्याची आम्ही प्रार्थना करतों. तो पापापासून आम्हांला मुक्त करो.

**विशोविशः प्रविशिवांसम् = सर्वाः प्रजाः जाठरादि रूपेण प्रविष्टवंतम्।**

ह्या अग्नीच्या विशेषणावरून पांचजन्य म्हणजे सर्व लोकांना पूज्य असलेला अग्नी असा अर्थ करणें युक्त दिसतें. तै. संहितेंत सुद्धां अग्नीचें हें सर्वजनात्मक स्वरूप वर्णन केलें आहे—

"विश्वस्यां विशि प्रविविशिवांसम् ईमहे" (४-७-१५-१)

बरें, पंचजनांत गंधर्व, राक्षस घेतले, तर हे लोक अग्निपूजक होते, ह्याविषयीं निर्विवाद पुरावा नाहीं.

"रक्षोहणं" (अथर्व ४-२३-३) असें अग्नीचें वर्णन आहे. तसेंच गंधर्व आणि अप्सरा ह्यांची देवांच्या शत्रूंतच गणना होते. उदारणार्थ

**त्वया वयमप्सरसो गन्धर्वांश्चातयामहे**—तुझ्या साधनानें आम्ही गंधर्व, अप्सरा ह्यांचा नाश करतों. ( अथर्व. ४-३७-२ )

सर्व लोकांना अग्नीची अवश्यकता असल्यामुळें, त्याला पांचजन्य हें विशेषण लावण्यांत आलें. उदाहरणार्थ,

**अग्निर्ऋषिः पवमानः पाञ्चजन्यः पुरोहितः ।**
**तमीमहे महागयम् ।** (ऋ. ९-६६-२०)

**वयमग्ने अर्वता वा सुवीर्यं ब्रह्मणा वा चितयेमा जनां अति । अस्माकं द्युम्नमधि पञ्च कृष्टिपूच्चा स्वर्ण शुशुचीत दुष्टरम् ॥**
(ऋ. २-२-१०)

अर्थ—हे अग्ने, आम्ही आपला पुरुषार्थ अश्वाच्या साहाय्यानें अगर प्रार्थनेच्या द्वारें तरी लोकांच्या मनावर विशेष रीतीनें ठसवूं असें कर. आमचें वैभव सूर्याप्रमाणें दुष्प्राप्य होऊन पंचजनांत अत्युच्च स्थळीं तळपत राहील असें कर.

येथेंहि पंचजनाचा आम्ही समजतों तो अर्थ विसंगत होणार नाहीं.

**विश्वस्य केतुर्भुवनस्य गर्भ आ रोदसी अपृणाज्जायमानः । वीळुं चिदद्रिमभिनत्परायञ्जना यदग्निमयजंत पंच ॥** (ऋ. १०-४५-६)

अर्थ—विश्वाचा ध्वज, भुवनाचा गर्भ असा ( अग्नि ) उत्पन्न होतांच, आकाश व पृथ्वी व्यापून टाकता झाला. आक्रमण करीत असतां बळकट पर्वताचाहि त्यानें भेद केला. तेव्हां पंचजनांनीं अग्नीचें यजन केलें.

अग्नीचा पराक्रम सर्व विश्वानें अनुभविला तर सर्व विश्वानें त्याचें यजन कां करूं नये ?

**यः पंच चर्षणीरभि निषसाद दमेदमे कविर्गृहपतिर्युवा ॥**
(ऋ. ७-१५-२)

अर्थ—जो ( अग्नि ) त्रिकालज्ञ, गृहस्वामी आणि नववयस्क, पंचजनांकडे येऊन, घरोघरीं स्थानापन्न होता झाला.

**या पृतनासु दुष्टरा या वाजेषु श्रवाय्या । या पंच चर्षणीरभींद्राग्नी ता हवामहे ॥** (ऋ. ५-८६-२)

अर्थ—जे युद्धामध्यें दुर्निवार, रणभूमीवर जे परम विख्यात, पांचहि लोकांना जे अंकित करतात ( अथवा पंचजनांचें जे रक्षण करतात-सायण ) अशा इंद्राग्नींचा आम्ही धांवा करतों.

येथेंहि पंचजनांना अंकित करण्याचें सामर्थ्य इंद्राग्नींना आहे, पण बाकीचे लोक त्यांना अंकित करतां येत नाहींत, हें म्हणणें अवास्तव असून, शिवाय उपास्य दैवतांना न्यूनत्व आणणारें आहे. आतां सायणाचार्यांचा अर्थ मान्य केला, तर मात्र सांप्रदायिक असा पंचजनाचा अर्थ युक्त नाहीं, असें म्हणतां यावयाचें नाहीं. पण 'अभि' हें अव्यय तसा अर्थ ध्वनित करीत नाहीं.

**यं त्वा होतारं मनसाभि संविदुस्त्रयोदश भौवनाः पञ्च मानवाः । वर्चोधसे यशसे सूनृतावते तेभ्यो अग्निभ्यो हुतमस्त्वेतत् ॥**

(अ. ३-२१-५)

अर्थ—ज्या तुला पंच मानव आणि तेरा भौवन होता म्हणून चांगल्या रीतीनें जाणतात, त्या तेजस्वी, यशस्वी व मधुरभाषी अशा तुला आणि त्या अग्नींना ही आहुती दिली जावो. ह्यांत 'त्रयोदश-भौवनाः' ह्या शब्दांचा अर्थ समजल्यावांचून 'पञ्च मानवाः' ह्याचा अर्थ निश्चित करणें अशक्य आहे. सायणाचार्यांनीं तेरा महिने व पांच ऋतु (पंच मानवाः) असा एकदां अर्थ करून विकल्प म्हणून भुवन नामक ऋषीचे तेरा पुत्र आणि निषादसहित चार वर्ण, असा त्रयोदश भौवनाः व पञ्च मानवाः ह्यांचा अर्थ दिला आहे. व्हिट-नेनें तेरा प्राणी आणि पांच मानववंश, असा अर्थ दिला आहे. पण त्रयोदश भौवनाः यांचा कोणताहि अर्थ समाधानकारक दिसत नाहीं.

भुवनऋषीचा विश्वकर्मा नांवाचा एक मुलगा निरुक्तांत व ऐतरेय ब्राह्मणांत सांगितला आहे, पण तेरा मुलांचा कोठेंच उल्लेख नाहीं. त्याचप्रमाणें व्हिटनेच्या तेरा प्राण्यांचा नामनिर्देश करतां येणें शक्य नाहीं. तथापि मनुष्येतर तेरा सृष्ट प्राणी असा अर्थ केलाच, तर पंच मानव ह्याचा अर्थ अखिल मानवजात, असाच समजणें प्राप्त आहे.

**य ओजिष्ठस्तमा भर पवमान श्रवाय्यं । यः पंच चर्षणीरभि रयिं येन वनामहै ॥** (ऋ. ९-१०१-९)

अर्थ—हे पवमान, जो ओजस्वी त्या प्रख्यात ( सोमरसाला ) आमच्याकडे आण. जो पंचजनांच्या सन्मुख असतो, आणि ज्याच्या योगानें आम्हीं संपत्ति मिळवूं शकूं.

येथेंहि पंचचर्षणी म्हणजे विशिष्ट लोक, असें मानण्याचें विशेष कारण दिसत नाहीं. "पंचचर्षणीरभि" ह्याचा अर्थच मुळीं स्पष्ट समजत नाहीं. "उपसर्गश्रुतेर्योग्यक्रियाध्याहारः" हा न्याय मान्य केला तरी येथें अध्याहृत क्रियापद कोणतें, तें कांहीं केल्या निश्चित करतां येत नाहीं.

**य आर्जीकेषु कृत्वसु ये मध्ये पस्त्यानां । ये वा जनेषु पंचसु ॥** (ऋ. ९-६५-२३)

अर्थ—जे ( सोमरस ) आर्जीक व कृत्व देशांत, जे घरांतून अथवा जे पंचजनांत गाळले जातात ते वगैरे.

आर्जीक व कृत्व ह्या देशांतील लोक जर अनार्य असतील, तर सोमरसाचा उपयोग पंचजनच ( विशिष्ट लोकच ) करीत होते, हें म्हणणें टिकणार नाहीं.

**प्र सुमेधा गातुविद्विश्वदेवः सोमः पुनानः सद एति नित्यं ।**
**भुवद्विश्वेषु काव्येषु रंतानु जनान्यतते पंच धीरः ॥** (ऋ ९-९२-३)

अर्थ—अत्यंत बुद्धिमान्, स्वर्गप्रापक, विश्वदेव असा हा सोम स्वच्छ केला असतां, नित्य आपल्या निवासस्थानीं जातो. सर्व यज्ञांत तो रमणीय दिसतो. सुधीर सोम पंचजनांच्या मागें जाण्याचा प्रयत्न करतो.

सोमामध्यें इतके गुण असल्यामुळें सर्व जनांना तो हवासा होतो.

आ दधिक्राः शवसा पञ्च कृष्टीः सूर्य इव ज्योतिषापस्ततान ॥

(ऋ. ४–३८–१०)

अर्थ—सूर्य ज्याप्रमाणें आपल्या तेजानें सर्वत्र जल पसरून देतो, त्याप्रमाणें दधिक्रा वीर आपल्या बळानें पंच जनांना पसरून देतो.

उपमेचें मर्म लक्षांत घेतां, पंचजन म्हणजे सर्व जन, असेंच मानणें युक्त दिसतें.

त्रिषधस्था सप्तधातुः पञ्च जाता वर्धयन्ती । वाजेवाजे हव्या भूत् ॥

(ऋ. ६–६१–१२)

ही ( सरस्वती ) तिन्ही लोकांत वास करणारी आहे. हिचें सत्त्व सात प्रकारचें असून पांचहि मानवजातींचा ही उत्कर्षच करते. तेव्हां अशा ह्या सरस्वतीला प्रत्येक सात्विक संग्रामांत पाचारण करणें अगदीं अवश्य आहे. ( श्रुतिबोध ).

ससर्परीरभरत्तूयमेभ्योऽधि श्रवः पांचजन्यासु कृष्टिषु ॥

(ऋ. ३–५३–१६)

अर्थ—पंचजनांजवळ असलेलें धन त्यांच्यापासून काढून ससर्परी आम्हांस सत्वर देवो.

येथें 'पांचजन्यासु कृष्टिषु' हा शब्दप्रयोग ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

ऋषिं नरावंहसः पांचजन्यमृबीसादत्रिं मुंचथो गणेन ॥

(ऋ. १–११७–३)

अर्थ—हे अश्वीहो, पंचजनांना पूज्य असा जो अत्रिऋषि त्याला तुम्ही त्याच्या गणांसह भयंकर गुहेंतून बाहेर काढलेंत.

अत्रिऋषींची लोकप्रियता मर्यादित कां करावयाची ? 'लोकमान्य' म्हटलें म्हणजे प्रत्येक व्यक्तीची मान्यता थोडीच मिळवे ?

**यस्येक्ष्वाकुरुप व्रते रेवान्मराय्येधते दिवीव पंच कृष्टयः ॥**

(ऋ. १०–६०–४)

अर्थ—ज्याच्या सेवेंत इक्ष्वाकु संपत्तिमान् व शत्रूचा काळ असा होतो. ( ह्याला उपमा म्हणजे ) आकाशांतील पंचजनांप्रमाणें.

आकाशांतील पंचजन कोण अर्थात् देव, म्हणजे अखिल देव. तसेंच पृथ्वीवरील ( गोजाताः ) अखिल जन कां घेऊं नये ?

**एषा स्या युजाना पराकात्पंच क्षितीः परि सद्यो जिगाति ।**
**अभिपश्यंती वयुना जनानां दिवो दुहिता भुवनस्य पत्नी ॥**

(ऋ. ७–७५–४)

अर्थ—लांब अंतरावर रथ जोडून ही ( उषा ) एकदम पंच-प्रदेशांवर ( अथवा पंचजनांवर ) येते. भुवनाची पत्नी, व द्यु-लोकाची कन्या मनुष्यांचीं कृत्यें अवलोकन करीत ( येते ).

कवीचें म्हणणें कीं, उषा आपला रथ कोठें सज्ज करते तें दिसत नाहीं, पण एकदम पंचजनांना व्यापून टाकते. हें जर निस-र्गाचें वर्णन असेल, तर पंचक्षिति म्हणजे सर्व जग असाच अर्थ घेतला पाहिजे.

**मित्राय पञ्च येमिरे जना अभिष्टिशवसे । स देवान्विश्वान्बिभर्ति ॥**

(ऋ. ३–५९–८)

अर्थ—इष्टकार्यार्थ बलाचा उपयोग करणारा जो मित्र त्याला पंचजन शरण जातात. तो सर्व देवांचा सांभाळ करतो.

येथें पंचजन म्हणजे पांच जातीच मानण्याचें कारण नाहीं.

**यदंतरिक्षे यद्दिवि यत्पंच मानुषाँ अनु । नृम्णं तद्धत्तमश्विना ॥**

(ऋ. ८-९-२)

अर्थ—हे अश्वी, जें अंतरिक्षांत, जें द्युलोकांत, जें पंचजनांत तेज आहे, तें मला द्या.

येथें 'पंचमानुषां अनु' ह्याचा अर्थ पंचक्षितिषु = सर्व पृथ्वीवर, असा करणें सयुक्तिक दिसतें. अर्थात् 'पंच मानुष' म्हणजे अखिल मानवजात होय.

**तदद्य वाचः प्रथमं मसीय येनासुराँ अभि देवा असाम।**

**ऊर्जाद उत यज्ञियासः पंच जना मम होत्रं जुषध्वं ॥**

**पञ्च जना मम होत्रं जुषंतां गोजाता उत ये यज्ञियासः ॥**

(ऋ. १०-५३-४।५)

अर्थ—जिच्या योगानें आम्ही देव असुरांना पराभूत करूं, अशी वाणी मी आज प्रथम उच्चारतों. पूज्य व अन्नभक्षक असे पंचजन हो, माझें होतृत्व तुम्हांला प्रिय होवो. पृथ्वीवर जन्मलेले व पवित्र असे पंचजन हो, माझें होतृत्व तुम्हांला प्रिय होवो.

ह्या ऋचेचा अर्थ आमच्या मतें पुष्कळांनीं चुकीचा केला आहे. इंग्रजी व मराठी भाषांतरें संदिग्ध व भ्रामक वाटतात. वरील मंत्रावरून देव नांवाचे मनुष्य होते, ही गोष्ट निर्विवाद होते. कारण मंत्रकार 'आम्ही देव असुरांचा पराभव करूं' असें म्हणत आहे. त्यानें नवीन स्तोत्र रचिलें व तें प्रथमच उपयोगांत आणण्याचा त्याचा हेतु होता. म्हणून तो पंचजनांना उद्देशून प्रार्थना करतो कीं, माझें होत्र तुम्हांला मान्य होवो. म्हणून होत्र याचा अर्थ हविर्द्रव्य, आहुति अगर यज्ञ असा करण्यापेक्षां, होतृत्व करणें अधिक सयुक्तिक दिसतें.

"अग्नेर्होत्रेण प्रणुदे" (अ. ९-२-६)

ह्यांतहि होत्र ह्याचा अर्थ priesthood (होतृत्व) असाच आहे.

तसेंच ऊर्जादः, यज्ञियासः, आणि गोजाताः हीं पंचजनांचीं विशेषणें होऊं शकतील; अथवा पंचजनाः; ऊर्जादः; यज्ञियासः आणि गोजाताः हीं स्वतंत्र व भिन्न संबोधनवाचक नामें होऊं शकतील; किंवा ऊर्जाद, गोजात व यज्ञियास हे शब्द पंचजनांतीलच, पण भिन्न व्यक्तिसंबोधक विशेषणें मानतां येतील. ऊर्जाद व गोजात हे यज्ञियास शब्दाचे प्रतियोगी असावेत. पंचजन हा शब्द जन ह्या अर्थींच येथें वापरलेला दिसतो. अन्नावर जगणारे ते ऊर्जादः आणि आहुतीवर राहणारे ते यज्ञियासः. यज्ञांत ज्या देवांना आव्हान करीत ते मृत्यूपूर्वीं मनुष्यकोटींतील होते, हें ह्यावरून उघड होतें. गो म्हणजे पृथ्वी किंवा इंद्रिय; कोणताहि अर्थ घेतला तरी तात्पर्य एकच. यज्ञिय जन गोजात नाहींत. दिव्य आणि पार्थिव, गोजात आणि यज्ञिय ही जोडी अन्यत्रहि आली आहे. उदाहरणार्थ,

**आदित्या रुद्रा वसवो जुषंतेदं ब्रह्म क्रियमाणं नवीयः**
**शृण्वंतु नो दिव्याः पार्थिवासो गोजाता उत ये यज्ञियासः**

(ऋ. ७-३५-१४)

सायणाचार्यांनीं गोजात म्हणजे मरुत देव हा अर्थ सुचविला आहे. पण तो येथें अग्राह्य वाटतो. इंग्लिश भाषांतरकारांनीं तर 'गो' म्हणजे गाय समजून भाषांतर केलें आहे. तेंहि सायणाचार्यांप्रमाणेंच चुकीचें केलेलें दिसतें. ऋ. १०-५३-५ पूर्वार्ध ही १०-५३-४ च्या उत्तरार्धाची पुनरुक्ति असून, श्रोत्यांचें लक्ष्य वेधण्याकरतांच उपयोजलेली आहे. सारांश, वरील मंत्रांत 'पंचजन' ह्याचा उपयोग 'जन' शब्दाच्या ऐवजींच केलेला दिसतो.

पंचजन म्हणजे सर्व मानवी जग, ह्या म्हणण्याला खालीं दिलेल्या अथर्ववेदांतील मंत्रावरूनहि पुष्टि मिळते:–

**अदितिर्द्यौरदितिरन्तरिक्षमदितिर्माता स पिता स पुत्रः ।**
**विश्वे देवा अदितिः पञ्चजना अदितिर्जातमदितिर्जनित्वम् ॥**

(अ. ७–६–१)

"हे अदिति, तूं सर्व कांहीं आहेस. स्वर्ग, अंतरिक्ष, माता, पिता, अखिल देव, पंचजन, सृष्टमात्र, तसेंच पुढें उत्पन्न होईल तें सर्व तूंच आहेस." मग पंचजनाचा अर्थ मनुष्यप्राणी घेणें अवश्य नाहीं काय ?

**ब्राह्मण एव पतिर्न राजन्यो न वैश्यः ।**
**तत् सूर्यः प्रब्रुवन्नेति पञ्चभ्यो मानवेभ्यः ॥** (अ. ५–१७–९)

अर्थ—ब्राह्मण हा एकटाच पति, क्षत्रिय किंवा वैश्य नाहीं, ही गोष्ट सूर्य पंच मानवांना सांगत हिंडतो.

ह्या मंत्राचा अर्थ बरोबर समजण्यास ह्याच्या मागील मंत्र उद्धृत करणें अवश्य आहे, तो मंत्र असा:–

**उत यत् पतयो दश स्त्रियाः पूर्वे अब्राह्मणाः ।**
**ब्रह्मा चेद्धस्तमग्रहीत् स एव पतिरेकधा ॥**

अर्थ—एखाद्या स्त्रीला अगोदरचे दहा अब्राह्मण पती जरी असले, तरी शेवटीं ब्राह्मणानें तिचें पाणिग्रहण केलें असतां, तो एकटाच पती होतो.

क्षत्रिय, वैश्य ह्यांचे हक्क नाहींसे होऊन एकट्या ब्राह्मणाचेच नवरेपणाचे हक्क चालू होतात, असा ह्या मंत्रद्वयाचा अर्थ आहे. व ही गोष्ट सूर्य पंचजनांना जाहीर करीत जातो. येथें पंचजन म्हणजे सर्वजन, असाच अर्थ होऊं शकतो.

नहि मे अक्षिपच्चनाच्छांत्सु पंच कृष्टयः । कुविस्सोमस्यापामिति ।

(ऋ. १०-११९-६.)

अर्थ—पंचजन म्हणजे माझ्या डोळ्यांतील एक कण सुद्धां होणार नाहींत. मीं सोमपान केलें नाहीं काय?

इतक्या गर्वोक्तीला पंचजनाचा अर्थ सर्वजनच करणें योग्य आहे.

यस्यामन्नं व्रीहियवौ यस्या इमाः पञ्च कृष्टयः ।

(अ. १२-१-४२)

अर्थ—भात आणि सातू हें जिच्यावर अन्न आणि जिचे हे पंचजन त्या भूमीला नमस्कार असो.

हें पृथ्वीसूक्त आहे. येथेंहि पंचजनाचा सर्वजन असा अर्थ होणार नाहीं असें नाहीं.

यथा यमाय हर्म्यमवपन् पञ्च मानवाः ।
एवा वपामि हर्म्यं यथा मे भूरयोसत ॥

(अ. १८-४-५५)

अर्थ—ज्याप्रमाणें पंचमानवांनीं यमाकरितां घर बांधलें त्याप्रमाणें मी (हे प्रेत) माझे आप्तजन वाढावे म्हणून (तुझ्याकरतां) घर बांधतों.

येथें पंचजन म्हणजे सर्व मानव असें समजणेंच युक्त होईल.

पांचजन्य हें जसें अग्नीचें विशेषण आहे, तसेंच दुसरें वैश्वानर हें आहे. सर्व लोकांना पूज्य, उपयुक्त तो वैश्वानर. त्यावरून वैश्वानर आणि पांचजन्य ह्यांचा एकच अर्थ समजण्यास प्रत्यवाय नाहीं.

देवांमध्यें निरनिराळ्या जाती होत्या, असें कित्येकांचें म्हणणें आहे. पूर्वदेव, मूरदेव, शूरदेव, शिश्नदेव, वगैरे. पण ह्या जाती नसाव्यात. शिश्नदेव म्हणजे शिश्नाची, लिंगाची पूजा करणारे—शिश्न

आहे देव ज्यांचा ते लोक. ह्या अर्थानें शिश्नदेव देवांपैकीं नव्हत, हें उघड होतें. अवेस्ता ग्रंथांत वरेण्यदेवाचें वर्णन आहे. पूर्वदेव म्हणजे वडील-देव इतकेंच. पूर्वदेवांप्रमाणें पूर्वजन शब्द अथर्ववेदांत आढळतो. उ०,

**यस्यां पूर्वे पूर्वजना विचक्रिरे यस्यां देवा असुरानभ्यवर्तयन् ।**

( अ. १२।१।५ )

जिच्यावर पूर्वींचे जन चोहोंकडे पसरले, जिच्यावर देवांनीं असुरांचा पराभव केला. येथें सुद्धां जन आणि देव ह्यांत भेद केला आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईलच. पण पूर्वदेव ही देवांची जात नव्हे, हें निश्चित आहे.

**देवाश्चित्ते असुर्याय पूर्वेऽनु क्षत्राय ममिरे सहांसि**

(ऋ. ७-२१-७)

ह्या ऋचेंत पूर्वे देवाः हे शब्द जातिवाचक नाहींत. "पूर्वे ऋषयः" "पूर्वे पितरः" ह्या प्रमाणेंच पूर्वे देवाः देवांच्याहून भिन्न समाज "पूर्वे मनवः" ( अ १९।२६।२ ) ह्या शब्दांनीं सूचित केला जातो.

पूर्वदेव अथवा शिश्नदेव ह्यांच्या प्रमाणेंच मूरदेव हे लोक सुद्धां देवांपैकीं नव्हते. उलट ते देवांचें शत्रू असावेत; उ०

**आ जिव्हया मूरदेवान् रभस्व** । (अ.८-३-२)

अर्थः— ( हे अग्ने ) तूं आपल्या जिभेनें मूरदेवांना स्पर्श कर ( जाळून टाक ).

**विग्रीवासो मूरदेवा ऋदन्तु मा ते दृशन्त्सूर्यमुच्चरन्तम्** (अ. ८-४-२४)

अर्थः—बिनमानेचे असे मूरदेव नाश पावोत. वर येणाऱ्या सूर्याचें दर्शन त्यांना न होवो.

**पराचिषा मूरदेवाञ्छृणीहि** । (अ. ८-३-१३)

अर्थः—( हे अग्ने ) तूं आपल्या ज्वालेनें मूरदेवांना नष्ट कर. मूरदेवांना मूर सुद्धां म्हणत; उ०

**मा त्वा मूरा अविष्यवो...आदभन्** (अ. २०-२२-२)

अर्थः—हे ( इन्द्र ) तुझी मूरदेव हिंसा न करोत.

मूर शब्दचा अर्थ नीट समजत नाहीं. शिश्नाप्रमाणेंच कांहीं तरी अर्थ असावा. मूर म्हणजे मूढ, ही यास्कांची नुसती कल्पना दिसते. पण मूर म्हणजे देव नाहीं, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

गंधर्व, यक्ष, नाग, वानर व राक्षस मिळून पंचजन होते असें रा. भागवत म्हणतात. शिवाय रामायणकालीं मनु, वानर, दानव, राक्षस, नाग, यक्ष व गंधर्व असे सात जन प्रसिद्ध होते, असाहि त्यांचा अभिप्राय आहे. अप्सरस हे दर्यावर्दी लोक असावेत, असाहि त्यांनीं तर्क केला आहे. पण अप्सरा ह्या गंधर्वांच्या स्त्रिया होत्या. उ.

**विश्वावसो ब्रह्मणा ते नमोभिर्जाया अप्सरसः परेहि** (अ. १४-२-३५)

हे विश्वावसो ! तूं आपल्या अप्सरा स्त्रियांकडे जा. तसेंच

**ताभ्यो गंधर्वपत्नीभ्योऽप्सराभ्योकरं नमः** अ. (२-२-५)

आतां गंधर्व हे पर्वतावर राहाणारे होते. हे लोक समुद्रावर राहाणाऱ्या स्त्रियांबरोबर विवाह करण्यास गेले, हें रत्नागिरीचे चित्पावन जोगाईच्या अंब्याला बायकांकरितां गेले, असें म्हणण्यासारखें दिसतें. कांहीं असलें तरी, सायणाचार्यांप्रमाणें पंचजनांत अप्सरांचा समावेश करतां येणार नाहीं. कारण पंचजन हा पुरुषवाचक शब्द आहे.

**स्युः पुमांसः पंचजनाः पुरुषा पूरुषा नरः** (अमरकोश)

तेव्हां स्त्रियांचा समावेश पंचजनांत होऊं नये, असें वाटतें.

राक्षस मनूची संतती नाहीं, हें रा. भागवतांचें म्हणणें बरोबर दिसतें. मनूचे वंशज म्हणजे मानव, हे देवांहून त्याचप्रमाणें राक्षसां

हून वेगळे होते. पण देव आणि मनुष्य ह्यांचें सख्य होतें. असुर आणि राक्षस ह्यांच्याशीं मात्र देवांचें शत्रुत्व होतें. तथापि गंधर्व आणि असुर एक असावेत, हा रा. भागवत ह्यांचा तर्क निराधार भासतो. गंधर्व यज्ञ करणारे होते असें म्हणण्यास सबळ पुरावा नाहीं. पण असुर मात्र निःसंशय अग्निपूजक होते. तसेंच असुर शंकराचे उपासक नव्हते; राक्षस होते. अग्नीची उपासना व विष्णूची किंवा महादेवाची उपासना एकाच वेळीं एकाच लोकांची असणें संभवनीय नाहीं. असो.

ब्राह्मणकालीं पंचजन म्हणजे देव, मनुष्य, गंधर्व, सर्प व पितर हे जरी समजत असले, तरी ह्या पांच जाती मिळून भूतलावरील सर्व लोक आले, अशीच त्यावेळीं समजूत असली पाहिजे. हें ऐतरेय ब्राह्मणांतील (४-२७) एका उपाख्यानावरून व्यक्त होतें. तें उपाख्यान असें:— पूर्वीच्या कालीं भूलोक व स्वर्गलोक एकत्र-एकजुटीनें-होते. पुढें ते भिन्न झाले. तेव्हां पर्जन्य पडण्याचें बंद पडलें. सूर्यहि प्रकाशण्याचा बंद झाला. तेव्हां पंचजन मूढ बनले. नंतर देवांनीं स्वर्ग आणि भूमी ह्यांचा पुनः मिलाफ केला वगैरे. ह्यांत पंचजन म्हणजे विशिष्ट लोक असें मानण्याला कांहींच कारण नाहीं. पंचजनांचें संवर्धन करणारी असें सरस्वतीचें वर्णन ऋग्वेदांत आहे—( पंच जाता वर्धयन्ती ६-६१-१२ )—त्यावरूनहि पंचजन म्हणजे सर्व लोक, असेंच अनुमान करणें भाग पडतें. हेंच अनुमान दृढ करण्यास ऐतरेय ब्राह्मणांतील आणखी एक वचन दिलें असतां पुरें होईल.

"महाकर्म भरतस्य न पूर्वे नापरे जनाः । दिवं मर्त्य इव हस्ताभ्यां नोदापुः पञ्च मानवा इति (८-२३)

अर्थ—- भरताचा पराक्रम पूर्वीच्या किंवा अलीकडच्या कोणत्याहि

लोकांना करतां आला नाहीं. मनुष्याला हातानें स्वर्ग गांठतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें पंच मानवांना भरताचा पराक्रम करतां आला नाहीं. येथें पंचमानव म्हणजे सर्व मानवजात नाहीं, असें कोण म्हणूं शकेल ? त्याचप्रमाणें अथर्ववेदांतील एका मन्त्रावरून पंचमानव म्हणजे अखिल मानवजात असें मानणें भाग पडतें.

त्वज्जातास्त्वयि चरन्ति मर्त्यास्त्वं बिभर्षि द्विपदस्त्वं चतुष्पदः।
तवेमे पृथिवि पञ्च मानवा येभ्यो ज्योतिरमृतं मर्त्येभ्य उद्यन्त्सूर्यो रश्मिभिरातनोति (१२-१-१५)

अर्थ—हे पृथ्वि, तुझ्यापासून सर्वांची उत्पत्ति झाली...हे तुझे पंच मानव वगैरे.

यस्मिन् पञ्च पञ्चजना आकाशश्च प्रतिष्ठितः
(बृ. उपनिषत् ४-४-१७)

अर्थ—ज्याच्या ठिकाणीं पंचजन व आकाश हीं प्रतिष्ठित झालीं आहेत ( त्यालाच मी आत्मा म्हणून समजतों ),

ह्या ठिकाणीं पंचजन म्हणजे सर्व लोक, असा अर्थ केल्यावांचून गत्यंतरच नाहीं.

पंचजन म्हणजे जन असा अर्थ समजण्यांत येऊं लागला, म्हणून पंचजन शब्दाला पंच हें येथें विशेषण लाविलें आहे. उत्तरकालीन वैदिक वाङ्मयांत अशीं उदाहरणें थोडीं थोडकीं नाहींत.

देवान् जनमगन्यज्ञस्ततो मा यज्ञस्याशीरागच्छतु पितॄन्सर्पान्गंधर्वानप ओषधीः पञ्च जनाञ्जनमगन्यज्ञस्ततो मा यज्ञस्याशीरागछतु... पञ्चानां त्वा दिशां धर्त्रायागृह्णामि पञ्चानां त्वा पञ्चजनानां धर्त्रायागृह्णामि । काठक सं. ५-६

येथें देवजन आणि पंचजन असा भेद दाखविला आहे. पण आपणांस सध्यां पंच पंचजन ह्या शब्दांवरच दृष्टि टाकावयाची आहे; तसेंच

**पञ्चानां त्वा दिशां धत्रांय गृह्णामि इति पञ्च वै दिशो दिश एवास्मै गृह्णाति सर्वा दिशोऽभिजयति सर्वा अस्य दिशोऽभिजिता भवन्ति। पञ्चानां त्वा पञ्चजनानां धत्रांय गृह्णामीति छंदांसि वै पञ्च पञ्चजना यज्ञच्छंदांस्युपैनं यज्ञो नमति।** (का. सं. ३२-६)

येथें छंदांनाच पंचजन म्हटलें आहे.

तैत्तिरीय संहितेंतहि ( [illegible] ) असाच मंत्र आहे.

**पञ्चानां त्वा पञ्चजनानां यन्त्राय धत्राय गृह्णामि ।**

पञ्चजनाशीं समानार्थक पञ्चदेव असा शब्द ऋग्वेदांत योजिलेला आहे असा कित्येकांचा अभिप्राय आहे.

**आ रोदसी अपृणादोत मध्यं पञ्च देवाँ ऋतुशः सप्तसप्त.** (ऋ. १०-५५-३)

वैदिक ऋषि देव आणि पञ्चजन ह्यांत भेद मानीत, असें पूर्वी दिलेल्या काठक–संहितेंतील उताऱ्यावरून दिसून येईल. पण सायणाचार्यांनीं पंचदेव ह्याचा पंचजन असाच अर्थ केला आहे; ( देव-मनुष्य-पित्रसुर-राक्षससंज्ञकान् ).

झिमरच्यामतें पंचजनांमध्यें अनार्यांचा समावेश होत नाहीं. त्याच्या म्हणण्याप्रमाणें यदु, तुर्वश, द्रुह्यु, अनु आणि पूरु हे पंचजन होत. खालील ऋचेंत ह्या पांचांचा निर्देश केला आहे:—

**यदिंद्राग्नी यदुषु तुर्वशेषु यद्द्रुह्युष्वनुषु पूरुषु स्थः। अतः परि वृषणावा हि यातमथा सोमस्य पिबतं सुतस्य।** (ऋ. १-१०८-८)

अर्थ—हे इन्द्र आणि अग्निदेव हो, जरी तुम्ही यदु, तुर्वश, द्रुह्यु, अनु अथवा पूरु ह्यांचे सदनांत असलां, तरी तेथूनहि, हे सामर्थ्यवान देवांनो, ( इकडे ) या व ( आम्हीं ) तयार केलेल्या सोमरसाचें प्राशन करा.

झिमरचें मत अग्राह्य ठरल्यासारखेंच आहे व आतांपर्यंत पंचजनांचा उल्लेख ज्यांत केलेला आहे अशीं जीं वचनें दिलीं, त्यांवरून

झिमरचा अभिप्राय विशेष विचार करण्यासारखा नाहीं, असें वाटतें.

पञ्चजनांप्रमाणें सप्तमानवांचाहि उल्लेख वैदिक ग्रंथांत येतो. उ०

**महदद्य भरतानां न पूर्वे नापरे जनाः**

**दिवं मर्त्य इव पक्षाभ्यां नोदापुः सप्त मानवा इति।**

(श. ब्राह्मण १३-५-४-२३)

सप्तमानुष हें विशेषण ऋग्वेदांत अग्नीला लावलेलें आहे. उ०

**यो अग्निः सप्तमानुषः श्रितो विश्वेषु सिंधुषु** ऋ. ८-३९-८

येथें सप्तमानुष ह्या विशेषणानें सात होत्यांचा निर्देश केला आहे, हें उघड आहे. यज्ञांत सात ऋत्विक् अग्नीची उपासना करतात. म्हणून यज्ञाला सप्तहोता असें म्हणतात. उ०

**यस्याध्वरः सप्तहोता मदिष्टः स नो मुञ्चत्वंहसः** (अ. ४-२४-३)

अर्थ—ज्याच्या (इन्द्राच्या) यज्ञांत सात होते असतात, ज्यांत वृत्ति उल्लसित होतात, असा तो (इन्द्र) पापापासून आम्हांला मुक्त करो.

शतपथब्राह्मणांतील जें अवतरण वर दिलें आहे, त्यावरून सप्तमानव आणि पंचजन हे दोनहि शब्द एकाच अर्थानें वापरले असावे असें वाटतें. पांच दिशांचे पांच लोक तसे सात पृथ्वीवरील सात लोक, असें म्हणण्याचा प्रघात पडला असावा. सप्तद्वीपांची कल्पना पंचदिशांच्या नंतरची दिसते. पृथ्वीला सप्तद्वीपा असें म्हणतात.

ह्या सर्व वचनांचा विचार करतां पंचजन आणि तत्सदृश शब्द ह्यांनीं अखिल मानव जातच ध्वनित होते, असें वाटतें. निदान मूलतः तरी अशा अर्थानेंच तो शब्द योजण्यांत आला असावा. सध्यां आपणांस तर्कच करावयाचे आहेत. निश्चित असें कोणतेंहि विधान करणें सध्यांच्या स्थितींत तरी धोक्याचें आहे.

# चातुर्वर्ण्य.

आजदिनतागायतची रूढ समजूत अशी आहे कीं, चार वर्णांचा नसला तरी त्रैवर्णिकांचा अविभिन्न असा एक समाज होता. ह्या एकजिनसी समाजाचे पुढें तीन तुकडे पाडले. कांहीं ब्राह्मण ठरले गेले, कांहीं क्षत्रिय झाले व बाकीच्यांना वैश्य ही संज्ञा प्राप्त झाली. शूद्र हा समाज अगदीं स्वतंत्र होता याविषयीं वाद नाहीं. माझ्या मतें ह्या लौकिक समजाचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे.

प्रथमतः असा विचार मनांत येतो कीं हाडामासानें, चालीरीतीनें व धार्मिक समजुतीनें एकजीव असलेल्या समाजाला अशा रीतीनें छिन्न विछिन्न करणें शक्य आहे काय? हें काम करणारा असा कोण अद्वितीय पुरुष असणार? व त्याचें ऐकणार तरी कोण? शिवाय अशी अपूर्व घटना ( विघटना? ) करणाऱ्याचें नांव अज्ञानावस्थेंत कसें व कां राहील? बरें हळू हळू हा भेद पडत गेला असें म्हणावें तर तें तरी संभवनीय आहे काय? प्रत्येक समाजांत तत्त्वतः हें चातुर्वर्ण्य असतेंच. मग बाकीच्या समाजांत आमच्या येथल्याप्रमाणें चातुर्वर्ण्य अथवा चार जाती आस्तित्वांत कां आल्या नाहींत? हिंदुस्थानांतच अशी कोणती विशेष परिस्थिती होती कीं तिच्यामुळें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे भेद उत्पन्न झाले? या परिस्थितीचें वर्णन कोणीं केलें आहे? खरोखर जर अशी स्थिती असती तर ज्या अनेक कारणांमुळें हे भेद पडत चालले त्या कारणांचा निर्देश कोठें तरी करण्यांत आला असता. म्हणून अशा प्रकारच्या इतिहासाच्या

अभावीं एकच समाज चतुर्विध झाला असें मानण्यास कांहीं आधार नाहीं.

सर्व धर्मग्रंथ म्हणजे स्मृती चातुर्वर्ण्याला उद्देशून आहेत. त्रैवर्णिकांच्यासंबंधानें धर्मशास्त्र कधींच नव्हतें. ऋग्वेदसंहिता कालीं चातुर्वर्ण्य दृढमूल झालें नव्हतें. पुरुषसूक्तावांचून अन्यत्र शूद्र शब्द कोठेंहि आलेला आढळत नाहीं. हें सूक्त ऋक्‌संहितेंतील बाकीच्या सूक्तांइतकें जुनें नाहीं हें सर्वांस मान्य आहे. ऋग्वेदांत पंच जनांचाच उल्लेख विशेषतः येतो. शूद्र शब्द इतर संहितांतहि पुष्कळ वेळां आला आहे असें नाहीं. अगदीं शेवटचा जो अथर्ववेद त्यांत हा शब्द सात वेळांच आला आहे. चातुर्वर्ण्य हा शब्द तर कोठेंच आढळणार नाहीं. चातुर्वण्य म्हणजे वर्णाश्रमधर्म. हा धर्म श्रुतींत सांगितलेला नाहीं. पण स्मृतींची उत्पत्ती वर्णाश्रमधर्म सांगण्याकरतांच आहे. यावरून असें उघड अनुमान निघतें कीं वेदांत चार वर्ण असले तरी चातुर्वर्ण्य नाहीं. अर्थात् चातुर्वर्ण्याची प्रतिष्ठा वेदोत्तरकालीन आहे. तसेंच हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं चातुर्वर्ण्यांतील शूद्र व ऋग्वेदांतील दास हे एक नव्हत. ऋग्वेदांत दास शब्द अनेक वेळां आला आहे. दासांबरोबर आर्यांच्या लढाया झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. परंतु शूद्रांबरोबर आर्यांचें युद्ध झालें असें एकहि उदाहरण नाहीं. दास हे बिन नाकाचे म्हणजे आखूड नाकाचे होते. असें त्यांचें वर्णन ऋग्वेदांत आहे. शूद्रांना हें वर्णन लागू पडणार नाहीं. दास श्रीमंत होते.[१] पण चातुर्वर्ण्यान्तर्गत शूद्र हे निर्धन होते. त्यांनीं आपल्या जवळ द्रव्यसंचय करावयाचा नव्हता.[२] दस्यु अगर दास हे

१ वधीर्हि दस्युं धनिनं (ऋ. १-३३-४)

२ शक्तेनापि हि शूद्रेण न कार्यो धनसंचयः (मनु १०-१२९)

अव्रत किंवा यज्ञ न करणारे असे अनार्य होते. दासांचें पारिपत्य करण्याकरतां इन्द्र जन्मास येतो.[३] एवढा मोठा मान शूद्रांना मिळाला नव्हता. आर्य आणि दास यांचा विरोध ठिकठिकाणीं संहिताग्रंथांत दाखविला आहे. आर्यांचे दस्यु हे प्रबळ शत्रू होते. शूद्रांचें इतकें सामर्थ्य कोठेंहि वर्णिलें नाहीं.

रोम मधील Patricians व Plebeians आणि आमच्यांतील आर्य व शूद्र यांमध्यें कोणत्याहि प्रकारचें साम्य नाहीं. युरोपियन लोकांची या बाबतींत चूक होते. प्लेबियन लोक शूद्रांसारखे होते. पण रोमन लोकांनीं आपखुशीनें त्यांना सुधारण्याचा प्रयत्न केला नाहीं. प्लेबियन लोकांना नागरिकत्वाचे हक्क नव्हते. पॅट्रिशिअन व प्लेबिअन यांत लग्नें होत नसत. प्लेबिअन लोकांचे कायदे निराळे. पुढें नाइलाजानें हळू हळू सर्व हक्क प्लेबिअन लोकांना द्यावे लागले. आमच्याकडे अगदीं उलट प्रकार होता. शूद्रांची सुधारणा व्हावी या हेतूनेंच त्यांचा चातुर्वर्ण्यांत समावेश करण्यांत आला. कारण ‘वर्णत्वाद्धर्ममर्हति’ असें वचन आहे. द्विजसेवेपासून उत्तरोत्तर शूद्रांची चातुर्वर्ण्यांत प्रगती झालेली दिसते. शूद्रांच्या सुधारणेच्या आड कोणीहि आलें नाहीं. ‘शूद्रोऽपि द्विजवत्सेव्यः’ या वचनानें तर संकल्पित सुधारणेचा कळस चढविला. शूद्रांची सुधारणा करणें हा जर हेतू नसता तर चातुर्वर्ण्यांत त्यांना स्थान मिळालें नसतें. म्हणून Patricians व Plebeians आणि आर्य व शूद्र यांत साम्य मानणें भ्रामक होईल. शूद्रांना आरंभापासून त्रैवर्णिकांचे अधिकार नसले तरी पायरी-पायरीनें ते त्यांना देण्याचा विचार निदान चातुर्वर्ण्यस्थापनेच्या वेळीं तरी होता.

---

३ सनादेव दस्युहत्याय जज्ञिषे ( ऋ. १–५१–६ )

तात्पर्य, शूद्र, चातुर्वर्ण्य आणि स्मृतिग्रंथ यांचें साहचर्य आहे. ही गोष्ट चातुर्वर्ण्यविचारांत प्रामुख्यानें दिसून येते. पूर्वीं देवासुरांचीं व देवदानवांचीं युद्धें होत असत. त्यावेळीं सर्व देवसमाज असुर– किंवा दानव–समाजाशीं लढे. देवांपैकीं क्षत्रिय तेवढे युद्धाला जात असें नव्हतें. यावरूनहि देवांमध्यें चातुर्वर्ण्य नव्हतें, असेंच म्हणावें लागतें. पूर्वींच्या सर्व समाजांत चातुर्वर्ण्य होतें असा समज कित्ये-कांचा झाला आहे. पण चातुर्वर्ण्य व चार वर्ण हीं दोनहि एकच अशा समजुतीमुळें तो समज झाला असावा असें वाटतें. कोणत्याहि समाजामध्यें धंद्याप्रमाणें चार वर्ग तत्त्वतः असतातच. पण त्यांना जातीचें स्वरूप येत नाहीं. आमच्याकडे प्रत्येक वर्णाचे धर्म निर-निराळे केल्यामुळें स्वभावतःच असलेल्या चार वर्गांना जातींचें स्वरूप प्राप्त झालें. पारशी धर्मांत चातुर्वर्ण्य नव्हतें व नाहीं. शूद्र हा शब्द नाहींच; पण तत्सम असा दुसरा शब्दहि पारशांच्या धर्मग्रंथांत आपणांस मिळणार नाहीं. चातुर्वर्ण्य जर परशुभारतीय आहे असें म्हटलें, तर शूद्र हा शब्द सुद्धां परशुभारतीय पाहिजे. पण तसा तो नाहीं. पारशांत शूद्र वर्णच नाहीं. झरथुष्ट्राच्या मरणानंतर मग लोक पुरोहित होण्याचा पिढीजाद हक्क आमचा आहे असें म्हणूं लागले. तसेंच ते आपणांस आथ्रवणहि म्हणत.

इतरांपेक्षां ते अधिक धर्मशास्त्रनिपुण असल्याकारणानें त्या आथ्र-वणांचा पिढीजाद पौरोहित्याचा हक्क मान्य करण्यांत आला. हा एवढाच वर्ग इतर पारशांपासून वेगळा झाला. पारशांतील हाच भिक्षुक वर्ग होय. पारशीपुरोहितास मोबेद म्हणतात. मोबेद होण्यास कांहीं संस्कार करावे लागतात हें खरें. तथापि भिक्षुक-घराण्यांत ज्याचा जन्म झाला आहे त्यालाच मोबेद होतां येतें; इत-

रांना नाहीं. आथ्रवण आणि बेहदिन असे दोनच भेद पारशी समाजांत सांप्रत आहेत. बेहदिन म्हणजे गृहस्थ अथवा भिक्षुकवर्गाचे नाहींत ते. आथ्रवण आपली मुलगी बेहदिनाला कधींहि देत नाहींत. बेटीव्यवहाराचा हा जसा कडक निर्बंध आहे तसा रोटीव्यवहाराचा मात्र नाहीं. आथ्रवण हे बेहदिनांकडे जेवतात. तरी पण बेहदिनाला पारशांव्यतिरिक्त इतर धर्मांच्या लोकांच्या हातचें अन्न चालतें तसें आथ्रवणांना चालत नाहीं. आथ्रवण हा पारशांच्याच हातचें अन्न खाईल. इतरांकडे तो जेवणार नाहीं. आथ्रवणांशिवाय प्राचीन इराणांत राथेष्ट्र ( रथएष्थाओ ), वास्त्रीयोह ( वास्त्र्योफ्ष्युयस्हु ) असे दोन वर्ग होते. हे अनुक्रमें क्षत्रिय व वैश्य होते. पण या दोन वर्गांचा लोप लवकरच झाला. शूद्रसम वर्ग तर कधींच नव्हता. सांप्रत पारशांत आथ्रवण आणि बेहदिन असे दोनच वर्ग आहेत. यावरून पारशी लोकांत चातुर्वण्य होतें असें म्हणतां येणार नाहीं. प्राचीन इराणी लोकांत चौथा वर्ग हूइती नांवाचा होता. हे लोक कारागीर अथवा कारू वर्गापैकीं होते. नुसतें परिचर्याकर्म हाच त्यांचा धंदा नव्हता. हूइती हा शब्द हू धातूपासून ( सं. सू ) झाला आहे. ह्या धातूचा अर्थ तयार करणें असा आहे. शूद्र शब्दाशीं या शब्दाचें कांहींच साम्य नाहीं. बरें, हूइती शब्द अवेस्तांत एकदांच आला आहे. तो यस्नाच्या १९ व्या अध्यायांत आहे. 'यथा आहुवैर्यो' या स्तोत्रावर वरील अध्यायांत टीका आहे. पाठीमागच्या धर्मग्रंथांत हुइती शब्द आहे आणि तो एकदांच आलेला आहे. यावरून तो मागाहून घातलेला आहे, असें डॉ. मोदी यांचें म्हणणें आहे. या चार वर्णांचे धर्म निरनिराळे सांगितले नाहींत, ही गोष्ट आमच्या चार वर्णांशीं पारसीकांच्या चार वर्णांची विसदृशता दाखविते.

प्राचीन ग्रीक लोकांतहि चातुर्वर्ण्याचा अभावच असला पाहिजे. ज्या समाजांत गुलामांची संस्था होती त्या समाजांत शूद्रवर्ग असण्याचें प्रयोजनच नाहीं. शिवाय गुलामांना ग्रीक लोकांनीं आपणांमध्यें सामील करून कधींच घेतलें नाहीं. खरोखर पाहतां चातुर्वर्ण्यस्थापनेला शूद्रांचीच मोठी हरकत येणार. एका समाजाचे चार भाग व्हावयाचे तर शूद्र होण्यास संमति कोण देईल? कोणीहि देणार नाहीं हें उघड आहे. जन्मावर जर वर्ण अवलंबून ठेवला नाहीं, तर तें चातुर्वर्ण्यच नव्हे ही गोष्ट ह्या विषयाचा विचार करतांना ध्यानांत ठेवली पाहिजे. गुणकर्मानें चार वर्ण प्रत्येक समाजांत फार काय प्रत्येक कुटुंबांत असतातच. म्हणून आमच्यांत चातुर्वर्ण्य गुणकर्मावर अवलंबून आहे, जन्मावर नाहीं असें प्रतिपादन करणें म्हणजे चातुर्वर्ण्याचा पायाच खणून टाकणें होय. जन्माव्यतिरिक्त चातुर्वर्ण्याची उभारणीच करतां येणार नाहीं. "सवर्णेभ्यः सवर्णासु जायन्ते हि सजातयः" असेंच स्मृतिकार सांगतात. एका वर्णांतून दुसऱ्या वर्णांत जातां येतें असें एकहि स्मृतिकार म्हणत नाहीं. असें असतें तर विवाहसंबंधानें झालेली संतती कोणत्या वर्णाची मानावयाची याविषयीं नियम करण्याचें कारणच नव्हतें. निरनिराळ्या वर्णांत विवाहसंबंध घडत व अन्नव्यवहारहि होई. या विषयीं वादच नाहीं. पाठीमागून अशा संबंधाला निषेध करण्यांत आला ही गोष्ट वेगळी. भिन्नवर्णविवाह होत तेव्हां कधीं क्षेत्रावरून तर कधीं बीजावरून संततीचा वर्ण निश्चित करण्यांत येई. पण कोणाचाहि वर्ण संदिग्धावस्थेंत केव्हांहि रहात नसे.

चार जातींना वर्ण शब्द तरी कां लावावा हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. वर्ण म्हणजे रंग. हा अर्थ अनादि आहे. मग एकाच

वर्णांच्या म्हणजे एकाच समाजाच्या चार विभागांना वर्ण शब्द प्रयुक्त करण्यांत स्वारस्य काय ? वर्ण हा जातिवाचक शब्द ऋग्वेदांत नाहीं. एवढेंच नव्हे तर अगदीं शेवटल्या अथर्ववेदांतहि या अर्थानें तो शब्द वापरलेला नाहीं. ऋक् व अथर्व या दोन वेदांत दासांचा वर्ण आर्यांच्या वर्णाहून भिन्न असा दाखविला आहे. एवढ्या पुरता वर्ण शब्द कदाचित् जातिवचक मानतां येईल[१]. "इन्द्रानें दस्यूंना मारून आर्यवर्णाचें रक्षण केलें." तसेंच[२] "जो दास वर्णाला जमीनदोस्त करता झाला." हा मंत्र ऋग्वेदांतहि आहे. पुरुषसूक्त वगळलें तर ऋग्वेद-कालीं चातुर्वर्ण्य नव्हतेंच, पण चार वर्ण अथवा वर्गहि नव्हतेच. आर्य आणि दास हेच दोन वर्ण किंवा वर्ग किंवा जाती होत्या. परंतु वर्ण हा मूलतः रंगाचा द्योतक आहे ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली असतां चार वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार निरनिराळ्या वर्णांचे असले पाहिजेत, म्हणजे हे चार निरनिराळे समाज असले पाहिजेत, असेंच अनुमान करावें लागतें व त्याप्रमाणें चार वर्णांचे चार निरनिराळे वर्णहि सांगितले आहेत. ब्राह्मणांचा रंग पांढरा होता. क्षत्रिय रक्तवर्णी व वैश्य पीतवर्णी होते. शूद्र काळ्या रंगाचे होते. ह्या चार वेगवेगळ्या लोकांचें चातुर्वर्ण्य बनवून त्यांस एकत्र करण्यांत आलें. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आर्य असतील, यज्ञ करणारे असतील किंवा समान देवतांची उपासना करणारे असतील; तथापि ते भिन्नवर्णीय स्वतंत्र समाज होते व असले पाहिजेत. नाहींतर एकाच वर्णाच्या—रंगाच्या—लोकसमूहाला चातुर्वर्ण्य ही संज्ञा

---

१ 'हत्वी दस्यून् प्रार्यं वर्णमावत्' ( ऋ. ३–३४ )

२ 'यो दासं वर्णमधरं गुहाकः' ( ऋ. २–१२ )

लावणें अप्रयोजक होतें. वर्ण म्हणजे जाति अथवा विभाग असा पूर्वींचा अर्थ नव्हता.

क्षत्रिय हे ब्राह्मणांहून निराळे होते असें मानण्यास पुराणांतरीं स्पष्ट आधार मिळतो. वायुपुराणांत ( अ० ६१ ) ब्राह्मणांची उत्पत्ति सप्तर्षींपासून आणि क्षत्रियवैश्यांची मनूपासून सांगितली आहे. "मनोः क्षत्रं विशश्चैव सप्तर्षिभ्यो द्विजातयः" याच पुराणाच्या ८८ व्या अध्यायांत मनूपासून क्षत्रिय झाले असें विधान केलें आहे. "मनुस्तु योगमास्थाय कलापग्राममास्थितः । एकोनविंशप्रयुगे क्षत्र-प्रावर्तकः प्रभुः ।" मनूपासून क्षत्रिय झाले हेंच खरें दिसतें. मनु क्षत्रिय होता, ब्राह्मण नव्हता. मनूला विप्र अथवा ब्राह्मण कोठेंहि म्हटलें नाहीं. मनूपासून मानवांची उत्पत्ति झाली, पण देवासुरांची उत्पत्ति त्याचप्रमाणें ब्राह्मणांची उत्पत्ति मनूपासून झाल्याचें वचन नाहीं. ह्यावरून क्षत्रिय आणि ब्राह्मण जन्मतः भिन्न होते हें उघड आहे.

एकाचे चार समाज झाले असें मानलें तर सर्वांच्या चालीरीती एकच असावयास पाहिजे होत्या. पण स्मृतिग्रंथांवरून आपणांस असें दिसतें कीं तीन समाजांचा उपनयनकाल वेगळा होता. ८, ११ व १२ ही उपनयन कालाची मर्यादा अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांची असें स्मृतिकार सांगतात. ही भिन्न मर्यादा शास्त्र-कारांनीं कां घालावी ? याचें उत्तर ही व्यवस्था अगोदरच समाजांत होती असेंच सयुक्तिक दिसतें. पण एकाच एकजिनसी समाजांत अशी विविध कालमर्यादा असणें संभवनीय नाहीं.

उपनयनकाल निरनिराळा तशा विवाहपद्धतीहि वेगळ्याच. एकाच समाजांत आठ प्रकारचे विवाह प्रचलित असणें संभवत नाहीं. ब्राह्म,

आसुर, पैशाच इत्यादि विवाहपद्धती या निरनिराळया संस्कृतींच्या निदर्शक आहेत. एकाच समाजांत इतक्या भिन्न संस्कृतीचे लोक असत नाहींत. तसेंच बारा प्रकारचे पुत्र सांगितले आहेत ते तरी काय दर्शवितात? निरनिराळ्या चालीरीतींचे निरनिराळे समाज. याशिवाय या चालीरीतींची समाधानकारक उपपत्तीच लागत नाहीं. एकजिनसी समाजाचें मुख्य लक्षण हें असतें कीं सर्वांच्या रीतीभाती बहुधा एकच असतात. पण सर्व चालीरीतींत मुख्य चाल जी विवाहाची ती चातुर्वर्ण्यांत अगदीं अस्थिर दिसते. कानीन, पुनर्भू इत्यादि पुत्रभेद अथवा गर्भिणी स्त्रीचा अंगीकार करणाऱ्या पुरुषाचाच ती स्त्री प्रसूत झाल्यानंतर होणारा पुत्र समजावयाचा अशा रीतीचा कायदा हे सर्व निरनिराळ्या समाजांचेंच आस्तित्व सूचित करतात.

स्मृतिकालीं चार वर्ण झाले असें आपण मानलें तर तत्पूर्वी समाज एक असला पाहिजे. पण तो केव्हां होता? स्मृतिपूर्वकालीं समाजाच्या एकोप्याचा पुरावा आपणांस कोठेंच दिसत नाहीं. ऋग्वेदकालीं प्रथमच आपणांस वसिष्ठविश्वामित्रांचीं भांडणें दृष्टीस पडतात. हीं दोन व्यक्तींमधील भांडणें नव्हतीं. ब्राह्मण्य आणि क्षत्रियत्व यांच्या बलाबलाचा हा सामना होता. चातुर्वर्ण्यानें विरोधी समाज एक केले. ब्राह्मण समाजांतला प्रत्येक इसम पुरोहिताचा धंदा करी व क्षत्रियांपैकीं प्रत्येक योद्धाच पाहिजे व होता ही समजूतहि बरोबर नाहीं. असें असणें संभवनीय नाहीं. क्षत्रियांतहि ऋषी होतेच त्यांस राजर्षि म्हणत. ऋग्वेदांत ब्राह्मण अनेक धंदे करीत असल्याचा पुरावा मिळतो. ब्राह्मण ज्याप्रमाणें ब्राह्मणेतरी धंदे करीत तसे क्षत्रिय ब्राह्मणी धंदे करीत, म्हणजे ब्राह्मण होत अथवा असत. ते क्षत्रियांतले ब्राह्मण अथवा क्षत्रिय-ब्राह्मण. तीच गोष्ट वैश्यांची. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य

हे सर्व आर्य असून वेदानुगामी होते. या दृष्टीनें प्राचीन कथानकांचा विचार केला पाहिजे. प्रत्येक क्षत्रिय राजा कसा असूं शकेल? शिपाई होणें देखील प्रत्येकास शक्य नाहीं. क्षत्रियांना पूर्वी राजन्य म्हणत. याचा अर्थ इतकाच दिसतो कीं क्षत्रियांमध्यें राजाची संस्था निर्माण झाली होती. ही संस्था सर्व समाजांत नव्हती. ऐतरेय ब्राह्मणांत एक आख्यायिका आहे, त्यावरून देवांत कोणीहि राजा नसे असें दिसून येतें. राजा नसल्यामुळें त्यांचा पराभव होई. म्हणून त्यांनीं आपल्यापैकीं एकाला राजा नेमलें. तात्पर्य राजा असणें हें क्षत्रियांचें वैशिष्ट्य होतें. ब्रह्मन् म्हणजे मंत्र किंवा वेद. मंत्र म्हणणें किंवा रचणें हाच ज्यांचा मुख्यतः व्यवसाय ते ब्राह्मण, अर्थात इतर धंदे करणारे ब्राह्मणांत असलेच पाहिजेत व होतेहि. माझा बाप वैद्य आहे असें एक ऋषि आपल्या मंत्रांत म्हणतो. ब्राह्मण युद्धेंहि करीत. ब्रह्मक्षत्रिय जात सांप्रत गुजराथेंत आहे. तिची उपपत्तीहि अशा रीतीनें लावतां येईल. पण वर्ण हा जन्मावरच निश्चित होई यांत शंका नाहीं. खालच्या वर्णाच्या कोणत्याहि क्षेत्रांत पुत्रोत्पत्ति केली तर त्या सन्तानाचा वर्ण जनकाच्या वर्णाप्रमाणेंच असे. धीवरकन्येच्या ठिकाणीं पराशरांनीं व्यासांची उत्पत्ति केली हें प्रसिद्धच आहे. वसिष्ठ, काश्यप, ऋष्यशृंग यांच्या उत्पत्तीच्या कथा सदरहूप्रमाणेंच आहेत असें महाभारतावरून दिसतें.

ब्राह्मण यांना प्रथम रक्तवर्ण क्षत्रिय भेटले. तेव्हां एका वर्णाचे दोन वर्ण झाले. पूर्वी एकवर्णी ब्राह्मणच काय ते होते. "तथा कृतयुगे पूर्वमेकवर्णमभूत् किल" असें पुराणकार म्हणतात तें खरें आहे. ऐतरेय ब्राह्मणांत एक आख्यायिका आहे तिचा विचार करतां ब्राह्मणक्षत्रिय वेगवेगळे होते असेंच दिसून येईल. ती गोष्ट अशी.

"नंतर ब्राह्मणांकडे क्षत्रिय गेले आणि म्हणाले, ह्या यज्ञांत आम्हांला तुम्ही बोलवा. ते म्हणाले ठीक आहे. परंतु तुम्ही आपलीं आयुधें ठेऊन ब्राह्मणांचीं रूपें धारण करून आणि ब्राह्मणांसारखे होऊन यज्ञाकडे या." क्षत्रियांनीं त्याप्रमाणें केलें. या वरील गोष्टीवरून असें दिसतें कीं क्षत्रियांचा वेष व आयुधें ब्राह्मणांच्या आयुधवेषांहून निराळी होतीं. ब्राह्मण क्षत्रियांना यज्ञांत येऊं देत नसत. दोन वर्णां-तलें हें भिन्नत्व उघड दिसतें. त्रेता युगांत तीन वर्ण झाले असें रामायणांत म्हटलें आहे. याचा अर्थ ब्राह्मण क्षत्रियांना कांहीं काला-नंतर वैश्य भेटले. वर्णांचा उच्चनीच भाव ह्या संयोग क्रमावर अव-लंबून आहे. ब्राह्मणांना क्षत्रिय प्रथम भेटले म्हणून त्यांना ब्राह्म-णांच्या खालचा अनुक्रम मिळाला. वैश्यांचा समागम मागून झाला, त्यामुळें वैश्यांचा तिसरा नंबर लागला. सगळ्यांच्या शेवटीं शूद्रांची गांठ पडल्या कारणानें त्यांचा नंबर सर्वांच्या खालीं लागला. ब्राह्मण मुखापासून, क्षत्रिय बाहूपासून, वैश्य ऊरूपासून आणि शूद्र पायां-पासून ही पुरुषसूक्तांतील कल्पना उपरिनिर्दिष्ट क्रमच सुचविते. देवांचेंच रूपांतर पुढें ब्राह्मणांत झालें ही कल्पना जर अगदींच अवास्तव नसेल तर देवलोकांचें वसतिस्थान मेरुपर्वतावर होतें म्हणजे ते शीर्षस्थानीं होते असें म्हणणें सयुक्तिकच्च होईल. "देवलोको गिरौ तस्मिन् सर्वश्रुतिषु गीयते" असें पुराणें सांगतात. ऋग्वेदांत ब्राह्मण शब्द देवशब्दाइतका नाहीं; कमी आहे; पुष्कळच कमी आहे. देवसमाजालाच पुढें ब्राह्मण हें अभिधान प्राप्त झालें कीं काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. देवांनीं सोमाला आपला राजा केला अशी ऐतरेय ब्राह्मणांत आख्यायिका आहे. इकडे ब्राह्मणहि सोमावांचून दुसऱ्या कोणास आपला राजा म्हणून ओळखण्यास

तयार नव्हते, असें वाजसनेयी संहितेवरून ( १०–१८ ) व शतपथ ब्राह्मणावरून ( ५, ४, २, ३, ) दिसतें. देव आणि ब्राह्मण यांचें तादात्म्य सिद्ध करण्यास हें कांहीं कमी महत्त्वाचें प्रमाण नाहीं. ब्राह्मणांना भूदेव म्हणतात हा सुद्धां त्यांच्या प्राचीन देवत्वाचा अवशेष आहे. तसेंच देव हे सोमपान करणारे व हविर्ग्रहण करणारे होते. ब्राह्मणांनाहि हींच विशेषणें पुढें देण्यांत आलीं. ऐतरेय ब्राह्मणांत ( ७–२९–२ ) ब्राह्मणांना आदायी व आपायी असें म्हटलें आहे. यानेंहि वरील अनुमानास थोडीशी पुष्टी मिळते. देव यज्ञ करीत. ब्राह्मणांचाहि मुख्यत्वेंकरून यज्ञाशींच संबंध आहे. श्रोत्रियाचा आनंद म्हणजे ब्रह्मानंदच होय. तात्पर्य, देव आणि ब्राह्मण यांच्यांत साम्य फार आहे. हा अगदीं नवीन विषय आहे व त्याचा स्वतंत्र विचार होणें इष्ट आहे. अथर्ववेदांत ब्राह्मणाच्या ऐवजीं देव शब्द वापरला आहे हेंहि ध्यानांत ठेवण्यासारखें आहे—

**प्रियं मा कुरु देवेषु प्रियं राजसु मा कृणु ।**
**प्रियं सर्वस्य पश्यत उत शूद्र उतार्ये ॥** (अ० १९–६२)

देवांना मी प्रिय होईन असें कर, राजांना मी प्रिय होईन असें कर; सर्व पहाणाऱ्या वस्तूंना मी प्रिय होईन असें कर; शूद्रांना तसेंच आर्यांना मी प्रिय होईन असें कर. ह्यांत आर्य शब्दाचा अर्थ कित्येक वैश्य करतात. त्याच्याबद्दल जरी संशय असला तरी देव म्हणजे ब्राह्मण याविषयीं शंका नाहीं. शूद्र शब्दाचा अर्थ येथें दास म्हणून केला पाहिजे किंवा आर्य शब्दाचा अर्थ वैश्य तरी समजला पाहिजे. पण सध्यां आपल्याला महत्त्वाचा शब्द म्हणजे देव होय. आणि त्याचा अर्थ ब्राह्मण म्हणून समजतात व समजण्यासारखा आहे. पंचविंशब्राह्मणांत देवराजन् शब्द आला आहे. त्याचा

अर्थ ब्राह्मण राजा असाच करतात. म्हणजे देव शब्दाचा अर्थ ब्राह्मण समजतात. ब्रह्मर्षि आणि देवर्षि या दोन समानार्थी शब्दांवरूनहि तेंच अनुमान निघतें.

असो. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचे पूर्वज जसे निरनिराळे, तसे त्यांचे धर्महि निराळेच होते. ब्राह्मणांचा श्रौत धर्म म्हणजे श्रुतींत, वेदांत सांगितलेला धर्म, तर मनूच्या वंशजांचा परंपरागत अथवा स्मार्त धर्म होय—

दाराग्निहोत्रसंयोगं ऋग्यजुःसामसंज्ञितम् ।
इत्यादिलक्षणं श्रौतं धर्मं सप्तर्षयोऽब्रुवन् ॥

तसेंच

**परंपरागतं धर्मं स्मार्तं चाचारलक्षणम् ।**
**वर्णाश्रमाचारयुतं मनुः स्वायंभुवोऽब्रवीत् ॥**

वा. पु. अ. ५७ श्लो. ४० । ४१

आणखी

**कृते कृते स्मृतेर्विप्र प्रणेता जायते मनुः ॥**
**चतुर्युगांते वेदानां जायते किल विप्लवः**
**प्रवर्तयन्ति तानेत्य भुवि सप्तर्षयो दिवः ॥**

वि० पु. अ० २

एवंच, या प्रमाणांवरून सुद्धां ब्राह्मण क्षत्रिय वेगळे समाज ठरतात. श्रौतधर्माचे अधिकारी मुख्यतः ब्राह्मण. क्षत्रियांचा आचारधर्म. ब्राह्मणक्षत्रियांहून वैश्यांची स्थिति सुद्धां निराळी होती. वैश्य शब्द प्रचारांत येण्याच्या पूर्वी विश् शब्दाचा उपयोग करीत. या शब्दाचा मुळचा अर्थ लोक असाच होता. उ०—

**इन्द्र क्षितीनामसि मानुषीणां विशां दैवीनामुत पूर्वयावा ।**

( ऋ. ३-३४-२ )

त्वं दैवीर्विश इमा वि राजा युष्मत् क्षत्रमजरं ते अस्तु ।
( अ. ६–९८–२ )

ह्या मंत्रांत विश् शब्दाचा अर्थ-लोक-प्रजा असा आहे. पुढें हा शब्द एका विशिष्ट समाजाचा द्योतक म्हणून निश्चित करण्यांत आला.

वेदांत काय किंवा नंतरच्या वाङ्मयांत काय वैश्यांचें महत्त्व कोठेंहि दिसून येत नाहीं. वैश्यांबरोबर युद्धें झाल्याचें वर्णन नाहीं. तत्त्वज्ञान अथवा वेदांत यांमध्येंहि वैश्यांचें अंग असल्याचें आढळत नाहीं. ब्राह्मण जसा मंत्रकार, क्षत्रिय जसा युद्धकार तसा वैश्य कृषिकार. म्हणजे कृषिकर्म हें वैश्यांचें वैशिष्ट्य. "अष्ट्रां वैश्याय पुष्टिं तेन परिक्रीणाति" असें काठकसंहितेंत आहे. अष्ट्रा म्हणजे चाबूक ही वैश्याची निशाणी. वैश्यांनीं ब्राह्मण किंवा क्षत्रियांबरोबर स्पर्धा केली नाहीं. कोणीहि वैश्य ब्राह्मण किंवा क्षत्रिय झाल्याचें उदाहरण नाहीं.

वैश्यांचा धंदा शेतकी, व्यापार व गोपालन हाच विशेषतः आहे

गोरक्षां कृषिवाणिज्यं कुर्याद्वैश्यो यथाविधि ( हारीत )

यांपैकीं कृषिकर्म आणि गोपालन हीं सध्यां शूद्रांकडेच आहेत. फक्त वाणिज्य काय तें वैश्यांकडे राहिलें आहे. पहिले दोन धंदे वैश्यांकडे कधीं काळीं होते कीं नाहीं याविषयीं विश्वासार्ह अशीं प्रमाणेंहि उपलब्ध होत नाहींत. ही ह्या चातुर्वर्ण्यासंबंधानें विचार करतांना मोठी नडणारी गोष्ट आहे. शेती करणारा एक निरुपद्रवी, निर्बल असा समाज असावा असें दिसतें. हिंदुस्तानचा व्यापार जेव्हां भरभराटींत होता अशा वेळींहि वैश्यांनीं नांव मिळविल्याचें दिसत नाहीं. गीताकारांनीं तर स्त्रीशूद्रांच्या पंक्तीलाच वैश्यांना बसविलें आहे. असा काळ कधीं होता काय कीं जेव्हां वैश्यांचा चातुर्वर्ण्यांत अंतर्भाव झाला नव्हता ? 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः' या वाक्याचा अर्थ समाधानकारक लावणें सध्यां तरी कठीण दिसत.

पुरुष-सूक्तांतील चातुर्वर्ण्याची उत्पत्ति वर सांगितल्याप्रमाणें थोडी बहुत तरी सार्थ म्हणतां येईल; पण गीतेंतील एतद्विषयक तर्क तितकाच सार्थ आहे असें म्हणतां येईल कीं नाहीं याविषयीं शंका वाटते. "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः" म्हणजे गुणकर्मा-प्रमाणें मीं चार वर्ण निर्माण केले याचा अर्थ काय ? गुण तीन; सत्त्व, रज आणि तम; पण वर्ण चार; तेव्हां कोणत्या गुणाच्या योगानें शूद्रवर्णाची उत्पत्ति झाली असें समजावयाचें ? गुणकर्मवि-भागशः याचा अर्थ गुणविभागशश्च कर्मविभागशश्च म्हणजे निर-निराळ्या गुणांना अनुसरून तसेंच निरनिराळ्या कर्मांना अनुसरून असा करतात. आतां गुण तीन तरी आहेत असें निश्चित आहे, पण कर्में अमूकच आहेत असें कोठें ठरलेलें आहे ? म्हणून तीन गुण आणि कर्में चार असें कसें म्हणतां येईल ? एवढ्याकरतां गीतेंतील चातुर्वर्ण्यसिद्धि समाधानकारक वाटत नाहीं.

चातुर्वर्ण्यव्यवस्था ऋग्वेदकालापूर्वीची आहे व ती सर्व समाजांत होती, ही समजूत खरी नाहीं असें मला वाटतें. आमच्या पूर्वजांना चातुर्वर्ण्याची कल्पना इतकी अपूर्व वाटूं लागली व कांहीं काल त्यांचें चातुर्वर्ण्यावर इतकें प्रेम होतें कीं, प्रत्येक समाजांत व प्रत्येक स्थलीं त्यांना चातुर्वर्ण्याचें प्रतिबिंब दिसूं लागलें. चातुर्वर्ण्य वस्तुतः मनुष्यांपुरतेंच. शंकराचार्य म्हणतात,

'तच्चेदं चातुर्वर्ण्यं नान्येषु लोकेषु । अतो मानुषे लोके इति विशेषणम् ।'

इतकें असूनहि देवांना सुद्धां चातुर्वर्ण्य लागू केलेलें दिसतें. फार काय अमूक वृक्ष ब्राह्मण आणि अमूक वृक्ष शूद्र अशी सुद्धां विभागणी करण्यांत आली. मग इतर राष्ट्रांत भारतीयांनीं चार वर्ण आहेत अशी कल्पना केल्यास त्यांत नवल नाहीं.

सारांश, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार स्वतंत्र समाज होते. चातुर्वर्ण्याच्या द्वारा त्यांचें एकीकरण करण्याचा अपूर्व प्रयोग करण्यांत आला; पण ह्या प्रयोगाचें पर्यवसान आमच्या दुर्दैवानें असंख्य जातींत होऊन हिंदुस्थानाची दुर्दशा होईल हें त्यावेळीं कोणाच्या स्वप्नींहि आलें नसेल. पण या सर्वांचें कारण इतकेंच दिसतें कीं चातुर्वर्ण्य हें एकीकरण नसून पृथक्करण होय ही समजूत. ही पृथक्करणकल्पना सांप्रतच्या अनर्थांचें मूळ होय. चार वर्णांत बेटीव्यवहार होत. असे हें सर्वश्रुतच आहे. अनुलोमपद्धतीनें कां होईना पण एक वर्ण दुसऱ्या वर्णांशीं सुसंबद्ध होई. बेटीव्यवहाराप्रमाणें रोटीव्यवहारहि चालू असेच.

"प्रशस्तानां स्वकर्मसु द्विजातीनां ब्राह्मणो भुंजीत"

यावरून त्रैवर्णिकांत अन्नव्यवहार होई हें निश्चित. शूद्रांच्या हातचें अन्न भक्षण करूं नये हा निषेधहि पुढें ढिला करण्यांत आला. कारण

"शूद्रेषु दासगोपालकुलमित्रार्धसीरिणः।
भोज्यान्ना नापितश्चैव यश्चात्मानं निवेदयेत्।"

असें स्मृतिकारच म्हणतात. हें आपल्या पूर्वजांचें धोरण आपण समजून घेणें इष्ट नाहीं काय?

# आवेस्तिक देव

लौकिक समज असा दिसतो कीं, झरथुष्ट्राच्या धर्माचे अनुयायी पारशी व हिंदुस्थानांतील सध्यांच्या हिंदूंचे पूर्वज हे एकत्र राहात असत. आतां इराणांत या दोघांचा सहनिवास होता असें कित्येक म्हणतात, तर दुसरे कित्येक हा मान हिंदुस्थानाला देतात. सहनिवासस्थानाविषयीं कितीहि मतभेद असला तरी, उपरिनिर्दिष्ट दोनीहि समाज एकत्र राहात होते, याविषयीं एकवाक्यता दिसते. या सिद्धांताची उभारणी वेदांतील असुर व अवेस्तांतील देव यांवर केली आहे. तसेंच अवेस्ता व वैदिक, संस्कृत अथवा गीर्वाण ह्या दोन भाषांमधील सादृश्यातिरेक आणि एकाच नांवाच्या देवता, हे वरील सिद्धांताचे आधारस्तंभ होत.

असुर म्हणजे पारशी व देव म्हणजे आमचे पूर्वज. वेदांत असुरांना शिव्याशाप आहेत, तर पारशी धर्मग्रंथांत देवांना शत्रूसमान मानलें आहे. वेद-ब्राह्मणांतील देवासुरांचें युद्ध म्हणजे पारशी व आमचे पूर्वज यांच्यांतील लढा होय. सकृद्दर्शनीं ही कल्पना सयुक्तिक दिसते. पण जरा खोल विचार केला तर ही कल्पना सिद्धांतभूत होण्यास कांहीं कमी अडचणी नाहींत, असें मनास पटूं लागतें. पण या गोष्टीचा कायमचा निर्णय होण्यापूर्वीं देव शब्द अवेस्ता ग्रंथांत जेथें आला आहे, तेथील वाक्यें तपासून पहाणें अगत्याचें आहे. असा प्रयत्न मराठींत अद्यापि कोणीं केलेला नाहीं, म्हणून मीं मुद्दाम सदरहू वचनें मराठींत भाषांतरित केलीं आहेत. अवे-

स्ताशीं माझा परिचय नसल्यामुळें इंग्रजीवरून मला मराठी करावें लागलें हें सांगणें नकोच.

पुढें जीं वाक्यें उद्धृत केलीं आहेत त्यांवरून एक गोष्ट निर्विवाद सिद्ध होतें ती ही कीं, कोणी तरी देव नांवाचे लोक आणि हल्लींच्या पारशांचे पूर्वज हे एकत्र राहात असत. एकाद्या वैद्यास नवीन प्रयोग करून पहावयाचा असेल तर तो प्रयोग त्यानें प्रथम देवांवर करावा, अशी त्यास अहुरमज़्दाची शिकवण असे. दूर अंतरावर राहाणाऱ्या लोकांच्या संबंधानें हा उपदेश करणें संभवनीय दिसत नाहीं. तसेंच हे देव माझंद प्रदेशांत राहणारे होते. कारण माझंदी देव या शब्दप्रयोगानें यांचा उल्लेख अनेकवार केलेला आहे. (उदा. फर्गर्द १७ पहा). जेथें जेथें देव शब्द वापरला आहे, तेथें तेथें तो एका विशिष्ट समाजाचा बोधक आहे, असें उघड दिसून येतें. तथापि मनुष्याहून देव निराळे सांगितले आहेत हीहि गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. (उदा. ब्ऱ्हामयस्त २१). हे देव मूर्तिपूजक होत (खब्रोशयस्त १), व त्यांचा राजा अथवा प्रमुख आंग्रमन्यु हा होता. As Ahurmazda stands at the head of the former (good world) so Angramainyu at the head of the latter (evil world). (Sanjana).

त्याचप्रमाणें जादुगार म्हणूनहि देवांची निंदा ठिकठिकाणीं केलेली आढळते (फर्गर्द १६). हे देव शेतीच्या विरुद्ध असून जनावरांचे कळप बाळगून असत. (फर्गर्द ३ आणि झ. यस्त ७). कपटामुळें कां होईना पण देव हे सातहि जगांत प्रसिद्ध होते, ही गोष्ट ह्या धर्मग्रंथांत कबूल केली आहे (य. २२).

अशा देवांशीं भांडण करून झरथुष्ट्रानें अहुरमझ्द धर्माची रचना

केली, हें य. ७१ वरून व्यक्त होतें. तेथें मझ्दोपासक म्हणतो, "आम्ही अत्यंत दानशील मिथ्राची पूजा करतों एवढेंच नव्हे तर देवांच्या विरुद्ध स्थापलेल्या धर्माचें सर्वांगत्वानें अर्चन करतों." देवांच्या द्वेषांत व देवांच्या विरुद्ध बंड म्हणून पारशी धर्माची स्थापना झाली ही गोष्ट फ. य. २४ मध्यें नमूद केली आहे. या धर्माची दीक्षा घेण्यास "मी देवांचा शत्रु आहे, मी त्यांचा द्वेष करीन" अशी शपथ घ्यावी लागते (गा. ह. ५). मी झरथुष्ट्रानुयायी मझ्दोपासक आहें या वाक्याबरोबरच देव दुष्ट असल्यामुळें त्यांचें नेतृत्व किंवा आश्रय मी शपथपूर्वक पार झुगारून देतों, याचाहि उच्चार धर्मग्राहकाला करावा लागतो (यस्न १२.१–४–५). देवांप्रमाणेंच यातु, पैरिख व मनुष्य हेहि मझ्दोपासक आपले शत्रु म्हणून समजत.

याप्रमाणें पुढें दिलेल्या गाथांतील ठळक ठळक गोष्टींचा येथें प्रामुख्यानें निर्देश केला आहे; व यावरून देव म्हणजे वैदिक आर्यच कीं काय, याचा निर्णय आपणांस करावयाचा आहे.

प्रथमतः ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली पाहिजे कीं खिस्ती व मुसलमानी धर्मांप्रमाणेंच पारशी हा धर्म आहे. म्हणजे, धर्म हा शब्द ज्या अर्थानें खिस्ती व मुसलमानी धर्मपद्धतींसंबंधानें आपण योजतों, तोच अर्थ पारशी धर्मानें विवक्षित होतो. आणि ह्यामुळेंच हिंदुत्वाहून झोरोस्ट्रियनत्वाचें वैलक्षण्य उघड व्यक्त होतें. येवढेंच नव्हे तर जगांतील सर्व धर्मांचा अग्रमान झोरोस्ट्रियन् धर्माकडे येतो. खिस्ती व मुसलमानी धर्मांप्रमाणें पारशी धर्माला धर्मसंस्थापक आहे, धर्मग्रंथ आहे, विशिष्ट संप्रदाय आहे. हिंदु धर्मामध्यें ह्या तिन्ही गोष्टींचा अभाव आहे, म्हणून हिंदुत्व आणि पारसीकत्व ह्यांमध्यें धर्मविषयक मूलभूत साम्य बिलकूल नाहीं. पाठीमागून येणाऱ्या येशू खिस्त व

महंमद ह्यांच्या वडीलपणाचा मान झरथुष्ट्रानें पटकावला एवढीच गोष्ट पारशी धर्मासंबंधानें प्रामुख्यानें सांगतां येण्यासारखी आहे.

दुष्ट लोकांच्या उपदेशाकडे तुम्ही लक्ष्य देऊं नका; कारण तसें करण्यानें तो आपल्या घरावर, गांवावर, देशावर, लोकांवर दुःख आणि यमयातना ओढून आणील. छे ! तरवार उचला आणि त्यांचे गळे कापा; ( यस्न३१–१८ ). ह्या उपदेशाचा पारशांपेक्षां मुसलमानांनींच आदर अधिक केला.

आजवर पारशी धर्म व हिंदु धर्म ह्यांमध्यें सर्वसाधारण असणाऱ्या गोष्टींवरच सर्वस्वीं अवलंबून विद्वानांनीं अनुमानें काढलीं आहेत. पण अशा प्रकारें रचलेले सिद्धांत निर्दोष असण्याचा संभव फार कमी. साम्याप्रमाणें विरोधदर्शक गोष्टींचाहि विचार करणें अगत्याचें आहे.

मी देवांपासून विलग्न, झरथुष्ट्रानुयायी, मझ्दोपासक आहें; ( यस्न $\frac{१२}{१}$ ). तसेंच देव दुष्ट असल्यामुळें त्यांचें नेतृत्व किंवा आश्रय मी शपथपूर्वक पार झुगारून देतों ( यस्न १२–४–५ ). ह्या वाक्यांवरूनच मझ्दोपासनेचा अंगीकार करण्यापूर्वी मझ्दोपासक हे देवांपैकीं होते, असें अनुमान करण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. कारण वरील प्रतिज्ञा यज्ञाच्या वेळीं सर्वांनाच करावी लागत असावी. आतां हे देव माझन्द प्रदेशांत राहाणारे असून मूर्तिपूजक होते.

In the eyes of the Gathic Zarathustraians these *Daevas* become distinctly evil existences, deceitful idols and demons (Sanjana, Zarathustra in the Gathas). With all their adherents, the idolators and false priests

they will go to eternal perdition, says Zarathustra: *Ibid.*

परंतु वैदिक आर्य ऋग्वेदकालीं मूर्तिपूजक होते, असें म्हणण्यास यत्किंचितहि आधार नाहीं. त्याचप्रमाणें वैदिक आर्य शेतकीच्या विरुद्ध असून, घरेंदारें करून न राहणारे फिरस्ते होते, हें म्हणणेंहि निराधार आहे. ज्या ऋषींनीं ऋक्मंत्रांनीं वास्तोष्पतीचें स्तवन केलें आहे, त्या ऋषींना इतस्ततः भटकणारे म्हणणें अनुचित होय. शेतकी करील तो पापी अशी कल्पना सगळ्या ऋग्वेदांत कोठेंहि आढळणार नाहीं; उलट विरुद्ध प्रकारचाच पुरावा विपुल सापडेल.

सातू लावले तेव्हां देव चकित झाले. उगवले तेव्हां त्यांचीं अंतःकरणें मूर्छित झालीं. बोंडें आलीं तेव्हां ते कुथूं लागले. कणीस आलें तेव्हां पळून गेले. ज्या घरांत गहूं टिकत नाहींत त्या घरांत देव राहातात. धान्याची समृद्धि झाली म्हणजे घशांत जणूं काय तप्त लोहदंड फिरविला जात आहे, असें देवांना होतें; (फ. ३). हें वर्णन धनधान्यसमृद्धीकरितां देवतांची नित्य प्रार्थना करणाऱ्या व 'कृषिश्च मे' म्हणून दररोज ओरड करणाऱ्या आमच्या पूर्वजांना निःसंशय लागू पडणार नाहीं. तात्पर्य वैदिक आर्य घरें करून व शेती करून राहणारे असेच होते. तेव्हां अवेस्तांतील देव ते तेच, हें म्हणणें अन्यायाचें होईल. बरें वेदानुयायी आर्य माझन्द प्रदेशांत असते तर या प्रदेशाचा निर्देश ऋग्वेदांत कोठेंच यावयास नको होता काय?

कास्पियन समुद्राच्या दक्षिणेस माझंदरान म्हणून डोंगराळ प्रदेश आहे. या ठिकाणीं राहणाऱ्या देवांचाच उल्लेख अवेस्तांत आहे. आतां हेच देव जर ऋग्मंत्र रचणारे ऋषि असते, तर माझंदरानाचा

निर्देश वेदांत यावयास पाहिजे होता. उत्तरध्रुवाचें वर्णन ज्या वेदांत येतें त्यांत अलीकडील काळांतल्या वसतिस्थानाचें वर्णन येत नाहीं, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

यानंतर आंग्रमैन्यु शब्दाचा विचार केला तर याचा प्रतिनिधि वेदांत आपल्यास आढळत नाहीं. देवांतर्फे दुष्टपणा करणारा जो आंग्रमैन्यु राक्षस याशीं समवर्णनाचा देव तेहतीस किंवा तेहतीस कोटी देवांत उपलब्ध होत नाहीं. तसेंच वेदानुयायी आर्य हे जादूटोणा करण्यांत वाकबगार होते, ही गोष्ट वेदांत देवांचें जें कांहीं वर्णन आहे, त्याशीं अगदीं विरुद्ध आहे.

याशिवाय दुसऱ्याहि अनेक विसदृश गोष्टींचा उल्लेख करणें अपरिहार्य आहे. मुख्यतः पारशांची प्रेतव्यवस्था आमच्याहून अगदीं भिन्न आहे. पारशांचे पूर्वज व वैदिक आर्य हे खरोखरच बहुतकाल एके ठिकाणीं राहिले असते तर मृत देहांचा निकाल करण्याची तऱ्हा दोघांची सारखीच असावयास पाहिजे होती. व कोणत्याहि कारणानें दोघांमध्यें बेबनाव होऊन दुफळी होण्याचा प्रसंग आला असता तरी पारशांनीं दहनविधि सोडला नसता. ही एकच गोष्ट एवढी महत्त्वाची आहे कीं, तिच्यापुढें पारशी व वैदिक आर्य एकत्र राहत होते, हा सिद्धांत डळमळित झाल्याशिवाय राहात नाहीं.

शतं नो रास्व शरदो विचक्षेऽश्यामायूंषि सुधितानि पूर्वा ऋ. २-२७-१० याप्रमाणें वैदिक ऋषि परमेश्वराजवळ १०० वर्षेंच आयुष्य मागतो. "शतायु" ही आयुष्याची कमाल मर्यादा होय. परंतु पारशी पुरोहित विवाहसमयीं वधूवरांना आशीर्वाद देतांना 'दीडशें वर्षें' तुम्ही जगा असें म्हणतो. याप्रमाणें पन्नास वर्षें आयुष्यमर्यादा पुढें

खेंचणाऱ्या पारश्यांचा समाज हा वैदिक आर्यांच्या समाजाहून भिन्न परिस्थितींत वाढला असला पाहिजे, असें वाटतें. याचप्रमाणें स्त्रियांनीं पुरोहितत्व करणें ही गोष्ट वैदिक आर्यांना संमत असल्याचें कोठेंहि दिसत नाहीं. तथापि पारशी धर्मग्रंथांत उपाध्याच्या बायकोनें नवऱ्याच्या गैरहजेरींत उपाध्येपणाचें काम करण्यास हरकत नाहीं, असा स्पष्ट निर्देश केल्याचें आढळतें. पारशी धर्माचें वैदिक धर्माशीं साम्य आहे, असें म्हणण्यापेक्षां अवैदिक धर्माशींच त्या धर्माचें अधिक साम्य आहे, हें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. अहुरमझ्दानें सहा दिवसांत सृष्टि निर्माण केली ! तसेंच नियतकालीं परमेश्वर सर्व मृत लोकांना जिवंत करील व सर्व पापी पापमुक्त केले जातील. व्याजानें पैसे लावणें हें मोठें पाप आहे, ( फ. ३।४१ ) इत्यादि कल्पना निःसंशय अनार्यांच्या होत. वेदब्राह्मणांमध्यें उपयोजिलेल्या असुर शब्दावरून असीरियन अथवा असूरियन अथवा अवैदिक लोकांचा बोध होतो, हें मत आतां बरेंच ग्राह्य होत चाललें आहे. असीरियन लोकांच्या मुख्य देवाचें नांवच "असूर" होतें, ही गोष्ट वरील मतास अर्थातच पोषक आहे. तेव्हां देवासुरांपैकीं असुर शब्दानें जर असीरियन समजावयाचें तर मग पारशी लोकांचा उल्लेख ऋग्वेदांत अन्यत्र उपलब्ध होणें शक्यच नाहीं. म्हणून झरथुष्ट्रानुयायी आणि वेदानुयायी हे जवळ जवळ राहत होते हें म्हणणें आमूलाग्र ढासळून पडतें. खरोखरच हे दोन समाज एकत्र असते तर झरथुष्ट्राचा किंवा त्याच्या धर्माचा नामनिर्देशहि वैदिक ग्रंथांत येऊं नये, हें चमत्कारिक नव्हे काय ? पण देवोपासक आणि मझ्दोपासक हे अगदीं जवळजवळ राहत होते हें तर झोरोॲास्टर मोठ्या दुःखानें सांगत आहे. (Hard by the believer in Ahur dwells the wor-

shipper of the Daevas complains Zoroaster.) यावरून देव म्हणजे वैदिक आर्यांहून दुसरे कोणी असले पाहिजेत.

पारशी धर्मग्रंथांत अग्नी हा अथवा तत्सम शब्द नाहीं, ही गोष्ट मनन करण्यासारखी आहे. शिवाय सोळा निरनिराळ्या ठिकाणांहून निरनिराळे अग्नी आणून ते एकत्र करण्याची कल्पना वैदिक ग्रंथांत आढळत नाहीं. हापरसी औषधि व निर्मेल्क काष्ठ देव अग्नीसाठीं वापरतात असें ब. य. ४९१७-५५ मध्यें सांगितलें आहे. पण ह्या औषधीकाष्ठांचा मागमूसहि वेदांत मिळणार नाहीं. खरोखर म्हटलें तर झरथुष्ट्राला अग्निपूजाहि संमत नव्हती. यस्न ४८-१० मध्यें होमहवनासंबंधानें त्यानें तिरस्कार व्यक्त केला आहे; एवढेंच नव्हे, तर तो त्याज्य ठरविला आहे.

भांडणें झाल्यानंतर देव हा शब्द पारशांनीं निंदात्मक समजून आमच्यासंबंधानें योजिला व आम्ही त्यांना उलट असुर म्हणून टोमणा मारूं लागलों, असें म्हणतात. पण पारश्यांनीं आपणां स्वतःस असुर म्हणून कधींहि संबोधिलें नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

ब्राह्मणांत देवासुरांच्या अनेक युद्धांच्या हकिकती दिल्या आहेत. पण अवेस्ता ग्रंथांत एकहि युद्धाचा प्रसंग वर्णिला नाहीं. देवांचें अनिष्ट वारंवार चिंतिलें आहे, परंतु युद्ध झाल्याचें लिहिलें नाहीं.

तसेंच ब्राह्मणांत असुरांची यज्ञ करण्याची पद्धती म्हणून जें वर्णन येतें त्याप्रमाणें अवेस्तांतील होमाची क्रिया आपणांस आढळत नाहीं. असुरांच्या यज्ञाची पद्धती ऐतरेय ब्राह्मणांत खालीलप्रमाणें वर्णन केली आहे. "असुरांनीं प्रथम आहवनीय अग्नीचें आधान केलें. नंतर गार्हपत्य व शेवटीं अन्वाहार्य. आहवनीय अग्नी विझाला असून अशा वेळीं गार्हपत्याकरितां पश्चिमेच्या बाजूचा आहवनीय अग्नी

काढून घेतला, तर हें कृत्य असुरांच्या यज्ञाप्रमाणें होतें." ( असुरवत् अग्निं तन्वीत ). पारशांचा अग्नी एकच असतो. आतां साहश्याचा विचार केला तरी सुद्धां प्रचलित सिद्धांताला अनुकूल असा भक्कम पुरावा मिळण्याची आशा दिसत नाहीं. अहुरमझ्द हा झरथुष्ट्राचा देव; परंतु ह्या देवाची उपासना झरथुष्ट्रानेंच सुरू केली, हें खरें नाहीं. झरथुष्ट्राच्या पूर्वीं पुष्कळ काळ अहुरमझ्द देव म्हणून प्रसिद्ध होता. "Behistan inscription calls Ahurmazda god of the Aryans. He held his position long before Zaradushtra's day as we know from Assyrian source" (Moulton). अर्थात् अहूरमझ्दाच्या उपासनेचें श्रेय झरथुष्ट्राच्या वांटणीला येत नाहीं. त्याचप्रमाणें ज्या उपदेवतांची उपासना पारशी धर्मांत सांगितली आहे त्या देवतांची उपासना झरथुष्ट्राच्या पूर्वींहि लोकांत प्रचलित होती. झरथुष्ट्राच्या पूर्वीं जो धर्म इराणांत चालू होता, त्या धर्माला पोइरोत्कएष असें म्हणत असत व त्या वेळचे लोक अग्नि, जल, सूर्य, चंद्र, पृथ्वी, आकाश यांना स्वतंत्र देवता मानीत असत. त्यांपैकीं मुख्य देवतांचीं नांवें मिथ्र, आइर्यमन, हओम्, वेरेथ्रघ्न, नर्यसंघ, वायु व उषा अशीं होतीं. तेव्हां वस्तुतः पाहिलें असतां झरथुष्ट्राच्या धर्मांत देवांचा द्वेष हेंच तत्त्व प्राधान्येंकरून दिसून येतें. झरथुष्ट्रानें एकाच देवाची उपासना सुरू केली, हेंहि विधान अगदींच यथार्थ दिसत नाहीं. कारण वेदांतहि ज्या ज्या ठिकाणीं कोणत्याहि देवतेची स्तुती केली आहे, त्या त्या ठिकाणीं तेंच दैवत प्रमुख म्हणून मानलेलें आहे. अग्नीची पूजा तर झरथुष्ट्राच्या अगोदरपासून होती, याबद्दल संशय घेण्याचें कारणच नाहीं. झरथुष्ट्राच्या धर्माबद्दल हा लेख नसल्यामुळें

हें विवेचन येथेंच सोडून दिलें पाहिजे. तथापि वर केलेल्या ऊहापोहावरून, अवेस्तांतील देव हे वैदिक आर्यच होत अशाविषयीं निखालस पुरावा नाहीं, इतकें कळून येईल. मग हे देव कोण होते ? ते केवळ काल्पनिक होते असें मानणें वितंडवादीपणाचें होईल. माझ्या मतें मग हेच देव होत. मग हे जादु अगर पिशाच्चविद्येंत प्रवीण होते ही गोष्ट महशूरच आहे. मगी हे सूर्यप्रकाशांत अगर दिवसास यज्ञ करीत नसत असें प्लूटार्क म्हणतो. Plutarch tells us that the Magis sacrificed wolf to the God of evil in a sunless place. आतां खोरशेद यस्त ४–५ पहा. सूर्य उगवला नाहीं, तर सात जगतांत जेवढ्या कांहीं वस्तु आहेत, त्या सर्वांचा नाश देव करतील. अर्थात् रात्रीं यज्ञ करणाऱ्या मगांचें सामर्थ्य दिवसां कमी असतें. यज्ञाच्या योगानें सामर्थ्य प्राप्त होतें, हा समज प्राचीनांचा होता. तेव्हां हा खो. यस्तांतील उल्लेख मगांनाच लागू पडत नाहीं काय ? निरंजिस्तानमध्यें रात्रीं दिलेल्या आहुति देवांना फलदायी होतात, असें सांगितलें आहे. For all libations poured out and presented that are poured in the darkness of night and without singing the Ahunvairya flow to the benefit of the Daevas (निरंजिस्तान). ह्या वाक्यावरून मगांचाच यज्ञप्रकार सूचित होत नाहीं काय ? मग व वैदिक ब्राह्मण यांच्यांत इतकें साम्य आहे कीं, हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं येथील ब्राह्मणांचा दर्जा मिळविला. "ब्राह्मणानां मगानां च समत्वं जायते कलौ" असा एका नेपाळांत सापडलेल्या लेखांत निर्णय दिला आहे. देव हे सातहि भूतलांवर प्रसिद्ध होते, म्हणून अवेस्तामध्यें सांगितलें आहे. मगांचेंहि हेंच वर्णन गोविंदपूर येथील

शिलालेखांत सापडतें. ( महितास्ते जगत्यां जयन्ति ).

शिवाय मोल्टन म्हणतो त्याप्रमाणें देवोपासक हे मिथ्राला-मित्राला नव्हे—उद्देशून याग करीत: Orgiastic nocturnal sacrifices held perhaps in honor of Mithra, slayer of the Bull, and under the inspiration of Hoama were among the grievances of quiet Mazda-yasnian agriculturists against the Daeva-yasnian nomads. आतां वैदिक आर्य ह्यांचा देव मिथ्र नसल्यामुळें त्यांच्या संबंधानें झरदुष्ट्राची तक्रार नाहीं, हें उघडच होतें.

देवोपासना ही असंस्कृत व अस्थायिक लोकांमध्यें होती हें गेल्ड्नरचें म्हणणें बरोबर आहे. "The Ruder Daeva cult held its ground among the uncivilized nomad tribes." पण वैदिक आर्यांना हें वर्णन लागू करतां येत नाहीं.

मीडिया देशांत झरथुष्ट्राचा जन्म झाला. मग हे मीडिया देशांतील पुरोहित होत. ज्या समाजांत झरथुष्ट्राचा जन्म झाला त्या समाजाची धर्मव्यवस्था त्यास पसंत नव्हती, म्हणूनच त्यानें नवीन धर्माची प्राणप्रतिष्ठा केली, हें उघड आहे. अशा ह्या धर्माला जोराचा विरोध त्या समाजाकडूनच होणें शक्य आहे. म्हणून झरथुष्ट्राचे शत्रू मगच असावेत, असें अनुमान करतां येण्यासारखें आहे. मग हे मूर्तिपूजक नव्हते, असें ग्रीक इतिहासकार म्हणतो. तथापि तें म्हणणें निराधार असावें. मग हे सूर्योपासक असून सूर्याच्या देवळांतील ते पुजारी असत. सध्यांहि सूर्यप्रतिमेची प्राणप्रतिष्ठा मग–ब्राह्मणांकडूनच करावी लागते. तात्पर्य, मग हे मूर्तिपूजक होते. चेटकविद्येंत वाकबगार होते; प्रबल व प्रसिद्ध होते; पंचमहाभूतोपासक

नव्हतेच असें नाहीं; द्वैती होते. ह्या सर्व गोष्टींवरून आवेस्तिक देव आणि वैदिक देव एक नव्हत, असें वाटतें. आवेस्तिक देव जर मग नसतील तर दुसऱ्या कोणत्या तरी जातीचे असावे. आवेस्तिक व वैदिक देवांचें तादात्म्य ठरविण्यास अधिक प्रबल पुरावा पाहिजे.

मग ही संज्ञा त्या लोकांना दुसऱ्यांनीं लावली आहे. हे लोक आपणांस मग म्हणत नसत. अवेस्तांत मग हा शब्द एकदांच आला आहे; (य. ६५–७). "मगी लोकांचा द्वेष करणारांस आमचें जल मिळतां कामा नये" असें वचन आहे. अर्थात् देव म्हणजे 'मग' असें जें वर ध्वनित केलें आहे, त्यास हें वचन बाधक आहे. पण हें गद्य आहे. गद्यवाक्यें इतकीं विश्वसनीय नाहींत. झरथुष्ट्रीय धर्माचें सूत्र मगांनीं आपल्या हातीं घेतल्यानंतर हें वाक्य घुसडलें असावें, हा तर्क अगदींच वावगा होणार नाहीं.

सारांश, आवेस्तिक देव व वैदिक देव ह्यांचें तादात्म्य सिद्ध होऊं शकत नाहीं. मग तुम्हीं आवेस्तिक देव म्हणजे 'मग' म्हणून समजा अगर दुसऱ्या एकाद्या जातीचे लोक समजा. 'मग' हे आर्य अगर सेमेटिक नव्हते, अशाबद्दल मोल्टननें बराच पुरावा दिला आहे. ह्या विषयाचा विचार करतांना ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली पाहिजे कीं, आर्यांच्या देवांचा प्रवेश अनार्यांत झाला होता व आर्यांची भाषाहि कांहीं अनार्य बोलत असत. निदान प्रसंगीं वापरीत असत, म्हणून ह्या दोन सादृश्यांवर सर्वस्वीं भिस्त ठेऊन अनुमान काढणें धोक्याचें आहे.

## गाथा

(१) नंतर सर्वस्वीं यमच असा जो आंग्रमैन्यु तो येऊन त्यानें उलट नदींतील सर्प, त्याचप्रमाणें हिंवाळा निर्माण केला. हें देवांचेंच कृत्य होय.–फर्गर्द १--३ (५)

(२) केवळ यमच असा जो आंग्रमैन्यु तो नंतर आला आणि त्यानें उलट हिंवाळा निर्माण केला हें देवांचें कृत्य होय. फ. १--२०(७६)

(३) सातु लावले तेव्हां देव चकित झाले, ते उगवले तेव्हां देवांचीं अंतःकरणें मूर्छित झालीं, वोंडें आलीं तेव्हां देव कुथूं लागले, जेव्हां कणीस आलें तेव्हां देव पळून गेले. ज्या घरांत गहूं टिकत नाहींत त्या घरांत देव राहातात. धान्याची समृद्धि झाली म्हणजे त्यांच्या घशांत तप्त लोहदंड जणूं काय फिरविला जात आहे असें त्यांना होतें. --फ. ३--३२

जर एकाद्या मझ्दोपासकाला वैद्यशास्त्रांतील एकादा प्रयोग करावयाचा असेल तर तो त्यानें कोणावर करावा ? मझ्दोपासकांवर अथवा देवोपासकांवर ? अहुरमझ्द म्हणाला, "मझ्दोपासकांवर करण्यापेक्षां देवोपासकांवरच त्यानें प्रयोग करावा. देवोपासकावर शस्त्रानें त्यानें एकादी क्रिया केली व तो मेला, तसेंच दुसऱ्या देवोपासकावर केली तोहि मेला, तिसऱ्या देवभक्तावर शस्त्रानें क्रिया करून तोहि मेला तर तो अगदीं कायमचा अयोग्य वैद्य म्हणून समजावा." फ. ७।३६।३७।४१

अहुरमझ्दानें उत्तर दिलें, "पुरुष ज्याप्रमाणें स्त्रीजातीबरोबर समागम करतो अथवा स्त्री ज्याप्रमाणें पुरुष जातीबरोबर समागम करते त्याप्रमाणें मनुष्य जातीबरोबर जो पुरुष समागम करतो तो देव होय; हाच मनुष्य देवांचें यजन करतो; देवांचा लाडका यार तोच. देवांची लाडकी यारीण तीच. (देवांची पत्नी तीच, हा माणूस देवाइतकाच वाईट होय.) तोच सर्वथैव देव होय. मरणापूर्वी प्रत्यक्ष देव आणि मरणानंतर अदृश्य देवहि तोच." फ. ८--३२

जेथें जेथें म्हणून अग्नीचा परिमळ वायु आणील तेथें तेथें अहुरमज़्दाचा अग्नि जाईल आणि हजारों अदृश्य देव, अंधारांत वाढलेले हजारों पिशाच्च, तसेंच यातु आणि पैरीख यांचीं हजारों युग्में यांचा संहार करील. फ. ८–८०

अरे जगाची उत्पत्ति करणाऱ्या पवित्र पुरुषा, देव म्हणून कोण मनुष्य आहे, देवांची पूजा करतो तो कोण आहे? तो देवांचा लाडका पुरुष आहे काय? ती देवांची लाडकी स्त्री आहे काय? ती देवांची पत्नी आहे काय? तो देवाइतकाच वाईट आहे काय? तो उर्वथैव देवच आहे काय? मरणापूर्वी देव असणारा आणि मरणानंतर अदृश्य देवांपैकीं एक होणारा असा कोण?

फ. ८- ३१

मी या घरांतून, या गांवांतून, या नगरांतून, या प्रांतांतून इंद्राला हाकलून देतों, सौर्वायाला हकलून देतों. मी नव्हेयेथ्य देवाला दूर हाकून लावतों. प्रेतानें दूषित झालेल्या पुरुषाच्या शरीरांतून, प्रेतानें दूषित झालेल्या स्त्रीच्या शरीरांतून (मी ह्यांना हकलून देतों). गृहपतीपासून, ग्रामाध्यक्षापासून, नगराध्यक्षापासून, देशाधिपतीपासून, (मी ह्यांना दूर हकलून लावतों). सर्व धर्मक्षेत्रांबाहेर (मी ह्यांना हकलून लावतों). फ. १०–९

आंग्रमैन्यु ज्यांनीं चीत होतो ते हेच शब्द. घातकी भाला धारण करणारा राक्षस जो एष्म त्याला चीत करणारे हेच शब्द. माझैन्य देवांना चीत करणारे हेच शब्द. सर्व देवांना चीत करणारे हेच शब्द.

फ. १०–१६

नऊ रात्रींनंतरहि रक्तस्राव तिच्या दृष्टीस पडत असल्यास, तें देवांचें कृत्य आहे म्हणून समजावें. कारण देवांचें यजन व्हावें,

देवांचा मोठेपणा वाढावा, म्हणून त्यांनीं तें कृत्य केलें आहे.

फ. १६–११

झरथुष्ट्रानें अहुरमझ्दाला विचारलें, "हे पावित्र्यवंता, जगत्स्रष्ट्या, लोकोपकारका अहुरमझ्दा, देवांना ज्या कृत्यानें यजन केल्यासारखें होतें असें अत्यंत घातक कृत्य कोणतें ?"

अहुरमझ्द म्हणाला, "आपले केस विंचरतांना अगर काढतांना अगर नखें काढतांना या पृथ्वीवर मनुष्य जेव्हां एखाद्या भोंकांत अगर भेगींत ते केस अगर तीं नखें टाकतो तेव्हां. (तें अत्यंत घातक कृत्य म्हणून समजावें.)"

अशा रीतीनें विधियुक्त क्रिया केल्यास पृथ्वीवरील देव उत्पन्न होतात. अशा रीतीनें नियमांचें उल्लंघन केल्यानें ज्यांना लोक यूका म्हणतात, ज्या शेतांतील धान्य आणि फडताळांतील कपडे खाऊन टाकतात असे जे खफ्स्त्र ते या पृथ्वीवर निर्माण होतात. १७; १–३

आणि नंतर हे अशोझुश्त पक्षा, हीं नखें मी तुला अर्पण करतों. तीं तुला भालेसुऱ्यांप्रमाणें होवोत. ते तुला धनुष्यांच्या ऐवजीं आणि ससाण्यांच्या पक्ष्यांनीं युक्त अशा बाणांच्या ऐवजीं उपयोगी पडोत. तसेंच माझैन्य देवांवर टाकण्यास गोफणगोटांप्रमाणें तुला ते उपयोगी पडोत.

फ. १७–९

तीं नखें जर अर्पण केलीं नाहींत (पक्षाला) तर माझैन्य देवांना भाले व सुऱ्यांप्रमाणें तीं होतील.

फ. १७–१०

अहो लोकहो, उठा आणि देवांना हतवीर्य करणारें असें अयेम-यद्वहिरतेम म्हणा.

फ. १८–१६

अरे गृहपते, चल ऊठ. तूं आपल्या कपड्यांवरून कस्ती बांध, आपले हात धू. काष्ठ घेऊन तें माझ्याकडे आण आणि तुझ्या

स्वच्छ धुतलेल्या हातांनीं आणलेल्या निर्मल काष्टांनीं मला अग्नीला प्रज्वलित कर. (कारण) देवांनीं केलेला आझी येऊन तो मला खाऊन टाकतो आणि मला जगांतून नाहींसें करूं बघतो.

फ. १८--१९

उत्तरेकडील प्रदेशांतून देवांचा देव असा जो क्रूर आंग्रमैन्यु तो धांवत आला. फ.१९–१

झरथुष्ट्रानें (हें सर्व) अंतर्ज्ञानानें पाहिलें. "दुष्ट आणि कुकर्मी जे देव ते (त्याला वाटलें) माझ्या मृत्यूविषयीं वाटाघाट करीत आहेत."

फ. १९--३

झरथुष्ट्र आंग्रमैन्यूला याप्रमाणें म्हणाला: "अरे दुष्टा आंग्रमैन्यु, देवांच्या सृष्टीचा मी नाश करीन. देवानें केलेल्या नसूला मी ठार मारीन" फ. १९--५

झरथुष्ट्रानें अहुरमझ्दाला विचारलें, "हे सर्वज्ञा अहुरमझ्दा, तूं कधीं निजत नाहींस, तूं कधीं उन्मत्त होत नाहींस ! वोहुमनोला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष विटाळ होतो. देवांनीं मारलेल्या (माणसांच्या) शरीरांनीं देव त्याला अशुद्ध करतात. वोहुमनो शुद्ध केला जावो."

फ. १९--२०

झरथुष्ट्रानें अहुरमझ्दाला विचारलें, "अरे सर्वज्ञा अहुरमझ्दा, धर्मनिष्ठ पुरुषाला, धर्मनिष्ठ स्त्रीला, पापांत राहणाऱ्या अशा देवोपासकाला, अहुरानें केलेली जमीन, वाहणारें जल, वाढणारें धान्य, तसेंच बाकी सर्व संपत्ति देण्यास सांगूं काय ? " फ. १९--२६

अहुरमझ्दानें उत्तर दिलें, "मनुष्याचें आयुष्य भरलें व तो मेला म्हणजे दुष्ट व दुष्कर्मी देव त्याचे डोळे काढून घेतात. तिसऱ्या रात्रीं प्रभातसमयीं अरुणोदय झाल्यावर सुंदर शस्त्रांनीं युक्त असा मिथ्र

१०२८७



आनंदी डोंगरांवर येऊन पोहोंचतो आणि सूर्योदय होतो तेव्हां विझरेष नांवाचा राक्षस पापांत मुरलेल्या दुष्ट देवोपासकांचे आत्मे बद्ध करून घेऊन जातो." फ. १९--२८।२९

यज्ञयागानें शुद्ध झालेल्या धर्मनिष्ठ मनुष्याविषयीं म्हटलें तर मरणानंतर त्याच्या आत्म्याच्या सुवासानेंच दुष्ट व पापी देवांचा थरकांप होतो. फ. १९--३३

पवित्र अशा स्रौषाला--जो सुरा न पितां उन्मत्त होतो आणि जो दुष्ट व पापी देवोपासकांना द्रुजनरकांत टाकून देतो, त्या कुंद राक्षसाला मारावें म्हणून,-- पवित्र स्रौषाला उद्देशून यज्ञ करा. फ. १९--४१

ते ओरडूं लागले, त्यांच्या मनाची चलबिचल होऊं लागली. देवांचा देव असा घोर आंग्रमैन्यु, इंद्रदेव, सौर्व देव, नाउङ्‌घैथ्य देव, तौर्वी आणि झैरी घातकी भाल्याचा एष्म, अकतश देव, देवांनीं केलेला हिंवाळा, फसव्या अदृश्य यम, वडिलांना कष्टप्रद अशी वृद्धावस्था देव, बुईती, द्वी, दैवि, कश्वी देवांमध्यें फारच देवां-सारखा पैतीश देव.

आणि भयंकर व पापी देव आंग्रमैन्यु म्हणाला, "दुष्ट पापी देवांना अरेझूराच्या माथ्यावर जमूं दे. दुष्ट पापी देव ओरडत ओरडत चालते झाले. ते दुष्ट व पापी देव ओरडत ओरडत धांवत जातात. ते दुष्ट व पापी देव कुदृष्टी टाकून धांवत जातात. "अरे-झूराच्या माथ्यावर आपण जाऊं या."

कारण पौरषस्पाच्या घरांत तो पुण्यशील झरथुष्ट्र जन्मास आला. त्याला आपल्याला कसें मारतां येईल ? राक्षसांना मारण्याचें तें एक शस्त्रच होय. राक्षसांना प्रतिराक्षसच तो आहे. द्रुजाला द्रुज होय. देवांनीं केलेला नसू, असत्य आणि देवोपासक यांचा विध्वंस झाला

आहे. ते दुष्ट पापी देव मोठ्यानें ओरडत गाढ अंधःकारांत शिरतात. फ.१९--४३ ते ४७

अरे झरथुष्ट्र, तर मग तो शब्द उच्चार, मूर्तिपूजकांवर जेव्हां तूं हल्ला करतोस आणि चोर व देव एकदम धांवून येतात तेव्हां तें स्तोत्र म्हणण्यांत यावें. म्हणजे मग दुष्ट असे देवोपासक, यातु आणि त्यांचे अनुयायी पैरीख आणि त्यांचे अनुयायी यांचें कपट पार नाहींसें होईल. देव चीत होऊन जातात, देवोपासक चीत होऊन जातात आणि आपलीं तोंडें मागें घेऊन चावण्याचें बंद करतात.

स्रोषयस्त १--६

सत् आणि असत् या दोन तत्त्वांपासून जगाची उत्पत्ति झाली. तेव्हांपासून ज्यानें निद्रा कधीं घेतली नाहीं, जो अहोरात्र माझैन्य देवांबरोबर युद्ध करीत असतो;

तो देवांपुढें भीतीनें नमत नाहीं; त्याच्यापुढें सर्व देव भीतीनें नाइलाज म्हणून नमतात आणि अंधःकारयुक्त प्रदेशांत जाऊन पडतात. स्रोपयस्त २--१२, १३

जो (स्रौप) देवांचीं डोकीं फोडतो. स्रोप यस्त. ५--१९

देवांपासून संपत्ति आणि सुख, स्थौल्य आणि जनावरांचे कळप, सुख आणि वैभव ज्यानें हिरावून घेतलीं; झम्याद यस्त ७--३२

त्याला पाहतांच देव एकदम पळून गेले. त्याला पाहतांच सर्व मत्सर अथवा दुष्ट बुद्धि पार मावळली, त्याला पाहतांच गैनींनीं मनुष्यापासून आपला मोर्चा फिरवून देवांवर हात टाकला. अहुनवैर्य मंत्र झरथुष्ट्रानें चार वेळां म्हटला व जसजसा तो उच्च स्वरांत म्हणूं लागला तसतसे देव पाताळांत घुसूं लागले आणि त्यांच्यापासून झरथुष्ट्रानें मंत्र व याग हिरावून घेतले. झम्याद यस्त१३,--८०, ८१

जो ( मिथ्र ) देवांची डोकीं फोडतो, जो अत्यंत निष्ठूरपणानें अपराध्याकडून काम करून घेतो, खोटें बोलणाराला जो शिक्षा करतो, जो पैरिखांचें कांहीं चालूं देत नाहीं.—

मिहिर यस्त ७--२६

ज्याच्यापासून ( मिथ्रापासून ) सर्व अदृश्य देव आणि वरेण्य राक्षस घाबरून पळत सुटतात—  मिहिर यस्त १७--६९.

,, २४--९७:

,, २५--९९.

ते ( मिथ्राचे बाण ) आकाशांतून देवांच्या डोक्यांवर पडतात.

मिहिर यस्त ३१--१२८

शुभ्र एकरंगी, एकरक्ती असे चार घोडे ज्याला नेतात व जे घोडे यातु, पैरीख, देव आणि मनुष्य तसेंच इतर द्वेषी या सर्वांचा द्वेष समूळ नाहींसा करतात ( त्याच्याकरतां यज्ञ करा).

आबान यस्त ३--१३

त्यानें तिच्याजवळ वर मागितला. तो म्हणाला "अरे अर्द्वीसूर अनाहित, मला हें दे म्हणजे मग देव, मनुष्य, यातु, पैरीख, छलक, आंधळे आणि बहिरे यांचें व सर्व देशांचें मला आधिपत्य प्राप्त होईल; तसेंच सर्वांच्या अघाडीला मीं राहावें. त्यानें जंगलांतून जाऊं नये; ( कारण ) तो खुनी असून आतांच घोड्यावर बसून क्रूरपणानें माझ्यावर चालून येत आहे."

आबान यस्त १३–५०, झम्याद यस्त ५–२६

नंतर झरथुष्ट्रानें अर्द्वीसूर अनाहिताला विचारलें, "अरे अर्द्वीसूर अनाहित, दुष्ट देवोपासक सूर्यास्तानंतर जो सोमरस तुला आणून देतात त्याचें काय होतें ?"  आबान यस्त २१–९४

अर्द्वीसूर अनाहितानें उत्तर दिलें, "अरे शुद्ध व पुण्यवान् स्पीत-मझरथुष्ट्र, ज्यांना यज्ञांतील कांहीं भाग मिळतां कामा नये असे १६०० देव टाळ्या पिटीत, उड्या मारीत, व ओरडत ओरडत येऊन सूर्यास्तानंतर आणलेला मला अर्पण केलेला सोमरस ग्रहण करतात." आबान य. २१-९५

हजारों, लाखों, कोट्यावधी देव समोर असतां जो हौर्वताताच्या नांवाचा उच्चार करील तो नसूला, हशीला, घशीला, सेनीला, बूगीला मारूं शकतो. खोरदाद यस्त ४--२

हे अत्यंत दयाळू द्रास्प, माझनच्या देवांना मला पराभूत करतां यावें, देवांची मला भीती वाटूं नये व त्यांच्यापुढें नमण्याचा प्रसंग येऊं नये उलट सर्व देवांनीं मलाच भ्यावें व माझ्यापुढें नमावें तसेंच धावरून जाऊन त्यांनीं काळ्याकुट्ट प्रदेशांत जावें, एवढ्या-करतां मला हा वर दे. गोशयस्त १--४ अशीयस्त ३--२५

अरे झरथुष्ट्रा, यातूंचा समूळ नाश कर. देव आणि मनुष्य या दोघांचाहि ( नाश कर ). हतानयस्त ३--११

देव आणि मनुष्य यांना पीडा देतां येईल, यातु आणि पैरीख यांना मला पीडा देतां येईल, देव किंवा मनुष्य यांच्या-कडून पीडा मला होणार नाहीं, यातु किंवा पैरीख हे मला पीडा करूं शकणार नाहींत ( असें मला तुझें नांव सांग ).

अहुरमझ्दयस्त--६

अरे झरथुष्ट्र देव, मनुष्य, यातु आणि पैरीख ह्यांचा द्वेष नाहींसा करण्याचें तुझ्या मनांत असेल ( तर ) हीं माझीं नांवें दररोज दिवसां आणि रात्रीं तूं म्हटलीं पाहिजे. अहुरमझ्द यस्त १०

सर्व देवांना आणि वरेण्य राक्षसांना मारण्याकरितां, माझैन्य राक्षसांना मारण्याकरितां, घातकी भाला धारण करणारा जो एष्म त्याला मारण्याकरितां, आंग्रमैन्यु राक्षसाला मारण्याकरितां, मी अहुरमझ्दाची उपासना करतों. अहुरमझ्द यस्त ३२

मझ्दोपासक मी आहें, झरथुष्ट्राचा मी अनुयायी आहें, तसेंच देवांचा द्वेष करणारा आणि अहुराचे कायदे मानणारा मी आहें, अशी मी कबूली देतों.

सन्मान्य राजे म्हणून देवोपासकांनीं कधीं राज्य केलें आहे काय?
यस्न ४४–२०

( त्याच्यापुढें ) दुखणें पळून गेलें, मृत्यु पळून गेला, देव पळून गेले, देवांची विरोधी क्रिया नाहींशी झाली. अरदीबेहिस्त यस्त २–७

रात्रीच्या अंधःकारांत आणि अहुनवैर्य न म्हणतां अर्पण केलेला सोमरस देवांना मिळतो. एरपतिस्तान ६–६८

पाठ व कंबर वाकवितात आणि आपल्या सर्व अवयवांची योग्य ठेवण करतात तेव्हां त्यांना वाटतें कीं, आम्ही मारूं; पण ते मारूं शकत नाहीं आणि नंतर देव आणि देवोपासक गोंधळून जातात आणि त्यांच्या डोळ्यांसमोर अंधेरी येते.

बेहेरामयस्त १७–५६.

अहुरानें केलेला वेरेथघ्न हा मोठ्यानें म्हणाला. सुज्ञ प्राणी जो बैल त्याच्या आत्म्याला मनुष्यापासून योग्य याग व प्रार्थना मिळत नाहीं; कारण आतां देव आणि देवोपासक पाण्यासारखे रक्ताचे पाट वाहवतात.

कारण आतां देव आणि देवोपासक हपरसी नांवाची औषधी व नेमेत्क नांवाचें काष्ट अग्नीसाठीं आणतात. बे. य. १७–५५

जो यातु आणि पैरिक देव आणि मनुष्य, आंधळे आणि बहिरे आणि दुष्ट छलक ह्यांचा संघ मोडून टाकतो अशा वेरेथघ्नाला उद्देशून आम्ही यज्ञ करतों. बेहेरामयस्त २१--६२

हजारों देवांना मारण्याकरितां प्रकाशरूपी वस्त्रें धारण करून आपल्याला यश मिळावें म्हणून जे आटोकाट श्रम करतात व पितळेचे मुकुट, पितळेचीं कवचें धारण करतात, अशा धर्मनिष्ठांच्या फ्रवशींची आम्ही पूजा करतों. फरवर्दीनयस्त १२–४५

देवांच्या जुलमामुळें, देवांच्या हल्ल्यामुळें सूर्य, चंद्र, नक्षत्रें आणि असंख्य तारे पुष्कळ काळपर्यंत निश्चल राहिले होते. त्यांना मार्ग दाखवणारे जे सज्जनांचे फ्रवशी त्यांचें मी यजन करतों.

फरवर्दीनयस्त १६–५७

जो ( पुण्यशील झरथुष्ट्राचा फ्रवशी ) पहिला पुरोहित, पहिला योद्धा, पहिला शेत करणारा होता, देवाच्या आणि निर्दय मनुष्याच्या हातून चक्राचें परिभ्रमण ज्यानें प्रथम घेतलें, ह्या सृष्टींत अपस्तुति ज्यानें प्रथम केली, देवांचें ज्यानें कांहीं चालूं दिलें नाहीं, झरथुष्ट्राचा अनुयायी व मझ्दोपासक मी आहें असें ज्यानें कबूल केलें, जो देवांचा तिरस्कार करतो आणि अहुराचे कायदे मानतो, ह्या जगामध्यें देवविध्वंसक असा शब्द म्हणजे अहुराचा कायदा, ज्यानें प्रथम उद्गारला व त्याचा पुकारा केला, देवांनीं निर्माण केलेले पदार्थ यज्ञांना अगर प्रार्थनेला अपात्र आहेत असें ज्यानें प्रथम ठरविलें; फरवर्दीनयस्त २४-८९,९०

त्यानें त्याच्याजवळ वर मागितला तो म्हणाला, ‘हे वायो, मला असा वर दे कीं, माझनचे $\frac{2}{3}$ देव आणि वरेणचे $\frac{2}{3}$ राक्षस ह्यांना मला मारतां येईल.” रामयस्त २-८

त्यानें त्याच्याजवळ एक वर मागितला. तो म्हणाला, "हे वायो मला असा वर दे कीं, त्याच्या योगानें सर्व देव आणि मनुष्य, सर्व यातु आणि पैरीख ह्यांच्यावर मला विजय मिळेल. तसेंच आंग्र-मैन्यूचा घोडा करून त्यावर बसून तीस वर्षेपर्यंत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सर्व पृथ्वीवर मला जातां येईल. रामयस्त. ३-१२

शूर यिमाच्या कारकीर्दीत थंड वाराहि नव्हता, व कढत वाराहि नव्हता, वार्धक्यहि नव्हतें, मृत्यूहि नव्हता, व देवांनीं केलेली असूयाहि नव्हती. रामयस्त. ४--१६

झम्याद यस्त ७--३३

हे वायो, तूं सर्व मनुष्य व अश्व यांचे ठिकाणीं भीती उत्पन्न करतोस, सर्व प्राण्यांचे ठिकाणीं राहून देवांच्या विरुद्ध क्रिया करतोस, वगैरे. रामयस्त. ११--५३.

सूर्य उगवला नाहीं तर सात कर्श्वरांत जेवढ्या कांहीं वस्तू आहेत त्या सर्वांचा नाश देव करतील. आणि या भौतिक सृष्टींत त्यांचा पराभव करण्यास स्वर्गातील यझतांना सुद्धां उपाय सांपडणार नाहीं.

नित्य दैदीप्यमान शीघ्रतुरगी अशा सूर्याला उद्देशून, अंधःकार घालवण्याकरितां, अंधःकारजन्य अशा देवांना विरोध करण्याकरितां, लुटारू दरवडेखोर यांचा पराभव करण्याकरितां, यातु आणि पैरीख यांचा पराजय करण्याकरितां, मृत्यूला दूर सारण्याकरितां जो कोणी यज्ञ करतो तो अहुरमझ्दाला उद्देशून यज्ञ करतो.

देवांच्या डोक्यांवर ज्यानें प्रहार केला, अशा मोठमोठ्या कुरणांचा प्रभु जो मिथ्र त्याच्या दंडाला उद्देशून मी यज्ञ करतों.

खोरशेद यस्त ३, ४, ६

त्याच्या हातून प्रत्येक देवोपासकाचा आणि प्रत्येक शत्रूचा नाश होवो अशी मी सतत प्रार्थना करतों. आफ्रिगान. १--२६

मी मझ्दोपासक झरथुष्ट्रानुयायी देवांचा शत्रु आहें, असें कबूल करतों. गाह ५

देवांना शरण आणणारीं, शत्रूचा पराजय करणारीं, अशीं शुद्ध उच्चारलेलीं जीं यज्ञीय सूक्तें त्यांना उद्देशून आम्ही यजन करतों.

विस्परद २०--१

सन्मान्य राजांप्रमाणें देवांनीं कधीं राज्य केलें आहे काय ?

यस्न ४४--२०

देवांची ज्यानें निर्भत्सना केली आहे त्याची आम्ही प्रार्थना करूं.

यस्न ४५--११

आणि आम्ही यज्ञाच्या रूपानें मथ्रस्पेंताची पूजा करतों. हा मथ्रस्पेंत वैभवशाली असून सत्यस्वरूपी आहे. देवांच्या विरुद्ध कायदे करणारा तोच आहे. ह्यालाच झरथुस्ट्रीय धर्म म्हणतात. यस्न २५--६, यस्न ६--१२, यस्न २२--२०, यस्न ४--१८, यस्न ७--१५, यस्न ३--१५, यस्न १९--१३.

येथून मी देवांना घालवून लावतों. मी देवांपासून विलग्न झरथुष्ट्रानुयायी मझ्दोपासक आहें हें निक्षून सांगतों. यस्न १२--१

देव दुष्ट असल्यामुळें त्यांचें नेतृत्व किंवा आश्रय मी शपथपूर्वक पार झुगारून देतों. त्यांच्या ठिकाणीं चांगलें असें कांहीं नाहीं—सद्गुण नाहीं. ते कपटी व दुष्ट असून जगांतील सर्व वस्तूंत अत्यंत निंद्य होत. यस्न १२–४; ५

परंतु तुम्ही देवहो सर्वजण दुष्ट मनापासून उत्पन्न झालां आहां. जो तुम्हांस उद्देशून यज्ञ करितो तो असत्यरूपी राक्षस होय व मिथ्यत्वा-

पासूनच त्याची उत्पत्ति आहे. तुमचें कपट तुमच्यापुढें चालत असून, त्यामुळेंच या सप्तविध पृथ्वीवर तुम्ही प्रसिद्धी पावला आहां.

यस्न ३२–३.

अरे मझ्द, तूं सर्वांपेक्षां अधिक श्रेष्ठ आहेस. देवांहून श्रेष्ठ आहेस आणि खफ्स्ट्रानें भ्रष्ट केलेल्या मर्त्यांहून श्रेष्ठ आहेस असें आम्ही ठरवितों. यस्न ३४-५

कयध आणि कैध्य यांना ज्यांनीं जिंकलें, पराक्रमी आणि जग-विध्वंसक असा जो देवांचा राक्षस त्याला ज्यांनीं ठार केलें असा जो पूज्य आणि थोर स्रौष त्याची आम्ही पूजा करतों. यस्न ५७–१५

आणि ह्या आमच्या प्रार्थनेनें दुष्ट मनुजांपासून आणि देवांपासून आमचें संरक्षण होवो. यस्न–५८–१

देवांपासून संरक्षण करण्यास समर्थ, रोगघ्न व चौफेर वहात असलेलें असें जें अर्द्विसूर अनाहित उदक त्याची आम्ही प्रार्थना करतों. यस्न ६५–१

अत्यंत दानशील मिथ्राची आम्ही पूजा करतों एवढेंच नव्हे, तर देवांच्या विरुद्ध स्थापलेल्या धर्माचें सर्वांगत्वानें आम्ही यजन करतों.

यस्न ७१–५

# देवांचीं पातकें.

त्रिते देवा अमृजतैतदेनस्त्रित एनन्मनुष्येषु ममृजे ।
ततो यदि त्वा ग्राहिरानशे तां ते देवा ब्रह्मणा नाशयन्तु ॥

वरील मंत्र अथर्ववेदांत सहाव्या कांडांत एकशें तेराव्या सूक्तांत आहे.

अर्थः—देवांनीं हें पाप त्रितावर झाडलें. त्रितानें हें मनुष्यावर सोडिलें. म्हणून जर (हे परिवित्त) तुला डाकिनीनें पछाडलें असेल तर ते देव मंत्राच्या योगानें तिचा नाश करोत.

वरील मंत्रांत देवांच्या पापांचा निर्देश आहे. ह्यासंबंधानें अशी आख्यायिका आहे कीं, पूर्वी यज्ञांत देवांनीं अग्नीला हवि अर्पण केल्यानंतर, हाताला चिकटून राहिलेल्या हविर्भागामुळें उत्पन्न झालेल्या पापाचें क्षालन करण्याकरितां एकत, द्वित आणि त्रित असे आप्त्य नांवाचे तीन पुरुष अग्नि आणि उदक यांच्या संपर्कानें उत्पन्न करून त्यांच्या ठिकाणीं देवांनीं आपलें पाप टाकलें. आप्त्यांनीं तें सूर्याभ्युदित आदिकरून दुसऱ्या पापीजनांवर एका-मागून एक असें लादलें.

मैत्रायणीसंहितेंत असें सांगितलें आहे कीं देवांना आपलें पाप ज्याच्यावर लादतां येईल असा कोणी न आढळल्यामुळें एकत, द्वित आणि त्रित असे तीन पुरुष मुद्दाम उत्पन्न करावे लागले. (मै. सं. ४--१--९)

तै. ब्राह्मणांत दिलेली आख्यायिका येणेंप्रमाणें.

देवा वै हविर्भूत्वाब्रुवन् । कस्मिन्निदं म्रक्ष्यामह इति । सोऽग्निरब्रवीत् । मयि तनूः संनिधद्ध्वं । ........सोऽङ्गारेणापः । अभ्यपातयत् । तत एकतो जायत । स द्वितीयमभ्यपातयत् । ततो द्वितो जायत । स तृतीयमभ्यपातयत् । ततस्त्रितो जायत । ........ते देवा आप्त्येष्व-मृजत । आप्त्या अमृजत सूर्याभ्युदिते । सूर्याभ्युदितः सूर्याभिनिम्रुक्ते । सूर्याभिनिम्रुक्तः कुनखिनि । कुनखी श्यावदति । श्यावदन्नग्रदिधिषौ । अग्रदिधिषुः परिवित्ते । परिवित्तो वीरहणि । वीरहा ब्रह्महणि । तद्ब्रह्म-हणं नात्यच्यवत ॥ ( ३-२-८-१२ )

हवि अर्पण केल्यावर एतद्विषयक पाप आतां कोणाच्या माथीं मारावें ह्याविषयीं देव विचार करूं लागले. तेव्हां अग्नी त्यांच्या मदतीला आला. त्यानें एकत, द्वित आणि त्रित असे तीन पुरुष उत्पन्न केले. त्यांना आप्त्य असें म्हणतात. तेव्हां देवांनीं आपलें पाप आप्त्यांवर लादलें. आप्त्यांनीं सूर्याभ्युदितावर, सूर्याभ्युदितानें सूर्या-भिनिम्रुक्तावर, सूर्याभिनिम्रुक्तानें कुनखीवर, कुनखीनें काळसर दातांच्या माणसावर; काळसर दातांच्या माणसानें अग्रदिधीषूवर; अग्रदिधीषूनें परिवित्तावर, परिवित्तानें गृह्याग्नि नष्ट झालेल्यावर, गृह्याग्नि नष्ट झालेल्यानें ब्रह्महत्या करणारावर, ह्याप्रमाणें पापमार्जन केलें. ब्रह्मघातक्याच्या पलीकडे पापाची मर्यादा जात नाहीं.

सूर्योदयानंतर निजून राहणारा आणि सूर्यास्तानंतर निजून राहणारा ह्यांस अनुक्रमें सूर्याभ्युदित व सूर्याभिनिम्रुक्त असें म्हणतात. अग्रदिधिषू म्हणजे अविवाहित कन्येची धाकटी विवाहित बहीण. “ज्येष्ठायां यद्यनूढायां कन्यायामुह्यतेऽनुजा । सा चाग्रेदिधिषूर्ज्ञेया पूर्वा च दिधिषूः स्मृता”. विवाहित धाकट्या भावाच्या अविवाहित मोठ्या भावाला परिवित्त अथवा परिवित्ति असें म्हणतात. “दाराग्निहोत्रसंयोगं कुरुते

योऽग्रजे स्थिते । परिवेत्ता स विज्ञेयः परिवित्तिस्तु पूर्वजः ॥

(मनु. ३ । १७१)

मैत्रायणी संहितेंत शेवटचा पापी म्हणजे भ्रूणहत्या करणारा दिला आहे. गर्भहत्या हें सर्वांत वाईट पातक आहे अशी समजूत अथर्ववेदांतहि आढळते. "भ्रूणघ्नि पूपन् दुरितानि मृक्ष्व" हे पूषा भ्रूणघ्न्यावर पापमार्जन कर. (६–११२–३)

कमजास्त फरकानें इतर श्रौत वाङ्मयांत ही आख्यायिका पुनः पुनः आली आहे.

ही आख्यायिका फार महत्त्वाची आहे. कारण हींत पापविषयक कल्पनांचा उगम सांपडतो. पापपुण्यांमध्यें पापाची अगर पुण्याची कल्पना अगोदरची ? पापपुण्यांचा अन्योन्याश्रयभाव दिसतो. पापाशिवाय पुण्य नाहीं व पुण्याशिवाय पाप नाहीं. तथापि वरील आख्यायिकेवरून पापाची कल्पना प्रथम उद्भूत झाली असावी. तिचें कारण पशुहत्या हें होय. आपण पशुवध करतों हें चांगलें करीत नाहीं, ही गोष्ट यूपस्तंभाशीं नेल्या जाणाऱ्या पशूच्या पराङ्मुखतेवरून विचारी देवांच्या लक्ष्यांत येणें स्वाभाविक होतें. आपला जीव कोणी घेतला तर आपणांस जसें वाटेल, तसेंच ह्या पशूसहि वाटत असलें पाहिजे असा विचार सुरू झाला. ही कल्पना ऐतरेय ब्राह्मणांतील एका आख्यायिकेंत प्रदर्शित केली आहे. ती आख्यायिका अशीः पूर्वी एकदां यज्ञप्रसंगीं देवांच्या उपयोगी पडण्याचें पशूंनीं नाकारलें. ते देवांपासून दूर अंतरावर जाऊन आतां आम्ही तुह्मांला मारण्याकरतां सांपडणार नाहीं असें वारंवार म्हणूं लागले ... वगैरे. (ऐ. ब्रा. आ ९). पशूला मारून मुटकून आणून आपल्या फायद्याकरतां आपण त्याचा वध करतों हें कांहीं निर्दोष कृत्य नव्हे असा

विचार मनांत घोळूं लागला. हेंच पापाच्या, अनीतीच्या कल्पनेचें मूळ. सारांश हिंसा हें पहिलें पातक मानण्यांत आलें. ही कल्पना बुद्धाच्या फार अगोदरची आहे असेंहि ह्यावरून दिसून येतें.

ह्यानंतर पातकांची यादी दिली आहे, तीहि बोधप्रद आहे. चोरी, व्यभिचार आणि अभक्ष्यभक्षण हीं सध्यां मानलीं जाणारीं महापातकें वैदिककालीन लोकांच्या हातून घडण्याचें कारणच नव्हतें. देश सुपीक व अफाट; तेव्हां चोरी करण्याचें काय कारण? तसेंच "सर्ववर्णानां स्वधर्मे वर्तमानानां भोक्तव्यं" आपआपल्या धर्माप्रमाणें वागणाऱ्या कोणत्याहि वर्णांतील मनुष्याबरोबर भोजन करण्यास प्रत्यवाय नव्हता ( आपस्तंबसूत्र ). तेव्हां जातिभ्रष्ट होण्याचें कारणच नव्हतें. वैवाहिक बंधनेंहि शिथिल होतीं. उ० उत यत्पतयो दश स्त्रियः पूर्वेऽब्राह्मणाः । ब्रह्मा चेत् हस्तमग्रहीत् स एव पतिरेकधा ॥ ( अ. वे. ५-१७-८ ) एखाद्या स्त्रीचे पूर्वीचे दहा अब्राह्मण पति असले तरी अखेरीस ब्राह्मण तिचें पाणिग्रहण करील तर पति म्हणून त्याचाच एकट्याचा त्या स्त्रीवर हक्क राहील असा ह्या मन्त्राचा अर्थ आहे.

वाईट नखें व काळे दांत असणें हें अस्वच्छतेचें लक्षण. येथें पापाची कल्पना अस्वच्छतेंत उद्भवलेली दिसते. पण अग्रेदिधिषूला पातकी ठरविण्यानें सामाजिक बंधनाचा अतिक्रम करण्यांत पाप घडतें ही कल्पना सिद्ध होते. मोठ्या मुलाचें अथवा मोठ्या मुलीचें लग्न झाल्याशिवाय धाकट्या मुलाचें अथवा मुलीचें करूं नये हें समाजस्वास्थ्याकरितां बंधन घालण्यांत आलें. राजसत्ता असून राजाकडे सामाजिक निर्बंधाचें उल्लंघन करणाराला शासन करण्याचा अधिकार दिला नाहीं. प्रायश्चित्त म्हणजे राजदंडाच्या ठिकाणीं आत्मदंडाची योजना होय.

कुनखी श्यावदन्तस्तु कृच्छ्रं द्वादशरात्रं चरेत् ॥

अग्रेदिधिषूपतिः कृच्छ्रं द्वादशरात्रं चरित्वा निविशेत् तां चैवोपयच्छेत् ॥ ( वसिष्ठस्मृति )

ह्या आख्यायिकेचें महत्त्व आणखी एका गोष्टींत आहे. देवांनीं आपलें पातक शोधून काढल्यावर तें दुसऱ्यावर झाडून टाकण्यास त्यांस दुसरा कोणीहि पापी आढळेना. म्हणून तेवढ्याकरितां त्रितादि उपदेवतांची उत्पत्ति करावी लागली. एका पुरुषाच्या ऐवजीं तीन पुरुष निर्माण करण्याचें कारण मात्र समजण्यासारखें नाहीं. पुढें कालांतरानें मनुष्यांमध्यें अधर्म अथवा पाप यांचा प्रवेश झाला. तेव्हां त्रितादिकांना आपल्यावर लादलेलें पातक दुसऱ्यावर लादतां आलें. घरांतला केर उकिरड्यावर टाकून आपण आपलें घर स्वच्छ करतों तशाच नमुन्याचा हा पापमार्जनाचा प्रकार आहे.

आतां हे देव कोण असावे ? वैदिककालीं देव नांवाचा मर्त्यांचा समाज होता ह्यांत संदेह नाहीं. कर्माच्या योगानें देवांनीं अमृतत्व प्राप्त करून घेतलें. "देवाः कर्मभिर्दिवं जग्मुः" (आपस्तंब) "येन देवा अमृतमन्वविन्दन्" (अ. वेद ४--२३--६). काठकसंहितेंत यज्ञविध्वंसक असेंहि देवांचें वर्णन केलेलें आढळतें.

ये देवा यज्ञहनो यज्ञमुषः पृथिव्यामध्यासते ।
अग्निर्मा तेभ्यो रक्षतु गच्छेम सुकृतिनो वयम् ॥

एका ऋक् मंत्रावरूनहि ह्या अनुमानास पुष्टी मिळते.

तदद्य वाचः प्रथमं मसीय येनासुराँ अभि देवा असाम (१०-५३-४)

ज्याच्या योगानें आम्ही देव असुरांचा पराभव करूं शकूं असें एक नवीनच स्तोत्र मी आज रचलें आहे. ह्यावरून हा मंत्र करणारा देवांपैकींच एक होता, हें उघड आहे.

पूर्वी देव, असुर आणि मनुष्य असे तीन प्रमुख समाज असावे. "येन सृष्टं जगत् सर्वं सदेवासुरमानुषम्" असें मत्स्यपुराणांत ब्रह्मदेवाविषयीं म्हटलें आहे.

सारांश देवांची पापमार्जनविषयक आख्यायिका फार महत्त्वाची आहे. देवांच्या एका पातकाचीं पुढें मनुष्यांचीं बारा पातकें झालीं. "द्वादशधा निहितं त्रितस्यापमृष्टं मनुष्यैनसानि" (अ. ६–११४–३). पापांच्या वाढीचा इतिहास कोणी लिहिला तर तो बोधप्रद झाल्याशिवाय राहणार नाहीं.

# ऐतरेय ब्राह्मण

ब्राह्मण हा एक वेदाचा अमंत्रक भाग होय. मंत्र आणि ब्राह्मण मिळून वेद होतात. संस्कृतांत गद्य ग्रंथ फार थोडे ह्या दृष्टीनें ब्राह्मणाचें महत्त्व फार आहे. प्रत्येक मंत्रगत वेदाला ब्राह्मणाची जोड ही आहेच; व ही जोड क्वचित् एकाहून अधिक ब्राह्मणांचीहि आहे. उदाहरणार्थ, ऋग्वेदाचा ऐतरेय ब्राह्मणाशिवाय आणखी कौषीतकि ब्राह्मण म्हणून भाग आहे. पूर्वीं बरेच ब्राह्मणग्रंथ अस्तित्वांत होते; परंतु हल्लीं ते सर्व उपलब्ध नाहींत.

ब्राह्मण हा शब्द ब्रह्म शब्दापासून निघाला आहे. ब्रह्म शब्दाचा अर्थ वेदामध्यें 'ऋचा' असा केलेला आहे; तेव्हां ऋचांसंबंधीं ज्यांत ऊहापोह केला आहे तो ब्राह्मणग्रंथ होय. म्हणजे यज्ञांत कोणत्या ऋचेचा उपयोग केव्हां, कोठें, कसा व कां करावयाचा ह्याची चिकित्सा ब्राह्मणांत केलेली असते. ह्यावरून ब्राह्मणग्रंथांना मूळ आधार वेदमंत्रांचा आहे हें उघड आहे. मंत्राच्या अस्तित्वाशिवाय ब्राह्मणाचें अस्तित्व शक्यच नाहीं. ह्यावरून मंत्रांनंतर ब्राह्मणग्रंथ रचले गेले पाहिजेत असें होतें. मंत्रब्राह्मणांचा काल निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळ्या प्रमाणांवरून ठरविलेला आहे, व तो कमींत कमी ख्रिस्ती सनापूर्वीं दोन हजार वर्षांचा आहे. ह्या कालनिर्णयाच्या कसोटीस आणखी एक प्रमाण लागू केलें असतां गैरशिस्त होणार नाहीं. आज २५०० वर्षें ह्या देशांत नाणीं प्रचलित होतीं असें आतां निर्विवाद ठरलें आहे. तेव्हां ज्या ग्रंथांवरून तत्कालीन समाजास

नाणीं वापरण्याचें ठाऊक नव्हतें असें दिसून येईल, ते सर्व ग्रंथ अडीच तीन हजार वर्षांच्या पाठीमागचे मानण्यास हरकत नाहीं.

ऐतरेयब्राह्मणांत नाण्याचा कोठेंहि उल्लेख नाहीं. आतां अभावावरून कांहीं निष्पन्न होत नाहीं हें खरें. तथापि जेथें एकाद्या वस्तूचा निर्देश अवश्य व स्वाभाविक असतो तेथें तसा तो नसल्यास अगर त्याऐवजीं दुसऱ्याच पदार्थांचा निर्देश असल्यास त्याच्या अस्तित्वाबद्दल अनुमान काढणें कधींहि चुकीचें होणार नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांत जेथें जेथें क्रयविक्रयाचा उल्लेख केलेला आहे तेथें तेथें तो नाणें अगर धातूचा पैसा वापरल्याशिवायच झालेला आहे असें दिसून येईल. ह्याचें एक उदाहरण 'रुपया शिरशहानेंच सुरू केला काय?' ह्या माझ्या निबंधांत दिलेंच आहे. दुसरें एक उदाहरण येथें देण्यासारखें आहे. अजीगर्तानें आपला मुलगा शुनःशेप हरिश्चंद्रपुत्र रोहिताला १०० गाई घेऊन विकत दिला. शुनःशेपाला यज्ञांत बलि द्यावयाचा होता; त्यामुळें पशूप्रमाणें त्याला खांबाशीं बांधून त्याची हत्या करण्याचा प्रसंग आला तेव्हां कोणी तयार होईना. अशा प्रत्येक प्रसंगीं तें तें कर्म करण्यास अजीगर्तानें १०० गाई रोहिताकडून मागून घेतल्या; ह्यावरून गाईरूपी पैशानेंच लोकांचा व्यवहार होत असे हें स्पष्ट होतें. ह्यामुळें कमींत कमी अडीच हजार वर्षांपूर्वींचे ब्राह्मण आहेत असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

ह्या ब्राह्मणाला "ऐतरेय ब्राह्मण" म्हणण्याचें कारण एका आख्यायिकेंत निर्दिष्ट केलें आहे ती येणेंप्रमाणें— एका महर्षीला पुष्कळ बायका होत्या. त्यांपैकीं एकीचें नांव इतरा असें होतें. तिला महिदास नांवाचा मुलगा होता; परंतु त्याच्या बापाचें प्रेम इतर स्त्रियांच्या पुत्रांवर विशेष असे. एके दिवशीं यज्ञसभेंत महिदासाला

दूर सारून दुसऱ्या पुत्रांना बापानें आपल्या मांडीवर घेतलें. ह्यामुळें महिदासाचें तोंड उतरलेलें पाहून त्याच्या आईस वाईट वाटलें. तिनें आपल्या कुलदेवतेची आराधना केली. त्याबरोबर ती दिव्यमूर्ति यज्ञसभेंत आली व तिनें महिदासाला दिव्यासनावर बसवून सर्व कुमारांत त्याला महापंडित बनविलें. तिच्याच प्रसादानें महिदासाला हा ब्राह्मणग्रंथ करतां आला. अशा प्रकारच्या कथा संस्कृत वाङ्मयांत बऱ्याच असल्यामुळें ही आख्यायिका किती विश्वसनीय मानावयाची हा प्रश्न निराळा; परंतु ह्या ग्रंथाचें कर्तृत्व इतरेचा मुलगा महिदास ह्याकडे देण्यास हरकत नाहीं. शिवाय हा ग्रंथ एकट्याचाच असावा असें मानण्यास आंतील भाषेवरून शंका वाटत नाहीं. अरण हाहि ब्राह्मणाचाच भाग आहे. "ऐतरेयब्राह्मणेऽस्ति काण्डमारण्यकाभिधम्" (आरण्यक नांवाचें काण्ड ऐतरेय ब्राह्मणांत आहे.); परंतु हा भाग अरण्यांत म्हणावयाचा असल्यामुळें त्यास अरण ही संज्ञा प्राप्त झाली.

वर ब्राह्मण शब्दाची जी व्युत्पत्ति दिली आहे, त्यावरून ह्या ग्रंथाचा विषय कोणता हें समजण्यासारखें आहे. ह्या ग्रंथाचे एकंदर चाळीस अध्याय असून प्रत्येक पांच अध्यायांची एक पंचिका अशा आठ पंचिका अगर पुस्तकें केलीं आहेत. ह्यांत ज्योतिष्टोम, गवामयन, आदित्यायन, आङ्गिरसामयन आणि द्वादशाह इतक्या यागांचा विधि सांगितलेला आहे. विशेषतः होत्यानें करावयाचें कर्म विस्तृतपणें ग्रथित केलें आहे. कारण ऋक्‌मंत्रांनींच हौत्र करावयाचें असतें. यज्ञाची व तदंगभूत कर्मांची माहिती सामान्य वाचकांस नीरस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. म्हणून ती गाळून त्यांस मनोवेधक होईल अशीच माहिती ह्या निबंधांत संकलित करण्याचें योजिलें आहे.

प्राचीन आर्यांचा बहुतेक काल यज्ञ करण्यांत जात असे. कित्येक यज्ञ सबंध वर्षभरहि चालत. ह्या ब्राह्मणकालीं तरी निदान ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद हे तीनच वेद अस्तित्वांत असल्यामुळें या तीन वेदांतील मंत्रांचाच उपयोग यज्ञकर्माकडे होणें शक्य होतें. अथर्ववेद अजून अस्तित्वांत यावयाचा होता. हौत्र ऋक्मंत्रांनीं, आध्वर्यव यजुर्मंत्रांनीं व सामांनीं उद्गीथ अशी योजना असे. (ऋचैव हौत्रमकुर्वन्यजुषाऽऽध्वर्यवं साम्नोद्गीथं). होत्याच्या हाताखालीं आणखी सहा ऋत्विज असतात त्यांचीं नांवें:-- १ मैत्रावरुण, २ ब्राह्मणाच्छंसी, ३ नेष्टा, ४ पोता, ५ आग्नीध्र आणि ६ अच्छावाक. हे अर्थात् ऋग्वेदी पाहिजेत. अच्छावाक तर ऋग्वेदी पाहिजे याबद्दल खुद्द ब्राह्मणांतच सांगितलें आहे. "तस्माद्यो ब्राह्मणो बह्वृचो वीर्यवान् स्यात्सोऽस्याच्छावाकीयां कुर्यात्" तसेंच "वीर्यवान्वा एष बह्वृचो वाह्निवदेतत्सूक्तं वहति ह वै वह्निर्धुरो यासु युज्यते तस्मादच्छावाको वह्निवदेतत्सूक्तमुभयत्र शंसति". कोणत्या ब्राह्मणाला आर्त्विज्य देऊं नये ह्याविषयीं ब्राह्मणांत जें सांगितलें आहे तें हल्लींहि मनन करण्यासारखें आहे. "तद्धैतदेव जग्धं यदा शंसमानमार्त्विज्यं कारयत उत वा मे दद्यादुत वा मा वृणीतेति तद्ध तत्पराङेव" "अथ हैतदेवगीर्णं यद्भिभ्यदार्त्विज्यं कारयत उत वा मा न बाधेतोत वा मे न यज्ञवेशसं कुर्यादिति तद्ध तत्पराङेव" 'अथ हैतदेव वान्तं यदभिशस्यमानमार्त्विज्यं कारयते' ह्याचें तात्पर्य हतकेंच कीं, लोभी ब्राह्मणाला अगर गांवांत श्रेष्ठ असलेल्या पण आमंत्रण न दिल्यास पुढें मागें हा आपणांस त्रास देईल किंवा यज्ञांत विघ्न आणील ह्या सबबीवर, एकाद्या मूढ ब्राह्मणाला तसेंच प्रयोगकुशल पण निंद्याचारी ब्राह्मणाला यज्ञांत ऋत्विक्पणाचा अधिकार देऊं नये.

सामान्य मनाला कुतूहल उत्पन्न करणारें यज्ञांतलें प्रमुख कृत्य म्हटलें म्हणजे पशुहत्या हें होय. मारलेला पशु यजमानाला स्वर्गाला नेतो अशी तत्कालीन लोकांची समजूत झालेली दिसते. पशूची हत्या कशी करावी ह्याबद्दल सूक्ष्म नियम सांगितले असून त्या नियमांना अनुसरून यज्ञपशूचें हनन न झालें तर मोठा दोष सांगितलेला आहे. तसेंच, मारल्यानंतर त्या पशूच्या कोणत्या भागाचें कोणी भक्षण करावयाचें, याविषयींचेंहि नियम ठरले आहेत. जीभ आणि हनवटी हा प्रस्तोत्याचा भाग; वक्षःस्थल उद्गात्याचा; कंठ आणि तालु हीं प्रतिहर्त्याच्या वांटणीचीं; उजवी श्रोणि होत्याची व डावी ब्रह्म्याची; उरूंच्या खालील भाग अनुक्रमें मैत्रावरुण आणि ब्राह्मणाच्छंसी यांचे; खांद्यासकट उजवी बाजू अध्वर्यूची; उपगात्यांची डावी बाजू; डावा खांदा प्रतिप्रस्थात्याचा; उजवा हात नेष्ट्याचा व डावा पोत्याचा; दक्षिण व सव्य ऊरु अनुक्रमें अच्छावाक आणि आग्नीध्र यांचे; दोन बाहूंपैकीं उजवा आत्रेयाचा व डावा सदस्याचा; पाठीचा कणा व मूत्राशय हीं यजमानाचीं; उजवा पाय यजमानाला भोजन घालणाराचा; आणि डावा त्याच्या बायकोचा; ओंठ हा ह्या दोघांचाहि सारखाच भाग होय. यजमानानें तो त्या दोघांना वांटून द्यावयाचा असतो. यजमानाच्या बायकांना शेपूट देतात; पण ती त्यांनीं ब्राह्मणाला द्यावी अशी अनुज्ञा आहे. गळ्याचें मांस व आंतील तीन हाडें हा भाग ग्रावस्तुताचा, दुसरीं तीन हाडें व पाठीवरील मांसाच्या गोळ्याचा अर्धा भाग उन्नेत्याचा. ह्याचा दुसरा अर्धा भाग व हृदयाच्या बाजूचा क्लोम नांवाचा मांसाचा गोळा हीं पशु मारणाऱ्या इसमाच्या वांटणीचीं; परंतु हा इसम ब्राह्मण नसेल तर त्यानें आपला भाग दुसऱ्या कोणत्या तरी ब्राह्मणाला दिला पाहिजे. पशूचें शीर

सुब्रह्मण्य नांवाच्या ऋत्विजाचें, 'श्वःसुत्या' (उद्यां सोमसवन ) असें म्हणणारा जो ऋत्विज (आग्नीध्र) त्याच्या हिश्शाला चामडें, ह्याशिवाय पशूचा जो इळा भाग (यज्ञान्न) तो सर्वांचा अगर होत्याचा.

ह्याच्या उलट मनसोक्त वांटणी केल्यास तो चोर, पापी, केवळ उदरपोषणाभिलाषी म्हणून समजावयाचा. वर आलेयाला म्हणजे अत्रिकुलांत उत्पन्न झालेल्या ब्राह्मणास एक भाग असल्याचें सांगितलें आहे. ह्या ब्राह्मणास यज्ञामध्यें कांहीं काम नसतें. ह्यामुळें कर्मनिरपेक्ष वंशपरंपराहक्क इतक्या प्राचीन काळीं अस्तित्वांत असल्याचें दिसतें. हा पशुविभाग कसा करावा हें देवभाग ऋषीला माहित होतें. परंतु ती विद्या कोणाला न सांगतां तो मरण पावला. (तामु हाप्रोच्यैवास्मा-ल्लोकादुच्चक्रामत्.) परंतु पुढें ह्या पशुविभक्तीची माहिती अमानुष जातीपैकीं एकानें बभ्रूचा मुलगा गिरिजनामक महर्षि यास सांगि-तली. हल्लींच्या सर्व मनुष्यांना एतद्विषयक ज्ञान ह्या ऋषीपासूनच परंपरेनें प्राप्त झालें आहे (तामु ह गिरिजाय बाभ्रव्यायामनुष्यः प्रोवाच ततो हैनामेतदर्वाङ्मनुष्या अधीयतेऽधीयते). ह्यावरून मनुष्येतर जातींतहि यज्ञ करण्याची चाल होती असें अनुमान करतां येतें. असुरांना यज्ञविध्वंसक हें विशेषण लावण्याचा प्रघात आहे. परंतु तेहि यज्ञ करीत असत असें दिसतें. आहवनीय अग्नि कायम असून गार्हपत्याग्नि विझाला आहे अशा वेळीं गार्हपत्याकरितां पश्चिमच्या बाजूचा आहवनीय अग्नि काढून घेतला तर हें कृत्य असुरांच्या यज्ञाप्रमाणें होतें असें म्हटलें आहे. (असुरवद्यज्ञं तन्वीत). एका शाखेमध्यें तर असुरयज्ञाची तऱ्हाहि सांगितली आहे, ती अशीः— त्यांनीं प्रथम आहवनीय अग्नीचें आधान केलें, नंतर गार्हपत्याचें आणि शेवटीं अन्वाहार्यपचनाचें. देव, मनुष्य, असुर,

राक्षस आणि गंधर्व अशा पांच जाती वैदिक काळीं कधीं कधीं मानल्या जात. ह्यावरून असुर आणि राक्षस हे एकच नव्हत हें दिसून येईल. मनांत एक आणि बोलणें दुसरेंच (अन्यमना वाचं वदंति) असें असुरांच्या स्वभावाचें वर्णन केलेलें आहे. बल, वृत्र, अरूरमघ, विश्वरूप, शम्बर, इतक्या असुरांचीं नांवें ब्राह्मणांत आलीं आहेत. ह्या सर्व जातींच्या लोकांत यज्ञ करण्याचा प्रघात असला पाहिजे.

ऋक्‌मंत्रांत देवांचीं नांवें आहेत त्याहून निराळीं ब्राह्मणांत नाहींत. देवांमध्येंहि मनुष्याप्रमाणेंच वर्णभेद असे. अग्नि आणि बृहस्पति हे ब्राह्मण, इंद्र, सोम, वरुण, रुद्र, पर्जन्य, यम हे क्षत्रिय; गणेश, वसु, आदित्य, विश्वेदेव आणि मरुत् हे वैश्य आणि पूषा शूद्र. देवांमध्यें इंद्र श्रेष्ठ; तो त्यांचा पुढारी, सर्वांमध्यें बलिष्ठ, अत्यंत तेजस्वी, कंटक, छातीठोक व उत्तम स्वभावाचा असें इंद्राचें वर्णन आढळतें. (देवानामोजिष्ठो बलिष्ठः सहिष्ठः सत्तमः पारयिष्णुतमः). इतकें श्रेष्ठत्व इंद्राचें देवांनीं मान्य केलें, तथापि आपल्या अधिकाराचा व योग्यतेचा दुरुपयोग केल्यास त्यास शासन केल्यावांचून देव रहात नसत. एकदां देवांनीं पांच अपराध इंद्रावर स्थापित करून त्यास यज्ञांत सोमपान मिळणार नाहीं अशी व्यवस्था केली. देवांच्या स्वभावाचें त्रोटक असें प्रसंगोपात्त जें जें वर्णन केलेलें आढळतें तें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. देव अमर्त्य तर आहेतच, पण त्यांस खरें बोलणारे ह्या विशेषणानें खोटें बोलणाऱ्या मनुष्यांपासून विश्लिष्ट केलें आहे (सत्यसंहिता वै देवा अनृतसंहिता मनुष्याः). देवांमध्यें दुसरा विशेष हा आहे कीं, ते एकमेकांच्या घरीं रहात नाहींत (न वै देवा अन्योन्यस्य गृहे वसन्ति). देवांमध्येंहि कांहीं उदारमतवादी व कांहीं अनुदारमतवादी असा भेद असावा असें वाटतें. प्रजापति हा पहिल्या

वर्गांतला होता. मनुष्यांत जो योग्य व लायक असेल त्यास आपल्यापैकींच एक मानून देवांचे सर्व हक्क देण्यास तो तयार असे. ऋभु हे मनुष्य असतांना त्यानें त्यांना देवांत घेऊन यज्ञांतहि देवांबरोबर भाग दिला. (प्रजापतिर्वै पिता ऋभून्मर्त्यान्सतोऽमर्त्यान्कृत्वा तृतीयसवन आभजत्) परंतु ह्यांना आपल्या पंक्तीस घेण्यास अग्निवसुआदिकरून देव कबूल होईनात. ह्यांच्या अंगाला घाण येते असें त्यांचें म्हणणें होतें. (तेभ्यो वै देवा अपैवाबीभत्सन्त मनुष्यगंधात्). देवहि यज्ञ करीत. त्यांनीं एकदां मनुष्ययज्ञ केला होता (पुरुषं वै देवाः पशुमालभन्त). ब्राह्मणांत हरिश्चंद्राची आख्यायिका दिली आहे, त्यांतहि मनुष्ययज्ञाचीच कथा आहे. ह्यावरून फार प्राचीनकाळीं मनुष्ययज्ञ करण्याची चाल आर्य म्हणवणाऱ्या लोकांत होती असें अनुमान कित्येकांनीं केलें आहे.

पंचजनांपैकीं देवांविषयीं ही हकीकत झाली. मनुष्यांसंबंधानें थोडी बहुत माहिती ब्राह्मणांतून मिळण्यासारखी आहे. मनुष्यांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण रूढ झाले होतेच. सर्वांत ब्राह्मण अगोदरचे असा समज होता (क्षत्रात्पूर्वं ब्रह्म). काव्य, अन्ध्र, पुंड्र, शबर, पुलिंद, मूतिब इतक्या निरनिराळ्या लोकांच्या नांवांचा उल्लेख ब्राह्मणांत केलेला आढळतो; त्याचप्रमाणें पुष्कळ राजांचा व ऋषींचा उल्लेख केलेला आहे त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

| राजे | राजे |
|---|---|
| १ मनतंतु. | २२ दुर्मुख. |
| २ एकादशाक्ष. | २३ शिबी. |
| ३ परीक्षित. | २४ शुष्मिण. |
| ४ जनमेजय. | २५ सुत्व. |

५ सहदेव.
६ सोमक.
७ शार्यात.
८ सत्राजित.
९ शतानीक.
१० उग्रसेन.
११ युधांश्रौष्ठि.
१२ आंवष्ठ्य.
१३ भुवन.
१४ विश्वकर्म.
१५ पिजवन.
१६ सुदाः.
१७ आविक्षित.
१८ मरुत्त.
१९ अङ्ग.
२० दुष्यंत.
२१ भरत.
२६ किरिश.
२७ भार्गायण.
२८ विरोचन.
२९ अरिंदम.
३० सनश्रुत.
३१ नग्नजित्.
३२ गांधार.
३३ साञ्जय.
३४ विश्वंतर.
३५ दैवावृध.
३६ वैदर्भ.
३७ भीम.
३८ ऋतुवित्.
३९ जानकि.
४० सुप्रद्मा.
४१ हरिश्चंद्र.
४२ वेधस.
४३ वृद्धद्युम्न.

ऋषि.

१ अवत्सार.
२ बिद.
३ शक्ति.
४ शाकल्य.
५ गौरिवीत.
३३ देवभाग.
३४ गिरिज.
३५ पैंगि.
३६ कौषीतकि.
३७ सौजात.

६ ऐतरेय.
७ जमदग्नि.
८ गृत्समद.
९ लांगल.
१० मुद्गल.
११ विमद.
१२ परुच्छेप.
१३ कक्षीवान.
१४ सुकीर्ति.
१५ जतूकर्ण.
१६ जानश्रुतेय.
१७ अर्बुद.
१८ वातावत.
१९ अंगिर.
२० विश्वामित्र.
२१ वामदेव.
२२ भरद्वाज.
२३ वसिष्ठ.
२४ नोधा.
२५ वालखिल्य.
२६ बरु.
२७ वृषाकपि.
२८ बुळिल.
२९ अश्वतर.
३८ आराळ्ह.
३९ सोमशुष्म.
४० कश्यप.
४१ पर्वत.
४२ नारद.
४३ अग्नि.
४४ तुर.
४५ कवष.
४६ सत्यकाम.
४७ अरुण.
४८ उद्दालक.
४९ च्यवन.
५० वाजरत्न.
५१ सुदास.
५२ अत्रि.
५३ दीर्घतमा.
५४ बृहदुक्थ.
५५ अजीगर्त.
५६ वृषशुष्म.
५७ बभ्रु.
५८ संवर्त.
५९ उदमय.
६० प्रियमेध.
६१ सत्यहव्य.

| | |
|---|---|
| ३० गौश्ल. | ६२ कुषारव. |
| ३१ ऐतश. | ६६ मैत्रेय. |
| ३२ श्रुत. | ६४ प्रियव्रत. |

सर्वचरु, कुरुक्षेत्र, अवचत्नुक, मष्णार, साचीगुण, वृत्रघ्न इतक्या देशांचीं नांवें आलीं आहेत. आठव्या पंचिकेंत कोणत्या लोकांच्या राजांना काय संज्ञा आहे तें सांगितलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, पूर्वेकडील लोकांच्या राजांना सम्राट्, दक्षिणेकडील राजांना भोज, पश्चिमेकडील नीच्य आणि अपाच्य नामक लोकांच्या राजांना स्वराट्, उत्तरेकडे हिमालयाच्या पलीकडे असणाऱ्या उत्तरकुरु व उत्तरमद्र नांवाच्या लोकांना विराट्, मधल्या भागांतील कुरु-पञ्चाल, वश आणि उशीनर नांवाच्या लोकांच्या राजाला राजा, ह्याप्रमाणें निरनिराळ्या राजांना निरनिराळ्या संज्ञा ठरलेल्या होत्या. ह्यांमध्यें एक वाक्य विशेष लक्ष देण्याजोगें आहे. "उदीच्यां दिशि ये के च परेण हिमन्वतं जनपदा उत्तरकुरव उत्तरमद्रा इति वैराज्यायैव ते अभिषिच्यन्ते विराळित्येनानाभिषिक्तानाचक्षत". हिमालयाच्या पलीकडे उत्तरकुरु व उत्तरमद्र हे लोक असून त्यांच्यांत राजा म्हणून कोणी नसे. राज्यकारभार लोकांच्या हातीं असे. वैराज्य म्हणजे राजावांचून राहणें हीच त्यांची उत्कट इच्छा असे; म्हणून राज्यकारभार चालविणाऱ्या लोकांना विराट् ही संज्ञा प्राप्त झाली.

हल्लीं ज्याप्रमाणें सामान्य नांवानें कांहीं लोक निर्दिष्ट केले जातात, त्याप्रमाणें पूर्वींहि जात असत असें दिसतें. उदाहरणार्थ, श्यापर्ण ब्राह्मण; भूतवीर ब्राह्मण, आसितमृग ब्राह्मण. बापाच्या अथवा आजाच्या नांवावरून मुलाला किंवा नातवाला अथवा पुढल्या सर्व वंशजांना नांव प्राप्त होई. सुषद्मा ह्याचा पुत्र सौषद्मन; वाजरत्नाचा

नातु वाजरत्नायन; शक्ति नामक ऋषीच्या कुलांत जन्मलेले शाक्त्य अशा रीतीनें पुरुषांवरून त्यांचे वंशज ओळखले जात. त्याचप्रमाणें स्त्रियांवरूनहि जात असत. उदाहरणार्थ, भार्गवेय राम (भृगुस्त्रीचा पुत्र); कद्रु नामक स्त्रीचा पुत्र काद्रवेय; इतरेचा मुलगा ऐतरेय; ममतेचा मुलगा मामतेय. सांप्रत आपण स्वतःच्या व बापाच्या नांवानंतर उपनांव लावून पूर्ण नांव बनवितों. पूर्वी स्वतःचें, बापाचें आणि आजाचें नांव लावण्याचीहि वहिवाट होती असें वाटतें. उदाहरणार्थ, "वृषशुष्मो ह वातावत उवाच जातूकर्ण्यः" जतूकर्ण्याचा नातु, वतावन्नामक ऋषीचा मुलगा वृषशुष्म म्हणाला.

ब्राह्मणकालीं समाज सुव्यवस्थित असून सुधारणेच्या पायावर प्रतिष्ठित झाला होता. सर्व सुधारणांचा मूलाधार जी विवाहपद्धति ती अस्तित्वांत आलेली होती हें सांगावयास नकोच. आई, बहीण, बायको, सून, सासरा वगैरे संबंध दृढ झाले होते. कुटुंबांतील स्त्री-पुरुषांची परस्परांशीं वागणूक हल्लींहून निराळी होती असें दिसत नाहीं. सासऱ्याला पाहातांच सुनेनें लाजून तोंडावर पदर घेण्याचा रिवाज एवढ्या प्राचीन काळींहि होता (तद्यथैवादः स्नुषा श्वशुराल्लज्जमाना निलीयमाना). एका पुरुषानें पुष्कळ स्त्रियांशीं लग्न करण्याची मोकळीक होती (यदिह वा अपि बह्व्य इव जायाः पतिर्वाव तासां मिथुनम्). परंतु एका स्त्रीला मात्र अनेक पति (अर्थात् एकाच वेळीं) करतां येत नसत (तस्मादेकस्य बह्व्यो जाया भवन्ति नैकस्यै बहवः सह पतयः). ब्राह्मणांत सर्वत्र शत्रूच्या ऐवजीं भ्रातृव्य शब्दाचा उपयोग केलेला आढळतो (तत्पाप्मानं भ्रातृव्यमपबाधते); ह्यावरून कुटुंबांतील कलह त्यावेळींहि किती तीव्र असले पाहिजेत ह्याची चांगली कल्पना करतां येण्यासारखी आहे. जायेच्या ठिकाणीं प्रवेश करून पतीच

पुन्हा पुत्ररूपानें जन्मास येतो ही कल्पनाहि तेव्हां प्रचलित होती ( पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वा स मातरम् । तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते ॥ ).

ऋग्वेदकालींहि लोक उत्कृष्ट वस्त्रें परिधान करीत असत (युवा सुवासाः परिवीत आगात्). मग ब्राह्मणकालीं उत्कृष्ट वस्त्रें तयार होत असत हें सांगण्याची अवश्यकता नाहीं. 'यथैव प्रवयणतः पेशः कुर्यात्' ह्या वाक्यावरून रंगीबेरंगी वस्त्रें करण्याचेंसुद्धां लोकांस ज्ञान होतें असें अनुमान होतें. त्याचप्रमाणें हत्ती वगैरे जनावरांचीं चित्रें, आरसे इत्यादि पदार्थ तयार करण्याइतकी कारागिरी लोकांत होती–एतेषां वै शिल्पानामनुकृतीह शिल्पमधिगम्यते हस्ती, कंसो, वासो, हिरण्यमश्वतरीरथः शिल्पम् । अश्वतरीरथ ह्या शब्दावरून लोकांच्या प्रवासाचें साधन रथ होता हें उघड आहे. गाड्यांना कधीं घोडे, कधीं बैल तर कधीं खेचरें लावीत असत. जमिनीवरील साधन जशी गाडी तशी पाण्यावरून जाण्याचें नौका हें साधन होतें. अन्नसामग्री घेऊन नौकेंत बसत; ह्यावरून लांबीचें जलपर्यटण करण्याची लोकांस सवय होती हें उघड दिसतें (तद्यथा सैरावतीं नावं पारकामाः समारोहेयुः). खेचर हा ग्राम्य पशु होय. एकंदर ग्राम्य पशु सात. 'सप्त वै ग्राम्याः पशवः' अज, अश्व, गौ, महिषी, वराह, हस्ती हे बाकीचे ग्राम्य पशु होत. ह्या देशांत मार्जार जातीचें अस्तित्वहि निदान अडीच तीन हजार वर्षें आहे असें ब्राह्मणांत त्या जातीचा जो उल्लेख केलेला आहे त्यावरून मानण्यास हरकत नाहीं. वर सात ग्राम्य पशु सांगितले त्यांत गाईचा समावेश केलेला आहेच. ह्या गाईचा उपयोग यज्ञाशिवाय अतिथिसंतर्पणाकडेहि होत असे. पूज्य अतिथि आला असतां यजमान गाय मारून तिच्या मांसानें अभ्यागताचा सत्कार करीत असे. ह्या अत्यंत

प्राचीन चालीचा निर्देश ब्राह्मणांत स्पष्टपणें केलेला आहे.

'अग्निं मन्थन्ति सोमे राजन्यागते तद्यथैवादो मनुष्यराज आगतेऽन्यस्मिन्वाऽर्हत्युक्षाणं वा वेहतं वा क्षदन्त एवमेव' ॥

वेदकालीं मांसभक्षणाचा अगदीं सामान्य प्रचार होता असें दिसतें. पुढें कोणत्या तरी निमित्तानें हा अनिष्ट प्रकार संपुष्टांत आणण्याचा बुद्धिपुरःसर प्रयत्न झाला असावा. त्यापैकींच अमेध्य-पशूचें मांस खाऊं नये हा निषेध होय: 'त एत उत्क्रान्तमेधा अमेध्याः पशवस्तस्मादेतेषां नाश्नीयात्'. घोडा, गाय, बैल, उंट, अज हे अमेध्य पशु होत. सांप्रतचें कालमान ब्राह्मणकालींहि निश्चित झालें होतें. वर्षाचे सहा ऋतु असून वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत आणि शिशिर हीं नांवें रूढ झालीं होतीं. वर्षाचे चोवीस अर्धमास व बारा मास ठरले होते. तथापि ब्राह्मणकालाच्या पूर्वीं तेरा महिन्यांचा संवत्सर असावा (तं त्रयोदशान्मासादक्रीणन्). ह्या तेरा महिन्यांचे अभिमानी देव होते असें म्हणतात. हल्लीं आपण दिवसाचा आरंभ सूर्योदयापासून करतों; पण ब्राह्मणकालीं तो रात्रीपासून होत असे असें खालील उताऱ्यावरून दिसून येईल. 'यां च रात्रीमजायेऽहं यां च प्रेतास्मि तदुभयमन्तरेण' 'ज्या दिवशीं मी जन्मलों' असें आतां आपण म्हणतों; परंतु पूर्वीं 'ज्या रात्रीं मी जन्मलों' असें म्हणत असत. एक वर्ष म्हणजे ३६० दिवस. त्रीणि च वै शतानि षष्टिश्च संवत्सरस्याहानि. खालीं दिलेल्या गाथेंत चारी युगांचीं नांवें आढळतात. कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः । उत्तिष्ठंस्त्रेताभवति कृतं संपद्यते चरंश्चरैवेति'. येथें हीं युगांचीं नांवें आहेत कीं फाशांच्या अवस्थांचीं आहेत हा वादग्रस्त प्रश्न आहे. तथापि टाकलेल्या फाशांच्या निरनिराळ्या अवस्थांवरून युगांना नांवें प्राप्त

झालीं हा जो कित्येकांचा समज आहे तो खरा असावा असें वाटतें.

ऋतु सूर्याच्या गतीमुळें होतात; म्हणून सूर्यास त्यांचा पति म्हटलें आहे. दिवसरात्रीचें कारण बरोबर ठरविण्यांत आलें होतें. 'स वा एष न कदाचनास्तमेति नोदेति तं यदस्तमेतीति मन्यन्तेह्न एव तदन्तमित्वाऽथाऽऽत्मानं विपर्यस्यते रात्रीमेवावस्तात्कुरुतेऽहः परस्तात्। अथ यदेनं प्रातरुदेतीति मन्यन्ते रात्रेरेव तदन्तमित्वाऽथाऽऽत्मानं विपर्यस्यतेऽहरेवावस्तात्कुरुते रात्रिं परस्तात्'. पृथ्वीच्या सभोंवार समुद्र पसरलेला आहे. "परिगृह्य तिष्ठति समुद्र इव भूमिं" ही समजूत प्राचीन लोकांमध्यें किती सर्वसामान्य होती हें कोणत्याहि प्रकारच्या संस्कृत वाङ्मयावरून दिसून येणारें आहे; पण "अलोमिकेवाग्र आसीत्" व "तस्याः शोचत्या इमे प्रदराः प्रादीर्यन्त येऽस्या इमे प्रदराः समेव हैव ततः पुरा." ह्या पृथ्वीवर पूर्वी वृक्ष वगैरे कांहीं नव्हतें. तिच्यावर प्रदर (छिद्र) नव्हतें. तिचा तल सारखा होता इत्यादि वचनांवरून भूगर्भशास्त्राच्या मूलतत्त्वांची थोडिशी तरी पण यथार्थ कल्पना आमच्या प्राचीन ऋषींस होती हें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

खालीं दिलेल्या ब्राह्मणांतील उताऱ्यावरून त्या वेळच्या लोकांच्या नीतिकल्पना कशा होत्या तें दिसतें. "अनेनसमेनसा सोऽभिशस्तादेनस्वतो वाऽपहरादेनः । एकातिथिमप सायं रुणद्धि बिसानि स्तेनो अप सो जहारेति ॥" कमळाचे तंतू चोरणारा व सायंकाळीं आलेल्या अतिथीस घरांत न घेणारा निर्दोषी लोकांवर ह्या अपराधाचा आरोप करील व दोषी असलेल्यांचा दोष काढून टाकील. ह्यावरून असें दिसतें कीं, कमळाचे तंतू चोरणें व सायंकाळीं अतिथीस घरांत आश्रय न देणें हे महान् अपराध समजले जात असत व हा दोष

आपल्यावरचा जावा म्हणून दोषी मनुष्य वस्तुतः निर्दोषी माणसांवर ते अपराध लादीत असे. निरपराधी माणसांवर असत्य आरोप करण्यानें आपल्या अपराधांचें क्षालन होतें ही समजूत फारच चमत्कारिक दिसते. हा क्षालनप्रकार अत्यंत प्राचीन असला पाहिजे.

"तस्माद्धाप्येतर्हि भरताः सत्वनां विर्त्तिं प्रयन्ति तुरीये हैव संग्रहीतारो वदन्ते" ह्या वाक्यावरून युद्धांत मिळालेली लूट सेनेंत वांटून देण्याची चाल फार जुनी आहे असें दिसतें. अशा लुटीचा चौथा भाग फक्त सारथ्याला मिळण्याचा हक्क आहे असें वरील वचनांत म्हटलें आहे. बहुधा सारथ्यांस ठरीव वेतन मिळत नसे असेंहि मानण्यास हरकत नाहीं.

ह्याशिवाय ब्राह्मणांत आख्यानें, उपाख्यानें आहेत तींसुद्धां फार बोधप्रद आहेत.

# ऐतरेयब्राह्मणांतील ४३ आख्यायिका

## प्रस्तावना

ह्या लेखांत ऐतरेय ब्राह्मणांतील त्रेचाळीस आख्यायिका दिल्या आहेत. त्या मुलांस मनोरंजक व थोरांस बोधप्रद झाल्यावांचून राहणार नाहींत. ह्यांपैकीं बऱ्याच आख्यायिका निःसंशय केवळ कल्पनासृष्ट आहेत. फार थोड्या ऐतिहासिक असाव्या. तथापि त्यांवरून तत्कालीन म्हणजे ब्राह्मणकालीन लोकांचे समज काय होते ह्याची कल्पना होण्यासारखी असून शिवाय त्या वेळच्या समाज-घटनेचें चित्रहि आपणांस रेखाटतां येण्यासारखें आहे.

पुढें दिलेल्या त्रेचाळीस आख्यायिकांपैकीं ज्यांत देवांच्या यज्ञाचा उल्लेख आहे अशा एकोणीस आहेत, व देवासुरांच्या युद्धाच्या हकीकतीनें भरलेल्या अशा दहा आहेत.

पहिलीच आख्यायिका फार महत्त्वाची आहे. त्यांत दक्षिणहिंदु-स्थानाचा स्पष्ट उल्लेख आहे एवढेंच नव्हे तर लोकवस्तीहि तेथें ब्राह्मणकालीं होती असें त्यावरून दिसून येणार आहे. त्याचप्रमाणें भारतांतील कांहीं व्यक्तींचा नामनिर्देश असून दशरथ अथवा राम ह्यांचा कोठेंहि उल्लेख नाहीं.

ह्याच आख्यायिकेंत नद्या पश्चिमाभिमुख वहात असण्याचें एक कल्पित कारण दिलें आहे. हिंदुस्थानांत अशा नद्या फार नाहींत. असें असून अशाच नद्यांचा उल्लेख केला आहे त्याअर्थी ब्राह्मण

रचणारा ऋषि–निदान ही आख्यायिका रचणारा तरी–दक्षिण हिंदुस्थानांत पश्चिमेकडे समुद्रकिनाऱ्यावर राहणारा असला पाहिजे.

एकोणीस आख्यानें देवांच्या यज्ञासंबंधानें आहेत म्हणून वर सांगितलेंच आहे. आतां ऋग्वेदामध्यें ज्याप्रमाणें नैसर्गिक सृष्टिचमत्कारांचा देवशब्दानें बोध होतो त्याच अर्थीं ब्राह्मणांतील देव शब्द योजलेला आहे कीं काय ? म्हणजे ब्राह्मणांतील देव–आणि असुरसुद्धां–ह्या काल्पनिक अगर वास्तविक व्यक्ति होत्या हें ठरविणें कठीण नाहीं. देव आणि असुर ह्या संज्ञा ज्यांना आहेत अशा दोन जाती निःसंशय होत्या. तें कांहींहि असो. देव व असुर हे दोन निरनिराळ्या जातींचे लोक होते असें आपण मानून चालल्यास त्या दोघांचें ब्राह्मणांत केलेलें वर्णन फारच महत्त्वाचें वाटल्याशिवाय राहणार नाहीं. देवांमध्यें प्रथम कोणी राजा नव्हता. अराजक स्थितींत समाज टिकणें शक्य नाहीं असें आढळून आल्यावर त्यांनीं असुरांना अनुसरून आपणांमधील एकास राज्यपदावर आरूढ केलें. (आ० ३). असुरांत परस्परांत कलह नसत; पण देवांत एकी क्वचितच असे. आपसांतील वैमनस्यामुळें असुरांबरोबर लढाई करतांना त्यांस वारंवार अपयश येई. युद्धापुरती तरी एकी असावी म्हणून त्यांनीं एके प्रसंगीं सर्वांचीं बायकामुलें एके ठिकाणीं कोंडून ठेवण्याची युक्ति काढली. जो कोणी फुटून जाईल तो आपल्या बायकामुलांस मुकेल असें त्यांनीं ठरविलें. (आ० ६). मत्सरानेंहि देव ग्रस्त झालेले असत असें दिसतें. आपल्याप्रमाणें मनुष्यांनीं किंवा ऋषींनीं स्वर्गास येऊं नये अशी त्यांची फार इच्छा असे. (आ० ८). हा स्वर्गलोक कोणता ? गंधर्वलोक व स्वर्गलोक एकच असावे असें २५ व्या आख्यायिकेवरून दिसतें. ३५ व्या आख्यायिकेवरून असुर फार श्रीमंत असत व ते

समुद्रकांठीं रहात असें वाटतें. राजाच्या कल्पनेप्रमाणें किल्ले बांधण्याची युक्ति ही देवांनीं असुरांपासून संपादन केली. (आ० ५).

मनुष्यांनीं देवांपासून यज्ञाची माहिती मिळविली. (आ० १२). पण यज्ञाची कल्पना देवांमध्येंच प्रथम उद्भवली असें दिसत नाहीं. सर्व यागांत सोमयाग प्रधान आहे. परंतु सोमवल्ली देवाच्या प्रदेशांत उपजत नव्हती. ती पूर्वेकडील देशांत होत असून तेथें रानटी लोकांची वस्ती होती. हे लोक वर्षाचे तेरा महिने मानीत. (आ० २). ह्याच लोकांना गंधर्व म्हणत, (आ० ७) असें दिसतें. यज्ञांत यजमानाला दीक्षा घ्यावी लागते व क्षीरपान करावें लागतें. हे दोनहि आचार ह्याच लोकांपासून देवांनीं घेतले असावे. (आ० २५). ह्या सर्व गोष्टींवरून यज्ञ करण्याची, निदान सोमयाग करण्याची प्रवृत्ति मूळची हिमालय पर्वतावरील गंधर्व नामक रानटी लोकांमध्यें असून त्यांच्यापासून ती इतरांनीं उचलली असें म्हणण्यास हरकत नाहीं. हे लोक रानटी होते असें म्हणण्याचें कारण त्याच आख्यायिकेंत (२) सोमविक्रय करणाराला अशिष्ट व पापी म्हटलें आहे हें होय.

येथवर एकंदर आख्यायिकांचें सामान्य निरूपण केलें. ह्याशिवाय किरकोळ बोध घेतां येईल अशा आख्यायिका त्या दृष्टीनें वाचणें अवश्य आहे. उदाहरणार्थ, ज्याच्यामुळें आपणांस लाभ होतो अथवा ज्याच्यावर आपली उपजीविका आहे त्याचा सर्वस्वीं नाश केल्यानें आपणांस फायदा होत नाहीं, तर त्याचें पोषणच केलें पाहिजे ही गोष्ट आपणांस ४ थ्या आख्यायिकेवरून शिकतां येण्यासारखी आहे. कांहीं रानटी जातींत क्रयविक्रयांत पैशादाखल माणसाचा उपयोग होत असावा. (आ० ७). १० व्या आख्यायिकेवरून यज्ञांत होणाऱ्या पशुहत्येचें समर्थन लोक कसें करीत तें समजेल. हें समर्थन कित्येकांस

अगदीं लंगडें वाटेल; तथापि त्यावरून आपल्या पूर्वजांस त्याबद्दल विशेष दोष देण्याचें कारण नाहीं. सांप्रत सुधारलेल्या काळांतहि मांसभक्षक लोकांकडून हेंच कारण पुढें करण्यांत येत असतें. आम्हांला खाण्याकरितां बोकड मारावयाचा असला म्हणजे आधीं आम्ही त्यास खायला घालून पुष्ट करतों व हे त्याच्यावर उपकारच करतों अशा तऱ्हेचें प्रतिपादन हल्लींहि कित्येक परकी धर्मप्रचारक करीत असतात.

आख्यायिका १४—ऋषींनीं केलेल्या यज्ञाची ही एकच आख्यायिका आहे. ऋग्वेदकालप्रमाणें ब्राह्मणकालींहि कांहीं ब्राह्मणांना जुगार खेळण्याचा नाद असे. हींत सरस्वती नदीचा नांवानें उल्लेख केला आहे; व परिसारक देश हल्लीं कोणत्या नांवानें ज्ञात आहे हें समजून घेण्यासारखें आहे.

आख्यायिका १५—दहीं मिसळून सोमरसाचा अम्मल कमी करण्याची युक्ति देवांनीं काढली. ह्या आख्यायिकेंत लांब जिभेची म्हणून आसुरीचें वर्णन आहे. परंतु हें वर्णन राक्षसांचें किंवा असुरांचें असलें पाहिजे, हें मनन करण्यासारखें आहे. असुर आणि राक्षस एकच नव्हत. (आ० ११).

आख्यायिका १६—भांडणाचा निकाल लावून घेण्याची ही तऱ्हा फार प्राचीन असून मर्दानी आहे.

आख्यायिका १७—देव व असुर ह्यांचें यज्ञ करण्याचे निर-निराळे मार्ग होते.

आख्यायिका २६—ही आख्यायिका फार महत्त्वाची आहे. वरिष्ठ वर्गाची कनिष्ठ वर्गाविषयीं तिरस्कारबुद्धि आजचीच नाहीं हें ह्यावरून स्पष्ट होतें. मानवजातींतील ऋभूंनीं देवांबरोबर यज्ञांत सोम-

पानाचा हक्क संपादन केला, ह्यावरून ऋभूंचा पराक्रम जितका दिसून येतो, तितकीच प्रजापतीची उदार बुद्धिहि व्यक्त होते.

आख्यायिका २७—प्रजापतीनें आपल्या मुलीबरोबर समागम केला ही जी पुराणांतली कथा तें वस्तुतः रूपक आहे, हें ह्या आख्यायिकेंत उघड सांगितलेलें आहे. दुसरें, पुराणांतील कथा केवळ अर्वाचीन नसून त्या फार प्राचीन कालापासून प्रचलित आहेत असेंहि सिद्ध होतें.

आख्यायिका २९—अव्यवस्थित रीतीनें लढाई होत नसून सैन्याच्या लहान लहान टोळ्या करून युद्ध करीत असें अनुमान होतें.

आख्यायिका ३१—गाडीस गाढव लावीत, व कन्या पराक्रमी पुरुषालाच अर्पण करीत.

आख्यायिका ३६—ह्यांतील सत्यनिष्ठेचें उदाहरण कोणाकडूनहि अभिमानपूर्वक वाचलें जाईल. ह्या वेळीं वाटप होऊं लागलें होतें, व बाप जीवंत असतांच मुलांना वाटपाचा हक्क प्राप्त झाला होता हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हल्लीं आपण संपत्ति म्हणजे धातूचें नाणें समजतों; पण प्राचीनकाळीं गाई म्हणजेच संपत्ति होती. अर्थात् गाई विनिमयाचें साधन होतें.

आख्यायिका ४०—भूगर्भशास्त्राची अंधुक कल्पना होती हें ह्या आख्यायिकेवरून निर्विवाद ठरतें.

आख्यायिका ४१—जाया ही मित्राप्रमाणें असते असें स्पष्ट म्हटलें आहे, ह्यावरून स्त्रियांची योग्यता आम्ही कमी मानतों हा जो आरोप आमच्यावर केला जातो तो किती निराधार आहे तें दिसून येईल. पूर्वी मनुष्ययज्ञ करीत कीं काय अशी शंका येते.

वरील संक्षिप्त विवेचनावरून पुढील आख्यायिका मराठी वाचकांस बोधप्रद व मनोरंजक झाल्याशिवाय राहणार नाहींत अशी आशा करण्यास जागा आहे.

## आख्यायिका १

एकदां असें झालें कीं, यज्ञदेवता देवांना सोडून चालती झाली. तेव्हां देवांना यज्ञासंबंधीं कांहीं एक करतां येईनासें झालें. ते अगदीं गोंधळून गेले. तेव्हां ते अदितीला म्हणाले, 'तुझ्या प्रसादानें यज्ञ करण्याचें सामर्थ्य आम्हांला येऊं दे'. 'बरें आहे' असें म्हणून ती देवांना म्हणाली, 'मी तुमच्याजवळ एक वर मागतें.' देवांनीं 'माग' असें म्हट-ल्यावर तिनें असा वर मागितला कीं, 'सर्व सोमयागांचा उपक्रम माझ्या-पासून व त्यांचें पर्यवसानहि माझ्या ठिकाणीं असो.' देवांनीं अदितीचें मागणें कबूल केलें. ह्याप्रमाणें अदितीला वर प्राप्त झाल्यामुळें यज्ञाचा प्रारंभकालीन व समाप्तिकालीन चरु अग्निदेवताक असतो.

अदितीनें देवांना आणखी असें सांगितलें कीं, 'मी, अग्नि, सोम व सविता ह्यांच्यावरून तुम्ही दिशांची ओळख ठेवा. म्हणजे माझें ज्या ठिकाणीं अधिष्ठान आहे ती पूर्व, आणि अग्नि, सोम व सविता ह्यांचें अधिष्ठान जेथें आहे त्या दिशा अनुक्रमें, दक्षिण, पश्चिम व उत्तर असें समजा.'

पथ्येचें (अदिति देवतेचें) यजन होत असल्यामुळें, आदित्य पूर्वेस उदय पावतो व नंतर पश्चिमेस अस्तंगत होतो. कारण हा पथ्येच्या पाठोपाठ संचार करतो.*

---

* उदयनीय इष्टीमध्यें पश्चिमेस पथ्येचें यजन करतात. म्हणून पथ्येचा पश्चिम दिशेसहि संबंध आहे असें समजावयाचें.

अग्नीचें यजन होतें म्हणून दक्षिण दिशेकडे धान्यें लवकर परिपक्व होऊन आपल्या धन्यांच्या घरीं येतात. कारण औषधि पक्वस्थितीला आणण्यास अग्नीच कारण आहे. सोमाचें यजन होत असल्याकारणानें, पुष्कळ नद्या पश्चिमाभिमुख वाहत आहेत. कारण नद्यांचा सोमाशीं संबंध आहे.

सवित्याचें यजन होत असल्यामुळें त्यानें प्रेरित असा हा वायु उत्तर व पश्चिम ह्या दोन दिशांच्या दरम्यान सोसाट्यानें संचार करितो.

आकाशांतील अदितीचें यजन होत असल्यामुळें, पृथ्वीला आकाश पावसानें आर्द्र करतें व (उन्हाळ्यांत उष्णतेनें) शुष्क करतें.

## आख्यायिका २

पूर्वी देवांनीं सोम राजा पूर्व दिशेस विकत घेतला; म्हणून सांप्रतहि पूर्व दिशेसच तो खरेदी करतात.

तो सोम तेराव्या महिन्याच्या अभिमानी पुरुषापासून विकत घेतला; त्यामुळें तेरावा महिना (शुभकर्माला) उपयुक्त नाहीं. त्याचप्रमाणें सोमाचा विक्रय करणारा (शिष्टाचाराला) अनुकूल नसतो. कारण जो सोमविक्रय करतो तो पापी होय. विकत घेतल्यानंतर मनुष्याकडे सोम आणला असतां त्यांतील वीर्य व इंद्रियें तीक्ष्ण करण्याचें सामर्थ्य त्यांतून उडून गेलें व सर्वत्र पसरलें. एका ऋचेनें तें एकत्र करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला; पण त्यांना यश आलें नाहीं. त्यांनीं दोन, नंतर तीन, नंतर चार, नंतर पांच, नंतर सहा, नंतर सात ऋचा म्हणून एकवट करण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. शेवटीं आठ ऋचांनीं त्यांना त्या गेलेल्या वीर्याचा व सामर्थ्याचा अवरोध करून तीं पूर्णपणें परत आणतां आलीं.

## आख्यायिका ३

ह्या लोकीं एकदां देव आणि असुर ह्यांचें युद्ध जुंपलें. पूर्व दिशेस त्यांची लढाई झाली, त्यांत देवांचा असुरांनीं पराजय केला. दक्षिण दिशेस लढाई झाली, त्यांतहि असुर जिंकले. त्याचप्रमाणें पश्चिमेस व उत्तरेस त्यांच्या लढाया झाल्या, त्यांतहि प्रत्येक वेळीं असुरांचाच विजय झाला. नंतर ईशान्य दिशेस लढाई झाली, त्यांत मात्र देवांचा पराजय झाला नाहीं. ती ही विजयी दिशा होय. म्हणून ह्या दिशेसच प्रयत्न करावा व करवावा. कारण, असा मनुष्य आपल्यास ऋणमुक्त करून घेण्यास समर्थ होतो.

नंतर ते देव म्हणूं लागले, आपल्यामध्यें राजा नसल्याकारणानें त्यांनीं आपणांस जिंकलें. आपणहि राजा करूं. सर्वांची मान्यता मिळाल्यावर त्यांनीं सोमाला राजा केला. सोमराजाच्या योगानें त्यांनीं सर्व दिशा जिंकल्या.

## आख्यायिका ४

एकदां यज्ञ देवांवर रागावून मी तुमचें अन्न होणार नाहीं असें म्हणून चालता झाला. तूं जाऊं नकोस, तूं आमचें अन्नच होशील असें म्हणून देवांनीं त्याला ठार मारलें. त्यांनीं त्याचे तुकडे तुकडे केल्यावर तो (क्षुधा तृप्त करण्यास) पुरेसा नाहीं असें त्यांस वाटलें. तेव्हां देव विचार करूं लागले कीं, मथित झालेला हा यज्ञ आपणांस पुरेसें अन्न होणार नाहीं. करतां ह्या यज्ञाचें आपण पोषण करूं. ही गोष्ट सर्वांस मान्य झाल्यावर त्यांनीं त्या यज्ञाचें पोषण केलें. (विस्कळीत केलेल्या) त्या यज्ञाला पूर्ववत् केल्यावर ते अश्विनींना म्हणाले 'ह्याला औषध द्या. कारण अश्विनी देवांचे वैद्य आहेत'.

## आख्यायिका ५

ह्या लोकांत देवासुरांचें युद्ध झालें. पराक्रमी व बलयुक्त राजा-प्रमाणें असुरांनीं ह्या तीन लोकांचीं प्राकारयुक्त पुरें बनविलीं. त्यांनीं भूलोकाला लोहमय केलें, अन्तरिक्ष रजतमय केलें आणि द्युलोक सुवर्णमय केला. ह्याप्रमाणें त्यांनीं या लोकांचे किल्ले बनविले. तेव्हां देवांनीं आपसांत विचार केला कीं, असुरांनीं ह्या लोकांचीं पुरें बन-विलीं, करितां आपणहि त्यांच्या प्रतिकारार्थ दुसरीं पुरें बनवूं. असा विचार करून त्यांनीं भूलोकापासून सदोनामक मंडप उभारला. अन्तरिक्षापासून आग्नीध्र नामक धिष्ण्य तयार केलें, व भूलोका-मधून हविर्धान नामक दोन शकट निर्माण केले. ह्याप्रमाणें देवांनीं प्रतिपुरें निर्माण केलीं.

नंतर देव म्हणूं लागले, आपण उपसदाख्य होम करूं. कारण उपसदांनींच महापुरें जिंकतां येतात. ही गोष्ट सर्वांस मान्य होऊन त्याप्रमाणें त्यांनीं केलें. पहिला होम केल्याबरोबर त्यांनीं असुरांना भूलोकांतून हाकून लावलें. दुसऱ्या होमानें अन्तरिक्षांतून व तिसऱ्या होमानें भूलोकांतून असुरांना घालवून लावलें. अशा रीतीनें त्यांनीं असुरांना ह्या लोकांतून बाहेर घालविलें.

ह्या तीनहि लोकांतून हाकून लावलेले ते असुर ऋतूंच्या आश्र-यास गेले. तेव्हां उपसदाख्य होमच आपण करावे असा विचार करून देवांनीं त्याप्रमाणें केलें. ऋतु सहा पण उपसद तीनच असल्यामुळें प्रत्येक होम त्यांनीं दोनदां केला. अशा रीतीनें सहा होम करून त्यांनीं ऋतूंपासूनहि असुरांचें उत्थापन केलें.

ऋतूंपासून घालवून दिलेल्या त्या असुरांनीं नंतर मासांचा आश्रय केला. त्यावेळेसही उपसन्नामक होमच आपण करूं असा विचार करून देवांनीं त्याप्रमाणें केलें. महिने बारा म्हणून पूर्वी सहा वेळां केलेले होम त्यांनीं आतां बारा वेळां केले. आणि अशा रीतीनें मासांपासूनहि असुरांना देवांनीं अनाश्रित केलें.

मासांपासून निघाल्यावर असुरांनीं अर्धमासांचा आश्रय केला. उपसदाख्य होमच आपण करूं असा विचार करून देवांनीं तसें केलें. बारा असलेले उपसद् होम त्यांनीं ह्या खेपेस चोवीस वेळां केले. कारण अर्धमास चोवीस आहेत. असें करून असुरांना देवांनीं तेथूनहि घालविलें.

अर्धमासांचा आश्रय सुटल्यावर असुर अहोरात्रांच्या आश्रयास गेले, तेव्हां उपसद् होमच आपण करूं असें देव म्हणूं लागले, व तसें त्यांनीं केलेंहि. पूर्वाह्णीं त्यांनीं जो उपसदाख्य होम केला त्याच्या योगानेंच दिवसापासून त्यांनीं असुरांस घालविलें, व अपराह्णीं केलेल्या होमाच्या योगानें ते असुरांना रात्रीपासून घालवते झाले. अशा रीतीनें अहोरात्रांपासूनहि असुरांना देवांनीं हांकून लाविलें.

## आख्यायिका ६

(देवासुरांच्या युद्धांत) देवांना अशी भीति पडली कीं, आपल्यामध्यें जे आपआपसांत कलह आहेत त्यांच्या योगानें असुर आपलें राज्य घेतील, म्हणून तेथून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन आपआपल्या मन्त्र्यांसह ते विचार करूं लागले. अग्नि वसूंना घेऊन गेला. इन्द्र रुद्रांना घेऊन गेला, वरुण आदित्यांसह चालता झाला, व बृहस्पति विश्वेदेवांना घेऊन गेला.

ह्याप्रमाणें दूर जाऊन ते विचार करूं लागले. ते म्हणाले, 'हीं आपलीं आवडतीं बायकामुलें ह्या राजा वरुणाच्या घरांत बंदोबस्तानें ठेवूं. जो आपणांतून फुटेल व आपलीं बायकामुलें तेथून घेऊन जाण्याची इच्छा करील त्यास तीं मिळणार नाहींत.' हा विचार पसंत पडल्यावर त्यांनीं राजा वरुणाच्या घरांत आपलीं बायकामुलें ठेविलीं.

## आख्यायिका ७

सोमराजा गंधर्वांकडे होता; तेव्हां तो आपणांकडे कसा येईल अशाविषयीं देव आणि ऋषि विचार करूं लागले. वाग्देवी म्हणाली, गंधर्व स्त्रीलंपट आहेत, करतां मी स्त्री होतें, मला देऊन तुम्ही त्यापासून सोम विकत घ्या. आम्ही तसें करणार नाहीं, तुझ्याशिवाय आमचें कसें होईल असें देव म्हणूं लागले. त्यावर ती म्हणाली, तुम्ही मला देऊन सोम विकत घ्याच. जेव्हां तुम्हांला माझें कारण लागेल तेव्हां मी तुमच्याकडे परत येईन. ही गोष्ट देवांनीं मान्य केली. नंतर वाग्देवी मोठी सुंदर पण नग्न अशी कुमारी बनली. तिच्यायोगानें देवांनीं सोम विकत घेतला.

## आख्यायिका ८

पूर्वीं एकदां यज्ञाच्यायोगानें देव स्वर्गास गेले. त्यांना अशी भीति पडली कीं हा आपला यज्ञ पाहून मनुष्य आणि ऋषि आपल्या पाठोपाठ येतील. म्हणून त्यांना भ्रम पाडण्याच्या उद्देशानें वर बुंधा आणि खालीं शेंडा करून एक यूप यज्ञभूमीवर देवांनीं पुरून ठेवला. पुढें मनुष्य आणि ऋषि यज्ञभूमीवर आले. येथें आपणांस कांहीं तरी यज्ञाची खूण दृष्टीस पडेल व त्यावरून देवांनीं यज्ञ कसा केला हें आपणांस समजेल असा विचार करीत करीत ते यूपापाशीं येऊन पोंचले. ज्याचा शेंडा जमिनींत पुरला आहे असा तो यूप त्यांनीं

अवलोकन केला तेव्हां त्यांना असें वाटलें कीं, आपणांस भ्रम व्हावा ह्याकरितांच देवांनीं आपल्या यज्ञांत अधोमुख यूपाची भेसळ केली. तेव्हां त्यांनीं तो यूप काढून पुन्हा ऊर्ध्वमुख पुरला. त्यामुळें, देवांनीं यज्ञाचें कसें अनुष्ठान केलें हें त्यांस समजलें व ते स्वर्गास गेले.

## आख्यायिका ९

पूर्वीं एकदां देवांच्या अन्नार्थ व यज्ञप्रसंगीं वधार्थ उपयोगी पडण्याचें पशूंनीं नाकारलें. ते देवांपासून दूर अंतरावर जाऊन तुम्हांला आतां आम्ही मारण्याकरितां सांपडणार नाहीं असें पुनः पुनः म्हणूं लागले. तेव्हां देवांनीं ह्या यूपाचा वज्राप्रमाणें उपयोग केला. त्यांनीं यूप उभारला. त्याच्यामुळें पशु भ्याले आणि देवाजवळ आले. पूर्वीं असा प्रकार घडल्यामुळें अद्यापिहि पशु यूपाजवळ असतात. तेव्हां-पासून देवांना दहीं, दूध देण्याचें व यज्ञप्रसंगीं वधार्थ उपयोगी पडण्याचें पशूंनीं कबूल केलें.

## आख्यायिका १०

देव पशूला वधस्थळीं घेऊन जात असतां त्यानें मूर्तिमंत मृत्यु अवलोकन केला. तेव्हां देवांच्या बरोबर जाण्याचें त्यानें नाकारलें. देव त्यास म्हणाले, तुला आम्ही स्वर्गाला घेऊन जाऊं. बरें आहे, पण तुमच्यापैकीं एकाला माझ्यापुढें चालूं द्या असें तो देवांना म्हणूं लागला. तें देवांनीं मान्य केलें व अग्नि पशूच्या पुढें चालूं लागला. तेव्हां पशूहि मोठ्या आनंदानें त्याच्या मागोमाग गेला.

## आख्यायिका ११

देवांनीं पूर्वीं एकदा यज्ञ केला. आपण यज्ञविच्छेद करूं असें म्हणून असुर त्या यज्ञ करणाऱ्या देवांजवळ आले. प्रयाजांनीं पशूचें संतर्पण झाल्यावर व पर्यग्निकरणाच्या पूर्वीं पूर्वेस यूपाजवळ ते

आले. देवांनीं त्यांचा हेतु जाणून आपल्या व यज्ञाच्या रक्षणार्थ पशूच्या भोंवतीं तीन अग्निमय प्राकार रचले. हे ह्यांचे अग्निरूप देदीप्यमान प्राकार प्रकाश पाडते झाले. ह्या प्राकारांच्या वाटेस न जातां असुरांनीं तेथून पलायन केलें. अग्नीच्याच योगानें देवांनीं पूर्वेकडे व पश्चिमेकडे असुरांना व राक्षसांना पळावयास लावलें.

## आख्यायिका १२

पूर्वीं एकदा यज्ञ, तप, हवन व तीर्थयात्रा करून देवांनीं स्वर्ग-लोक वश करून घेतला. वपेचें हवन करतांच त्यांस तो लोक व्यक्त झाला. वपेचें हवन करून पुढलीं कर्में त्यांनीं सोडून दिलीं व तसेच ते स्वर्गाप्रत गेले. नंतर यज्ञाचें अनुष्ठान समजून घेण्याच्या उद्देशानें मनुष्य व ऋषि देवांच्या यज्ञभूमीवर आले. इकडे तिकडे फिरल्यावर वपारहित असें पशूचें शरीर जेथें पडलें होतें तेथें ते आले. तेव्हां त्यांना असें खास वाटलें कीं, वपा हेंच पशूचें सारभूत अंग आहे.

## आख्यायिका १३

पूर्वीं एके प्रसंगीं प्रजापतीनें स्वतः होतृत्व पतकरलें. तो प्रातरनुवाक् म्हणण्यास उद्युक्त झाला असतां ह्यानें मला उद्देशून आरंभ करावा, अशा प्रकारची अपेक्षा सर्व देवतांनीं केली. तेव्हां प्रजापतीनें असा विचार केला कीं, एकदेवतोद्दिष्ट मन्त्र म्हणून जर मी प्रारंभ केला तर इतर देवतांना राग येईल. म्हणून सर्व देवतांचा उपक्रम एकदम एका ऋचेनें होईल अशी "आपोरेवतीः" ही ऋचा त्यानें शोधून काढली. आप आणि रेवती ह्या शब्दांनीं सर्व देवता निर्दिष्ट केल्या-सारख्या होतात. ह्या ऋचेनें प्रजापतीनें प्रातरनुवाकाचा प्रारंभ केला, त्यामुळें मला उद्देशून ह्यानें आरंभ केला असें प्रत्येक देवतेला वाटून त्या सर्वांनाच आनंद झाला.

## आख्यायिका १४

सरस्वतीच्या तीरावर कांहीं ऋषींनीं एकदा सत्र करण्यास प्रारंभ केला. तेथें इलूष नामक ऋषीचा कवष म्हणून मुलगा होता. हा दासीपुत्र जुगारी व अब्राह्मण आहे, ह्याला आपल्यामध्यें दीक्षा कशी घेतां येईल ? या विचारानें ऋषींनीं त्याला सोमयागांतून घालवून दिलें; आणि सरस्वतीचें उदक त्याला न मिळून तान्हेनें तो मरावा ह्या हेतूनें त्यांनीं त्याला निर्जल प्रदेशांत नेऊन सोडलें. अशा त्या जलरहित प्रदेशांत तृष्णेनें व्याकुल झालेल्या कवषानें 'देवत्रा ब्रह्मणे गातुः' इत्यादि अपोनप्त्रीय सूक्त म्हटलें. त्यामुळें जलाभिमानी देवतांच्या प्रियधामाप्रत तो प्राप्त झाला. तेथें त्याला भरपूर उदक मिळालें, व स्वतः सरस्वती नदीहि त्याच्याभोंवतीं धावत आली. ज्या ठिकाणीं कवष ऋषीला सरस्वती नदीनें परिवेष्टित केलें त्या ठिकाणास अद्यापीहि परिसारक ही संज्ञा आहे.

तेव्हां ऋषींनीं विचार केला कीं, ह्या कवषाला प्रत्यक्ष देवहि ओळखतात म्हणून आपण आतां ह्याला आपल्या जवळ बोलावूं. त्याप्रमाणें त्यांनीं त्याला बोलाविलें, व बोलाविल्यावर त्यांनीं त्याचें अपोनप्त्रीयसूक्त म्हटलें. ह्या सूक्ताच्यायोगानें जलदेवतांचें तसेंच अन्यदेवतांचें प्रिय स्थान त्यांस प्राप्त झालें.

## आख्यायिका १५

लांब जीभ असलेल्या एका असुरस्त्रीनें देवांच्या सकाळच्या यागांतील सोमरस चाटला. त्यामुळें त्या रसांत अत्यंत दोष उत्पन्न झाला, तेव्हां देवांना विचार पडला. ते मित्रावरुणांना म्हणाले, 'तुम्ही हें शुद्ध करा.' 'बरें आहे; पण आम्ही एक वर मागतों' असें ते म्हणाले. 'मागा' असें म्हटल्यावर प्रातःसवनांतील दह्याचा

भाग त्यांनीं आपल्याकरितां मागून घेतला. तें हें दहीं त्यांना निरंतर मिळतें. कारण तें त्यांनीं वरानें मागून घेतलें आहे. असुरस्त्रीच्या अवलेहनानें जें विमत्त ( दूषित ) झालें होतें तें आतां शुद्ध झालें. बिघडलेल्या सोमांतील दोष मित्रावरुणांनीं दह्याच्यायोगानें काढून टाकला.

## आख्यायिका १६

पूर्वीं एकदा प्रथम सोमरस कोणी प्यावा ह्याविषयीं देवांमध्यें ऐकमत्य राहिलें नाहीं. 'मला प्रथम पिण्यास मिळावा' असें सर्वांस वाटूं लागलें. तेव्हां त्यांनीं आपसांत असें ठरविलें कीं, धावण्याच्या शर्यतींत आपणांपैकीं जो सर्वांत पुढें जाईल त्याला एकट्यालाच सोमाचा रस प्रथम पिण्याचा मान मिळेल. हा विचार सर्वांस मान्य झाला, व नेमलेल्या हद्दीपर्यंत धावून जाण्यास त्यांनीं आरंभ केला. त्या सर्वांच्यापुढें वायु गेला; त्याच्या मागून इंद्र, नंतर मित्रावरुण व मग अश्विनी गेले.

वायु सर्वांच्या पुढें जाणार हें इंद्रानें अगोदर जाणलें. तेव्हां तो वायूच्या पाठोपाठ सपाट्यानें धावत जाऊन त्यास म्हणूं लागला कीं, 'तूं अर्धें सोमपान कर, मी अर्धें करीन आणि आपण दोघे सारखाच जय मिळवूं.' वायूनें ही गोष्ट नाकारली व 'मी एकटाच विजयी होईन' असें म्हणूं लागला. ह्यावर इंद्रानें असें बोलणें लावलें कीं, 'सोमपानांत माझा तिसरा भाग व तुझे दोन भाग अशा अटीवर आपण बरोबरच जय मिळवूं'. वायूनें हेंहि साफ नाकबूल केलें व 'मी एकटाच विजयी होईन,' असें म्हणूं लागला. ह्यानंतर इंद्राचें 'माझा एक भाग व तुझे तीन भाग अशा अटीवर आपण दोघे सारखेच विजयी होऊं' हें म्हणणें वायूनें कबूल केलें व इंद्राला चौथा भाग दिला.

ह्याप्रमाणें इंद्र व वायु हे दोघे नेमलेल्या ठिकाणीं बरोबर जाऊन पोंचले. त्यांच्या पाठीमागून मित्रावरुण गेले व त्यांच्यानंतर अश्विनी जाऊन पोंचले. अशा क्रमानेंच यज्ञांत इंद्रवायू, मित्रावरुण आणि अश्विनी सोमपान करतात.

## आख्यायिका १७

पूर्वकालीं एकदा असें घडलें कीं, देवांनीं यज्ञांत जें जें केलें तें तें सर्व असुरांनींहि केलें. त्यामुळें ते दोघे समानवीर्य झाले. त्यांच्यांतलें न्यूनाधिक्य नाहींसें झालें. त्या वेळेस देवांना तूष्णींशंस नांवाचें शस्त्र सुचलें. पण असुरांना ह्याचा समज न पडल्यामुळें त्यांनीं त्याचें अनुष्ठान केलें नाहीं. हें शस्त्र म्हणजे ऋक्समूह मनांत म्हणावयाचें म्हणून त्यास तूष्णींशंस म्हणतात.

ज्या ज्या वज्राचा देव उपयोग करीत त्या प्रत्येकाचा असुरांनीं प्रतिकार केला. तेव्हां देवांनीं ह्या तूष्णींशंसशस्त्ररूपी वज्राचा उपयोग केला. ह्याचा प्रतिकार असुरांना करतां येईना; ह्या शस्त्रानें देवांनीं असुरांना मारलें. असुरांचा पराभव झाला.

## आख्यायिका १८

पूर्वी प्रजापतीनें देवांमध्यें यज्ञाची आणि छंदांची वांटणी केली. अग्नीला आणि वसूंना त्यानें प्रातःसवनांत गायत्री दिली. मध्यंदिन-सवनांत त्रिष्टुप् छंदाची वांटणी त्यानें इंद्र आणि रुद्र ह्यांच्यांत केली. आणि तृतीय सवनांत जगतीला विश्वेदेव व आदित्य ह्यांच्या वांटणीस घातलें.

प्रजापतीचा स्वतःचा जो अनुष्टुप्छंद त्या अनुष्टुप्छंदाला त्यानें यज्ञाच्या शेवटीं अच्छावाकीय ऋक्कडे सोडून दिलें. तेव्हां ती अनुष्टुप् प्रजापतीला म्हणाली, 'मी तुझा मूळचाच छंद असून तूं

मला आपल्यापासून दूर केलेंस ह्यावरून तूं सर्व देवांत अत्यंत पापी आहेस'. अनुष्टुभेचा हेतु प्रजापतीनें जाणला आणि तिचा दोषारोप राहूं नये म्हणून त्यानें आपला सोमयाग केला. त्या सोमयागांत त्यानें अनुष्टुप्छंदाला प्रथम स्थानापन्न केलें. तेव्हांपासून अनुष्टुप्-छंदाचा उपयोग सर्व सवनांत प्रथमतः केला जातो.

## आख्यायिका १९

एकदा अग्नीनें देवांचें होतृत्व पतकरलें होतें. परंतु बहिष्पवमान-स्तोत्र म्हटल्यावर मृत्यु त्याच्याजवळ प्राप्त झाला. तेव्हां अनुष्टुप्-छंदांत आज्यशस्त्र म्हणून त्यानें मृत्यूचें अतिक्रमण केलें. आज्यशस्त्र संपूर्ण होतांच पुनः मृत्यु त्याच्याकडे आला. त्यावेळीं प्रउगशस्त्र म्हणण्यास आरंभ करून त्यानें मृत्यूचा परिहार केला.

पुढें माध्यंदिन स्तोत्र म्हणतांच मृत्यु प्राप्त झाला. तेव्हां अनुष्टुप्-छंदांत मरुत्वतीय शस्त्र म्हणून अग्नीनें त्याचें निराकरण केलें. हें शस्त्र पूर्ण झाल्यावर बृहतीछंदस्क ऋचा म्हणण्यास अग्नीनें आरंभ केला, तेव्हां मृत्यु त्याच्यापाशीं जाण्यास समर्थ झाला नाहीं. कारण बृहती म्हणजे प्राणस्वरूपच आहेत.

तृतीयसवन स्तोत्र म्हणून झाल्यावर मृत्यु पुनः अग्नीकडे आला. त्या वेळीं अनुष्टुप्छंदांत वैश्वदेवाख्यशस्त्र म्हणून अग्नीनें मृत्यूचा परिहार केला.

नंतर यज्ञायज्ञीयस्तोत्र संपल्यावर मृत्यु अग्निसन्निध आला. तेव्हां अग्नीनें वैश्वानरीय सूक्तानें मरुत्वतीयशस्त्र म्हणण्यास आरंभ केला व मृत्यूचें निवारण केलें. कारण वैश्वानरीयसूक्त म्हणजे वज्रच होय व यज्ञायज्ञीय स्तोत्र ही यज्ञाची प्रतिष्ठा होय. म्हणून सूक्तरूप वज्रानेंच यज्ञसमाप्तीपर्यंत अग्नीनें मृत्यूचें निवारण केलें. अग्नीनें मृत्यूच्या सर्व पाशांपासून व आयुधरूपी काष्ठांपासून आपली मुक्तता करून घेतली.

मानवांमध्यें अग्नीचें जो अनुकरण करील त्याचीहि त्याच्याप्रमाणेंच मृत्यूपासून सुटका होईल.

## आख्यायिका २०

इंद्रानें वृत्रनामक दैत्याला मारलें. परंतु तो मेला नाहीं अशा समजुतीनें इंद्र दूर पळाला. तेथेंहि त्याची भीति न गेल्यामुळें तो तेथून आणखी लांब गेला. तो वाक्स्वरूपी अनुष्टुप्‌मध्यें प्रविष्ट होऊन तेथेंच शयन करता झाला. तेव्हां सर्व भूतांनीं मिळून निर-निराळ्या दिशेस त्याचा शोध चालविला. शेवटीं यज्ञाच्या आदले दिवशीं पितरांनीं व दुसऱ्या दिवशीं देवांनीं त्यास गांठलें. ह्या कारणा-स्तव अमावास्येस पितृयज्ञ व प्रतिपदेस देवयज्ञ करतात.

इंद्राची गांठ पडल्यावर ते देव आपसांत म्हणूं लागले कीं, आपण सोमरस काढूं म्हणजे हा इंद्र अगदीं त्वरित आपणांकडे येईल. हा विचार सर्वांस मान्य होऊन त्याप्रमाणें ते करूं लागले. देवांनीं "आ त्वा रथं" हा मंत्र म्हणतांच इंद्र अनुष्टुप् सोडून अभि-षवाच्या ठिकाणीं आला. "इदं वसो सुतमन्ध" ही ऋचा म्हणतांच तो प्रकट झाला, आणि "इंद्र नेदीय एदिहि" ही ऋचा म्हटल्याबरोबर तो यज्ञाच्या मध्यभागीं येऊन उभा राहिला.

## आख्यायिका २१

इंद्रानें वृत्राला मारलें; परंतु तो मेला नाहीं असें मानून सर्व देवतांनीं इंद्राचा परित्याग केला. तथापि निद्रेंत देखील जागृत असणारे मरुत् ह्यांनीं मात्र त्याला सोडलें नाहीं. प्राण हेच निद्रेंत जागृत असणारे मरुत् होत. म्हणून प्राणांनींच इंद्राला सोडलें नाहीं असें म्हणावयाचें. ह्यामुळें प्रत्येक मरुत्वतीय शस्त्रांत इंद्राची प्रशस्ति असतेच असते.

## आख्यायिका २२

वृत्राला मारण्यास प्रवृत्त झालेला इंद्र सर्व देवतांना म्हणाला, मला तुम्ही मनापासून पाठिंबा द्या व माझ्या उपयोगी पडा. तेव्हां त्या सर्व देवता होय म्हणून वृत्राला मारण्याच्या हेतूनें धावत आल्या. ह्या आपणांस मारण्याकरितां येत आहेत हें वृत्राला समजलें. तेव्हां आपण ह्यांना भेवडावूं असा विचार करून त्यानें त्यांच्यावर श्वास सोडला. त्या श्वासानें भिऊन जाऊन सर्व देव पळत सुटले, मरुतांनीं मात्र इंद्राला सोडलें नाहीं. 'महाराज मारा, पराक्रम करा' असें म्हणून त्यांनीं इंद्राला धीर दिला.

एका ऋषीनें देवांना पळतांना पाहून इंद्रास म्हटलें, 'मित्र म्हणून ज्यांना तूं समजत होतास ते सर्व वृत्राच्या श्वासाला भिऊन तुला सोडून गेले. म्हणून ह्या मरुतांबरोबर तुझें सख्य असो. त्यांच्या योगानें वृत्राच्या सर्व सेनेचा तूं पराभव करूं शकशील.'

नंतर इंद्रानें विचार केला हे मरुत् माझे मित्र खरे, ह्यांनीं मला सोडलें नाहीं. म्हणून माध्यंदिनगतशस्त्रांत ह्यांना वांटेकरी करावें. त्याप्रमाणें त्यानें मरुतांस त्या शस्त्रांत भाग दिला. ह्याच्या पूर्वी माध्यंदिन सवनांत केवळ इंद्रदेवताक शस्त्रें होतीं.

## आख्यायिका २३

इंद्रानें वृत्राला मारून सर्व भूमि जिंकली. नंतर तो प्रजापतीला म्हणाला, 'जो तूं आहेस तोच मी होऊं दे. म्हणजे सर्व भूतांमध्यें मला श्रेष्ठ होऊं दे.' त्यावर प्रजापतीनें उत्तर दिलें, 'तूं सर्वांत श्रेष्ठ झाल्यावर मी कोण (सं. कः) असणार?' तेव्हां इंद्र त्यास म्हणाला, 'तूं आपल्याला उद्देशून आतां जो शब्द वापरलास तोच तूं हो.' म्हणून

तेव्हांपासून प्रजापति कः ह्या नामानें प्रसिद्ध झाला, व इंद्र महान् झाला म्हणून त्यास महेंद्र अन्वर्थक म्हणूं लागले.

इंद्र महान् झाल्यानंतर देवतांना म्हणूं लागला 'माझा विशेष सत्कार करण्याकरितां यज्ञांत तुम्ही मला निराळा भाग द्या.' हल्लींसुद्धां जो सर्वांत श्रेष्ठ बनतो त्याची अशीच इच्छा असते. तेव्हां देव म्हणाले, 'तुला जें इष्ट असेल तें तूं स्वतःच सांग.' त्याबरोबर इंद्रानें महेंद्र पात्र, माध्यंदिन सवन, निष्केवल्य शस्त्र, त्रिष्टुप्छंद आणि पृष्ठस्तोत्र हीं आपणांकरितां स्वतंत्र मागून घेतलीं व त्याप्रमाणें त्यास तीं प्राप्त झालीं.

असें झालें तेव्हां इतर देव इंद्राला म्हणूं लागले, 'तूं सर्वच भाग उचलल्यास; आमचा थोडा तरी भाग ह्यांत राहूं दे;' परंतु इंद्रानें ही देवांची विनंति नाकारिली. 'आमचा भाग असूं देच' म्हणून पुनः देवांनीं इंद्राची प्रार्थना केली. तेव्हां इंद्रानें देवांकडे फक्त अनुग्रह-दृष्टीनें पाहिलें.

इंद्राचा अभिप्राय न समजून देव परस्परांत बोलूं लागले कीं, इंद्राची मध्यमजातीय (वावाता) परंतु प्रिय स्त्री प्रासहा येथें आहे, करतां तिच्याकडे जाऊन इंद्राचा अभिप्राय काय आहे तो आपण समजून घेऊं. हा विचार सर्वांस पसंत पडतांच तिच्याकडे जाऊन त्यांनीं आपली इच्छा प्रदर्शित केली. तेव्हां ती त्यांस म्हणाली 'तुम्ही सकाळीं या, त्या वेळीं मी तुमच्या प्रश्नाचें उत्तर देईन.' हल्लींसुद्धां स्त्रिया आपणांस कळावयास पाहिजे असेल तें सर्व पतीपासून रात्रीं काढून घेतात. ठरल्याप्रमाणें देव तिच्याकडे सकाळीं गेले. तेव्हां ती त्यांना म्हणाली, 'तुम्हांला पाहिजे होतें तें इंद्रानें केलें आहे.' हें उत्तर ऐकून देव आपसांत म्हणूं लागले कीं, "वाहवा, ताईनें आपणांवर

उपकार केले आहेत; करितां तिचाहि भाग ह्या निष्केवल्य शस्त्रांत असावा" असें म्हणून त्यांनीं त्याप्रमाणें केलें.

## आख्यायिका २४

पूर्वीं ऋक् आणि साम अगदीं भिन्न होतीं; ऋक् 'सा' ह्या नांवानें प्रसिद्ध होती व 'अम' ह्या नांवानें साम प्रसिद्ध होतें. ऋक् सामाकडे येऊन म्हणूं लागली, 'प्रजोत्पादनार्थ आपला संयोग व्हावा.' 'माझा महिमा तुझ्यापेक्षां अधिक आहे' असें म्हणून सामानें तिची विनंति अमान्य केली. तेव्हां दोन ऋचा सामाकडे आल्या; तरीसुद्धां साम त्यांच्याजवळ बोलेना. नंतर तीन ऋचा आल्या त्यांच्याबरोबर सामानें संयोग केला. असा हा तीन ऋचांशीं संयोग झाल्यामुळें साम गाणारे यज्ञांत तीन ऋचांवर साम म्हणतात. एका सामाचा तीन ऋचांशीं संबंध झाल्याकारणानें एका पुरुषाच्या पुष्कळ बायका असूं शकतात; पण एका स्त्रीला एकाच वेळीं पुष्कळ पती असूं शकत नाहींत. सा आणि अम हीं एक झाल्यामुळें साम हें नांव त्या मिथुनास प्राप्त झालें.

## आख्यायिका २५

पूर्वीं सोम राजा स्वर्गलोकीं होता. म्हणून आपणांस त्याची प्राप्ति कशी होईल ह्याविषयीं देव आणि ऋषी विचार करूं लागले. विचार करून गायत्र्यादिच्छन्दांना ते म्हणाले, 'तुम्ही आमच्याकरितां सोमराजाला इकडे घेऊन या.' 'होय, आणतों' असें म्हणून छन्दांनीं पक्ष्याचें स्वरूप धारण केलें व ते स्वर्गाप्रत चालते झाले. सुपर्ण (पक्षी) होऊन छन्द चालते झाले म्हणून पौराणिक ह्यास सौपर्णिकाख्यान असें म्हणतात.

सोमराजाच्या प्राप्त्यर्थ छन्द निघाले त्यावेळेस चार अक्षरांचेच

छन्द होते. त्यांपैकीं चतुरक्षरा जगती प्रथम निघाली; परंतु अर्ध्या मार्गावर गेल्यावर थकून जाऊन तिनें तीन अक्षरें टाकून दिलीं. एकाक्षरा होऊनच ती पुढें गेली. त्यामुळें तेथें गेल्यावर सोमाला घेऊन येणें तिला होईना. तेव्हां तेथील सोमयागसंबंधी दीक्षा व क्षीरपानादिरूप तप हीं घेऊन ती परत फिरली.

जगतीच्या मागून त्रिष्टुप् निघाली ती पडत पडत जात होती. पण अर्ध्या रस्त्यावर गेल्यावर अगदीं थकली. तेव्हां एक अक्षर तिनें तेथें सोडलें व त्र्यक्षरा होऊन ती भूलोकीं जाऊन पोंचली. तेथील 'दक्षिणा' घेऊन ती माघारी फिरली.

नंतर देव गायत्रीला म्हणाले 'तूं सोम राजाला घेऊन ये.' 'होय, आणतें' असें ती म्हणाली; पण माझ्याकरितां तुम्ही स्वस्त्ययनमन्त्र म्हणा असें तिनें देवांस सांगून ठेवलें व देवांनीं त्याप्रमाणें मन्त्र म्हटले. गायत्री निघाली ती सोमाप्रत प्राप्त झाली, व सोमरक्षकांना तिनें भिववून दूर घालविलें व नंतर पायांनीं आणि मुखानें सोम-राजाला तिनें घेतलें. एवढेंच नव्हे, तर इतर छन्दांनीं जीं चार अक्षरें टाकलीं होतीं तींहि घेऊन ती परत फिरली.

गायत्री परत आल्यावर तिला त्रिष्टुप् व जगती म्हणूं लागल्या, 'तुला प्राप्त झालेलीं अक्षरें आमचीं आहेत, करितां तीं आमचीं आम्हाला मिळावीं.' परंतु गायत्रीनें ही गोष्ट साफ नाकारली. 'ज्याला जें मिळालें तें त्याचें समजावयाचें' असें तिचें म्हणणें पडलें. म्हणून त्या दोन छंदांनीं देवांकडे जाऊन त्यांस ह्या प्रश्नाचा निर्णय करण्यास सांगितलें. देवांनींहि 'तुमच्यापैकीं जिला जें मिळालें असेल तें तिचें' असाच निकाल दिला. त्यामुळें सांप्रतहि 'ज्याला जी वस्तु सांपडेल ती त्याच्याच मालकीची' असें न्यायपंडित सांगतात. एव्हांपासून

गायत्री आठ अक्षरांची, त्रिष्टुप् तीन अक्षरांची व जगती एक अक्षराची झाली.

अष्टाक्षरा गायत्री प्रातःसवनयज्ञ तडीस नेती झाली. परंतु तीन अक्षरांच्या त्रिष्टुप्च्छंदाकडून माध्यंदिन सवन तडीस जाईना. तेव्हां गायत्री तिला म्हणाली 'तूं मला ह्या यज्ञांत भाग देशील तर मी तुला साहाय्य करीन.' ही गोष्ट त्रिष्टुप्नें मान्य केली व 'तूं आपल्या आठी अक्षरांनीं माझ्यांत प्रवेश कर' असें ती गायत्रीस म्हणाली; गायत्रीनें होय म्हटलें. गायत्रीच्या प्रवेशामुळें अकरा अक्षरांची झालेली जी त्रिष्टुप् तिला नंतर माध्यंदिन सवन तडीस नेतां आलें.

त्याचप्रमाणें तृतीय सवन पार पाडण्यास एकाक्षरा जगती असमर्थ झाली. तिला गायत्री म्हणाली 'माझा भाग ह्या सवनांत राहील तर मी तुझ्या साहाय्यार्थ येतें.' 'हें मला मान्य आहे. तूं आपल्या अकरा अक्षरांसह माझ्यांत प्रवेश कर' असें ती गायत्रीला म्हणाली. गायत्रीनें त्याप्रमाणें केलें, त्यामुळें बारा अक्षरांची झालेली जी जगती तिला तृतीय सवनाचें कृत्य शेवटास नेतां आलें. तेव्हांपासून गायत्री आठ अक्षरांची, त्रिष्टुप् अकरा अक्षरांची व जगती बारा अक्षरांची झाली.

## आख्यायिका २६

ऋभुनामक देवांनीं तप करून सोमपानाचा हक्क संपादन केला. तेव्हां प्रातःसवनयागांत ह्यांना सोमपान मिळावें अशी प्रजापतीनें इच्छा प्रदर्शित केली. परंतु अग्नीनें आपल्या वसुनामक अनुयायांच्या मदतीनें प्रातःसवनांतून ऋभूंस हांकलून लावलें. त्यामुळें माध्यंदिन सवनांत त्यांच्या सोमपानाची योजना प्रजापतीनें केली. पण तेथेंहि इन्द्रानें रुद्रांच्या साहाय्यानें त्यांचा शिरकाव होऊं दिला नाहीं. नंतर

तृतीय सवनांत ऋभूंस सोमपान मिळावें म्हणून प्रजापतीनें मनांत आणलें, पण विश्वेदेवांनीं तेथेंहि त्यांचें निराकरण केलें. 'ह्या ठिकाणीं ते पिणार नाहींत' 'येथें ते पिणार नाहींत' असें म्हणूं लागले. तेव्हां सवित्याला प्रजापति म्हणाला, 'हे ऋभु तुझे शिष्य आहेत. तूं ह्यांच्यासह सोमपान कर.' हें सवित्यानें मान्य केलें. मग प्रजापतीला तो म्हणाला, 'तूंहि ह्यांच्या दोनहि बाजूंस उभा राहून पान कर;' त्याप्रमाणें प्रजापतीनें केलें. त्याबरोबर अग्नि, वसु आदिकरून देव ह्या मनुष्यांचा गंधसुद्धां नको असें म्हणून दूर गेले. व त्यांची निर्भर्त्सना करूं लागले.

## आख्यायिका २७

प्रजापतीची कामवासना एकदा आपल्या मुलीवर गेली. तेव्हां ही मुलगी कोण समजावयाची ह्याबद्दल ऋषींमध्यें मतभेद पडला. कांहीं म्हणूं लागले प्रजापतीची मुलगी म्हणजे द्युलोक होय. दुसऱ्यांचा अभिप्राय पडला कीं ती उषा होय. प्रजापतीनें मृगाचें रूप धारण करून ऋतुमती झालेल्या आपल्या मुलीबरोबर मैथुनक्रिया केली. तेव्हां प्रजापतीनें करूं नये तें केलें असें सर्व देव म्हणूं लागले, व ह्याला कोण शिक्षा करील ह्याची चौकशी करूं लागले. परंतु प्रजापतीला शासन करणारा त्यांस त्यांच्यांत कोणी मिळेना. म्हणून त्यांनीं त्यांच्यामध्यें जीं उग्र शरीरें होतीं तीं सर्व एकत्र करून त्यांचें एक शरीर बनविलें. तोच हा (रुद्र) देव होय. ह्या कारणास्तव रुद्राला 'भूतशब्दानें युक्त' असें नांव प्राप्त झालें.

नंतर त्याला देवांनीं सांगितलें 'प्रजापतीनें करूं नये तें कर्म केलें आहे, करतां तूं त्याला बाणांनीं प्रहार कर.' 'करतों, पण तुमच्याजवळ मी वर मागतों' असें रुद्र म्हणाला. 'माग,' असें म्हटल्यावर

'पशूंचें आधिपत्य माझ्याकडे असावें' असा त्यानें वर मागितला. म्हणून रुद्राला 'पशुशब्दानें युक्त' असें नांव प्राप्त झालें.

पुढें रुद्रानें धनुष्याची दोरी ओढून प्रजापतीस विद्ध केलें. विद्ध झालेला तो प्रजापति ऊर्ध्वमुख होऊन पडला. अशा रीतीनें पडलेल्या मृगरूप प्रजापतीला आकाशांत पाहून लोक त्यास 'मृग' असें म्हणतात. मृगघाती रुद्राला 'व्याध' म्हणतात. रक्तवर्ण प्रजापतिकन्येला 'रोहिणी' म्हणतात, व ज्या बाणानें प्रजापतीला रुद्रानें विद्ध केलें त्याला 'त्रिकाण्डबाण' म्हणतात.

मृगरूप प्रजापतीनें आपल्या कन्येच्या ठिकाणीं जें रेतसिंचन केलें तें चोहीकडे धावूं लागलें. सखल प्रदेश मिळाल्याबरोबर त्याची एक नदीच झाली. तेव्हां देव म्हणाले कीं 'प्रजापतीचें रेत दोषयुक्त न होवो.' देवांनीं असें म्हटल्यामुळें त्या रेताला 'मादुष' ही संज्ञा प्राप्त झाली. वस्तुतः मादुष असा शब्द असतां वर्णव्यत्यय करून परोक्षप्रिय असणारे देव 'मानुष' असें म्हणूं लागले.

## आख्यायिका २८

वर सांगितलेलें जें प्रजापतीचें रेत तें अग्नीकडून देवांनीं परिवेष्टित करविलें, नंतर मरुतांनीं त्यांत वायुसंचार करविला. तथापि अग्नीच्यानें त्या रेताचें रूपांतर होईना, त्यामुळें वैश्वानरसंज्ञक अग्नीनें त्या रेताभोंवतीं परिवेष्टन केलें, व मरुतांनीं तें संचलित केलें. त्या बरोबर तें रेत पिंडाकार बनलें. प्रथमच जो उद्दिष्ट पिंड बनला तो 'आदित्य' झाला. दुसरा पिंड 'भृगु' झाला. भृगूचा वरुणानें पुत्रत्वानें स्वीकार केला म्हणून त्याला 'वारुणि' असें म्हणूं लागले. तिसरा पिंड बनला त्यापासून अदितिपुत्रांची उत्पत्ति झाली. जे रेतपिंड दग्ध होऊन

निखारे बनले होते, ते सर्व आङ्गिरसनामक ऋषि झाले. जे झगझगीत विस्तवासारखे होते ते सर्व बृहस्पति झाले.

विझलेल्या निखाऱ्यांत जे काळे कोळसे बनले होते ते काळे पशू झाले. विस्तवामुळें तांबडा झालेला जो जमिनीचा भाग त्यापासून तांबड्या पशूंची उत्पत्ति झाली.

## आख्यायिका २९

देवांनीं असुरांबरोबर युद्ध आरंभलें; परंतु त्यांच्याबरोबर जाण्याचें अग्नीनें नाकारलें. तेव्हां देव त्याला म्हणाले, 'तूं आमच्यापैकीं एक आहेस, तुला आलेंच पाहिजे.' 'मला उद्देशून स्तुति केल्यावांचून मी येणार नाहीं. करितां तुम्ही माझें स्तवन करा' असें अग्नीनें उत्तर दिलें. देवांनीं हें म्हणणें मान्य केलें, व ताबडतोब उठून अग्नीसमोर उभे राहून त्यांनीं त्याचें स्तवन केलें. त्याबरोबर अग्नि देवांबरोबर जाता झाला.

अग्नीनें आपल्याबरोबर तीन टोळ्या घेतल्या, व तीन रांगा करून विजयार्थ तो असुरांवर धावून गेला. गायत्री, त्रिष्टुप् आणि जगती हे छंदच त्या तीन रांगा होत; आणि प्रातःसवन, माध्यंदिन व तृतीयसवन ह्या त्या तीन टोळ्या होत. अटकळीच्या बाहेर अग्नीनें असुरांचा पराभव केला. देवांचा विजय झाला व असुर पराभव पावले.

## आख्यायिका ३०

असुरांबरोबरच्या युद्धांत विजयी झालेले देव स्वर्गाप्रत गेले; परंतु अग्नीनें जागच्या जागीं राहून स्वर्गाला स्पर्श करून तेथील प्रांत व्यापून टाकला. त्यानें स्वर्गलोकाचें द्वार बंद केलें. कारण अग्नि हा स्वर्गलोकाचा अधिपति आहे. त्याच्याकडे प्रथम वसु येऊन म्हणाले,

'आम्हांला स्वर्गप्राप्ति करून दे. आम्हांस स्वर्गांत जाण्याची संधि दे.' 'माझी स्तुति केल्याशिवाय मी हें स्वर्गद्वार खुलें करणार नाहीं, करतां माझें तुम्ही स्तवन करा' असें अग्नीनें उत्तर दिलें. वसूंनीं ही गोष्ट मान्य केली व त्रिवृन्नामक स्तोत्रानें त्यांनीं अग्नीचें स्तवन केलें. ह्याप्रमाणें स्तवन केल्यानंतर अग्नीनें त्यांना स्वर्गद्वार मोकळें करून दिलें व नंतर ते वसु आपापल्या स्थानीं गेले.

नंतर रुद्र, मग आदित्य आणि पाठीमागून विश्वेदेव अग्नीकडे येऊन म्हणूं लागले कीं, 'आम्हांला स्वर्गप्राप्ति करून दे.' 'माझें स्तवन केल्यावांचून मी स्वर्गद्वार सोडणार नाहीं, म्हणून माझी स्तुति करा' असें अग्नि त्यांस म्हणाला. तें मान्य करून त्यांनीं त्याची अनुक्रमें पंचदश, सप्तदश व एकविंश स्तोमानें स्तुति केली. तेव्हां अग्नीनें स्वर्गाचें द्वार मोकळें केलें आणि सर्व आपापल्या स्थानीं गेले.

## आख्यायिका २१

प्रजापतीनें आपली म्हणून मानलेली कन्या 'सूर्या सावित्री' हिला सोमराजाला दिली, त्यावेळीं तिला वरण्याकरितां सर्व देव वर होऊन आले होते. तेव्हां प्रजापतीनें त्यांच्यापुढें सहस्रऋचात्मक आश्विन-शस्त्र हरिद्रादि मंगल द्रव्यांच्या ऐवजीं ठेवलें. त्या शस्त्राबद्दल देवां-मध्यें वाद उत्पन्न झाला. 'हें मला मिळो,' 'हें मला मिळो' असें प्रत्येकजण म्हणूं लागला. तेव्हां ह्याची तोड काढावी म्हणून त्यांनीं असा विचार केला कीं, 'धावण्याच्या शर्यतींत जो बाकीच्यांस जिंकील त्याला हें शस्त्र मिळावें.' गार्हपत्यअग्नीपासून आदित्यापर्यंत धावत जाण्याचें त्यांनीं ठरविलें.

धावण्याच्या शर्यतींत त्या निरनिराळ्या दिशांनीं धावणाऱ्या देवांत अग्नि प्रथम मुखाप्रमाणें पुढें निघाला, त्याच्यामागून अश्विनी

गेले. ते अग्नीला म्हणाले 'तूं दूर हो.' 'आपण दोघे हें शस्त्र जिंकूं, माझा ह्यांत भाग असो' असें म्हणून अग्नीनें तें मान्य केलें; व अग्नीचें म्हणणें अश्विनींनाहि मान्य झालें म्हणून आश्विन शस्त्रांत, होता अग्निदेवताक ऋचा म्हणत असतो.

धावतां धावतां अश्विनी उषेच्या मागें राहिले. तेव्हां ते तिला म्हणाले, 'तूं मागें रहा आपण दोघेहि तें शस्त्र जिंकूं.' 'माझा त्यांत भाग असूं दे' असें म्हणून तिनें तें म्हणणें मान्य केलें, व अश्विनींनाहि तिचें म्हणणें कबूल झालें. एवढ्याकरतां आश्विन शस्त्रांत उषस्यकांड म्हणतात.

नंतर इंद्र अश्विनींच्या पुढें गेला. तेव्हां आश्विनी त्यास म्हणाले, 'हे मघवन्, आपण दोघे हें शस्त्र जिंकूं.' इंद्राला एकीकडे हो असें म्हणण्याची त्यांची छाती झाली नाहीं. त्यावर 'होय माझा या शस्त्रांत भाग असो' असें इंद्रानें म्हटलें, व तें अश्विनींनीं मान्य केलें. म्हणून आश्विन शस्त्रांत इंद्रकाण्ड म्हणावें लागतें.

अशा रीतीनें अश्विनींना जय प्राप्त झाला, व त्यांना तें शस्त्र प्राप्त झालें. म्हणून त्या शस्त्रास आश्विन शस्त्र हें नांव प्राप्त झालें.

शर्यतींत अग्नीच्या रथाला खेंचरें जोडलीं होतीं. त्यांना पळवितांना अग्नीनें त्यांची योनि दग्ध केली. त्यामुळें त्यांच्यापासून अपत्योत्पादन होत नाहीं.

उषेच्या रथाला लालसर बैल जोडले होते. ह्या कारणास्तव सांप्रतहि पहाट होऊं लागली म्हणजे तिचें स्वरूप आरक्तवर्ण दिसतें.

इंद्राच्या रथाला घोडे लावलेले होते. म्हणून शब्दयुक्त उच्चस्वर हें क्षत्रियांचें स्वरूप होय. कारण हा उच्चस्वर इंद्राचा होता.

अश्विनींनीं गर्दभयुक्त रथानें शर्यत जिंकली व शस्त्र मिळविलें ह्यामुळें (फार श्रम झाल्यामुळें) गर्दभ हा मंदगति व रूक्ष प्राणि झाला. हल्लींसुद्धां सर्व वाहनांत तो अत्यंत वेगरहित प्राणि दिसतो. तथापि ह्याच्या रेताचें वीर्य अश्विनींनीं हरण केलें नाहीं. त्या कारणानें तें जनावर द्विरेत (खेचर व गर्दभ उत्पन्न करण्यास समर्थ) राहिलें आहे.

## आख्यायिका ३२

पूर्वी एकदा हे दोन लोक (भू आणि स्वर्ग) एकत्रच होते. पुढें त्यांची फाटाफूट झाली तेव्हां पाऊस पडेनासा झाला; सूर्यप्रकाश बंद झाला; (देव मनुष्यादि) पांचहि प्रकारच्या जनांचें ज्ञान नष्ट झालें. तेव्हां देवांनीं दोनहि लोकांचा समागम पूर्ववत करून दिला. देवांच्या विवाहपद्धतीनें ह्या संयोग पावलेल्या लोकांनीं विवाह केला. रथंतर सामाच्यायोगानें ही भूमि द्युलोकाला प्रसन्न करते, व बृहत्सामानें द्युलोक हिची प्रीति संपादन करितो. नौधस सामानें पृथ्वी द्युलोकाला प्रसन्न करते, तर श्यैत सामानें तो लोक हिला प्रसन्न करतो. अग्निजन्य धूमानें ही भूमि द्युलोकाची प्रीति संपादन करिते तर द्युलोक वृष्टीच्या योगानें भूमीला प्रसन्न ठेवतो. भूमीनें देवयजनप्रदेश स्वर्गलोकीं ठेवला तर द्युलोकानें भूमीवर पशू ठेवले. चंद्रावर जो काळा डाग दिसतो तोच हा देवयजनप्रदेश होय.

## आख्यायिका ३३

स्वर्ग लोकाच्या प्राप्तीकरितां अंगिरस महर्षींनीं एकदां सत्र करण्यास आरंभ केला,परंतु पडहाच्या दुसऱ्या दिवसाच्या कृत्यापर्यंत ते आले कीं त्यांची पुनः पुनः चूक होई. तेव्हां 'शार्यात' नामक कोणी एका मानवानें त्यांस दुसऱ्या दिवसाकरितां हें सूक्त सांगितलें. त्यामुळें त्यांस यज्ञ तडीस नेतां आला व ते स्वर्गास गेले.

## आख्यायिका ३४

तिसऱ्या दिवसाचें अनुष्ठान पुरें झाल्यावर देव स्वर्गास गेले. तेथें त्यांचा प्रवेश होऊं नये म्हणून असुर व राक्षस त्यांचें निवारण करूं लागले. तेव्हां देवांनीं 'तुम्ही विरुद्धरूपधारी व्हा' असा शाप असुरांस व राक्षसांस दिला, व आपण आपल्या मूळच्या स्वरूपानें स्वर्गाप्रत जाते झाले. तथापि ह्या देवशापामुळें कुरूप झालेले ते असुर व राक्षस तसेच देवांच्या पाठोपाठ जाऊं लागले, व पुढें ते दूर अंतरावर उभे न राहतां देवांत जाऊन मिसळले. तेव्हां सर्व देवांनीं घोड्याचें रूप धारण करून पाठीमागें उभे-असलेल्या असुर राक्षसांना पायांनीं ताडण केलें. ह्यावरून लोकांमध्येंसुद्धां, चतुष्पाद जनावरांत जे पादताडनांत कुशल असतील त्यांस अश्व ही संज्ञा देत असतात.

## आख्यायिका ३५

ह्या लोकांत देवासुरांचें युद्ध झालें. त्यांत सहाव्या दिवशीं देवांनीं असुरांना ह्या लोकांतून हाकून लावलें. पुढें हत्तीवरून नेण्याइतकी आपली संपत्ति घेऊन असुर समुद्रकांठीं गेले व त्या समुद्रांत त्यांनीं ती टाकून दिली. नंतर पारुच्छेपीयच्छंदाचें अनुष्ठान करून देव त्यांच्या पाठोपाठ गेले. आणि पारुच्छेपीय ऋकूरूपी अंकुशानें त्यांनीं ती सर्व संपत्ति समुद्रांतून काढून घेतली.

## आख्यायिका ३६

मनूचा मुलगा नाभानेदिष्ठ वेदाध्ययन करण्याकरतां गुरुगृहीं ब्रह्मचर्य व्रतानें राहिला असतां पाठीमागें त्याच्या वडील भावांनीं आपल्या पित्याची सर्व मिळकत आपसांत वांटून घेतली. नाभानेदिष्ठाचा भाग त्यांनीं काढला नाहीं. कांहीं दिवसांनीं, वेदाध्ययन समाप्त करून नाभानेदिष्ठ घरीं परत आल्यावर आपल्या भ्रात्यांस विचारूं लागला

कीं, 'माझ्या वांट्याला तुम्ही काय मिळकत घातली आहे?' त्या भावांनीं पिता मनु ह्याच्याकडे बोट दाखवून उत्तर दिलें, 'आम्हांला कांहीं ठाऊक नाहीं. धर्मशास्त्रवेत्ता व कोणाला काय मिळावयाचें हें जाणणारा जो पिता त्यालाच तूं विचार.' ह्याप्रमाणें भ्रात्यांकडून उत्तर मिळाल्यावर तो नाभानेदिष्ठ पित्याकडे येऊन त्यास म्हणूं लागला, 'हे तात, माझा भाग तुझ्याजवळ आहे तो मला दे.' तेव्हां मनु म्हणाला 'हे पुत्रक, तूं आपल्या भ्रात्यांच्या वचनावर विश्वास ठेवूं नको. तुझ्या भावांनींच सर्व धन घेतलें. पण तुला मी धनप्राप्तीचा एक उपाय सांगतों. जवळच अंगिरस नामक महर्षी स्वर्गप्राप्तीची इच्छा धरून यज्ञ करीत आहेत. परंतु सहाव्या दिवसाच्या अनुष्ठानांत मन्त्र पुष्कळ असल्यामुळें ते कोठें तरी चुकतात व त्यांचा यज्ञ समाप्त होत नाहीं. तरी सहाव्या दिवशीं तूं तेथें जाऊन त्यांना "इदमित्थ" व "ये यज्ञेन" हीं दोन सूक्तें सांग म्हणजे त्यांचा यज्ञ समाप्तीस जाईल, व ते स्वर्गास जातेवेळीं अवशिष्ट राहिलेलें सर्व धन तुला देतील.'

नंतर तो नाभानेदिष्ठ अंगिरस ऋषींकडे येऊन त्यांस म्हणाला 'हे बुद्धिमान् ऋषीहो, मनुपुत्र जो मी त्या माझा स्वीकार करा.' ह्यावर ते ऋषि म्हणाले, 'तूं काय हेतूनें असें म्हणत आहेस?' तेव्हां नाभानेदिष्ठानें उत्तर केलें; 'तुमचें सहाव्या दिवसाचें अनुष्ठान पुरें कसें होईल तें मी तुम्हांस सांगतों. यज्ञ समाप्त होऊन तुम्ही स्वर्गास जाऊं लागला म्हणजे अवशिष्ट राहिलेलें सहस्रसंख्याक धन मला द्या.' त्या ऋषींनीं ही गोष्ट कबूल केली. तेव्हां नाभानेदिष्ठानें बापानें सांगितलेलीं दोन सूक्तें त्यांस सांगून त्यांचा यज्ञ पार पाडला.

तेव्हां स्वर्गाला जाणारे अंगिरस नाभानेदिष्ठाला म्हणाले; 'हे

ब्राह्मणा, यज्ञभूमीवर शिल्लक राहिलेल्या हजार गायी आम्ही तुला दिल्या आहेत.' त्याप्रमाणें नाभानेदिष्ठ हें धन गोळा करीत आहे तों इतक्यांत त्या यज्ञभूमीवर कृष्णवस्त्र परिधान केलेला पशुपति अवतीर्ण झाला व त्यास म्हणूं लागला कीं, 'हें पशुसहस्र माझें आहे. कारण यज्ञसमाप्तीनंतर जें कांहीं अवशिष्ट राहील त्याच्यावर माझी सत्ता आहे.' नाभानेदिष्ठानें उत्तर केलें "पण मला हें अंगिरस ऋषींनीं दिलें आहे." तेव्हां तो पुरुष त्याला म्हणूं लागला कीं, 'ज्याअर्थी ह्या धनावर सत्ता कोणाची ह्याबद्दल संशय आहे त्याअर्थी तूं व मी दोघेहि तुझ्या पित्यालाच ह्या प्रश्नाचा निकाल करण्यास सांगूं.' त्याप्रमाणें विचारण्याकरतां नाभानेदिष्ठ पित्याकडे चालता झाला. पित्यानें त्याला पाहतांच विचारलें; 'हे मुला, तुला अंगिरस ऋषींनीं द्रव्य दिलें काय?' तो म्हणाला 'होय दिलें; पण कोणी एक कृष्णवस्त्र परिधान केलेला पुरुष यज्ञभूमीवर उत्तरेच्या बाजूनें येऊन यज्ञावशिष्ट द्रव्य माझें आहे असें म्हणून घेता झाला.' मनूनें तेव्हां मुलाला म्हटलें; 'हे मुला, तें द्रव्य त्याचें खरेंच; कारण यज्ञावशिष्ट स्वामी व पशुपति ह्या दोनहि नात्यांनीं त्याची त्या द्रव्यावर सत्ता आहे. तथापि तूं जा. तो तुला तें धन देईल.' पित्याच्या आज्ञेप्रमाणें यज्ञभूमीवर जाऊन नाभानेदिष्ठानें त्या पशुपतीस 'हें धन तुझेंच आहे' म्हणून पित्यानें म्हटल्याचें सांगितलें. हें ऐकून रुद्रानें म्हटलें, 'ज्याअर्थी तूं सत्य भाषण केलेंस त्याअर्थी हें धन मी तुलाच देतों.' असें म्हणून त्यानें नाभानेदिष्ठाला तें सर्व धन देऊन टाकलें.

## आख्यायिका ३७

देवांनीं एकदा यज्ञ करण्यास आरंभ केला. तो यज्ञ करीत असतां 'ह्यांच्या यज्ञाचा आपण नाश करूं' असा हेतु धरून असुर व राक्षस

यज्ञभूमीवर आले. यज्ञभूमीची दक्षिणेकडील बाजू कोणी रक्षक नसल्याकारणानें दुर्बल आहे असें पाहून ते त्या बाजूला आले. देवांनीं हें जाणून दक्षिणेकडे मित्रावरुण पाठविले, व त्यांच्याकडून असुर आणि राक्षस ह्यांचा पराभव करविला.

दक्षिणेकडे पराभव झाल्यानंतर ते असुर यज्ञाच्या मध्यभागीं आले. देवांनीं तें पाहून इंद्राला तिकडे पाठविला व त्याच्याकडून त्या बाजूस त्यांनीं दैत्यांचा पराभव करविला.

मध्यभूमीवर पराभूत झालेले ते दैत्य उत्तरेकडून यज्ञभूमीवर शिरूं लागले. हें कळल्यावर देवांनीं इंद्राग्नींना तिकडे रवाना केलें, व त्यांच्या बलावर त्यांनीं असुरराक्षसांचा पराजय केला.

ह्याप्रमाणें उत्तरेकडे पराजित झाल्यावर ते असुर चांगलें सैन्य घेऊन यज्ञभूमीच्या पूर्वदिशेस प्राप्त झाले. देवांना हें समजतांच त्यांनीं त्या दिशेस अग्नीची योजना केली व तेथून त्यांना पिटाळून लावलें.

इकडे पराजय झाल्यावर असुर पश्चिमेकडून प्रवेश करूं लागले. तें पाहून देवांनीं त्यांचे विशेष आप्त जे विश्वेदेव त्यांस पश्चिमेकडे पाठवून तेथें त्यांनीं त्या असुरांचा आणि राक्षसांचा विश्वेदेवांकडून पराभव करविला.

अशा रीतीनें सर्व बाजूंनीं देवांनीं असुरांचा पराभव केला.

देवांनीं त्या पापी असुरराक्षसांचा ह्याप्रमाणें पराभव केला व ते स्वर्गास जाते झाले.

## आख्यायिका २८

वलराक्षसाच्या घरांत देवांना (आपल्या हरवलेल्या) गायी आढळल्या. त्या यज्ञाच्या योगानें प्राप्त करून घेण्याचा त्यांनीं निश्चय

केला. षडह यज्ञ करून त्यांनीं त्या गायी मिळविल्या. प्रातःसवनांत नभाकऋषीनें पाहिलेलें स्तोत्र म्हणून त्यांनीं वलाचें ताडन केलें; ताडन होतांच तो अगदीं शिथिल झाला. पुढें तृतीय सवनांत वाल-खिल्याख्य ऋग्रूपी वज्रानें वलाला पक्का जेर करून देवांनीं आपल्या सर्व गाई परत आणल्या.

## आख्यायिका ३९

ऐतश नामक मुनि 'अग्नेरायुः' ह्या नांवाचें मंत्रकाण्ड पाहता झाला. ह्याच काण्डाला कांहीं याज्ञिक यज्ञाचें अयातयाम (रसभरित भाग) असें म्हणतात. तो आपल्या मुलांना म्हणाला, "मुलांनों, मी 'अग्नेरायुः' नामक मंत्र पाहिले आहेत, ते मी म्हणतों; मी जें कांहीं म्हणेन त्याचा तुम्ही उपहास करूं नका." (असें बोलून) त्यानें म्हणण्यास प्रारंभ केला.

ह्याप्रमाणें तो मुनि मंत्र म्हणत असतां अभ्यग्नि नामक त्याच्या पुत्रानें आपला बाप वेड्यासारखा बडबडत आहे असें समजून समोरून उठून जवळ येऊन हातानें त्याचें तोंड बंद केलें.

तेव्हां मुनि त्याला म्हणाला, "तूं माझी वाणी बंद केलीस, तुला ऐकण्याचाच कंटाळा आहे, तूं येथून चालता हो. अल्पायुषी गायीला मी शतायुषी करीन अगर पुरुषाला सहस्रायुषी करीन (इतका माझा पराक्रम आहे). तूं माझा अपमान केला आहेस; तस्मात् तुझीं मुलें अत्यंत पापी निपजतील." ह्यावरून और्व गोत्रोत्पन्न एतश मुनीचें अभ्यग्निप्रमुख वंशज झाडून सारे अत्यंत पापी आहेत असें लोक मानतात.

## आख्यायिका ४०

देव आणि अंगिरस ऋषि ह्यांची स्वर्गप्राप्तीकरितां स्पर्धा चालली होती. 'आम्ही स्वर्गास प्रथम जाऊं' असें प्रत्येकजण म्हणे. यज्ञाला प्रथम आरंभ करणारे जे अंगिरस महर्षि त्यांनीं स्वर्गलोकप्राप्तीला साधनीभूत जो सोमाभिषव तो दुसऱ्या दिवशीं करण्याचें (एक दिवस) निश्चित केलें. त्यांनीं आपल्यापैकीं अग्नि नामक ऋषीला देवाकडे पाठविला. ते त्याला म्हणाले; 'हे अग्ने, तूं जा आणि स्वर्गाचें द्वार प्राप्त करून देणारा सोमाभिषव आम्ही उद्यां करणार आहों त्याकरितां तुम्ही (आर्त्विज्य करण्यास) या असें सांग.' अग्नीला पाहतांच स्वर्ग-लोकदायक अभिषव ताबडतोब करण्याचें देवांनीं ठरविलें. देवांकडे येऊन अग्नि म्हणाला 'स्वर्गलोकप्राप्तिकारक सोमाभिषव उद्यां आम्ही करणार त्याकरतां तुम्हांस आमंत्रण देत आहें.' त्यावर देव म्हणाले, स्वर्गलोक मिळवून देणारा सोमाभिषव आम्ही आतांच करतों व तुम्हांस आमंत्रण देतों. तूंच आमचें होतृत्व पतकर, तुझ्यासह आम्ही स्वर्गाला जाऊं.' अग्नीनें तें मान्य केलें व परत तो अंगिरसां-कडे आला.

आंगिरसांनीं त्याला विचारलें, 'आमचा निरोप तूं देवांना सांगितलास काय?' 'होय सांगितला' असें अग्नीनें उत्तर देऊन देवांनीं त्याला जें प्रत्युत्तर दिलें तेंहि त्यानें निवेदन केलें. त्यावर आंगिरस म्हणाले, 'काय तूं देवांचें होतृत्व नाकबूल केलें नाहींस?' 'मीं तें पतकरलें' असा अग्नीनें जबाब दिला. 'जो ऋत्विक्‌पणा पतकरतो तो यशस्वी होतो. जो तो सोडून येतो तो यशहीन असतो. म्हणून मी आमन्त्रणाचा प्रतिकार केला नाहीं.'

त्यानंतर सर्व आंगिरस ऋषींनीं यज्ञ पार पाडण्यांत देवांना मदत

केली. याजन करणाऱ्या आंगिरसांना दक्षिणेच्या प्रसंगीं ही सर्व पृथ्वी देवांनीं दिली. प्रतिग्रहानंतर पृथ्वीनें त्यांना जाळलें. म्हणून त्यांनीं तिला टाकलें. तेव्हां ती सिंहीण होऊन धावूं लागली व लोकांना खाऊं लागली. ह्याप्रमाणें भूमि संतापली असतां तिच्यावर हल्लीं दृग्गोचर होणारे प्रदर पडले. त्यापूर्वीं ती अगदीं सारखी म्हणजे सपाट होती.

## आख्यायिका ४१

इक्ष्वाकु वंशांतील वेधस राजाचा पुत्र हरिश्चन्द्र हा निपुत्रिक होता. त्याला शंभर बायका होत्या. त्यामध्यें एकीलाहि पुत्र झाला नाहीं. हरिश्चन्द्राच्या घरांत पर्वत व नारद असे ऋषि रहात असत. त्यांपैकीं नारदाला त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें प्रश्न केला.

" ज्याअर्थीं विचारशील ( मनुष्य ) आणि विवेकहीन ( पशु ) सर्व प्राणी पुत्राची इच्छा करतात त्याअर्थीं पुत्राच्या योगानें काय फल मिळतें हें नारदा मला सांग. "

नारद म्हणालाः—" जन्मलेल्या व जिवंत असलेल्या पुत्राचें मुख जो पिता पाहतो तो त्या पुत्राच्या रूपानें आपलें ऋण फेडतो व अमर होतो. पृथ्वी, अग्नि आणि उदक ह्यांपासून प्राण्यांना जीं सुखें प्राप्त होतात त्या सर्वांहून अधिक सुख पित्याला पुत्राच्या ठिकाणीं अनुभवितां येतें. "

" पुत्राच्यायोगानें पिते नेहमीं मोठमोठीं संकटें पार पाडून गेले आहेत. ( पुत्र उत्पन्न झाला म्हणजे ) आपल्यापासून आपण उत्पन्न होतो. तो ( पुत्र ) अन्नसामग्रीनें भरलेली नौकाच होय."

" मलीन ( गृहस्थाश्रमी ) राहून काय उपयोग ? हरणाचें चामडें ( ब्रह्मचर्याश्रमी ) वापरून काय करावयाचें ? श्मश्रु ( वान-

प्रस्थाश्रम ) कशाकरतां ? तप ( पारिव्राज्य ) काय म्हणून ? हे ब्राह्मण हो, पुत्रप्राप्तीची इच्छा करा. खरोखर पुत्रलोकाची निंदा करणें अयोग्य आहे. "

" अन्न प्राण रक्षितें. वस्त्र गृहाप्रमाणें थंडीचें निवारण करतें. सुवर्ण सौंदर्य वाढवितें. विवाहांच्या योगानें पशूंची समृद्धि होते. जाया ही मित्राप्रमाणें असते. कन्या दुःखदायक असते. परंतु पुत्र हा अत्युच्च आकाशांत ज्योतीप्रमाणें उपयोगी पडतो. "

" पुढें माता होणारी जी आपली स्त्री तिच्या ठिकाणीं पति गर्भ होऊन प्रवेश करतो. तिच्या ठिकाणीं पुनः नवीन ( बालरूप ) होऊन दहाव्या महिन्यांत जन्मास येतो. "

" स्त्रीच्या ठिकाणीं पुनः ( पति ) उत्पन्न होतो. म्हणून तिला ' जाया ' म्हणतात. तिच्या ठिकाणीं बीज सिंचन केलें जातें म्हणून तिला 'भूति ' व 'अभूति' हीं नांवेंहि प्राप्त झालीं आहेत."

"देव आणि ऋषि ह्यांनीं हिच्या ठिकाणीं मोठें तेज प्रस्थापित केलें." देव मनुष्यांना म्हणाले, 'ही तुमची पुन्हा आई होईल.'

"पुत्रहीनाला लौकिकसुख प्राप्त होत नाहीं हें सर्व पशूंनासुद्धां माहीत आहे, म्हणून ( पशुजातींत ) पुत्र, माता किंवा बहीण यांच्याबरोबर समागम करितो."

"पुत्र ज्यांना आहेत असे लोक शोकरहित होऊन जो मार्ग आक्रमितात तोच हा सर्वांच्या तोंडीं असलेला मार्ग होय. पशुपक्ष्यांना तो माहित आहे म्हणून ते मातेबरोबरहि समागम करितात."

याप्रमाणें नारदांनीं सांगितलें.

नंतर हरिश्चंद्राला नारद म्हणाला, "मला पुत्र होवो; त्या पुत्रानें तुला उद्देशून मी यज्ञ करीन,' असें राजा वरुणाला जाऊन सांग."

'बरें आहे' असें म्हणून तो वरुणराजाजवळ आला व 'मला पुत्र होऊं दे, त्या पुत्रानें तुला उद्देशून मी यज्ञ करीन' असें म्हणाला; त्यावर 'बरें आहे' असें वरुणानें उत्तर दिलें. हरिश्चंद्राला रोहित नांवाचा मुलगा झाला.

हरिश्चंद्राला वरुण म्हणाला, 'तुला मुलगा झाला आहे त्यानें आतां मला उद्देशून तूं यज्ञ कर.' हरिश्चंद्र म्हणाला, 'दहा दिवस झाल्यानंतर पशु यज्ञास योग्य होतो, दहा दिवस होऊन जाऊं दे, नंतर मी तुझें यजन करीन.' वरुण म्हणाला, 'ठीक आहे'.

दहा दिवसांहून जास्त दिवसांचा तो झाला. तेव्हां वरुण त्याला म्हणाला, ' याला दहा दिवस होऊन गेले. आतां ह्यानें माझें यजन कर.' तो म्हणाला 'पशूला दांत आले म्हणजे मग तो यज्ञास योग्य होतो. ह्याला दांत येऊं दे, नंतर मी तुझें यजन करीन.' ' बरें आहे' असें वरुणानें म्हटलें.

त्याला दांत आले तेव्हां तो हरिश्चंद्राला म्हणाला, 'ह्याला दांत आले. आतां ह्यानें माझ्याकरितां यज्ञ कर.' तो म्हणाला, 'पशूचे दांत पडतात तेव्हां तो यज्ञास योग्य होतो, ह्याचे दांत पडूं दे, नंतर मी तुझें यजन करीन.' वरुणानें हेंहि कबूल केलें.

त्याचे दांत पडले तेव्हां त्याला वरुण म्हणाला, 'ह्याचे दांत पडले. ह्यानें माझें आतां यजन कर.' तो म्हणाला 'पशूला जेव्हां पुनः दांत येतात तेव्हां तो यज्ञास पात्र होतो म्हणून याला दांत येऊं दे. नंतर मी तुला उद्देशून यज्ञ करीन.' 'बरें, असें वरुण म्हणाला.

त्याला पुनः दांत आले. तेव्हां वरुण त्याला म्हणाला. 'ह्याला पुनः दांत आले आहेत. त्यानें आतां मजसाठीं यज्ञ कर.' 'क्षत्रिय जेव्हां कवच धारण करण्यासारखा होतो तेव्हांच तो यज्ञास योग्य होतो.

याचे अंगावर कवच पडूं दे नंतर मी यज्ञ करीन.' वरुण म्हणाला 'तसें होऊं दे.'

तो कवच घालूं लागला तेव्हां हरिश्चंद्राला वरुण म्हणाला, 'ह्याला कवच प्राप्त झालें आहे. ह्यानें माझें यजन कर.' 'करतों' असें म्हणून हरिश्चंद्रानें आपल्या मुलास हांक मारिली व त्याला म्हणाला, 'हे पुत्रा, ह्यानें तुला मला दिलें आहे, म्हणून पशूच्याऐवजीं तुलाच देऊन मी ह्याचें यजन करतों.'

हरिश्चंद्राच्या मुलानें ही गोष्ट नाकबूल केली. 'नाहीं' असें म्हणून धनुष्य घेऊन अरण्यांत चालता झाला. एक वर्षभर तो अरण्यांत राहिला.

नंतर हरिश्चंद्राला वरुणानें पछाडलें. त्याला उदर झाला, ही हकीकत रोहिताच्या कानावर आली. तो अरण्यांतून एका गांवीं आला. तेथें त्याला पुरुषरूप धारण केलेला इंद्र भेटला आणि म्हणाला, हे रोहिता, आम्ही असें ऐकत आलों कीं जो फिरत नाहीं त्याला संपत्ति प्राप्त होत नाहीं. श्रेष्ठ मनुष्यसुद्धां मनुष्यांत राहील तर पापी होतो. फिरत राहणाऱ्या तुझा प्रत्यक्ष इंद्र साहाय्यकर्ता होईल म्हणून तूं फिरतच रहा.'

'फिरत रहा' असें ब्राह्मणानें आपणांस सांगितलें आहे म्हणून आणखी एक वर्ष तो अरण्यांत फिरत राहिला; नंतर तो अरण्यांतून गांवीं आला. तेथें त्याला इंद्र पुरुषरूपानें येऊन म्हणाला, 'फिरणाऱ्याच्या मांड्या पुष्पयुक्त वृक्षाप्रमाणें होत. त्यांचें वृद्धिंगत पावणारें शरीर आरोग्यरूप फलानें युक्त होतें. याचीं सर्व पापें मार्गांत होणाऱ्या श्रमानें नष्ट होऊन पडतात, म्हणून तूं फिरतच रहा.'

'फिरत रहा' असें ब्राह्मणानें आपणांस सांगितलें आहे असें समजून त्यानें तिसरें वर्ष अरण्यांत फिरून काढलें. नंतर तो अरण्यांतून गांवीं जाण्यास निघाला. त्याला इंद्र पुरुषरूपानें येऊन म्हणाला, "बसून राहणाऱ्यांचें नशीब खालीं बसतें, उभें राहणाऱ्यांचें उभें राहतें, निजून राहणाऱ्यांचें निजलें जातें, चालणाऱ्यांचें चालतें, म्हणून तूं फिरत रहा."

'फिरत रहा' असें ब्राह्मणानें सांगितलें म्हणून चौथें वर्षहि त्यानें अरण्यांत फिरून काढलें. नंतर तो अरण्यांतून गांवीं येण्यास निघाला. तेथें त्याला इंद्र पुरुषरूपानें येऊन म्हणाला, 'निजणारा कलीप्रमाणें होतो, निद्रेचा परित्याग करणारा द्वापराप्रमाणें होतो, उठून उभा राहणारा त्रेता होतो, व चालणारा कृताप्रमाणें होतो, म्हणून तूं फिरतच रहा.'

'फिरत रहा' असें ब्राह्मणानें आपणांस सांगितलें आहे म्हणून पांचवें वर्षहि त्यानें अरण्यांत फिरून काढलें. नंतर तो अरण्यांतून गांवीं येण्यास निघाला. तेथें त्याला इंद्र पुरुषवेषानें येऊन म्हणाला, 'फिरणाऱ्या मनुष्याला मध व गोड उदुंबराचीं फळें प्राप्त होतात. जो चालण्याला कधीं आळस करीत नाहीं, असल्या सूर्याचें श्रेष्ठत्व पहा. म्हणून तूं फिरतच रहा.'

'फिरत रहा' असें ब्राह्मणानें आपणांस सांगितलें आहे म्हणून सहावें वर्षहि त्यानें अरण्यांत फिरून काढिलें. पुढें त्याला क्षुधेनें व्याकुळ झालेला सूयवस् नामक ऋषीचा पुत्र अरण्यामध्यें भेटला.

त्या अजीगर्ताला शुनःपुच्छ, शुनःशेप, आणि शुनोलांगूल असे तीन मुलगे होते. त्याला रोहित म्हणाला, 'मी तुला शंभर गाई देतों, आणि ह्या तिघांपैकीं एकानें मी आपल्याला विकत घेतों.'

( तुझा एक मुलगा वरुणाला देऊन मी आपली मुक्तता करून घेतों. ) त्याबरोबर आपल्या वडील मुलाला देऊं न इच्छिणारा तो अजीगर्त रोहिताला म्हणाला, 'ह्याला तूं घेऊं नको.' त्याचप्रमाणें सगळ्यांत धाकट्या मुलाविषयीं आईनें सांगितलें; त्या दोघां आई-बापांनीं मधला मुलगा जो शुनःशेप त्याला देण्याचें निश्चित केलें. त्याला शंभर गाई देऊन शुनःशेपाला घेऊन रोहित अरण्यांतून गांवीं येण्यास निघाला. तो बापाजवळ येऊन म्हणाला, 'बाबा मी ह्याला ( शुनःशेपाला ) देऊन आपल्याला विकत घेतों.' असें म्हटल्यावर वरुणराजाजवळ येऊन 'ह्यानें ( शुनःशेपानें ) मी तुझें यजन करितों' असें म्हणाला. वरुण म्हणाला 'बरें आहे, क्षत्रियापेक्षांहि ब्राह्मण चांगला.' नंतर वरुणानें राजाला राजसूय यज्ञाचा विधि सांगितला. अभिषेचनीय नांवाच्या सोमयागाच्या दिवशीं पशूच्या ऐवजीं ह्या पुरुषाची ( शुनःशेपाची ) योजना करण्याचें हरिश्चंद्रानें निश्चित केलें.

ह्या यज्ञांत विश्वामित्र होता, जमदग्नि अध्वर्यु, वशिष्ठ ब्रह्मा, आणि अयास्य उद्गाता होता. पूर्वसंस्कार झाल्यानंतर त्याला ( शुनःशेपाला ) यूपाशीं बांधणारा त्यांना कोणी आढळेना, तेव्हां सूयवसाचा मुलगा अजीगर्त म्हणाला, 'मला आणखी शंभर गाई द्या, मी याला बांधीन.' त्यानें त्याला आणखी शंभर गाई दिल्या त्याबरोबर त्यानें त्याला बांधिलें.

उपाकर्मानंतर शुनःशेपाला बांधला. आप्री ऋचा म्हटल्या व त्याच्या भोंवतालीं अग्नि फिरविला; परंतु त्याचा वध करणारा त्यांना कोणी मिळेना; तेव्हां सूयवसाचा मुलगा अजीगर्त म्हणाला 'मला आणखी शंभर गाई द्या; मी याचा वध करीन.' त्याला त्यांनीं

आणखी शंभर गाई दिल्या. त्याबरोबर अजीगर्त आपली तरवार पाजवून ( मारण्याकरितां ) चालता झाला.

नंतर शुनःशेपानें विचार केला कीं, 'हे मला पशूप्रमाणें मारताहेत. मी देवतांची आराधना करितों.' 'कस्य नूनं' इ० ऋचा म्हणून देवांमध्यें वडील जो प्रजापति त्याची त्यानें आराधना केली. तेव्हां त्याला प्रजापति म्हणाला, 'अग्नि हा देवाच्या अगदीं जवळचा आहे, त्याचीच तूं उपासना कर.' तेव्हां त्यानें अग्नीची उपासना केली. अग्नि त्याला म्हणाला, 'सविता सर्व प्राण्यांचा स्वामी आहे त्याच्याकडे तूं जा,' म्हणून त्यानें सवित्याची आराधना केली. सविता त्याला म्हणाला 'राजा वरुणाकरितां तूं बद्ध झाला आहेस म्हणून त्याचीच तूं आराधना कर,' तेव्हां त्यानें वरुणाची आराधना केली.

त्याला वरुण म्हणाला, 'अग्नि हा देवांचें मुख आहे व तो अत्यंत दयाळू आहे त्याची तूं स्तुति कर, मग आम्ही तुला सोडूं,' त्यानें अग्नीचा स्तव केला.

तेव्हां त्याला अग्नि म्हणाला, 'विश्वेदेवांची प्रार्थना कर, नंतर तुला आम्ही बंधमुक्त करूं.' त्यानें विश्वेदेवांचें स्तवन केलें. तेव्हां त्याला ते म्हणाले 'सर्व देवांत इंद्र हा अत्यंत तेजस्वी, बलिष्ठ, काटक, सत्यनिष्ठ व कोणतेंहि कृत्य तडीस नेणारा असा आहे, तेव्हां त्याची तूं स्तुति कर, नंतर आम्ही तुला सोडूं.' त्याप्रमाणें इंद्राची त्यानें स्तुति केली या स्तुतीनें इंद्राचें मन प्रसन्न होऊन त्यानें त्याला सोन्याचा रथ दिला, व शुनःशेपानें त्याचा 'शश्वदिंद्र' ऋचा म्हणून स्वीकार केला.

इंद्रानें त्याला सांगितलें, 'तूं अश्विनीची स्तुति कर म्हणजे आम्ही तुला सोडूं;' तेव्हां त्यानें अश्विनींची स्तुति केली; तेव्हां

अश्विनींनीं त्याला सांगितलें, 'तूं उषेची स्तुति कर, नंतर आम्ही तुला सोडूं.' त्याप्रमाणें त्यानें उषेची स्तुति केली.

एकेक ऋचेबरोबर त्याचा पाश तुटूं लागला आणि हरिश्चंद्राचें उदर लहान होऊं लागलें. शेवटली ऋचा संपतांच तो पाशमुक्त झाला व हरिश्चंद्राचा रोग अजीबात गेला.

नंतर शुनःशेप विश्वामित्राच्या मांडीवर जाऊन बसला; तेव्हां सूयवसपुत्र अजीगर्त विश्वामित्राला म्हणाला, 'माझा मुलगा मला परत दे;' विश्वामित्र म्हणाला 'मी देणार नाहीं, मला हा देवांनीं दिला आहे.' तेव्हांपासून शुनःशेप हा 'देवरात' नांवाचा विश्वामित्राचा मुलगा झाला. कपिल गोत्री व बभ्रुगोत्री हे त्याचेच वंशज होत.

नंतर अजीगर्त शुनःशेपाला म्हणाला, 'तूं आमचेकडे ये. आम्ही तुला बोलावितों.' अजीगर्त पुन्हा म्हणाला 'तूं जन्मानें अंगिरस गोत्रांत उत्पन्न झाला असून अजीगर्ताचा मुलगा आहेस व विद्वान् म्हणून तुझी प्रसिद्धि आहे. हे ऋषे, तूं या वंशांतून जाऊं नको. माझ्याकडे तूं पुन्हा ये.' त्यावर शुनःशेपानें उत्तर केलें. 'शूद्राच्या हातांत जें मिळणार नाहीं असें खड्ग ( मला मारण्याकरितां ) तुझ्या हातांत लोकांनीं पाहिलें, हे अंगिर, मला टाकून तूं तीनशें गाई मिळविल्यास.'

अजीगर्त म्हणाला, 'हे मुला, मी केलेलें पाप मला ताप देत आहे त्याचा मी आतां परिहार करितों. मी मिळविलेल्या तीनशें गाई तुलाच असूं देत.' यावर शुनःशेप म्हणाला, जो एकदां पाप करितो तो नंतर दुसरेंहि पाप करूं शकतो. शूद्रजातीच्या क्रौर्यापासून तूं अद्यापि अलिप्त नाहींस. निष्कृति न करितां येण्यासारखें तूं पाप केलें आहेस.'

'होय निष्कृति न होण्यासारखें तें आहे' असें विश्वामित्रहि बोलला. तो आणखी म्हणाला, 'अजीगर्त शस्त्र घेऊन मारण्यास प्रवृत्त झाला तेव्हां तो भयंकर दिसत होता म्हणून तूं ह्याचा मुलगा हो.' शुनःशेप म्हणाला 'हे राजपुत्र, जसा तूं क्षत्रिय असून ब्राह्मण समजला जातोस, त्याप्रमाणें मी अंगिर कुलोत्पन्न असून तुझा मुलगा कसा होऊं तें सांग.' विश्वामित्र म्हणाला, 'तूं आमच्या सर्व पुत्रांत ज्येष्ठ हो. तुझी प्रजा सर्वांत श्रेष्ठ होईल. देवांनीं मला दिलेलें जें पुत्रत्वरूपी दाय तें तुला प्राप्त होवो. त्यानेंच (पुत्र म्हणून) मी तुला हाक मारीन.'

तो शुनःशेप पुन्हा म्हणाला, 'हे भरतश्रेष्ठ, तुझे सर्व मुलगे या गोष्टीस कबूल झाले म्हणजे ज्याच्यायोगानें मला तुझें पुत्रत्व प्राप्त होईल, त्यांचें प्रेम माझ्यावर राहील व त्यांजकडून मला संपत्ति प्राप्त होईल अशा रीतीनें तूं त्यांना सांग.' नंतर विश्वामित्र आपल्या मुलांस म्हणाला, 'हे मधुच्छंद, ऋषभ, रेणु, अष्टक ऐका; जे तुम्ही भाऊ आहां ते तुम्ही ह्यालाच ज्येष्ठ बंधु म्हणून समजा.'

विश्वामित्राला शंभर मुलगे होते. मधुच्छंदाहून पन्नास वडील व पन्नास कनिष्ठ. त्यांपैकीं वडील भावांना ही गोष्ट रुचली नाहीं, त्यामुळें विश्वामित्रानें त्यांना असा शाप दिला, 'तुमची प्रजा हीन-जातीची होईल.' ह्या शापामुळें विश्वामित्राच्या वंशजांमध्यें अट्टल चोर व हीन जातींत उत्पन्न झालेले असे पुष्कळ आहेत व त्यांपैकींच अंध्र, पुंड्र, शबर, पुलिंद, मूतिब हे होत; पण आपल्या पन्नास लहान भावांसह मधुच्छंद (शुनःशेपाला) म्हणाला– 'जें आमच्या पित्याला पसंत पडलें त्याप्रमाणें आम्ही चालूं. आम्ही तुला पुढें करतों आणि आम्ही सर्व तुझे पाठीमागून येऊं.' ह्यामुळें विश्वा-

मित्राचा विश्वास बसला व त्यानें आपल्या मुलाची प्रशंसा केली. तो म्हणाला, 'तुम्ही माझें म्हणणें ऐकलें व मला वीरमान् पुत्र असा केला त्यामुळें, हे पुत्रांनो, तुमच्याजवळ पुष्कळ पशु असतील व तुम्हांला वीर पुत्र प्राप्त होतील. हे वीरपुत्रयुक्त गाधिपौत्र हो, देवरात हा तुमचा पुढारी असल्यावर तुम्ही सर्व यशस्वी व्हाल. हा तुम्हांला सन्मार्ग दाखवील. हे कुशिकवंशज, हा वीर देवरात तुमचा आहे. त्याचे तुम्ही अनुयायी बना. माझी वडिलार्जित मिळकत तुम्हांला व त्याला प्राप्त होईल व तुम्हांला जी विद्या येत आहे तीहि तुम्हांला अवगत होईल. गाधीचे नातू व माझे पुत्र असे जे धनसंपन्न असून देवरातांचें पोषण करण्यास व त्याचें श्रेष्ठत्व मान्य करण्यास सारखेच तयार झाले, ते सर्व प्रशंसनीय होत.'

## आख्यायिका ४२

प्रजापतीनें यज्ञ केला. यज्ञानंतर ब्राह्मण आणि क्षत्रिय अशा दोन जाती निर्माण केल्या. ब्राह्मण आणि क्षत्रियांच्या नंतर यज्ञान्न खाणारी आणि यज्ञान्न न खाणारी अशा दोन प्रकारच्या प्रजा उत्पन्न केल्या. ब्राह्मणांच्या नंतर यज्ञान्न खाणारी प्रजा उत्पन्न केली. व क्षत्रियांच्या उत्पत्तीनंतर यज्ञान्न न खाणारी प्रजा उत्पन्न केली. जे ब्राह्मण आहेत ते यज्ञान्न खाणारे व जे क्षत्रिय, वैश्य, शूद्र ते यज्ञान्न न खाणारे होत.

ह्या प्रजांपासून यज्ञ दूर चालता झाला. त्यांच्या पाठीमागून ब्राह्मण व क्षत्रिय गेले. ब्राह्मणांचीं जीं आयुधें होतीं तीं ब्राह्मण घेऊन गेले व क्षत्रियांचीं जीं आयुधें होतीं तीं घेऊन क्षत्रिय गेले. यज्ञाचीं आयुधें तींच ब्राह्मणांचीं आयुधें होत. अश्वयुक्त रथ, कवच, धनुष्य व बाण हीं क्षत्रियांचीं आयुधें होत.

यज्ञप्राप्ति न होतां क्षत्रिय मागें फिरले. क्षत्रियांच्या आयुधांना भिऊन यज्ञ दूर पळून गेला. नंतर त्याच्या पाठीमागून ब्राह्मण गेले. त्यांनीं त्याला गांठून त्याचा पुढचा मार्ग बंद करून ते उभे राहिले. ह्याप्रमाणें ब्राह्मणांनीं गांठून ज्याचा पुढील मार्ग बंद केला आहे, असा तो यज्ञ स्तब्ध उभा राहिला. (ब्राह्मणांच्या हातांत असलेलीं) आयुधें आपलींच आहेत असें पाहून तो ब्राह्मणांकडे गेला. म्हणून अद्यापिहि यज्ञ हा ब्राह्मणांमध्येंहि जे विद्वान् ब्राह्मण आहेत, त्यांच्याच ठिकाणीं प्रतिष्ठित झालेला आहे (म्हणजे यज्ञामध्यें ब्राह्मणांनाच आर्त्विज्य करितां येतें.)

नंतर ब्राह्मणांकडे क्षत्रिय गेले आणि म्हणाले, 'ह्या यज्ञांत आम्हांला तुम्ही बोलवा.' ते म्हणाले 'ठीक आहे, परंतु तुम्ही आपलीं आयुधें घेऊन ब्राह्मणांचींच आयुधें घेऊन ब्राह्मणांचीं रूपें धारण करून, आणि ब्राह्मणांसारखे होऊन यज्ञाकडे या.' क्षत्रियांनीं त्याप्रमाणें केलें. त्यांनीं आपलीं आयुधें खालीं ठेविलीं व ब्राह्मणांच्याच आयुधांनीं ब्राह्मणांचा वेष धारण करून ब्राह्मण होऊन ते यज्ञाकडे आले; म्हणून हल्लींहि क्षत्रिय यजमान आपलीं आयुधें ठेऊन ब्राह्मणांचींच आयुधें घेऊन व ब्राह्मणांचा वेष धारण करून ब्राह्मणासारखा होऊन यज्ञ करितो.

## आख्यायिका ४३

सुषद्म राजाचा मुलगा विश्वंतर यानें यज्ञाला श्यापर्णनामक ब्राह्मणांना न बोलावतां विश्यापर्ण ब्राह्मणांना बोलावलें; ही गोष्ट समजतांच श्यापर्ण ब्राह्मण यज्ञाच्या ठिकाणीं आले व ते वेदीशेजारीं येऊन बसले. त्यांना पाहून राजा (आपल्या नोकरांना) म्हणाला, 'हे श्यापर्ण ब्राह्मण, पापकर्म व निंद्यभाषण करणारे येथें बसले आहेत

त्यांना हाकलून लावा, हे माझ्या वेदींत बसतां कामा नये.' 'बरें आहे' असें म्हणून त्यांनीं त्यांना तेथून हाकून लाविलें.

तेथून उठवून लावल्यावर ते मोठ्यानें ओरडून म्हणाले, 'पारिक्षित जनमेजयानें कश्यपांना न बोलावतां केलेल्या यज्ञांत कश्यपांपैकीं असितमृग नांवाचे ब्राह्मण होते त्यांनीं तेथें ( अगोदर आर्त्विज्य करीत असलेल्या ) भूतवीर नामक ब्राह्मणांपासून सोमयाग हस्तगत करून घेतला. हा जो कश्यपांनीं जय मिळविला त्याचें कारण त्यांच्यामध्यें हे असितमृग ब्राह्मण शूर होते, तर मग आपणांमध्यें असा कोण पराक्रमी आहे कीं, जो हा सोमयाग हरण करील ?' ( त्यावर ) 'हा तुमचा वीर मी आहें,' असें मृगवु नामक स्त्रीचा पुत्र राम म्हणाला.

हा मृगवुपुत्र राम श्यापर्णब्राह्मणांपैकीं असून वेदशास्त्रपारंगत होता. वेदींतून ब्राह्मण उठले तेव्हां तो राजाला म्हणाला, 'हे राजा, यागसंबंधीं ज्ञान असलेल्या मलासुद्धां तुझे नोकर वेदींतून उठवतात ?' ( राजा म्हणाला ) 'हे ब्राह्मणाधम, इतकें धाष्ट्र्य करणारा जो तूं त्या तुला कसें ज्ञान असणार ?'

राम म्हणाला, 'पूर्वी इंद्रानें त्वष्ट्याचा पुत्र जो विश्वरूप त्याची अवहेलना केली, वृत्र मारिला, कोल्ह्यांपुढें यतींना फेंकून दिलें, अरुर्मघांची हत्या केली, बृहस्पतीला प्रत्युत्तर केलें, ह्या अपराधांमुळें देवतांनीं इंद्राला यज्ञांतून घालविला, त्यामुळें इंद्राला सोमपान मिळेनासें झालें. इंद्राला सोमपान मिळेनासें झालें त्याबरोबर सर्व क्षत्रियांचेंहि सोमपान बंद पडलें, परंतु इंद्रानें त्वष्ट्यापासून बळजबरीनें सोमपान मिळविलें. अद्यापि बाकीचे क्षत्रिय सोमपानाशिवाय राहिले आहेत. ज्याच्यायोगानें क्षत्रिय समृद्ध होतात असें सोमपान

ज्यांना नाहींसें झालें आहे, अशा क्षत्रियाचें भक्ष्य ज्याला ठाऊक आहे त्याला ह्या वेदींतून तुझे लोक कसे उठवितात' ? ( विश्वंतर म्हणाला ) 'हे ब्राह्मणा' काय तुला तें भक्ष्य ठाऊक आहे ?' 'होय मला ठाऊक आहे' असें ( रामानें ) उत्तर दिलें. तर मग 'हे ब्राह्मणा सांग.' 'हे राजा तुलाच सांगतों' असें राम म्हणाला.

'सोम, दहीं किंवा उदक या तीन भक्ष्यांपैकीं एक भक्ष्य ( ऋत्विज ) घेतील. ब्राह्मणांचें भक्ष्य असलेला सोम जर त्यांनीं घेतला तर त्याच्यायोगें तूं ब्राह्मणांना संतुष्ट करशील. तसें झालें म्हणजे तुझे संततींत कोणी तरी ब्राह्मणासारखा निपजेल म्हणजे तो प्रतिग्रह घेईल, सोमपान करील, भिक्षा मागेल, वाटेल तेव्हां धिः-कारून देण्याच्या योग्यतेचा होईल. क्षत्रियाकडून चूक झाल्यास त्याच्या संततींत ब्राह्मणासारखी ( शौर्यरहित ) संतति होते. त्याच्यापासून दुसरी किंवा तिसरी पिढी ब्राह्मण होण्यास समर्थ होते. ब्राह्मणांबरोबर बंधुत्वानें राहण्याची ती इच्छा करील.'

'वैश्यांचें भक्ष्य असलेलें दहीं जर ते तुला देतील तर त्या भक्ष्यामुळें वैश्यांना प्रिय होशील. तुझी प्रजा वैश्यगुणी होईल, म्हणजे दुसऱ्याला कर देणारी, दुसऱ्याचें खाद्यच खाणारी व राजाच्या मर्जीप्रमाणें जुलूम ज्यांच्यावर करितां येतो अशी होईल. क्षत्रियाच्या हातून अशी कृति झाल्यास त्याला वैश्यासारखी प्रजा होते. त्याच्यापासून दुसरी किंवा तिसरी पिढी वैश्य होण्यास समर्थ होते व ती वैश्यवृत्तीनें राहण्यास प्रवृत्त होते.'

शूद्राचें भक्ष्य जें उदक तें जर ते तुला देतील तर त्या भक्ष्यामुळें तूं शूद्रांना संतोषविशील. तुझी प्रजा शूद्रासारखी दुसऱ्याची चाकर, धन्याच्या मर्जीस येईल तेव्हां घालवून टाकली जाणारी,

ताडन केली जाणारी, अशी होईल. क्षत्रियाकडून असा प्रमाद घडल्यास शूद्रासारखी त्याला प्रजा होते. त्याच्यापासून दुसरी किंवा तिसरी पिढी शूद्र होण्यास समर्थ होते व शूद्रवृत्तीनें राहण्यास प्रवृत्त होते.'

तो म्हणाला, 'हे राजा यज्ञ करणाऱ्या क्षत्रियानें ह्या तीन प्रकारच्या भक्ष्यांची इच्छासुद्धां करूं नये. आतां त्याचें स्वतःचें भक्ष्य सांगतों. वडाच्या पारंब्या, उदुंबर, पिंपळ आणि पायरी यांचीं फळें ह्यांचा रस काढून तो प्यावा, तें त्याचें स्वतःचें भक्ष्य होय.' ह्याप्रमाणें भार्गवेय रामानें सुषद्मपुत्र विश्वंतराला हें भक्ष्य सांगितलें. रामाचें सांगून झाल्यावर तो राजा त्याला म्हणाला, 'हे ब्राह्मणा, तुला मी सहस्र गाई देतों आणि माझ्या यज्ञांत श्यापर्ण ब्राह्मण असोत.'

# अष्टपुत्रे आणि दशपुत्रे

ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मणांत अष्टपुत्रे आणि दशपुत्रे या दोन भिन्न उपनावांचीं कुटुंबें आहेत त्यांना हीं आडनांवें पडण्याचें कारण काय असावें असा प्रश्न कोणाच्याहि मनाला सुचणें अगदीं स्वभाविक आहे. पूर्वी कधीं काळीं एखाद्या मनुष्यास आठ मुलगे व दुसऱ्यास दहा मुलगे झाले असावे व म्हणून ह्या उभयतांस व पुढें त्यांच्या वंशजांस अष्टपुत्रे व दशपुत्रे ह्या अनुक्रमानें लोक संबोधूं लागले असें उत्तर वरवर विचार करणाऱ्यांकडून प्रायः दिलें जातें. परंतु हा तर्क किंवा ही कल्पना अगदींच असंभाव्य व अयथार्थ दिसते. आठ किंवा दहा मुलगे एखाद्यास असणें यांत कांहीं असंभाव्य नाहीं तथापि त्या बरोबरच एक, दोन, तीन, चार, पांच, सहा, नऊ, ह्याप्रमाणें दुसरे कित्येकांस पुत्र होणें हेंहि संभवनीय किंबहुना अधिक संभवनीय आहे. परंतु एकपुत्रे, द्विपुत्रे, पंचपुत्रे, सप्तपुत्रे, इत्यादि आडनांवें सांप्रदायांत आलेलीं कोठें आढळत नाहींत. पांचपुते, सातपुते हीं आडनांवें आहेत पण हे शब्द संस्कृत नसून मराठी आहेत. अर्थात् त्यांचा उद्भव अर्वाचीन असला पाहिजे. शिवाय वैचित्र्य किंवा भिन्नत्व निदर्शित करणें हें जें उपयुक्त कार्य आडनांवांच्या योगानें घडून येतें तें अष्टपुत्रे किंवा दशपुत्रे अशा अर्थाच्या योगानें साधत नाहीं. कारण अष्टपुत्रांचीं देणगी ही कांहीं परमेश्वरानें एकाच व्यक्तीस किंवा एकाच कुटुंबास दिली होती असें मानण्यास कांहीं आधार नाहीं. म्हणून आमच्या

मतें हीं आडनांवें प्रचारांत येण्याचें उपरिनिर्दिष्ट कारण वास्तविक नाहीं. करतां दुसरी अधिक सयुक्तिक उपपत्ति शोधणें अनुचित होणार नाहीं.

सुवासिनीनें नमस्कार केला असतां तिला ' अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद देण्याचा प्रघात आपल्याकडे आहे. ह्यांत अष्टपुत्राच म्हणण्याचें कारण काय असावें? 'आठ मुलगे तुला होवोत' असें म्हणण्याऐवजीं 'दहा मुलगे तुला होवोत' ह्या आशीर्वादांत औचित्यभंग कां व्हावा हें समजणें कठीण आहे. आमची अशी कल्पना आहे कीं पूर्वीं 'दशपुत्रा सौभाग्यवती भव' असें म्हणण्याचाहि परिपाठ असावा; व ह्या दोन सांप्रदायांचे जे पुरस्कर्ते त्यांस दशपुत्रे व अष्टपुत्रे अशीं नांवें दिलीं गेलीं असावीं. ऋग्वेदांत 'दशास्यां पुत्रानाधेहि पतिमेकादशं कृधि' अशी एक ऋचा आहे. तिचा अर्थ 'हिच्या ( वधूच्या ) ठिकाणीं तूं दशपुत्रांचें आधान कर.' हा मंत्र विवाह झाल्यावर वधूला घेऊन वर जेव्हां गृहप्रवेश करितो आणि घरीं आल्यावर लक्ष्मीपूजन, ऐरणीदान वगैरे विधी होतो, त्यावेळीं म्हणत असतात. हा मंत्र वधूला उद्देशून म्हटला जातो हें निराळें सांगणें नकोच. तेव्हां 'दशपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद देणें हें अनुचित तर नव्हेंच पण उलट श्रुतीला अनुसरूनच आहे व म्हणून 'दशपुत्रा सौभाग्यवती भव' अशा आशीर्वादानें सुवासिनीचा नमस्कार स्वीकारण्याचा प्रघात पूर्वीं असावा असा तर्क करणें अगदींच अप्रयोजक होणार नाहीं.

परंतु हल्लीं तर 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असाच आशीर्वाद देण्याची रूढी सर्वत्र आढळते. आतां ही रूढी जरी वर उद्धृत केलेल्या वेदमंत्राच्या विरुद्ध असली तरी निराधार आहे असें नाहीं.

ऋग्वेदाच्या परिशिष्टांत 'अष्टपुत्रा भव त्वं च सुभगा च पतिव्रता' असें वचन आहे. आतां वेदमंत्राच्या विरुद्ध पण त्याच वेदाच्या परिशिष्टांत हें वचन कां यावें ह्या प्रश्नाचें यद्यपि समाधानकारक उत्तर देतां आलें नाहीं तथापि हे दोन संप्रदाय एका वेळीं प्रचलित होते हें अनुमान उघड होतें. त्यांतहि दशपुत्री संप्रदाय पुरातन असून अष्टपुत्री संप्रदाय हा तदनंतरचा, व पहिल्या संप्रदायाचा लोप करण्याकरितां निघाला असला पाहिजे. कदाचित् दुसऱ्या सांप्रदायाचें बीज खालीं सुचविल्याप्रमाणेंहि असूं शकेल. दहा पुत्र झाल्यावर पत्नीचा वैवाहिक संबंध तोडावा लागतो, ही गोष्ट वरील मंत्रांतील 'पतिमेकादशं कृधि' ह्या उत्तरार्धावरून व्यक्त होते. तेव्हां ही आपत्ती टाळण्याकरितां 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असें म्हणण्याची चाल मुद्दाम पाडली असावी. विषमतेच्या दोषामुळें 'नवपुत्रा भव' हें आशीर्वचन कोणाच्याहि अभिरुचीस पटलें नाहीं यांत आश्चर्य नाहीं. म्हणून दशपुत्रांवरून अष्टपुत्रांवर येणें ही गोष्ट ओघानेंच प्राप्त होते. कांहीं असलें तरी 'दशपुत्रा सौभाग्यवती भव' व 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' अशा आशीर्वादाचे दोन संप्रदाय असावे व ह्याच संप्रदायांचा प्रचार करणारांना दशपुत्रे व अष्टपुत्रे हीं अन्वर्थक नांवें प्राप्त झालीं. अर्थात् ही सर्व रचना तर्कावर उभारलेली आहे; तरी पण हा तर्क सुप्रतिष्ठित नसला तरी अगदींच अप्रतिष्ठित नाहीं हें खास.

# गणमैत्री आणि राक्षसांचा महादेव

वधूवरांच्या कुंडल्या पहांतांना गणगोत्राला प्राधान्य असतें. गणगोत्र जमल्यास अधिक न पहाणारे लोक पुष्कळ आहेत. म्हणजे त्यांनीं विशेष पाहिलें नाहीं तरी ते गणगोत्र बघतातच. त्यांतहि गणापेक्षां गोत्राचें महत्त्व विशेष. गणांकडे दुर्लक्ष्य झालेलें एक वेळ खपेल पण सगोत्र विवाह कोणीहि होऊं देणार नाहीं. तथापि गोत्र जुळविण्यासंबंधानें कांहीं गूढ नाहीं. कुटुंबांतल्या कुटुंबांत विवाहसंबंध घडूं नये, तसें होणें अनिष्ट आहे, अशी प्राचीनांची समजूत होती. तेव्हां वधूवरांचीं गोत्रें पाहणें हें सकारण आहे ही गोष्ट आपल्या मनाला पटते. परंतु गण पहाण्याचें प्रयोजन काय या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण पडतें. आमचा असा तर्क आहे कीं, गोत्र हा जसा कुटुंबविषयक, तसा गण हा जातिवंशविषयक प्रश्न आहे. निदान प्रथम त्याचें हेंच स्वरूप असलें पाहिजे.

देव, मनुष्य आणि राक्षस असे तीन गण असतात हें सर्वांना माहितच आहे. ज्योतिषशास्त्राप्रमाणें वधूवरांचा एकच गण असला तर ६ गुण येतात. तसेंच वर देवगणी असून वधू मनुष्यगणी असली तरीहि ६ गुणच मिळतात. पण देवगणी वराला राक्षसगणी वधू पाहिली तर १ गुण मिळतो. अर्थात् या दोघांचा संयोग कमी प्रतीचा मानला गेला. आतां मनुष्यगणी वराला देवगणी कन्या दिली तर ५ गुण ठेवले आहेत. म्हणजे हाहि संबंध पहिल्या प्रतीचा लेखला गेला नाहीं. हा सर्व प्रकार प्रतिलोमविवाहासारखाच दिसतो.

म्हणजे ब्राह्मणेतराची कन्या करण्यास दोष नसे, पण ब्राह्मणेतर वरानें मात्र ब्राह्मण वधू करूं नये, असा शास्त्रनिर्बंध होता. आतां चातुर्वर्ण्यांत ब्राह्मणाला शूद्रकन्येशीं लग्न लावण्यास कांहीं काल तरी प्रत्यवाय नव्हता. पण वरील गणांगुणांवरून असें दिसतें कीं, देवांना मनुष्यकन्या पतकरे पण राक्षसकन्या पतकरत नसे. राक्षसांशीं एकरक्त होण्यास देव तयार नव्हते. मनुष्यगणाचा वर आणि राक्षसगणाची वधू अथवा राक्षसगणी वर आणि मनुष्यगणी वधू यांना वधूवरांच्या घटितांत शून्य गुण आहे. यावरून मनुष्य आणि राक्षस यांचा कोणत्याहि प्रकारानें विवाहसंबंध होऊं नये असा हेतु असावा असें उघड दिसतें. राक्षसगणाच्या मुलाला देवगणाची मुलगी केली तरीहि गुण १ च, याचा अर्थ असा दिसतो कीं देवांनीं राक्षसांबरोबर संबंध करण्यास थोडथोडी सुरुवात केली होती, पण मनुष्यांनीं तसें करण्याचें नाकारलें.

देव, मनुष्य आणि राक्षस असे तीन समाज पूर्वीं होते. हे तीन निरनिराळे मानववंश असावे. हा सिद्धांत जर खरा ठरला तर जुन्या पुष्कळ गोष्टींचा उलगडा चांगल्या रीतीनें करतां येण्यासारखा आहे. राक्षस हा निराळा लोकसमूह होता ही गोष्ट पुष्कळांना पटेल; पण देव आणि मनुष्य या नांवाचे दोन समाज होते याला पुष्कळांकडून लवकर मान्यता मिळणार नाहीं. म्हणून तत्संबंधी प्रमाणें देणें अवश्यक आहे.

"यथा वा इदं मनुष्या उपासत एवमेतं देवा उपासत"

(काठकसंहिता ८।१०।१०)

मनुष्यांनीं ज्याप्रमाणें याची उपासना केली त्याचप्रमाणें देवांनींहि केली. "त्वमस्माकं नाम मा देवानां तन्तुश्छेदि मा मनुष्याणाम्"

( का. ९।९।९ ) तूं आमचा आहेस. देवांचा व मनुष्यांचा वंश न तुटो.

"इन्द्रस्य कुक्षिरसि सोमधान आत्मा देवानामुत मानुषाणाम्"

( अथर्ववेद ७।११६।१ )

देवांचा आणि मनुष्यांचा तूं आत्मा आहेस.

"ययोर्वधान्नापपद्यते कश्चनान्तर्देवेषूत मानवेषु"

( अ. वेद ४।२८।५ )

ज्याच्या प्राणघातक शस्त्राच्या तडाक्यांतून देव किंवा मनुष्य यांपैकीं कोणीहि सुटत नाहीं.

या सर्व अवतरणांवरून देव आणि मनुष्य असे मानवी अथवा मर्त्य समाज होते असें सिद्ध होतें. काठकसंहितेंत तर पृथ्वीवर राहणारे, यज्ञविध्वंस करणारे व यज्ञांत चोरी करणारे असें देवांचें वर्णन आहे. हें वर्णन स्वर्गस्थ देवांना लागू पडणारें नाहीं हें सांगावयास नको.

राक्षसांचाहि समाज होता हें राक्षसांचें जें पुराणांत वर्णन केलेलें आहे त्यावरून सिद्ध होतें. असुर आणि राक्षस एक नव्हत. दोघांना एकच समजण्यांत पुराणकारांनीं चुकी केली आहे. असुर हे देवांप्रमाणें यज्ञ करणारे होते. पण राक्षस यज्ञ करणारे नसावे. क्वचित् ठिकाणीं ( उ. रामायण ) यज्ञाचा व राक्षसांचा संबंध जोडण्यांत येतो. पण अशीं स्थलें संशयास्पद मानण्यास जागा आहे. किंबहुना यज्ञ करण्याचें बंद पडल्यानंतर देव आणि राक्षस यांचा संबंध आला असावा. देव आणि असुर यांचा लढा यज्ञासंबंधीं असे; पण देव आणि राक्षस यांचें वैमनस्य उपास्यदेवतेवरून पडलें होतें. मूर्तिपूजा अथवा देवपूजा सुरू झाल्यावर देवराक्षसांचा संयोग झाला. अथवा

इंद्र व वरुण या देवतांसंबंधानें देवासुरांत वितुष्ट असे; तर देवराक्षसांत विष्णु आणि महादेव या देवतांवरून भांडणें होत. राक्षसांचा देव महादेव अथवा शंकर. म्हणून दस्यु आणि राक्षस हेहि एक नव्हेत. अकर्मन, अदेवयु, अव्रत, अब्रह्मन् अयज्यु असें दस्यूंचें वर्णन ऋग्वेदांत केलें आहे. महादेव हा मूळचा वैदिक देव नव्हे. विष्णु हा वैदिक देव होता. पुढें राक्षसांनीं आपलें वर्चस्व चांगलेंच स्थापिलें. शंकराचें व्रत म्हणजे कधीं सुटतां कामा नये. विष्णूची एकादशी मध्येंच सोडली तरी चालेल, पण शिवरात्र सोडल्यास महादोष मानला जातो. हरिहरांचें ऐक्य दाखविण्याचे अटोकाट प्रयत्न करण्यांत आले, पण जंगली महादेवाला आम्ही आपल्या डोक्यावर बसवला यांत कांहीं खोटें नाहीं.

ब्रह्मा, विष्णु, व महेश हे तीन समाजांचे तीन देव होते. देवांचा विष्णु, मनुष्यांचा ब्रह्मा व राक्षसांचा महेश. जसे समाजांचे गुण तसेच त्यांच्या देवांचेहि. देव हा समाज सत्त्वप्रधान तर मनुष्य व राक्षस हे अनुक्रमें राजस व तामस होते. मत्स्यपुराणांत ( अ. ५३ श्लोक ६७-६८ ) विष्णु सात्विक, ब्रह्मा राजस व महेश तामस असें वर्णन आहे. तीन समाजांचें एकीकरण झालें तेव्हां ब्रह्मविष्णुमहेश असा सर्वांचा त्रिमूर्ति देव बनवावा लागला. एकीकरणाचे शिकस्तीचे प्रयत्न झाले तरी हें विष्णुमहादेवाचें भांडण पुष्कळ वर्षें चालू होतें. हिरण्यकशिपु व प्रल्हाद या पितापुत्रांत मुलानें विष्णूची उपासना स्वीकारली म्हणूनच कलह माजला. वैष्णव व शैव यांच्यांत अद्यापिहि हाडवैर कां वसत आहे हें आतां आपणांला नीट समजेल. देव, मनुष्य, गंधर्व, नाग, गरुड, पिशाच, राक्षस हे सर्व निरनिराळे समाज होते. देवांनीं सर्व समाजांत वैदिक संस्कृतीची छाप

बसावी म्हणून प्रयत्न चालविले होते. गरुड हे देवांना लवकर वळले. ते विष्णुभक्त बनले. "दैवतं विष्णुरेतेषां विष्णुरेव परायणम् । हृदि चैषां सदा विष्णुर्विष्णुरेव सदागतिः।। (महाभारत, उद्योगपर्व). विष्णूचें वाहन गरुड हें देवांनीं गरुड नांवाच्या लोकांवर मिळविलेल्या जयाचें सूचक आहे. राक्षसांनीं मात्र देवांना कसून विरोध केला आणि आपला महादेव त्यांनीं अखेरीस देवांवर लादलाच. नाग, सर्प, गंधर्व इत्यादि समाजांबरोबर देवांना फार लढावें लागलें नाहीं. पण राक्षसांनीं शत्रुत्व फार दिवस चालविलें म्हणून "सुरशत्रूणां दैत्यदानवरक्षसाम्" (वायुपुराण) असें वर्णन सर्वत्र आढळतें. दानव महापराक्रमी होते. "महौजसः" "महासाहसिनः" अशीं विशेषणें पुराणकारांनीं त्यांना लावलीं आहेत (भागवत). हिरण्याक्ष, हिरण्यकशिपु, रावण, बली वगैरे दानव बलिष्ठ असून त्यांचीं साम्राज्यें होतीं.

या सर्व समाजांत थोड्याबहुत प्रमाणानें विवाहसंबंध घडत असत. राक्षसांसारखे जे लोक देवांना वश झाले नाहींत त्यांच्याबरोबर असे संबंध न होणें स्वाभाविक होतें. इंद्राचा सारथि मातलि हा नारदाबरोबर वरसंशोधनार्थ सर्व पृथ्वीभर हिंडला. त्यानें नागजातीचा वर आपल्या कन्येकरितां पसंत केला, पण राक्षसपुत्र नाकारला. मातलीनें नारदाला सांगितलें, देव आणि राक्षस यांचें वैर सदैव चालू असतां शत्रूबरोबर संबंध करणें मला आवडत नाहीं. देवांना ही गोष्ट रुचणार नाहीं. आणि देवांना अप्रिय असें मी कधीं करणार नाहीं.

देवर्षे नैव मे कार्यं विप्रियं त्रिदिवौकसाम् । नित्यानुषक्तवैरा हि

भ्रातरो देवदानवाः । परपक्षेण संबन्धं रोचयिष्याम्यहं कथं"

(म. भा. उ. पर्व)

मातलीच्या या आख्यानावरून एवढें व्यक्त होतें कीं देवसंस्कृतींचें अनुयायित्व मान्य करणारे लोक देवांत मिसळून गेले. त्यांची मैत्री झाली; त्यांचे संबंध जडले. राक्षसांची मात्र प्रतिक्रिया सुरू झाल्यानें ते अमित्र झाले. त्यांच्याबरोबर देवांची किंवा मनुष्यांची गणमैत्री कशी जमावी ? विवाहघटितांतील गणमैत्रीचें मूळ कोठें आहे हें आतां सहज समजण्यासारखें आहे. गण म्हणजे लोकसमूह, —जात. गणमैत्री पहाणें म्हणजे आपल्या अथवा आपल्याला मान्य अशा समाजापैकींच वधूवर आहेत अगर परसमाजांतील आहेत हें पहाणें. मूळ देवांची संस्कृति. देव हे उत्तरेकडून आले. खालीं आल्यावर ज्यांनीं त्यांची संस्कृति मान्य केली ते मनुष्य आणि ज्यांनीं विरोध केला ते राक्षस असें असण्याचा संभव आहे. असुर आणि राक्षस यांच्याशिवाय बाकीच्या समाजांकडून देवांना विरोध फारसा झालाच नाहीं. मनुष्यांचा मूळ पुरुष मनु. जेते देव, जित जेवढे तेवढे मनुष्य. देवांचा आणि मनुष्यांचा शरीरसंबंध घडे तरी मनुष्यांना देवांनीं देव ही संज्ञा लावली नाहीं. अर्थातच त्यामुळें सर्व पृथ्वीवर तीन गण अथवा समाज झाले; देव, मनुष्य, आणि राक्षस. राक्षसांशीं शरीरसंबंध न करण्याचें देवांनीं ठरविलें त्याप्रमाणें त्यांचें अन्नहि ग्रहण न करण्याचें ठरविलें पाहिजे. मनुस्मृतींत (अध्याय ४ श्लोक २०९) गणान्नभक्षण करण्यासंबंधानें निषेध आहे. "गणान्नं गणिकान्नं च विदुषां च जुगुप्सितम्". हें गणान्न म्हणजे राक्षसांचें अन्न असेल काय ? हीन संस्कृतीच्या लोकांतील मुलगी वरिष्ठ संस्कृतीचे लोक करीत. पण याच्या उलट प्रकार

फारसा घडत नसे. वृषपर्वा दैत्याची कन्या शर्मिष्ठा हिचा ययातीबरोबर विवाह झाला. कृष्णाचा नातु अनिरुद्ध यानें बाणासुराची कन्या उषा हिचें पाणिग्रहण केलें. भीमानें हिडिंबा बायको केली. अर्जुनानें उलूपी या नागकन्येबरोबर विवाह लावला. दैत्य कंस हा कृष्णाचा मामा हें प्रसिद्धच आहे. जरत्कारु ब्राह्मणानें सर्पजातीय वासुकीच्या बहिणीला वरिलें. पण विरुद्ध उदाहरणें फारशीं नाहींत. देव, मनुष्य आणि राक्षस हे सर्व पुढें एक झाले यांत संशय नाहीं. पण देवराक्षसांमधली देवघेव उभयपक्षी असावी. त्यांनीं आपला महादेव देवांच्या गळीं उतरविला, पण देवांनीं दानवांना वेदानुयायी केलें नाहीं काय ? हल्लींचा आमचा सांब म्हणजे वैदिक रुद्र अथवा शिव, राक्षसी हर आणि लिंगायतांचें लिंग, असें कडबोळें आहे. एकीकरणाचे हे प्रकार अर्वाचीन सुधारकांनीं मनन करण्यासारखे आहेत एवढें मात्र खरें.

देवलोकाहून राक्षसांचा प्रदेश निराळा होता. नागलोकाच्या मध्यभागीं दैत्यदानवांनीं वसलेला पाताळनामक सुप्रसिद्ध भूभाग आहे असें महाभारतांत वर्णन आहे. ( उद्योगपर्व. ) पण हें पाताल म्हणजे रसातल नसावें. कारण रसातल म्हणून सातवें भूमितल आहे असें पुढें याच पर्वांत नारदांनीं मातलीस सांगितलें आहे. असें जरी आहे तरी मत्स्यपुराणांत आमचा येथें कोणी त्राता नसल्यामुळें आम्ही आतां रसातळाला जातों असें दैत्य शुक्राचार्यांस सांगतात: "स्थातुं न शक्नुमो ह्यत्र प्रविशामो रसातलम्" (अ. ४७ श्लोक ६०). पण लगेच पुढें देवांनीं 'आम्ही ह्या दैत्यांना बळजबरीनें पाताळांत हाकलून लावूं' असें म्हटलें आहे: "प्रसह्य हत्वा शिष्टांस्तु पातालं प्रापयामहे". पाताल व रसातल हे एकच भूप्रदेश आहेत अशी चुकीची

समजूत पुढें झाली असावी असें दिसतें. कांहीं असो, सप्तपातालांत दैत्यांची वस्ती होती हें खास. हा भूप्रदेश काल्पनिक नव्हता. भागवतांत सुद्धां "ततोऽधस्ताद्रसातले दैतेया दानवा...हिरण्यपुरवासिनः" म्हणजे रसातलीं हिरण्यनगरांत दैत्य दानव रहातात, असें वर्णन आहे (स्कं. अ २४ श्लोक. ३०). सारांश, देवलोक, मनुष्यलोक आणि दानवलोक हा नुसता कल्पनेचा बाजार नव्हे. शतकोटिपुराण देवलोकांत अद्यापि आहे; कार्तिकस्वामींनीं सांगितलेल्या पुराणास मनुष्यलोकांत स्कंदपुराण म्हणतात; रसातलीं विष्णूंनीं कूर्मपुराण सांगितलें; वगैरे वचनांचा अर्थ शब्दशःच घेणें अवश्य आहे. देवलोक म्हणजे आकाशांतील स्वर्ग असें समजणें चुकीचें होय. असो.

महादेवाच्या वर्णनावरून तो अनार्यांचा देव असावा. हल्लीं सुद्धां शंकराची पूजा अनार्यांच्याच हातीं आहे. श्रीशैल येथें परिया लोकांनीं देवाची पूजा केल्यावर मग ब्राह्मण देवळांत जातात असा वहिवाट आहे. विष्णूचा पुजारी ब्राह्मण असावाच लागतो. पण शंकराचा पुजारी ब्राह्मण क्वचित् सांपडतो. अनार्य देवाचें महत्त्व फार वाढलेलें कट्टर वैष्णवांना न रुचणें स्वाभाविक आहे.

हल्लीं जन्मनक्षत्रावरून ज्योतिषशास्त्रांत गण ठरविले जातात हा कल्पनेचा खेळ आहे किंवा गणनक्षत्रसंबंध सोपपत्तिक आहे हें समजण्यास मार्ग नाहीं. पण गणांची वर सुचविलेली उपपत्ति जर खरी असेल तर हा गणनक्षत्रसंबंध काल्पनिकच मानला पाहिजे. कोणतें जन्मनक्षत्र असलें म्हणजे कोणता गण असतो, हें खालील कोष्टकावरून समजेल.

| देव | मनुष्य | राक्षस |
| --- | --- | --- |
| अश्विनी | भरणी | कृत्तिका |

| | | |
|---|---|---|
| मृग | रोहिणी | आश्लेषा |
| पुनर्वसु | आर्द्रा | मघा |
| पुष्य | पूर्वा | चित्रा |
| हस्त | उत्तरा | विशाखा |
| स्वाति | पूर्वाषाढा | ज्येष्ठा |
| अनुराधा | उत्तराषाढा | मूळ |
| श्रवण | पूर्वाभाद्रपदा | धनिष्ठा |
| रेवती | उत्तराभाद्रपदा | शततारका |

नक्षत्राच्या ज्या देवता दिल्या आहेत त्यांवरून कोणतेंहि अनुमान करण्यास साधन मिळत नाहीं. ज्यांच्यामध्यें जन्मकुंडल्या केलेल्या नसतात अशा शूद्रादि जातींत वधूवरांच्या आद्याक्षरांवरून जातक व गण ठरवतात. अ, क, च, ट, त, प, य, आणि श या वर्गांत कोठेंतरी प्रत्येकाचें नांव आलेंच पाहिजे. प्रत्येक वर्गाचा एक स्वामी असतो त्यास जातक असें म्हणतात. उ.

| वर्ग | जातक | वर्ग | जातक |
|---|---|---|---|
| अ | गरुड | त | सर्प |
| क | मांजर | प | उंदीर |
| च | सिंह | य | मृग ( हरीण ) |
| ट | श्वान | श | मेंढा |

स्ववर्गापासून अथवा स्वजातकापासून पांचवें जातक रिपुतुल्य असल्यामुळें वर्ज्य. यानंतर नांवावरून रास निश्चित करतात आणि राशीवरून गण ठरवितात. जसें:—

| | | | |
|---|---|---|---|
| अ, ल | मेष | ब, व | वृषभ |
| क, थ | मिथुन | ड, ह | कर्क |
| म, ट | सिंह | प, ठ | कन्या |
| र, त | तूळ | न, य | वृश्चिक |
| म, ध | धन | ज, ख | मकर |
| ग, स | कुंभ | च, द | मीन |

वरील कोष्टकांत कांहीं अक्षरें नाहींत. उ. घ, ढ, वगैरे. घारु या नांवाचा मनुष्य गांवजोशाकडे घटितांकरतां गेला तर तो जोशी वरील आद्याक्षरांतच त्याला कोठें तरी घालील. आतां राशि आणि गण यांचा संबंध खालीं दिल्याप्रमाणें बसवला आहे.

| देव | मनुष्य | राक्षस |
|---|---|---|
| मेष | वृषभ | मिथुन |
| कर्क | सिंह | कन्या |
| तूळ | वृश्चिक | धन |
| मकर | कुंभ | मीन |

ही सर्व घटना काल्पनिक असावी असा ग्रह होतो. आधीं या वरील सारणीला कोणत्या ग्रंथाचा आधार आहे हें गांवजोशासहि सांगतां येत नाहीं.

वरील विवेचनानंतर गणाला हल्लीं जें महत्त्व देतात तें देणें योग्य होईल काय ?

---

# श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थम्.

श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं असा संकल्प प्रत्येक धार्मिक कृत्याच्या आरंभीं आपण करीत असतों. श्रुति, स्मृति आणि पुराणें ह्यांत सांगितलेलीं फळें आपणांस प्राप्त व्हावीं हा प्रत्येक धर्मकर्म करण्यांत आपला उद्देश असतो. हा संकल्प फार प्राचीन आहे. पण ह्याचा अर्थ काय ह्याचा विचार फारसा झालेला दिसत नाहीं. जें आपण कर्म करतों त्याचें फल श्रुति, स्मृति आणि पुराणें ह्यांत सांगितलें असतें असा निश्चय आहे काय ? असल्यास एकच फळ श्रुतींत, स्मृतींत आणि पुराणांत सांगितलें आहे अथवा प्रत्येकांत भिन्नभिन्न फळें सांगितलीं आहेत ? एकच फळ असल्यास तिघांचा उच्चार करण्याचें प्रयोजन काय ? भिन्न पण विरोधी असल्यास एकवाक्यता कशी करावयाची ? भिन्नपणा अविरोधी असल्यास त्यांपैकीं आपणांस कोणतें फळ पाहिजे, अथवा सर्वच फळें पाहिजेत, ह्याचा विचार आपण करावयास नको काय ? कारण आपण विचार करीत नाहीं हें निःसंशय. मग ह्या त्रयीचा उच्चार अन्वर्थक आहे काय ? " श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं " हा सामान्य संकल्प आहे. ह्याशिवाय प्रत्येक कर्माचा स्वतंत्र संकल्प असतोच; जसें श्रुतिस्मृति-पुराणोक्तफलप्राप्त्यर्थं तसेंच अन्नसंस्कारार्थं, आत्मसंस्कारार्थं आणि पंचसूनादोषपरिहारार्थं वैश्वदेवाख्यं कर्म मी करतों असें आपण नेहमीं म्हणतों. ह्याचप्रमाणें व्रतादिकांत व निरानिराळ्या पूजांत सामान्य आणि विशेष दोनहि संकल्प असतात. एक अपवाद

संध्येमध्यें दिसतो. तेथें सामान्य संकल्प म्हटला जात नाहीं. व्रतांचा उल्लेख श्रुतींत आढळणार नाहीं. मग श्रुतीनें सांगितलेलें फळ मिळण्याकरितां मी हें व्रत करतों, असें म्हणण्याचा उद्देश काय असावा? श्रौतामध्यें "श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं" असें म्हणणार नाहींत. शूद्राकडे कर्म करतांना "पुराणोक्तफलप्राप्त्यर्थं" इतकेंच म्हणतात. तेथें "श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं" असें म्हणण्यास प्रत्यवाय कां असावा? शूद्रांना श्रुतीचा म्हणजे मंत्रोच्चार करण्याचा अधिकार नसेल पण श्रुत्युक्त फलाचा अधिकार नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. वेदमंत्र न म्हणतांहि वेदांचें फल मिळवून देण्याकरितां पुराणांचा अवतार झाला आहे. "स्त्रीशूद्रद्विजबंधूनां न वेदश्रवणं मतं" म्हणूनच व्यासांनीं "भारतव्यपदेशेन वेदार्थमुपादिष्टवान्" भारत लिहून वेदार्थ उपदेशिला. तेव्हां "श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं" असा संकल्प शूद्रांचें धर्मकृत्य करतांना त्यांच्याकडून म्हणवून घेण्यास वस्तुतः हरकत नसावी. पण शूद्रांनीं कोणता संकल्प करावा, हा प्रस्तुत विषय नाहीं. "श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं" असें म्हणण्यांत कांहीं विशेष हेतु आहे काय, हें पाहावयाचें आहे. ह्या शब्दसमूहाचा शब्दशः अर्थ करण्याचा प्रयत्न केला तर अखेरीस हाताला कांहीं लागत नाहीं असें दिसतें. निदान मनाचें समाधान झालें असें वाटत नाहीं. कदलीव्रत, शिवा-मुष्टिव्रत, अशोक-द्वादशीव्रत, अनंगव्रत इत्यादि हजारों व्रतें पुराणांत वर्णिलीं आहेत. त्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उल्लेखहि श्रुतीमध्यें सांपडणार नाहीं. मग ह्या व्रतांच्या संबंधानें श्रुत्युक्त फल प्राप्त व्हावें, म्हणून हीं व्रतें मी करतों, हें म्हणणें योग्य कसें होईल? तसेंच स्मृत्युक्त फल मिळण्यास शूद्रांना आडकाठी कां असावी? स्मृतीमध्येंच मुख्यतः

शूद्रांचे धर्म सांगितले आहेत. बरें फल ह्याचा अर्थ काम्यफल अगर मुक्ति घ्यावयाचा ? काम्यफल घेतल्यास "श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं" हा सामान्य संकल्प अगदींच अर्थशून्य होतो. तात्पर्य, वरील संकल्पाची उपपत्ती निराळ्या रीतीनें लावणें अवश्य आहे.

माझ्या मतें "श्रुतिस्मृतिपुराणोक्त" ह्या संकल्पाकडे ऐतिहासिक दृष्ट्या पाहिलें पाहिजे. फार प्राचीन काळीं मनुष्य जातीच्या तीन समाजांचा संबंध परस्परांशीं आला. हे तीन समाज म्हणजे देव, मनुष्य आणि दानव अथवा राक्षस.

मत्स्यपुराणांत प्रयागची यात्रा करण्याचा बेत देवांच्या सांगण्यावरून तूं सोडूं नको, असा धर्मराजास उपदेश केला आहे. "न देववचनात्तात न लोकवचनात्तथा। मतिरुत्क्रमणीया ते प्रयागगमनं प्रति" (अ. १०६ श्लो. २२). लोकवचनात् हाहि शब्द मनन करण्यासारखा आहे. देव आणि लोक ह्यांत भेद केला आहे. लोक म्हणजे मनुष्य. वरील श्लोकांत देव म्हणजे आकाशांतील देव समजतां येणार नाहीं, हें उघड आहे. ह्याच पुराणांतल्या ८१ व्या अध्यायांत विशोकद्वादशीव्रत इंद्रासुरमानवांनाहि (इन्द्रासुरमानवेषु) गुह्य आहे, असें म्हटलें आहे. इन्द्रलोक म्हणजे देवलोक. देवांचा देव विष्णु व दानवांचा महादेव. मनू हा मनुष्यांचा पूर्वज. विष्णूच्या पूर्वी देवांमधला प्रमुख इन्द्र. प्रजापति हा मनुष्यांचा देव असावा. मनूला शेती करण्याला देवांनीं शिकविलें असें ऋग्वेदांत वर्णन आहे: "दशस्यंता मनवे पूर्व्यं दिवि यवं वृकेण कर्षथ." ह्यावरूनहि मनू हा देवांपैकीं नसावा असा ध्वनि निघतो.

देव, मनुष्य आणि राक्षस हे जे तीन समाज, त्यांचे देव जसे निराळे, तसे धर्मग्रंथहि निराळे असले पाहिजेत, असें अनुमान करणें अनुचित होणार नाहीं. देवांचे धर्मग्रंथ श्रुति, मनुष्यांचे धर्मग्रंथ स्मृति आणि राक्षसांचे धर्मग्रंथ पुराणें असें मानणें सयुक्तिक होणार नाहीं काय ? मनूचें नांव ऋग्वेदांत येतें हें वरील ऋक् मंत्रावरून दिसेलच: तथापि, स्मृतिकार ह्याच नात्यानें मनु प्रसिद्ध आहे; वैदिक ऋषि किंवा मंत्रकार म्हणून नाहीं, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. श्रुतीचा विषय निराळा आणि स्मृतींचा निराळा. ऋग्वेदांतील मनूच्या उल्लेखावरून श्रुति व स्मृति एकाच वेळीं अस्तित्वांत असाव्या असें वाटतें. पुराणांचाहि उल्लेख अथर्ववेदांत आहे. " ऋचः सामानि च्छदांसि पुराणं यजुषा सह । उच्छिष्टा ज्ज्ञिरे सर्वे दिवि देवा दिविश्रितः " सांख्यायन व आश्वलायन श्रौतसूत्रें त्याच प्रमाणें बृहदारण्यक, छांदोग्य इत्यादि उपनिषदांतहि पुराणविद्येचें महत्त्व वर्णिलें आहे. पुराणांना पुराणविद्या म्हणणें ही गोष्टहि फार महत्त्वाची आहे; त्यावरून पुराणांचें स्वतंत्र वाङ्मय होतें, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. तसेंच पुराणें फार प्राचीन आहेत ह्याविषयीं सुद्धां शंका रहात नाहीं. आतां वेदमंत्र अथवा वेदवाङ्मय निर्माण होत असतांना, त्याच ऋषींकडून अगदीं भिन्न स्वरूपाचें जें पुराण-वाङ्मय, तें निर्माण झालें असेल हें संभवनीय दिसत नाहीं. ह्या कारणास्तव पुराणें राक्षसांचे धर्मग्रंथ असावे असें वाटूं लागतें. तिबेटांतील कांहीं जातींचे धर्मग्रंथ पुराणेंच आहेत, हें विद्यासेवकांत रा. आबा चांदोरकर ह्यांनीं लिहिलें आहे. त्यावरूनहि वरील अनुमान दृढ होतें. माझ्या मतें तिबेटी पुराणें हिंदु-पुराणांचीं रूपांतरें नसावींत. तिबेटी पुराणांचा अधिक शोध करणें अवश्य आहे.

राक्षस ह्या नांवानें सांप्रत कोणतीहि मानवजात ज्ञात नाहीं. राक्षसां-बरोबर अथवा त्यांच्या नांवाबरोबर त्यांच्या मूळ ग्रंथाचाहि लोप झाला असावा हा माझा तर्क खरा असेल, तर सर्व पुराणें मूळचीं शैव असावीं; निदान एवढी गोष्ट खरी कीं, राक्षसांचें व देवांचें प्रथमतः हाडवैर होतें. तें वैर मुख्यतः देवासंबंधानें होतें. देवांचा देव विष्णु आणि राक्षसांचा देव महादेव. आज शिवविष्णूंचें ऐक्य झालें आहे. त्यास अनुसरून सध्यांचीं पुराणें आहेत. पण हें ऐक्य होण्याच्या अगोदर म्हणजे देव–राक्षसांचा विरोध असतांना देवां-प्रमाणें राक्षसांचेंहि धार्मिक वाङ्मय असलें पाहिजे, आणि तें महादे-वावरच असलें पाहिजे. महादेवाचें देऊळ गांवाबाहेर असतें व पुजारी अब्राह्मण असतो. ह्यावरूनहि महादेवाविषयीं आमची भावना काय होती, तें समजण्यासारखें आहे. सध्यां उपलब्ध असलेल्या स्मृति व पुराणें हीं सर्व सलोख्यानंतरचीं आहेत. देवदानवांचें सामान्य दैवत तूं आहेस, अशी महापुरुषाची स्तुती केलेली आढळते (देवानां दानवानां च सामान्यमसि दैवतम् ). ह्यावरून असें अनुमान करणें शक्य आहे कीं, दानवांना देवांनीं देशाबाहेर हांकलून लावलें नाहीं. देवदानव ह्यांचें बेमालूम मिश्रण झालें. आज जसा देवसमाज नाहीं, तसा दानव नांवाचा समाजहि नाहीं. तसेंच मनुष्य हें नांव एका विशिष्ट समाजाचें नांव होतें, तें आतां सर्व समाजाचें झालें; म्हणजे देवदानव, मनुष्यांत समाविष्ट झाले.

स्मार्त म्हणजे स्मृतीचा अनुयायी. सध्यां स्मार्त कोणाला म्हणतात हें समजणें कठिण आहे. तथापि, स्मृतीचा अनुयायी असा स्मार्त शब्दाचा अर्थ होतो हें खचित. पण मग ह्या अर्थामध्यें विशेष

अर्थ नाहीं हेंहि तितकेंच निश्चित आहे. कारण, प्रत्येक हिंदू हल्लींच्या समजुतीप्रमाणें स्मृतींना अनुसरूनच आपला आचार ठरवतो. तेव्हां प्राचीन काळीं स्मृति हेंच ज्यांचे धर्मग्रंथ आहेत, त्यांनाच स्मार्त म्हणत असावेत. स्मार्तांप्रमाणें, पौराणिक म्हणजे पुराणें आहेत धर्मग्रंथ ज्यांचे ते असा मूळचा अर्थ नसेल कशावरून ? पक्षी लोकांचा पुराण हा वेद होता, असें शतपथ ब्राह्मणांत सांगितलें आहेच. पुराणें वैदिक ऋषींचेंच अमंत्रकवाङ्मय असतें, तर त्यांस वेद म्हणण्याचा आग्रह कोणीहि केला नसता. पुराणांत—त्यांच्या मूळ स्वरूपांत—आणि वेदांत कांहींहि साम्य नाहीं. शिवाय पुराणांतल्या गोष्टी छंदांत आणि ब्राह्मण ग्रंथांतहि समाविष्ट करतां आल्या असत्या. सारांश श्रुति, स्मृति आणि पुराणें हे निरनिराळ्या लोकांचे धर्मग्रंथ असावेत. पूर्वींचे कडकडीत वैष्णव स्मृतींचें प्रामाण्य मानीत नसत असें म्हणतात; हें खरें असेल तर, ह्या लेखांत प्रदर्शित केलेल्या तर्काला पुष्टीच मिळते. स्मृतिकारांनीं श्रुतीच्या ठिकाणीं प्रामाण्य मान्य केलें. पण, पुराणांना त्यांच्याबद्दल स्वतंत्र प्रामाण्यविषयक मान्यता मिळेना, हें "वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः" ह्या वचनावरून दिसून येतें. तथापि अखेरीस "श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं" ह्या संकल्पद्वारा स्मृतिकारांचें न्यूनत्व पुढील निबंधकारांनीं भरून काढलें. याप्रमाणें ह्या संकल्पाचा इतिहास आहे. "श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं" ह्यांतील मर्म आतां थोडेंबहुत समजण्यासारखें आहे. सिद्धांतरूपानें मांडण्याइतका पुरावा सध्यां आपल्याजवळ नाहीं, हें खरें, तथापि ह्या दृष्टीनें अधिक विचार व्हावा, ह्या हेतूनेंच ही अपरिपक्व कल्पना लोकांच्या निदर्शनास

आणली आहे. ह्यामुळें पुष्कळ गोष्टींचा उलगडा होण्याजोगा आहे. श्रुति, स्मृति, पुराणें सर्व अनादि आहेत, हा जुना समज अगदींच चुकीचा नाहीं. जुन्या लोकांना श्रुतीनंतर स्मृति; स्मृतीनंतर पुराणें हा क्रम मान्य होत नाहीं. पण तो कसा चुकलेला आहे हें त्यांस दाखवितां येत नाहीं इतकेंच.

# अथर्ववेदांतील राजसूक्तें

१--९

या-( राजा-)च्या ठिकाणीं वसुदेव, इन्द्र, पूषा, वरुण, मित्र, अग्नि ( हे ) संपत्ति स्थापन करोत.

आदित्य त्याचप्रमाणें सर्वदेव याला उत्कृष्ट तेजाच्या ठायीं धारण करोत. (१)

सूर्य, अग्नि व हिरण्य ( अशासारखी ) ज्योति हे देवहो याच्या आज्ञेंत असो.

शत्रू याच्या खालीं असोत; याला उत्तम स्वर्गाला चढवा. (२)

हे जातवेद ज्या उत्तम मन्त्रानें इन्द्राला तूं क्षीरादि ( पयांसि ) आणून दिलेंस

त्यानें हे अग्ने याला ह्या लोकीं समृद्ध कर, याला सजातीयांत-श्रेष्ठ पदावर प्रस्थापित कर. (३)

हे अग्ने यांचा ( शत्रूंचा ) यज्ञ ( स्वर्गादि साधन ), तेज, विपूल संपत्ति, त्याचप्रमाणें बुद्धि मी घेतों;

शत्रू याच्या खालीं असोत, याला उत्तम स्वर्गाला चढवा. (४)

या सूक्ताचा उपयोग सर्वसंपत्कर्मांकडे म्हणजे यशःप्राप्तीकरतां करतात. वर्चस्यगणांत या सूक्ताचा समावेश केला आहे. ( कौ. अ. २ कंडिका १३ सू. १ टीप ब्लूमफील्ड). व्रताच्या तेराव्या दिवसापासून तीन दिवस तांबड्या दोन गुंजा, दहीं व मध यांत घालून ठेवतात. तसेंच ज्या गायीचें वासरूं तिच्याच रंगाचें असेल त्या

गायीच्या दुधांत भात शिजवून त्यांत पुरुषाचें चित्र काढतात. नंतर गुंजामणी बांधतात आणि भात खातात. ( कौ. २.२ )

त्याचप्रमाणें पदच्युत झालेल्या राजाला आपलें राज्य परत मिळावें म्हणूनहि या सूक्ताचा विनियोग सांगितला आहे. तोडल्यानंतर वाढलेल्या कांपील काष्ठांनीं सारूपवत्स गायीच्या दुधांत शिजविलेला, कापून पुनः वाढलेल्या तांदुळाचा भात हें सूक्त म्हणूनँ राजानें खावयाचा असतो.

२

तैतिरीय संहितेंत हिरण्याला ज्योति म्हटलें आहे. "ज्योतिर्वै हिरण्यं ज्योतिषैव तमोपहते" ( तै. सं. ५–७–५--२ )

छान्दसं ह्रस्वत्वं असें म्हणून सायणाचार्यांनीं अस्मत् म्हणजे अस्मात् समजून अर्थ केला आहे.

या मंत्राची दुसरी ओळ तशीच्या तशीच पुढील चौथ्या मंत्रांत आली आहे.

३

हा मंत्र थोड्या फरकानें तैतिरीय संहितेंत ( ३-५-४-२ ) व मैत्रायणी संहितेंत ( १-४-३ ) आला आहे.

१--१९

दुरून बाण मारणाऱ्यांना, समोरून बाण मारणाऱ्यांना आम्ही न सांपडो.

हे इन्द्रा, सर्वगामी बाणांचा वर्षाव आमच्यापासून दूर अंतरावर पाड. (१)

सोडलेले आणि सोडावयाचे बाण आमच्यापासून दूर सर्वत्र पडोत. मनुष्यांचे देवांपासून मिळालेले बाणहो, तुम्ही शत्रूंना मारा. (२)

जो कोणी आमच्याचपैकीं, जो कोणी परकी, जो कोणी आमच्या जातीचा, अथवा हीनजातीचा आम्हांला मारतो

ह्या माझ्या शत्रूंना रुद्र बाणांच्या वर्षावानें विद्ध करो. (३)

जो शत्रू, जो अशत्रू, जो द्वेष करून आम्हांला शाप देतो

त्याला सर्व देव नष्ट करोत, माझें स्तोत्र अन्तर्गत कवच ( आहे ). (४)

अपराजितगणामध्यें या सूक्ताचा समावेश अथर्वपरिशिष्टांत केला असून या गणांतील सूक्तांना सांग्रामिक सूक्तें अशीहि दुसरी संज्ञा आहे.

ब्राह्मणांनीं आयुधें धारण करणें, देवतांच्या प्रतिमांनीं नाचणें, हसणें इत्यादि अद्भुत प्रकार झाले असतां, तसेंच बैल गाईचें दुग्धपान करूं लागल्यास हें सूक्त म्हणून आज्यहोम करावयाचा असतो.

अथ यत्रैतद्दैवतानि नृत्यन्ति च्योतन्ति हसन्ति गायन्ति वान्यानि धा रूपाणि कुर्वन्ति च आसुरा मनुष्या मा नो विदन्नमो देववधेभ्य इत्येताभ्यां जुहुयात् ॥ १ ॥ ( कौशिक १३. १३ )

अथ यत्रैतदनड्वान्धेनुं धयति तत्र जुहुयात् ॥ १ ॥

( कौ. ३. २१ )

२

दैवीः मनुष्येषवः याचा अर्थ सायणाचार्यांनीं आग्नेयवारुणादि अस्त्रें व मनुष्यांचे बाण असा केला आहे.

३

निष्ट्य याचा अर्थ परकी असा इंग्लिश भाषांतरकारांनीं केला आहे. पण संस्कृत वाङ्मयांत चांडाल अथवा हीन जातीचा अशा

अर्थानें निष्टय शब्द योजतात. शिवाय येथें स्वजातीशीं विरोध दाखविण्याला हाच अर्थ योग्य दिसतो.

४

तीन व चार या मंत्रांसारखा ऋग्वेदांतहि एक मंत्र आहे. ( ऋ. ६. ७५. १९. ) ऋग्वेदांतील हें सूक्त संग्रामसूक्तच आहे.

३--१

सर्वत्र हिंसा करणाऱ्या शत्रूला दग्ध करीत शहाणा अग्नी (शत्रु-) सेनेवर जावो.

शत्रूंच्या सेनेला तो व्याकूळ करो; अग्नी (शत्रूंना) निर्हस्त करो.(१)

अहो बलवान मरुत देवहो, अशा प्रसंगीं तुम्ही (आमच्या ) जवळ या, (आणि) जा, मारा, जिंका. प्रार्थना केल्यावर या वसूनीं (आमच्या शत्रूंना ) मारिलें, यांचा दूत होऊन शहाणा अग्नी (शत्रूवर ) जावो. (२)

हे मघवन् , ( आमचा ) द्रोह करणाऱ्या शत्रुसेनेवर ( जा ). हे वृत्रघ्न इन्द्र, तूं आणि अग्नि त्यांना जाळून टाक. (३)

हे इन्द्र, ( तुझ्या ) घोड्यांनीं ( तुला ) उतरंडीवरून ओढीत आणल्यावर तुझें वज्र शत्रूंचा धुवा उडवीत जावो.

समोरून येणाऱ्या, पाठीमागून येणाऱ्या, पळणाऱ्या शत्रूंना मार; यांचें चित्त निश्चयानें भ्रमणशील कर. (४)

हे इन्द्रा, शत्रूंच्या सेनेला मूर्च्छित कर.

अग्नीच्या (व) वाऱ्याच्या भडक्यानें त्यांचा सर्व बाजूंनीं विध्वंस कर. (५)

इन्द्र सेनेला मोह पाडो, मरुत पराक्रमानें मारोत,

अग्नी डोळे घेवो ( शत्रूंची दृष्टी नाहिंशी करो ), पराजित झालेली ( सेना ) परत फिरो. (६)

शत्रूंच्या सेनेला मोह पाडण्याकडे या सूक्ताचा विनियोग. आपल्या पक्षाचे कोण आणि शत्रुपक्षाकडील कोण हें ओळखतां न येणें याचें नांव मोह. तूस किंवा कण्या मिसळलेल्या शिजवलेल्या भाताची आहुती उखळावरून अग्नीमध्यें या कर्मांत देतात किंवा सुपांत एकवीस साखरेचे खडे घेऊन शत्रुसेनेवर सूप पाखडतात. त्याचप्रमाणें अप्वा नांवाच्या देवतेला हें सूक्त म्हणून चरूची आहुती देतात. (कौ. २·५)

१

अग्नि हा देवांचा सेनानी असें ब्राह्मणग्रंथांत म्हटलें आहे. सांग्रामिकाग्नीला सेनाग्नि ही संज्ञा आहे.

४

प्रवता याचा अर्थ उतरंडीवरून असा केला आहे. हिमालयावरून किंवा स्वर्गावरून इन्द्र खालीं पृथ्वीवर येतांना उतरंडीवरूनच येणार. सत्यम्=निश्चयानें.

६

पराजिता म्हणजे स्वपक्षाची पराजित सेना असा अर्थ केला आहे.

३--२

सर्वत्र हिंसा करणाऱ्या शत्रूला दग्ध करीत आमचा दूत जो अग्नी तो ( शत्रूवर ) चाल करून जावो.

अग्नी शत्रूंच्या मनांचा गोंधळ उडवून देवो, (त्यांना) निर्हस्त करो. (१)

तुमच्या मनांत जे विचार ( त्यांचा ) अग्नीनें गोंधळ उडवला.

तो तुम्हांला घरांतून बाहेर काढो, सर्व ठिकाणांहून तुम्हांला हाकलून लावो. (२)

हें इन्द्रा, (शत्रूंच्या) चित्तांत मोह पाडून संकल्प करून तूं इकडे ये. अग्नीच्या, वाऱ्याच्या धगीनें त्यांचा सर्व बाजूंनीं विध्वंस कर. (३)

अहो व्याकृतींहो, यांच्या (कडे) जा, आणि चित्तें मोहयुक्त करा.

तसेंच यांच्या हृदयांत जें आतां आहे तें यांचें नष्ट करा. (४)

हे अप्वे, यांचीं चित्तें मूढ बनविणारी तूं जा, (आणि) (त्यांचीं) अंगें पछाड.

धाव, शोकांनीं (त्यांच्या) हृदयांत दाह कर, तमोरूपी पिशाचानें विरोधी शत्रूंना विद्ध कर. (५)

हे मरुतहो, ही जी शत्रूंची सेना जोरानें हल्ला करीत आमच्यावर चाल करून येत आहे

तिला यांच्यांतील एक दुसऱ्याला ओळखणार नाहीं अशा रीतीनें क्रियाविघातक तमानें विद्ध करा. (६)

विनियोग ३–१ प्रमाणेंच.

५

अप्वा ही पापदेवता आहे असें सायणाचार्य म्हणतात. यद् एनया विद्धः अपवीयते व्याधिः भयं वा (निरुक्त ६–१२). ऋ. मंडल १० सूक्त १०३ मंत्र १२ हा अशाच अर्थाचा मंत्र असून त्यांत अप्वा हीच देवता आहे. वाजसनेयिसंहिता (१७–४४) पहा. "अमीषां चित्तं प्रतिलोभयन्ती गृहाणाङ्गान्यप्वे परेहि"

६

अशाच अर्थाचा मंत्र वाजसनेयिसंहितेंत आहे. (१७–४७)

३–३

(हे अग्ने, हा) राजा ओरडत आहे; हे अग्ने, येथें (हा राजा) स्वराष्ट्रपालक होवो; (हे अग्ने,) सर्व व्यापून टाकणाऱ्या द्यावापृथ्वीला

( या राजाच्या रक्षणार्थ ) तूं व्यापून टाक.

सर्व जाणणारे मरुत तुला येऊन मिळोत. नमस्कारपूर्वक हवन केलेल्या या राजाला ( आपल्या राष्ट्राप्रत ) आण. (१)

कितीहि दूर असणाऱ्या बुद्धिमान इन्द्राला दीप्यमान ( ब्राह्मण किंवा घोडे ) ( या राजाच्या ) साहाय्यार्थ आणोत;

कारण गायत्री, बृहती व अर्क ( मन्त्रात्मकशस्त्र ) म्हणत देवांनीं सौत्रामणि यज्ञ करून ह्याला ( इन्द्राला ) धैर्ययुक्त केलें आहे. (२)

(हे राजा) राजा वरुण जलांतून तुला बोलावून आणो; सोम तुला पर्वतांपासून बोलावून आणो;

इन्द्र तुला ह्या (परकी) लोकांमधून बोलावून आणो, श्येनपक्षी होऊन ह्या लोकांकडे ये ( आपल्या प्रजेकडे झटकन् ये). (३)

परराज्यांत नियंत्रणांत असणाऱ्या (व) बोलावण्यास योग्य (अशा ह्या राजाला) श्येन पक्षी फार दुरून घेऊन येवो;

(हे राजा) अश्विनीकुमार तुझा मार्ग सुखकर करोत, अहो बंधुजनहो, ह्याच्या भोवतीं तुम्ही जमा व्हा. (४)

प्रतिकूल असलेले लोक तुला बोलवोत, मित्रांनीं तुला पसंत केलें आहे. इन्द्र, अग्नि आणि सर्व देव यांनीं प्रजेमध्यें तुझें संरक्षण (निश्चित रीतीनें) केलें आहे. (५)

जो बंधुजन व जो नीच तुझ्या बोलावण्याला हरकत करील त्याला, हे इन्द्रा, हाकलून लावून नंतर ह्या(राजा)ला येथें सर्वसंमत होईल असा कर. (६)

शत्रूनें हाकलून लावलेल्या राजाचा आपल्या राज्यांत पुनः प्रवेश व्हावा एतदर्थ या सूक्ताचा उपयोग सांगितला आहे (कौ. २–७).

शत्रूनें हकलून लावलेल्या राजाला आपल्या राज्यांत पुनः प्रवेश व्हावा एतदर्थ या सूक्ताचा उपयोग सांगितला आहे. (कौ. २-७.)

उदकांत दर्भ पसरून शत्रूच्या सेनेचा आकार ज्याला दिला आहे असा पुरोडाश त्यांच्यावर ठेवतात. नंतर मातीच्या ढेकळानें पाण्यांत बुडवतात.

हा विधी करण्याची जागा ज्या राज्यांतून तो राजा भ्रष्ट झाला असेल त्याच राज्यांत असावी लागते. विस्तव पेटवण्याचे जागेवर माती टाकतात. आणि राजाला शिजवलेला दूधभात खावयास देतात. जेथून माती घेतात तेथूनच बाकीची सामुग्री आणली पाहिजे. चवथ्या दिवशीं सकाळीं पाण्यांत बुडविलेला पुरोडाश राजा भक्षण करतो आणि आपल्या राज्यांत प्रवेश करतो. पुरोडाशाला सेनेच्याऐवजीं निजण्याच्या गादीचाहि आकार देतात.

१

येथें सायणाचार्यांप्रमाणेंच ओरडत आहे या क्रियापदाचा कर्ता राजा मानला आहे.

२

सख्याय म्हणजे पदच्युत राजाच्या साह्याकरितां असा अर्थ सायणाचार्यांना धरून पण इंग्रजीग्रंथकर्त्यांना सोडून येथें केला आहे.

३

सोम पर्वतावरच होतो असें या मंत्रावरून दिसतें. वरूण आणि सोम यांचें ज्याप्रमाणें जलावर व पर्वतावर प्रभुत्व त्याप्रमाणें इंद्राचें परकीयांवर प्रभुत्व दिसतें.

६

अवगमय म्हणजे हाच राजा आहे असें प्रसिद्ध कर अथवा लोकांना सांग असा अर्थ सायणाचार्यांनीं केला आहे तोहि वावगा नाहीं.

३--४

(हे राजा) राष्ट्र तुझ्याकडे आलें आहे, बलयुक्त होऊन (उदय) पाव, सर्व लोकांचा राजा--एकराट् होऊन पूर्वेकडे विराजमान हो.

हे राजा सर्व दिशा तुला आव्हान करोत, येथें तूं सेवार्ह व मानार्ह (असा) हो. (१)

(हे राजा) लोक तुला राजपदासाठीं निवडोत, तुला ह्या पांच दिव्य दिशा (निवडोत.)

राष्ट्राच्या पुरातन सिंहासनावर तूं अधिष्ठित हो, तेथून बलिष्ठ असा तूं आम्हांला संपत्ति दे. (२)

बंधुजन आज्ञेप्रमाणें तुजकडे येवोत, (तुझा) शीघ्रगति दूत अग्नीप्रमाणें संचार करो.

(तुझ्या) स्त्रिया (व) पुत्र प्रसन्नचित्त होवोत. शक्तिमान असा तूं पुष्कळ कर आलेला पहा. (३)

प्रथम अश्विनी, मित्र आणि वरूण हे दोघे, सर्व देव (आणि) मरुत तुला बोलावोत.

नंतर द्रव्यदानाविषयीं तूं मनांत आण, मग आम्हांला शक्तिमान असा तूं संपत्ति वाटून दे. (४)

अतिशय दूर अंतरावरून तूं धांवत ये, स्वर्ग आणि पृथ्वी दोनहि तुला कल्याणकारक होवोत.

कारण हा वरुण राजा तसेंच म्हणतो तो हा वरुण तुला बोलावतो. तो तूं इकडे ये.

हे इन्द्र, हे इन्द्र तूं मनुष्यांप्रत ये; (कारण) तूं वरुणाशीं एकमत करून संमति दिली आहेस.

तो हा तुला आपल्या ठिकाणीं बोलावतो; तो देवांना ( उद्देशून ) यजन करो, तो प्रजेचा स्वीकार करो. (६)

नाना प्रकारच्या विविध रूपांच्या सर्व धनसंपन्न मार्गदेवता एकत्र होऊन त्यांनीं तुला विस्तृत ( राज्य ) दिलें आहे.

त्या सर्व एक मुखानें तुला बोलावोत. शक्तिमान असा तूं दहाव्या दसकडीपर्यंत आनंदानें राज्य कर. (७)

या सूक्ताचा विनियोग ३--३ प्रमाणेंच सांगितला आहे. पण प्रत्यक्ष सूक्तांत राजाची निवड करण्याविषयीं निर्देश आहे.

२

अशाच अर्थाचा मंत्र तै. सं. ( ३--३--९--२ ) आणि मै. संहिता ( २--५--१० ) यांत आहे.

३--५

हा बलवान पर्णमणी जोरानें शत्रूंचा संहार करीत इकडे आला आहे ( येवो ).

देवांचें ओज, ओषधींचें पय (तो आहे), ( तो ) तेजानें ( तेज देऊन ) माझा सतत उत्कर्ष करो. (१)

हे पर्णमणे, माझ्या ठिकाणीं बल धारण कर, माझ्या ठिकाणीं संपत्ति ( धारण कर ).

राष्ट्र वश करून घेण्याच्या कामीं मी सर्वांत श्रेष्ठ, कोणावर अवलंबून न राहणारा असा होवो. (२)

ज्या प्रियकर मण्याला देवांनीं गुप्तपणानें वनस्पतींत ठेवलें. तो आम्हांला धारण करण्याकरतां आयुष्यासकट देव देवोत. (३)

इन्द्रानें दिलेलें, वरुणानें अनुज्ञा केलेलें, अत्यंत बलिष्ठ असें सोमाचें पान ( मजकडे ) आलें आहे.

शंभर वर्षांचें दीर्घायुष्य मिळावें म्हणून पुष्कळच शोभिवंत असा तो पर्णमणि मला धारण करूं दे. (४)

पूर्ण संरक्षण करण्याकरतां पर्णमणि माझ्यावर येऊन बसो;

जेणें करून संपन्न अथवा ज्ञानवान ( माणसा ) पेक्षांहि मी श्रेष्ठ होईन. (५)

जे बुद्धिमान सुतार जे बुद्धिमान लोहार

त्या सर्व लोकांना हे पर्ण तूं माझ्या भोंवतीं ( जमवून ) ( माझे) सेवक बनव. (६)

जे राजे, सचिव, सूत जे ग्रामाधिपति,

त्या सर्व लोकांना माझ्याभोंवतीं ( जमवून ) हे पर्ण ( माझे ) सेवक बनव. (७)

तूं शरीरसंरक्षक पर्ण आहेस, तूं वीर, मी जो वीर त्या माझा भाऊ आहेस.

म्हणून संवत्सराच्या तेजानें [ युक्त ] असा जो तूं त्या तुला हे पर्ण मी धारण करतों. [८]

तेज, बल, आयुष्य, धन इत्यादिकांची प्राप्ती व्हावी म्हणून या सूक्ताचा उपयोग सांगितला आहे. पळसाच्या झाडाचा मणी दह्यांत व मधांत बुडवून ह्या सूक्तानें अभिमंत्रण करून बांधावयाचा असतो. [ कौ. ३--२ ].

१

पर्णमणी म्हणजेच पलाश [ पळस ] मणी. पळसाच्या झाडाला पर्ण हें दुसरें नांव आहे. "अप्रयावन्" याच्याऐवजीं अप्रयावम् वाचलें पाहिजे असें कित्येकांचें म्हणणें आहे. इतरत्र अप्रयावम् हेंच आढळतें; उ. वाजसनेयिसंहिता [ ११–७५ ]. "अहरहमप्रयावं"

ह्याच मंत्र अथर्ववेदांत पुढें [ १९--५५--१ ] आला आहे. तेथें सायणाचार्य अप्रयावम् हाच शब्द घेऊन त्याचा अर्थ " सांतत्येन " [ सतत ] असा करतात.

२

अथर्ववेद ६--५५--२ हा मंत्र अशाच अर्थाचा आहे.

४

सोमपर्णाची आख्यायिका तै. संहितेंत [३--५ -७--१ ], ऋग्वेदांत [मंडल ४ सूक्त २६ व २७] आणि ऐतरेय ब्राह्मणांत [ पृ. १५२ पहा--आख्यायिका ] दिली आहे. द्युलोकांतून श्येनपक्षाचें रूप धारण करून गायत्रीनें सोम हरण केला. मार्गांत पक्ष्याचा पंख छेदला गेला. आणि खालीं पडला. " तत्पर्णोभवत् तत्पर्णस्य पर्णत्वं."

५

अर्यमन् म्हणजे संपत्तिमान "यः खलु वै ददाति सोर्यमा " [ तै. सं. २. ३. ४. १ ].

६ व ७

राजाचा बस बसावा एतदर्थ रचलेलें या सूक्तांतले हे दोन मंत्र आहेत.

धीवानः याचा अर्थ येथें बुद्धिमान् म्हणून केला आहे. सायणाचार्य धीवराः मात्स्यिकाः ( मासे मारणारे ) असा करतात. तसेंच मनीषिणः म्हणजे "बुद्धिविशेषोपजीविनः"

राजाला सुतार व लोहार यांची गरज फार लागत असली पाहिजे.

ग्रामण्यः ग्रामाधिपति किंवा सायणाचार्यांप्रमाणें ग्रामस्य नेतारः. ग्रामपुढाऱ्यांचें महत्त्व राजालाहि वाटत असे.

४-८

समृद्ध ( असा ) भूतांच्या ठिकाणीं पय स्थापन करतो. तो भूतांचा अधिपति झाला.

त्याच्या राजसूय यज्ञाला मृत्यु येतो. त्या राजाला हें राज्य पसंत पडो. [१]

चल इकडे ये; भलताच विचार मनांत आणूं नको. पराक्रमी, विचारी, शत्रूचें निर्दालन करणारा, मित्र जोडणारा ( असा तूं ) ( सिंहासनावर ) बस. देव तुला आशीर्वाद देवोत. [२]

( तेथें ) बसणाऱ्या त्याला सर्वांनीं अलंकृत केलें. स्वदीप्तिमान्, श्री धारण करणारा ( असा तो ) संचार करतो.

वीर्यवान असुराचें तें नांव मोठें आहे. विश्वरूप ( असा तो ) अमृतप्रापक गोष्टी आचरता झाला. [३]

व्याघ्रासनावर ( बसलेला ) वाघच ( असा तूं ) मोठ्या दिशा पादाक्रांत कर.

सर्व लोक तुझी इच्छा करोत, दिव्य पयस्वती उदकें ( तुझी इच्छा करोत.) [४]

अंतरिक्षांत किंवा पृथ्वीवर जीं दिव्य उदकें ( आपल्या ) पयानें उन्माद करतात,

त्या सर्व उदकांच्या तेजानें मी तुला अभिषेक करतो. [५]

दिव्य पयस्वती उदकांनीं आपल्या तेजानें तुला सिंचन केलें.

तूं मित्र वाढवणारा होशील असा तुला सविता करो. [६]

व्याघ्राला आलिंगन करणारीं हीं जलें मोठ्या सौभाग्य प्राप्तीसाठीं सिंहाला समुद्राप्रमाणें संतोषवितात.

पाण्यामध्यें उभा असलेल्या व्याघ्राला ( राजाला ) सेवकजन पुनः पुनः मार्जन करतात. [७]

अथर्व परिशिष्टांत गणमाला सांगितली आहे त्या मालेंतील अभिषेकगणांत ह्या सूक्ताचा समावेश होतो.

राजावर अभिषेक करितांना ह्या सूक्ताचा उपयोग करितात. ( कौ. २--८. )

राजाला अभिषेक करणारा पुरोहित गंगा, यमुना, सरस्वती यांसारख्या एखाद्या महानदावर जाऊन पुढें पांचव्या मंत्रांत सांगितलेल्या जलानें शांत्युदक तयार करितो. नंतर स्थालीपाक सिद्ध करून परिवृह्यानामक वेदीच्या दक्षिणेस दर्भावर उभ्या राहणाऱ्या राजाला अभिषेक करितो. मग खाटेवर बैलाचें चामडें पसरून त्याच्यावर राजाला बसवितो. यानंतर राजा व पुरोहित एकमेकांकरितां उत्कुंभ तयार करून पुरोहित आपला कलष राजाला देतो व राजा आपला कलष पुरोहिताला देतो. मग ब्रह्मा ( पुरोहित ) राजाला म्हणतो दोघांचें सुकृत् दुष्कृत् सारखेंच असो ( सहैव नौ सुकृतम् सह दुष्कृतम् ). राजा उत्तर करितो दुष्कृत् करणारेच दुष्कृत् असोत. पण सुकृत मात्र आपलें दोघांचें सारखेंच असो. नंतर पुरोहित राजाला शिजवलेलें अन्न खावयास देतो. हें झाल्यावर राजाला घोड्यावर बसवून ईशान्य दिशेकडे त्याचें तोंड फिरवितो. ब्रह्मयाला हजार गाई किंवा एक उत्कृष्ट गांव दक्षिणा म्हणून देण्यांत येते.

एकराज म्हणून अभिषेक करावयाचा असेल तेव्हां बैलाच्या चामड्याच्याऐवजीं वाघाच्या चामड्याचा उपयोग करितात. आणि अभिषेकानंतर चार राजपुत्र त्या मंचकाचे चार खूर धरून राजाला

सभेंत आणतात. दास राजाचे पाय धुतो. आणि महाशूद्र ( शूद्रांतील श्रेष्ठ ) उपसिंचन करितो. वगैरे.

१

लक्षणेनें पय ह्याचा अर्थ समृद्धि असा समजावयाचा. राजाला फक्त मृत्यूची भीती. पण मृत्यूच ज्याच्या यज्ञाला येतो त्याला मृत्यूचीहि भीति बाळगण्याचें कारण नाहीं. अथवा सायणाचार्यांप्रमाणें मृत्यू म्हणजे यम,--धर्मराज, असें मानतां येईल.

३

हा मंत्र ऋग्वेदामध्येंहि आहे ( ३--३८--४ ). ह्या मंत्रांत असुर शब्दानें इंद्राचाच बोध होतो. ऋग्वेदांतील ऋचेची इंद्र हीच देवता आहे.

व्याघ्र आणि सिंह हे शब्द राजाला उद्देशून योजले आहेत.

४--२२

हे इन्द्रा ह्या माझ्या क्षत्रियाचा ( राजाचा ? ) अभ्युदय कर, ह्याला तूं लोकांचा अधिपति कर.

ह्याच्या शत्रूंचा संकोच कर, ते सर्व ह्याला युद्धांत वश होतील असें कर. [१]

( हे इन्द्रा, ) ह्याला गांव, घोडे, गाई यांच्या ठिकाणीं वाटा दे, याचा जो शत्रू त्याला वाटा देऊं नको;

हा राजा क्षत्रियांचा मुकुटमणि होवो, हे इन्द्रा, सर्व शत्रू याला वश होतील असें कर. [२]

हा राजा संपत्तीचा धनपति होवो, हा लोकांचा लोकपति होवो.

हे इन्द्रा, याच्या ठिकाणीं मोठें तेज घाल, याच्या शत्रूला तेजोहीन कर. [३]

हे द्यावापृथ्वी, यज्ञिय गाईप्रमाणें याला पुष्कळ इष्ट (वस्तू) द्या.

हा राजा इन्द्राला प्रिय होवो, गाईंना, वनस्पतींना, पशूंना प्रिय होवो. [४]

( हे राजा ), ज्याच्यामुळें ( लोक ) जय पावतात, पराजय पावत नाहींत अशा श्रेष्ठ इन्द्राची तुझ्याशीं सांगड घालतों;

जो तुला लोकांचा तसाच राजांचा मुख्य करील, मनुष्यांचा मुख्य ( करील. ) [५]

हे राजा, तूं सर्वोत्कृष्ट हो, तुझे शत्रू, जे कोणी तुला प्रतिकूळ ( असतील ते ) निकृष्ट असोत;

सर्वांत बलिष्ठ, इन्द्र आहे सखा ज्याचा असा शत्रूंना जिंकणारा, तूं शत्रुत्व करणाऱ्यांचें धन हरण करून आण. [६]

सिंहसदृश असा तूं सर्व लोकांना खाऊन टाक, व्याघ्रसदृश असा तूं शत्रूंना पीडा दे;

सर्वांत बलिष्ठ, इंद्रसखा असणारा, जयशील असा तूं शत्रुत्व करणाऱ्यांचीं धनें अपहार करून आण. [७]

युद्धांत जय मिळावा म्हणून ह्या सूक्ताचा विनियोग सांगितला आहे. ( कौ. २–५ )

आज्यहोम व सक्तुहोम हे करावयाचे असून शिवाय दुसरा एक अग्नि तयार करून त्यांत इन्धनें म्हणून धनुष्यांचा उपयोग करितात. आणि बाणाचें समिधा म्हणून हवन करितात. नंतर अभिमंत्रण केलेलें धनुष्य पुरोहित राजाला देतो.

राजाच्या राज्याभिषेकाच्या वेळींहि हें सूक्त दररोज सकाळीं पुरोहित राजाला म्हणून दाखवितो. त्याचप्रमाणें पाण्यानें भरलेले उदकुंभ पुरोहित व राजा परस्परांस देतात.

हें सूक्त तैत्तिरीय ब्राह्मणांतहि आढळतें ( २-४–७–७ ).

१

हा मंत्र अर्थात् पुरोहित म्हणतो.

५

मानवांना ह्या शब्दावरून मानव समाज एक निराळाच होता असा तर्क वाहतो.

५–२०

मोठ्या आवाजाचा, शूरासारखा, लाकडी, बैलाचें चामडें लावलेला,

वाणी तीक्ष्ण करणारा, सिंहाप्रमाणें शत्रूंना लोळवणारा, जय मिळविणारा ( असा तूं, दुंदुभे, ) मोठ्यानें आवाज कर. [१]

बांधलेला, लाकडाचा दुदुंभी सिंहाप्रमाणें गर्जला, बैल गायीवर रेकून जातो त्याप्रमाणें;

तूं बैलासारखा सशक्त आहेस, तुझे शत्रू दुर्बल आहेत; विरोधकांना चीत करणारें असें इन्द्राचें बल तुला आहे. [२]

कळपामध्यें जोरानें विदारण करणाऱ्या बैलाप्रमाणें, हे धन मिळविणाऱ्या दुंदुभे, मोठा आवाज काढ.

शत्रूचें हृदय शोकानें विद्ध कर. गांव सोडून पळत सुटलेले शत्रू जावोत. [३]

सेनेला जिंकणारा, मोठ्या आवाजाचा, घेण्यासारखे असतील त्यांना घेणारा, असा तूं नाना प्रकारें आवाज काढ.

हे दुंदुभे, दैवी वाणी उच्चार, शत्रूंचें द्रव्य ( आमच्या ) कडे आण. [४]

दुंदुभीची दूरवर जाणारी बोलणारी वाणी ऐकून, आवाजानें जागी झालेली,

शस्त्रास्त्रांच्या कोलाहलानें भयभीत झालेली, मुलाला हातांत धरून शत्रूची बायको धांवत सुटो. [५]

हे दुंदुभे, तूं प्रथम आवाज काढ, पृथ्वीच्या पाठीवर सुरेख आवाज काढ.

शत्रूसेनेकडे तोंड उघडून पाहणारा असा तूं, हे दुंदुभे, तेजस्वी आवाज काढ. [६]

या द्यावापृथ्वींच्या मध्यें ( तुझा ) आवाज पसरलेला असो; तुझे ध्वनी लवकर गमन करोत.

ओरड, त्वेषानें कडकडाट कर, सत्रक्ष आहे ज्याचा असा तूं मित्राच्या विजयाची कीर्ति पसरविणारा ( हो. ) [७]

युक्तीनें बनवलेला असा तूं ( दुंदुभी ) मोठा आवाज काढ; वीरांचीं शस्त्रें हर्षयुक्त कर.

इन्द्रासहित वीरांना बोलाव, मित्रांच्या साहाय्यानें शत्रूंना हांणून टाक. [८]

मोठ्यानें ओरडणारा, मोठ्या आवाजाचा, शूर सेनेंतला, सर्वत्र द्वाही फिरविणारा, गर्दीत नाना प्रकारांनीं घोषणा करणारा,

यशेच्छु, कार्य जाणणारा, (अशा हे दुंदुभे,) तूं युद्धांत पुष्कळांना कीर्ति दे. [९]

यश चिंतणारा, द्रव्य जिंकणारा, बलवान्, संग्राम जिंकणारा, असा जो तूं त्या तुझी स्तोत्रानें स्तुति केली आहे.

हे चामड्याच्या दुंदुभे, सोमसवनांत बळकट दगड जसा सोमावर नाचतो तसा तूं मिळविलेल्या धनावर नाच. [१०]

शत्रूला जिंकणारा, सामर्थ्यवान्, पराभव करणारा, गोधनाची इच्छा करणारा, धडप घालणारा, भेदून टाकणारा,

वक्ता मन्त्र म्हणतो त्याप्रमाणें शब्द काढ, संग्रामजयार्थ येथें आवाज काढ. [११]

अच्युतांना च्युत करणारा, रणांगणाकडे जाणारा, शूर, जिंकता न येण्यासारखा नेता;

इंद्रानें रक्षण केलेला, जाणावयाचें तें जाणणारा, शत्रूच्या हृदयांत दाह करणारा असा तूं लवकर जा. [१२]

शत्रूच्या सेनेंत भय उत्पन्न करण्याकरतां या सूक्ताचा उपयोग करतात ( कौ. २–७ ). भेरी आदिकरून वाद्यें धुतात. नंतर त्यांना तगर व वाळा यांचा सुगंधी अर्क लावतात. पुरोहित स्वतः हीं वाद्यें तिनदा वाजवतो आणि मग वाजविणाऱ्यांच्या तीं हवालीं करतो.

१

एकदा वाग्देवी देवांमधून निघाली आणि वृक्षांमध्यें तिनें वास्तव्य केलें, म्हणून लाकडी वाद्यांतून हल्लीं मधुर आवाज निघतो अशी तै. संहितेंत ( ६--१--४--१ ) आख्यायिका आहे.

२

वासिताम् आणि वाशिताम् एकच. जिला वास येतो ती वासित-गाय. हल्लीं सुद्धां बैल गाईचा वास घेतो म्हणतात. वासिता म्हणजे फळणारी गाय.

४

दैवी वाणी म्हणजे मेघांचा गडगडाट असेंहि मानतां येईल.

७

उत्पिपानः म्हणजे त्वेषानें व श्लोककृत् म्हणजे कीर्ति पसरविणारा असा अर्थ केला आहे.

८

वदाति याच्या जागीं वदासि हें रूप समजून अर्थ केला आहे.

५--२१

हे दुंदुभे, शत्रूंच्या ठिकाणीं विषण्णता व विमनस्कता ( येईल ) असें बोल.

शत्रूंच्या ठिकाणीं परस्परांविषयीं द्वेष, पाप बुद्धि, भय आम्ही उत्पन्न करतों, हे दुंदुभे यांना मार. [१]

मनानें, डोळ्यानें, हृदयानें कंपयुक्त होऊन,

आम्ही आहुती दिल्यावर धास्तीनें भयभीत झालेले शत्रू पळत सुटोत. [२]

वनस्पतीचा बनवलेला, चामड्यानें मढवलेला, सर्वांशीं सख्य असलेला असा तूं,

आज्य ओतल्यावर शत्रूंना भय वाटेल असा ध्वनी कर. [३]

पुरुषाला पाहून ज्याप्रमाणें अरण्यांतील पशू कांपू लागतात.

त्याप्रमाणें, हे दुंदुभे, शत्रूंवर ओरड, (त्यांना) भिवव, ( त्यांचीं ) मनें गोंधळून टाक. [४]

ज्याप्रमाणें लांडग्याला पाहून शेळयामेंढ्या घाबरून पळत सुटतात,

श्येन पक्षाला पाहून जसे पक्षी थरकांप होतात, सिंहाच्या ओरडण्यानें जसे रात्रंदिवस ( पशु भयभीत होतात.)

त्याप्रमाणें, हें दुंदुभे, तूं शत्रूंवर ओरड, (त्यांना) भिवव ( त्यांचीं मनें गोंधळून टाक. [५ व ६]

दुंदुभीनें व मृगाजिनानें शत्रूंना

संग्रामाचें जे नियंत्रण करतात ते सर्व देव त्रस्त करते झाले. [७]

ज्या पावलांच्या आवाजांनीं छायेबरोबर इन्द्र क्रीडा करतो,

त्यांनीं जे टोळी करून येत आहेत असे हे आमचे शत्रू भयभीत होवोत. [८]

धनुष्याच्या दोरीचा आवाज व दुंदुभी यांनीं दिशा आक्रोशमय होवोत.

ज्या ( दिशां ) कडे शत्रूंच्या पराभूत सेना टोळ्याकरून जात असतील. [९]

हे आदित्या, त्यांचे डोळे काढ, अहो मरीची हो त्यांच्यामागून धांवा.

( त्यांचें ) बाहुवीर्य नाहींसें झालें कीं पाईक त्यांचा पाठलाग करोत. (१०)

पृश्नि आहे माता ज्यांची असे बलवान् मरुत हो, तुम्ही इन्द्राच्या मदतीनें शत्रूंचा संहार करा.

राजा सोम, राजा वरुण, महादेव आणि मृत्युतुल्य इंद्र ( मारोत ) [११]

ह्या सूर्यनिशाणाच्या हुशार देवसेना
शत्रूंना जिंकोत. स्वाहा ! [१२]

५--२० या सूक्ताप्रमाणेंच याहि सूक्ताचा उपयोग सूत्रकार सांगतात.

५--२० यामधील विधानाशिवाय या सूक्तांतील विधान येणेंप्रमाणें.

पुरोहित उच्चस्वरानें हवन करतो. स्रुवा होमावरून फिरवतो. नंतर सोमलता मृगचर्माला बांधून तें चर्म राजावर बांधतो. (कौ.२-७).

८

कशाला उद्देशून इंद्राच्या क्रीडेचा उल्लेख येथें केला आहे समजत नाहीं. सावलीबरोबर करण्याचा हा एक खेळ असावा.

१०

पत्संगिनीः या शब्दाचा अर्थ पाईक असा केला आहे.

११

इन्द्रवरुणांच्यावरोबर महादेव या देवाचा उल्लेख आला आहे.

६–३८

सिंह, वाघ, व सर्प यांच्यांत जें—अग्नि, ब्राह्मण ( आणि ) सूर्य यांच्या ठिकाणीं जें—तेज ( तें आम्हांकडे येवो ).

ज्या भाग्यवान देवीनें इन्द्रास प्रसविलें ती तेजोयुक्त ( होऊन ) आमच्याकडे येवो. ( १ )

जें तेज हत्तीमध्यें, चित्यामध्यें, जें सुवर्णांत, जें उदकांत, गुरांत, पुरुषांत ( तें आम्हांस प्राप्त होवो ).

ज्या भाग्यवान देवीनें इन्द्राला प्रसविलें ती तेजोयुक्त ( होऊन ) आमच्याकडे येवो. ( २ )

रथांत, फांशांत, बैलाच्या शक्तींत, वायूंत, पर्जन्यांत, वरुणाच्या शक्तींत ( जें तेज तें आम्हांकडे येवो ).

ज्या भाग्यवान देवीनें इन्द्रास जन्म दिला ती तेजोयुक्त ( होऊन ) आमच्याकडे येवो. (३)

क्षत्रियांत, नगाऱ्यांत, ओढलेल्या ( धनुष्यां )त, घोड्याच्या शक्तींत, पुरुषाच्या शब्दांत ( जें तेज तें आमच्याकडे येवो).

ज्या भाग्यवान देवीनें इन्द्रास जन्म दिला ती तेजोयुक्त ( होऊन ) आमच्याकडे येवो. ( ४ )

हें व याच्या पुढचें सूक्त ( ६--३९ ) हीं राजकर्मांगभूत आहेत. राजामध्यें वर्चस् म्हणजे ओज यावें हें या दोन सुक्तांचें कार्य आहे. स्नातक, सिंह, वाघ, बोकड, मेंढा, बैल आणि राजा यांपैकीं

कोणाच्या तरी नाभीचे केस घेऊन त्यांना लाख लावून व सोन्यानें वेष्टून आणि या सूक्तांनीं अभिमंत्रण करून ताइतासारखे राजाच्या ( मणगटाला ) बांधतात.

तसेंच पळस वगैरे दहा वृक्षांच्या काटक्या घेऊन त्यांस लाख लावून त्या सोन्यानें वेष्टून त्यांचें या दोन सूक्तांनीं अभिमंत्रण करून राजाच्या अंगावर त्या बांधतात. पळस, उंबर, जांभूळ, कांपील (?) स्रग्वंध, सरस, तीळ, वायवर्णा, बेल, अर्जुन, हे ते दहा वृक्ष होत.

उत्सर्जन कर्माकडेहि या दोन सूक्तांचा विनियोग सांगितला आहे. ( कौ. २--४ )

४

आयतायाम् म्हणजे दोरी ओढलेल्या धनुष्यांत असा अर्थ केला आहे. असाच अर्थ सायणाचार्यांनीं अ. ९--२--१ मध्यें केला आहे. येथें मात्र त्यांनीं आयतायाम् हें दुंदुभीचें विशेषण करून "आताड्यमानायाम्" असा अर्थ केला आहे.

६--३९

इंद्रप्रेरित, सहस्रवीर्य, सुपुष्ट, धाडसानें केलेला, प्रसरणशील, यशोदायी हवी वृद्धिंगत होवो

दीर्घकाल दर्शन व्हावें म्हणून ( तसेंच श्रेष्ठता प्राप्त व्हावी म्हणून ) हवी देणाऱ्या मला समृद्ध कर. ( १ )

यश देणाऱ्या, यशस्वी आमच्या इंद्राला यशांनीं नमस्कार करणारे आपण भजूं या.

तो ( तूं ) इंद्रप्रेरित राष्ट्र आम्हांला दे. त्या तुझ्या देणगींत आम्ही यशस्वी होवो. ( २ )

यशस्वी इंद्र, यशस्वी अग्नी, यशस्वी सोम झाला

यशस्वी, सर्व प्राण्यांहून मी यशस्वी आहें. ( ३ )

या सूक्ताचा विनियोग ६--३८ प्रमाणें म्हणून वर सांगितलेंच आहे. पण मागल्या सूक्तांत वर्चस् ही प्रमुख कल्पना आहे तर यांत यशस् ही आहे.

२

यशांनीं म्हणजे यशदायी हवींनीं असेंच समजावयाचें. पहिल्या मंत्रांत " यशः हविः" म्हणजे यश हेंच हवि असें म्हटलें आहे. त्याला अनुलक्षून या मंत्रांत हविर्भिः या अर्थानें यशोभिः शब्द वापरलेला दिसतो.

३

तिसऱ्या पादांतील "यशाः", यशस्वी हा शब्द निष्कारण दिसतो.

६--९७

यश पराभवशील होवो, अग्नि पराभवशील होवो, सोम पराभवशील होवो, इन्द्र पराभवशील होवो.

आम्ही अग्निहोत्री अशारीतीनें हवी देऊं कीं सर्व सेनांचा मी पराभव करीन ( १ )

विद्वान् मित्रावरुण हो (तुम्हांला) स्वधा असो, प्रजायुक्त क्षत्र मधानें सिंचित करा.

निर्ऋतीला दूर अंतरावर गाडून टाका, केलेलें पाप आम्हां पासून काढून टाका. ( २ )

या वीराप्रमाणें तुम्ही उत्साह धरा, मित्रहो बलवान इन्द्राप्रमाणें ईर्षा धरा

ग्राम जिंकणारा, गाई जिंकणारा वज्रबाहू, रथादि जिंकणारा, जोरानें हिंसा करणारा ( अशा इन्द्राप्रमाणें ). ( ३ )

६-९७, ९८ व ९९ हीं तीन सूक्तें संग्रामजयकर्मांकडे उपयोगांत आणतात. ( कौ. २--५ )

अ. ४--२२ मध्यें सांगितल्याप्रमाणेंच हा विधि आहे. म्हणजे आज्यहोम, सक्तुहोम, नंतर धनुष्य हेंच इंधन समजून बनवलेला अग्नि, त्यांत धनुष्याचीच समिधा करून हवि देणें तसेंच बाणांचा अग्नि करून बाणांची समिधा देणें व राजाला पुरोहितानें मग धनुष्य व बाण देणें इत्यादि प्रकार करतात.

उपाकर्मांकडेहि या सूक्तांचा विनियोग विहित आहे. शिवाय इन्द्रमहोत्सवांत ६--९७ या सूक्तानें पूर्णहोम करतात.

२

निर्ऋति म्हणजे पापदेवता. पहिल्या ओळींतील क्षत्र या शब्दानें राष्ट्र समजलें पाहिजे.

३

हा मंत्र अथर्ववेदांत पुनः आला आहे. (१९-१३-६). इतर वेदांतहि थोड्या फार फरकानें आहे. उ. वा. सं. १७--३८; ऋ. १०--१०३--६ वगैरे.

अज्म=अजनशीलं=क्षेपणशीलं ( सायण ). पण अज्मन्=रथ असा अर्थ येथें केला आहे. अ. ११-१२-२२मध्यें हाच अर्थ सायणांनीं दिला आहे. पण पुढें १९--१३--६ मध्यें युद्धस्थान असाहि अर्थ केला आहे.

६--९९

हे इन्द्रा, तुला वरून मी प्रथम तुला संकटामुळें बोलावतों.

बलिष्ठ, विचारी, बहुनामधारी राजाला ( इन्द्राला ) मी बोलावतों. ( १ )

जें शत्रूचें हत्यार आज आमचा घात करण्यास उचललें आहे त्या ठिकाणीं इन्द्राचे बाहू आम्ही सभोंवार धरतों. ( २ )

संरक्षण करणाऱ्या इन्द्राचे बाहू आम्ही सभोंवार धरतों. तो आमचें संरक्षण करो.

हे देव सविता, राजा सोम कल्याण व्हावें म्हणून मला प्रसन्न मनाचा कर. ( ३ )

विनियोग मागील सूक्ताप्रमाणें

१

वरिमतः याचा वरून असा अर्थ केला आहे. तो ऐतिहासिक दृष्ट्या बरोबर असण्याचा संभव आहे.

एकजम्=असहायोत्पन्नं ( सायण अ. ४--३१--३ ). इन्द्राचें नांव.

८--८

मंथन करणारा, पराक्रमी, शूर, किल्ले फोडणारा इन्द्र मंथन करो,
अशा रीतीनें कीं, शत्रूंच्या हजारों फौजा आम्ही ठार करूं शकूं. ( १ )

फुंकली जाणारी दुर्गंधयुक्त रज्जु त्या सेनेला सडलेली करो;
धूर व आग पाहून शत्रू हृदयांत भीति धरोत. ( २ )

हे अश्वत्थ, त्या पलीकडच्या ( लोकांना ) चिरून टाक; हे खदिर, त्यांना लवकर खाऊन टाक.

एरंडाप्रमाणें ते मोडले जावोत, यांना वधक शस्त्रांनीं मारो. ( ३ )

परष नांवाचें ( झाड ) त्यांना गांठाळ करूं दे, वधक शस्त्रांनीं यांना मारुं दे.

मोठ्या जाळयानें बांधलेले ( हे ) बाणाच्या बोरूप्रमाणें लवकर भग्न होवोत. ( ४ )

अंतरिक्ष जाळें होतें, मोठ्या दिशा जाळ्याचे खांब होते;

त्याच्या योगानें इन्द्रानें दस्यूंच्या सेनेला गराडा घालून पळाववयास लावलें. ( ५ )

घोडे असलेल्या बलवान इन्द्राचें जाळें मोठेंच होतें.

त्यानें सर्व शत्रूंना यांच्यापैकीं एकहि सुटणार नाहीं अशा रीतीनें पकड. ( ६ )

हे शूर इन्द्रा, मोठा, हजारांची बरोबरी करणारा, शतवीर्य असा जो तूं त्या तुझें जाळें मोठें ( आहे ).

सेनेनें गराडा घालून दस्यूंचे शेंकडो, हजारों, दशसहस्र, दशकोटी ( लोक ) इन्द्रानें मारले. ( ७ )

पराक्रमी इन्द्राचें हा लोक मोठें जाळें होतें;

त्या इन्द्राच्या जाळ्यानें त्या सर्वांना मी अंधःकारानें व्यापतों. (८)

दुबळेपणा, मोठें अपयश व मंत्रानें घालवतां न येण्यासारखें दुःख, श्रम व गुंगी व मोह यांनीं त्या सर्वांना मी व्यापतों. ( ९ )

मी यांना मृत्यूच्या स्वाधीन करतों, मृत्युपाशांनीं ते बांधले आहेत, मृत्यूचे जे दुष्ट दूत त्यांच्याकडे यांना बांधून मी नेतों. ( १० )

हे मृत्युदूत हो, हे यमदूत हो, यांना न्या, उघडे करा;

हजाराहून अधिक मारले जावोत, भवाची काठी यांना चिरडून टाको. ( ११ )

साध्यदेव जाळ्याचा एक दांडा धरून तेजस्वीपणानें जातात;

रुद्र एक, वसू एक, आदित्यांनीं एक धरला. ( १२ )

सर्व देव वरतून जोरानें शत्रूंना पालथेपाडीत येवोत.

मधल्यामार्गानें मोठ्यासेनेला मारीत अंगिरस येवो. ( १३ )

वनस्पती, वानस्पती, ओषधी, लता,

द्विपाद, चतुष्पाद यांस मी पाठवितों, म्हणजे त्या सेनेला ते मारतील. ( १४ )

गंधर्व, अप्सरा, सर्प, देव, पुण्यजन, पितर,

दृष्ट, अदृष्ट यांना मी पाठवतों, म्हणजे त्या सेनेला ( ते ) मारतील. ( १५ )

ज्यांवर आक्रमण केलें असतां तूं सुटणार नाहींस असे हे मृत्यूचे पाश पसरले आहेत.

हें जाळें त्या सेनेला हजारांनीं मारो. ( १६ )

हा प्रखर यज्ञ हजारों प्रकारांनीं प्रज्वलित केला आहे.

भव आणि ठिपके आहेत बाहूंवर ज्याच्या असा शर्व, तुम्ही त्या सेनेला मारा. ( १७ )

मृत्यूचें स्थान त्यांना प्राप्त होवो; क्षुधा, दुबळेपणा, वध, भय ( त्यांना प्राप्त होवो ).

हे शर्व, इन्द्र आणि तूं सांपळा आणि जाळें यांनीं त्या सेनेला मारा. ( १८ )

पराजित झालेले शत्रूहो, जा पळा, ( आमच्या ) स्तोत्रानें हुडकवून लावलेले तुम्ही धांव मारा.

बृहस्पतीनें हुडकावलेल्या यांच्यापैकीं एकहि सुटणार नाहीं. ( १९ )

यांचीं शस्त्रें खालीं पडूं दे, ( धनुष्याला ) बाण जोडण्यास ते समर्थ न होवोत.

तसेंच पुष्कळच घाबरलेले जे हे त्यांचीं मर्मस्थळें ( आमचे ) बाण मारोत. ( २०

द्यावापृथ्वी यांना आक्रोश करावयास लावो, देवतांसहर्तमान अंतरिक्ष ( यांना आक्रोश करावयास लावो ),

त्यांना शहाणा मनुष्य, आधार न मिळो, परस्परांना मारीत त्यांना मृत्यु येवो. ( २१ )

चार दिशा या देवरथाच्या घोड्या, पुरोडाश हे खूर, अंतरिक्ष हीं उद्धि ( बसण्याची जागा ? ),

द्यावापृथ्वी दोन बाजवा, ऋतू लगाम, मध्यप्रदेश नोकर, वाणी मार्ग ( होय ). ( २२ )

संवत्सर रथ, पूर्णसंवत्सर सारथीबसण्याची जागा, विराट् धुरा, अग्नी रथाचें मुख,

इन्द्र सव्यष्ठा ( डाव्याकडे बसणारा ), चन्द्रमा सारथी. ( २३ )

येथून जय मिळव, येथून विजयी हो, जिंक, जिंक, स्वाहा, ( कल्याण असो ). यांना जय मिळो, ते पलीकडचे जिंकले जावोत! यांना स्वाहा, त्यांना दुराहा ( अकल्याण );

जांभळया रंगानें मी यांना आच्छादितों. ( २४ )

ह्या आठव्या सूक्तांतील ऋचांनीं केल्या जाणाऱ्या कर्मास "सेना-कर्म" हें नांव दिलें आहे. कारण ह्यांतील सर्व मंत्रांचा उपयोग शत्रुक्षय, शत्रूपासून उत्पन्न होणाऱ्या भयाचा नाश, शत्रूचा पराजय, स्वतःच्या बलाचें वर्धन, इत्यादि कार्यें सिद्ध होण्यासाठीं केला जातो.

या सेनाकर्माच्या अग्नीसाठीं "पूतिरज्जुः" या मंत्राच्या अर्ध्या ऋचेनें अग्नि पडावयाच्या ठिकाणीं जीर्ण रज्जू ठेवून अश्वत्थ ( पिंपळ ) करिमालक ( शमी ) या दोघांच्या संघर्षानें "इन्द्रो मन्थतु" या मंत्रानें अग्नि सिद्ध करावा लागतो व अग्नि सिद्ध करतांना धूर निघाल्यावर या सूक्तांतील दुसरी अर्धी ऋचा, "धूममग्निं परादृश्यां" ( यांतील अग्नि शब्द गाळून ) म्हणून अग्नीची सिद्धता करावयाची असते. अग्नि निघूं लागल्या

नंतर त्याच दुसऱ्या मंत्रांतील दुसरी अर्धी ऋचा "धूम" शब्द वगळून म्हणावयाची असते. अशा रीतीनें अग्नि सिद्ध झाला म्हणजे त्या सिद्धाग्नींत पुढील कर्म करावयाचें असतें. "इन्द्रो मन्थतु" या ऋचेनें अश्वत्थसमिधांचें हवन करतात.

या सर्व ऋचा म्हणून अश्वत्थ, करिमालक, एरण्ड, पलाश, खदिर, शर या समिधांचें हवन करावयाचें असतें. असें केलें असतां शत्रुक्षय, शत्रुभयनाश वगैरे फल मिळतें.

तसेंच, भांगेचे व मुंजगवताचे पाश, बाधक झाडाच्या काटक्या, पिंपळाच्या लाकडाचे केलेले सापळे, आणि भांगेची केलेलीं जाळीं, हीं सर्व अनुक्रमें या सूक्तानें अभिमंत्रून रणांगणावर फेकून देतात.

यांचें कल्याण होवो असें म्हणून आपलें व आपल्या मित्रांचें बल वाढविण्याकरतां बाधक काष्ठांनीं प्रज्वलित केलेल्या अग्नींत उजव्या हातानें घृताचें हवन करतात.

शत्रुसेनेचा नाश व्हावा या उद्देशानें यांचें अकल्याण होवो असें म्हणून "इंगिड" चें हवन डाव्या हातानें करतात. नंतर अग्नीच्या उत्तरेस पिंपळाची तांबडी टहाळी जमिनींत उरफाटी करून पुरतात मग निळ्या आणि तांबड्या सुतांनीं ती सर्व वेष्टून दक्षिणेकडे फेकून देतात.

हें सेनाकर्म युद्धप्रसंगीं किंवा अन्य वेळेस अरण्यांत करावयाचें असतें.

या प्रमाणेंच कौशिकसूत्रांतहि (२--७) सांगितलें आहे.

३

वधक, बधक, गिरिमाल, कृमिमाल, करिमाल हीं सर्व नांवें एकाच झाडाचीं आहेत.

१४

पहिली ओळ कांड ११ सू. ११ त आली आहे ( मंत्र १४ ).

१५

पुण्यजन हे कोण ? पितरांचें हें विशेषण किंवा निराळे लोक ?

१७

पृश्निबाहु हा कोणी निराळा देव होता कीं काय ? येथें शर्वाचें विशेषण केलें आहे, पण तें व्याकरणाच्या विरुद्ध आहे.

१८

आषम्=स्थान किंवा पाश.

२१

दुसरी ओळ पूर्वी आली आहे ( ६-३२-३ ).

११-११

जे बाहू, जे बाण, आणि धनुष्यांचे पराक्रम, तरवारी, परशु, आयुध आणि मनांत जें योजलें असेल तें,

तें सर्व, हे अर्बुदे, तूं शत्रूंना दिसेल असें कर आणि भूतें दाखव. ( १ )

हे देवमित्र हो, तुम्ही उठा, तयार व्हा,

हे अर्बुदे, जे आमचे मित्र आहेत ते ज्यांच्यावर तुमची नजर आहे व जे तुमच्याकडून संरक्षण केलें गेलें आहेत असे असोत. (२)

हे अर्बुदे ( व न्यर्बुदे ), तुम्ही उठा, आरंभ करा; आदानसंदानांनीं शत्रूंच्या सेनेला बांधा. ( ३ )

अर्बुदिनामक जो देव व प्रभु न्यर्बुदि, ज्यांनीं अंतरिक्ष व्यापून टाकिलें आहे आणि ही मोठी पृथ्वी ( व्यापून टाकिली आहे ).

ह्या दोन इंद्राच्या सोबत्यांसह मी सेना घेऊन जिताचा पाठलाग करतों. ( ४ )

हे देवजन अर्बुदे, तूं सेनेसह ऊठ;

शत्रूंची सेना भग्न करून (आपल्या) शरिरांनीं झाक. (५)

हे न्यर्बुदे, सात प्रकारच्या भूतांना उभारून (शत्रू पाहतील असें (करून)

त्यांसह आज्य हवन केल्यावर तूं सेनेसह ऊठ. (६)

आपल्याला मारून घेणारी, तोंडावर अश्रुधारा असणारी, आखुड कानांची,

विकेशी अशी (शोक विव्हल स्त्री), हे अर्बुदे, तूं पुरुषाला चावून मारल्यावर आक्रोश करो. (७)

हे अर्बुदे, तूं चावल्यावर, कराकर ओढीत, मनानें पुत्राला इच्छीत,

पतीला, भावाला, नंतर ज्ञातीच्यांना (इच्छीत) (ओरडत जावो). (८)

अलिक्लव, जाष्कमद, गृध्र, श्येन पक्षी,

काक, पक्षी, हे अर्बुदे, तूं शत्रूंच्या ठिकाणीं चावल्यावर (तें) पाहून तृप्त होवोत. (९)

तसेंच सर्व श्वापद, मक्षिका, क्रिमी, हे अर्बुदे, तूं चावल्यावर पुरुषाच्या शरीरावर तृप्ती पावोत. (१०)

हे न्यर्बुदे, तूं (आणि अर्बुदि), (शत्रूंचे) प्राणापान घ्या, बाहेर काढा;

हे अर्बुदे, तूं शत्रूंच्या ठिकाणीं चावा घेतल्यावर (तें) पाहून मोठाले आवाज निघोत. (११)

कांपावयास लाव, ते कांपोत, शत्रूंना भीतीनें युक्त कर; हे न्यर्बुदे, शत्रूंना मोठ्यानें आवळून आणि बाहूंनीं कवटाळून मारून टाक. (१२)

यांचे बाहू गोंधळून जावोत, हृदयांत जे बेत असतील ते (फसोत).
हे अर्बुदे, तूं चावल्यावर यांचें कांहींहि अवशिष्ट न राहो. ( १३ )
हे अर्बुदे, तुझ्या चावण्यानें पुरूष मेल्यावर गृह सुटलेल्या, काढलेल्या केसांच्या, रडणाऱ्या,

स्वतःला ताडण करून घेणाऱ्या, ऊर (व) पोटऱ्या बडविणाऱ्या (अशा शत्रूच्या स्त्रिया) पळत सुटोत. (१४)

बरोबर कुत्रा असलेल्या स्वरूपवान अप्सरा, आणि, हे अर्बुदे,
भांड्यांत चाटणारी, वाईट जागीं टाकलेलें इच्छिणारी रिशा
त्या सर्वांना, हे अर्बुदे, तूं शत्रूंच्या दृष्टीस पाड, व भुतें दाखव. (१५)
खड्डूरावर चालणारी, ठेंगू, आंखूडवस्त्र नेसणारी, जे पिशाच गुप्त (आहेत), जे गंधर्व व अप्सरा, सर्प, इतरलोक, राक्षस, ( १६)
चारदांताचे, काळसर दांतांचे, कुंभासारख्या शिश्नाचे, रक्त ज्यांच्या तोंडावर आहे असे,

स्वयंभू भयंकर असे, भयोत्पादक ( या सर्वांना शत्रूंना दाखव).(१७)
हे अर्बुदे, शत्रूंच्या ह्या पलीकडल्या सेनांना घाबरून टाक.
पराभव करणारे, आणि जय मिळविणारे असे तुम्ही इन्द्राचे
सोबती शत्रूंना जिंका. ( १८ )
हे न्यर्बुदे, शत्रू लीन, घायाळ, मेलेला पडो.
अग्नीच्या ज्वाळा, धुराचे लोट, सेनेबरोबर जय मिळवीत जावोत. (१९)

तिनें (सेनेच्या मदतीनें) पराभूत झालेल्या शत्रूंच्यापैकीं प्रमुख असतील त्यांना, हे अर्बुदे, शचीपती इन्द्र ठार करो. यांपैकीं कोणीहि न सुटो. ( २० )

( शत्रूंचीं ) हृदयें फुटोत, प्राण वर जावो.

शत्रूंचें तोंड शुष्क होवो, पण मित्रांचें नको. ( २१ )

जे शूर, जे भित्रे, जे पळपुटे, जे बधिर,

जे काळे बोकड, तसेंच जे बोकडाप्रमाणें ओरडणारे,

त्या सर्वांस, हे अर्बुदे, तूं शत्रूंना दाखव व भुतें दाखव.( २२ )

अर्बुदी व त्रिषंधी आमच्या शत्रूंना मारोत,

असें कीं, हे शचीपते वृत्रघ्न इन्द्र, आम्ही या शत्रूंच्या ( लोकांना) सहस्रशः मारूं शकूं. ( २३ )

वनस्पती, वनस्पतीच्या वस्तु, ओषधी, आणि लता, गंधर्व, अप्सरा, सर्प, देव, यक्ष, पितर,

त्या सर्वांना, हे अर्बुदे, शत्रूंना दाखव, तसेंच भुतें दाखव. ( २४ )

( हे शत्रूहो ) तुमच्यावर, मरुत, देव आदित्य, ब्रम्हणस्पती, प्रभुत्व मिळवोत;

इन्द्र, आणि अग्नि, धाता, मित्र, प्रजापती तुम्हांला जिंकोत;

ऋषी तुमच्यावर सत्ता मिळवोत, हे अर्बुदे, शत्रूंच्या ठिकाणीं तूं चावल्यावर ( तें ) पाहून ( २५ )

हे देवमित्रहो, त्या सर्वांवर प्रभुत्व मिळविणारे तुम्ही उठा, तयार व्हा.

हा संग्राम जिंकून आपआपल्या स्थानीं जा. ( २६ )

या व पुढच्या सूक्ताला अर्थसूक्त म्हणतात. जयेच्छुराजानें युद्धाचे वेळीं आपल्या योद्धयांना यांनीं सूत्रांत सांगितलेल्या लक्षणानुसार प्रोत्साहन द्यावें.

तसेंच आपणांस जय मिळावा म्हणून या सूक्तानें दधि, घृत व सातू यांचें हवन करावें. त्याचप्रमाणें धनुष्य हें आहे इंधन ज्याचें अशा अग्नींत धनुष्यरूपी समिधेवरच पृषदाज्य सोडून तिचें हवन करावें;

तसेंच बाणरूपी समिधांनीं प्रज्वलित केलेल्या अग्नींत पृषदाज्ययुक्त बाणरूपी समिधेचें हवन करावें.

नंतर धनुष्याला पृषदाज्य लावून व त्याचें या सूक्तानें अभिमंत्रण करून तें पुरोहितानें विजयेच्छु राजाला द्यावें.

१

अर्बुद नांवाचा सर्पऋषि होता असें ऐ. ब्राह्मणांत म्हटलें आहे. " अर्बुदः काद्रवेयः सर्पऋषिर्मन्त्रकृत् " ( ऐ. ब्रा. ६–१ ). मन्त्रकृत् असेंहि त्यास म्हटलें आहे. (ऋ. सूक्त १७५ मं. १०). ह्याचा ऋषि अर्बुद आहे. तसेंच याच मंडलांतील ९४ व्या सूक्ताचा ऋषि " सर्पकद्रुपुत्र " अशा निर्देशानें उल्लेखलेला आढळतो. त्रिताकरतां इन्द्रानें अर्बुदाला ठार केलें असेंहि ऋग्वेदांत आहे ( २–११–२०;८–३२–३,१–५१–६;२–१४–४ ). अर्बुदी व न्यर्बुदी हे अर्बुदाचे मुलगे; पण या व पुढील सूक्तांशिवाय या दोन पुत्रांचा उल्लेख वेदांत आढळत नाहीं.

२

देवजन=देवलोक=देव. जन शब्द " देव " व अशाच दुसऱ्या शब्दांना लावलेला आढळतो. देवजन हा शब्द " देव " याचा प्रतियोगी तर नाहीं ? देवजन म्हणजे देव नांवाचे लोक असाच अर्थ असावा.

३

आदान व संदान हीं निरनिराळ्या दोऱ्यांचीं नांवें असावीं. रज्जुयन्त्र असें सायणाचार्य म्हणतात. पण स्पष्ट बोध होत नाहीं.

क्रियापद द्विवचनी असल्यामुळें न्यर्बुदी हाहि कर्ता अध्याहृत समजला पाहिजे.

४

सर्व अंतरिक्षाला व पृथ्वीला व्यापून टाकणारे हे अर्बुदी व न्यर्बुदी देव कोण असावे ?

न्यर्बुदी या देवाचा उल्लेख याच मंत्रांत प्रथम आला आहे. न्यर्बुदी देवाविषयीं ब्लुमफील्डची कल्पना विचार करण्यासारखी आहे. तो म्हणतो ऋग्वेदांत अर्बुदाचा उल्लेख आला आहे (तीं स्थळें मागें निर्दिष्ट केलींच आहेत). त्यांत नि हा उपसर्ग अर्बुद शब्दाच्या आधीं आलेला आहे. त्यावरून पुढें गैरसमजानें न्यर्बुदी (न्यर्बुद ?) नांवाचा एकदेव अस्तित्वांत आला असावा.

अर्बुदाला इन्द्रानें ठार मारल्याचें ऋग्वेदांत वर्णन आहे. येथें तर त्याचे पुत्र इन्द्राचे मित्र असें म्हटलें आहे.

५

अर्बुदीला देवजन म्हटलें आहे. छांदोग्यांत (७–१) सर्पदेव-जनविद्या म्हणून सर्पदेवजनांची विद्या सांगितली आहे. देवज-नांना सर्पविषावर उपाय माहीत होते असें अथर्व वेदांत (६–५६–१ व २) वर्णन आहे. देवांपासून देवजन भिन्नत्वानें वर्णिले आहेत. या मंत्रांतील वर्णन खरोखर सर्पाचें आहे कीं तें रूपक आहे हें निश्चित करतां येत नाहीं.

७

जिचा नवरा मेला अशा स्त्रीचें येथें वर्णन आहे. केश मोकळें सोडणें, छाती बडवून घेणें वगैरे चाली फार जुन्या आहेत. कुधु-कर्णी म्हणजे कर्णभूषणें जिनें काढलीं आहेत अशी. सायणाचार्यांनीं केलेला हा अर्थ बरोबर आहे. ब्लुमफील्डचा संशय निराधार दिसतो. येथें कपाळाच्या कुंकवाचा अथवा नाकांतल्या नथीचा

उल्लेख नाहीं हें विचार करण्यासारखें आहे. विकेशी म्हणजे केस जिचे काढले आहेत अशी. यावरून वपनाची चाल फार प्राचीन दिसते. सायणाचार्य व त्यांना अनुसरून इंग्रजी भाषांतरकार विकीर्ण म्हणजे विखुरलेले केस आहेत जिचे असा अर्थ करतात.

८

या मंत्राचा अर्थ चांगला लागत नाहीं. करूकरं संकर्षंती म्हणजे बोटाचीं पेरें मोडणारी असा भाष्यकार अर्थ करतात. इंग्लिशभाषांतरकारांना हा अर्थ पसंत पडत नाहीं. पण सायणांचा अर्थ कांहीं वावगा नाहीं. करू म्हणजे अनुकरणशब्द. असा शब्द करणारा तो करू-कर. हाताचीं बोटें मोडतात तेव्हां असा शब्द अथवा आवाज निघतो. शोक झाला असतां बोटें मोडतात. पण मनानें पुत्राची वगैरे इच्छा करणारी म्हणजे काय ? अशा वेळीं बायको मोठ्यानें ओरडत राहील. तसेंच विष घालविण्याकरितां जर यांना हाका मारावयाच्या तर ज्या तिच्या नवऱ्याला विषबाधा झाली त्याला हाका-मारून काय करणार! असा अर्थ केला तर? हे अर्बुदे, तूं चावल्यावर बोटें मोडणारी, पुत्र असता तर बरें झालें असतें असें मनांतल्या मनांत म्हणणारी (मनसा पुत्रमिच्छन्ती), पतीला, भावाला व इतर स्वकीयांना (मोठ्यानें हाका मारो=आक्रोशतु). आत् म्हणजे आणि. क्रोशतु हें मागल्या मंत्रांतील क्रियापद येथें घेतलेंच पाहिजे. हाच अर्थ एकंदरींत बरा दिसतो.

९

अलिक्लव, आणि जाष्कमद हे कोण पक्षी आहेत त्याचा बोध होत नाहीं. समीक्षयन् हें एकवचन आहे. वस्तुतः अनेकवचन पाहिजे. सायण—व्यत्ययेन एकवचनम्.

११

समीक्षयन् पासूनचा चौथा पाद ध्रुपदासारखा आहे मंत्र ९ पहा.

१२

ऊरुग्राहैः असें सायणाचार्य वाचतात. त्याचा अर्थ अर्थात् मांड्यांत धरून असा होईल.

१४

घर सुटलेलें आहे ज्यांचें हा अर्थ "अघारिण्यः" या पदाचा केला आहे. घर किंवा घार याचा अर्थ घर असा आपस्त्यांच्या कोशांत दिला आहे त्याला अनुसरून वरील अर्थ दिला आहे. सायण अघ म्हणजे दुःख असा अर्थ देतात. अघारिणी म्हणजे शोकानें विव्हल झालेली. पण धावोत या क्रियापदाला योग्य असा घर सोडलेली हाच अर्थ होईल. मात्र घार म्हणजे घर हा अर्थ बरोबर असला पाहिजे. आमचा आधार आपस्त्यांचा कोश.

१५

सायणाचार्यांप्रमाणें येथें भाषांतर केलें आहे. पण रूपवान अप्सरा दाखवण्यानें शत्रूसेनेंत भीति कशी उत्पन्न होईल ? मोह उत्पन्न करण्यासाठीं असेल तर ठीक आहे. कुत्र्याच्या स्वरूपाच्या अप्सरा व भुतें ( रूपकाः ) असा अर्थ ब्लुमफील्डनें केला आहे. पण त्यापेक्षां सायणांचा अर्थ बरा.

रिशा म्हणजे काय ? सायणाचार्य वशा शब्द समजून त्याचा गाय असा अर्थ करतात. रिशा म्हणजे स्त्रीभूत असा अर्थ इंग्रेजी भाषांतरकार देतात. रिश म्हणजे शत्रू. रिशा म्हणजे शत्रुस्त्री असें समजलें तरी अर्थ लागतो. शत्रुस्त्रीचें भूत दाखवावयाचें.

१६

खङ्कूर याचा बोध नीट होत नाहीं. सायणचार्य खदूरे असा शब्द घेतात व खदूरे आकाशे, दूर देशे असा अर्थ करतात.

२२

अर्थ दुर्बोध.शूर व मित्रे उभयतांचीं भुतें दाखविण्याचें कारण काय?

२४

त्रिषंधिः सेनामोहको देवः ( सायण ). न्यर्बुदीच्या ऐवजीं त्रिषंधी देव येथें येतो.

अर्थसादृश्याकरतां अ. ८–८,१४ व १५ पहा.

२५

ऋषिशब्दानें येथें अथर्वाङ्गिरःप्रभृति ऋषी समजावयाचे.

११–१२

पिशाच हो, तुम्ही आपलीं निशाणें घेऊन उठा तयारी करा, हे सर्प हो, इतर जनहो, राक्षसहो शत्रूंच्या मागून धांवा. (१)

( हे शत्रूहो, ) तुमचें राज्य (त्रिषंधीला) प्रभुत्वानें माहीत होवो, हे त्रिषंधे, तांबड्या निशाणांसह ( ऊठ ).

जे अंतरिक्षांत, जे स्वर्गांत, जे पृथ्वीवर दुर्नामक मानव (असतील)
ते त्रिषंधाच्या मनांत राहोत. (२)

लोहमुखी, सुईसारख्या तोंडाचे आणि कांटेरी मुखांचे,
वायुगती मांसभक्षकपक्षी तिसांधी वज्रानें ( उडविलेले ) शत्रूंवर आसक्त होवोत. (३)

हे जातवेद आदित्य, तूं आपल्यांत पुष्कळ प्रेतें धारण कर.
त्रिषंधीची ही सेना माझ्या ताब्यांत ठेवलेली असो. (४)
हे देवजातीय अर्बुदे, तूं सेनेसह ऊठ,

या बलीची तुला आहुती दिली. त्रिषंधीला आहुति प्रिय आहे.(५)
पांढऱ्या पायाचा, चार पायांचा हा बाणांचा समुदाय मारो,
हे कृत्ये, त्रिषंधीच्या सेनेसह तूं शत्रूंकरतां ( आमची ) हो. (६)
डोळयांपुढें धुरकट दिसतें आहे अशी, कानानें बधिर झालेली -
( अशी शत्रुसेना) एकमेकांवर पडो, ओरडो,
त्रिषंधीच्या सेनेनें पराभव केल्यावर तांबडीं निशाणें असोत. (७)
जे पक्षी अंतरिक्षांत, जे द्युलोकांत संचार करतात ते पक्षी खालीं येवोत.

श्वापद आणि मक्षिका ( भक्षणाला ) आरंभ करोत, मांसभक्षक गिधाडें प्रेतांना कुरतडून खावोत (८)

हे बृहस्पते, इन्द्राबरोबर आणि ब्रह्माबरोबर जें बोलणें तूं केलेंस
त्या इन्द्राबरोबर झालेल्या बोलण्यावरून मी येथें सर्व देवांना हवन करतों. येथेंच तुम्ही जय संपादन करा, येथून परत्र जय मिळवूं नका. (९)

आंगिरस बृहस्पती ( आणि ) मंत्रांनीं ( शस्त्र ) तीक्ष्ण करणारे ( दुसरे ) ऋषी यांनीं
असुरांचा क्षय करणारे तिसंधी शस्त्र द्युलोकांत स्थापिलें. १०
ज्यानें संरक्षित झालेले-हा आदित्य व इन्द्र–असे दोघे आहेत
( त्या ) त्रिषंधीला देवांनीं तेजाकरतां व बलाकरतां भजलें. (११)
या आहुतीनें देवांनीं सर्व लोक जिंकिले.

अंगिरसपुत्र बृहस्पतीनें ज्या वज्राला असुरविध्वंसकशस्त्र बनविलें ( त्यानें देवांनीं सर्व लोक जिंकिले ). (१२)

अंगिरसपुत्र बृहस्पतीनें जें वज्र असुरविध्वंसकशस्त्र बनविलें

त्यानें मी या सेनेला कापून काढतों; हे बृहस्पते, शत्रूंना मी तेजाच्या जोरावर ठार करतों. (१३)

वषट्कारपूर्वक दिलेला हवि जे सेवन करतात ते सर्व देव येत आहेत.

( हे देवहो, ) ही आहुती सेवन करा, येथूनच जय मिळवा; येथून अन्यत्र नको. (१४)

सर्व देव येवोत, त्रिषंधाची ( ही ) प्रिय आहुती ( आहे ).

ज्या प्रतिज्ञेनें पूर्वी असुर जिंकले गेले ती मोठी प्रतिज्ञा पाळा. (१५)

शत्रूंच्या बाणांचीं टोकें वायू लववो,

यांचे बाहू इन्द्र भग्न करो, ( हातांत ) बाण धरण्यास समर्थ न होवोत,

यांचें अस्त्र आदित्य मोडून टाको, चन्द्र न आलेल्यांचा मार्ग बंद करो. ( १६ )

जरी देवांचीं नगरें गेलीं, मंत्रांचीं कवचें बनविलीं,

शरीरसंरक्षक आयुध, सर्वसंरक्षक आयुध करणारे ( असले )

(तरी), जें कांहीं त्यांनीं संकलित केलें तें सर्व निःसत्व कर. ( १७ )

अग्नि आणि मृत्यु यांना पुढें असलेल्या ( शत्रूंच्या ) मागें पाठवून,

हे त्रिषंधे, सेनेसह तूं जा. शत्रूंना जिंक, चल. ( १८ )

हे त्रिषंधे, तमाच्या योगानें तूं शत्रूंना व्यापून टाक, दधिघृताच्या ( आहुतीनें) नष्टप्राय झालेल्या ह्यांपैकीं एकालाहि सोडूं नको. (१९)

शत्रूंच्या या पलीकडच्या सेनेवर चारपायांची ( बाण ? ) जाऊन पडो.

हे न्यर्बुदे, शत्रूंच्या ह्या सेना मोह पावोत. ( २० )

हे न्यर्बुदे, शत्रू मूढ झाले आहेत. यांच्यांतील मोठमोठ्यांना मार.

या सेनेनें मार. ( २१ )

जो शत्रू कवची, जो कवचविरहित, जो रथांत ( तो )

ज्या पाशांनीं, कवचपाशांनीं, रथानें मारलेला पडो. ( २२ )

जे चिलखत घातलेले, जे चिलखत न घातलेले, जे अंगत्राण घातलेले,

त्या सर्वांना, हे अर्बुदे,—जमिनीवर पडून मेलेल्यांना श्वान खावोत. ( २३ )

जे रथी, जे अरथी, घोड्यावर न बसलेले, घोडेस्वार असलेले,

त्या सर्व मेलेल्यांना गिधाड, श्येन, (दुसरे) पक्षी खावोत, २४

शस्त्रास्त्रांच्या झगड्यांत विद्ध झालेली, छिन्नविच्छिन्न झालेली, शत्रूची सेना हजारों प्रेतें जिच्यांत आहेत अशी होऊन पडो. ( २५)

बाणांनीं मर्मस्थळीं विद्ध झालेली, रडत असलेली, टाकलेली, ठेचलेली, पडलेली ( सेना ) ( गिधाड ) खावोत. जो कोणी शत्रु ही ( आमची ) शत्रूच्या प्रतिकारार्थ दिलेली आहुती निष्फळ करण्याचा प्रयत्न करील त्या

बाणांनीं मर्मस्थळीं विद्ध झालेल्या, रडत असलेल्या, विषण्णचित्त झालेल्या, ठेचलेल्या, जमिनीवर लोळणाऱ्या ( शत्रूला ) पक्षी खावोत. ( २६ )

जिचें देव अनुष्ठान करतात, जिचा प्रतिकार करणारें कांहीं नाहीं,

त्या तिसंधी वज्रानें वृत्राला मारणारा इन्द्र शत्रूला मारो. ( २७ )

विनियोग ११--११ प्रमाणेंच.

१

सर्प, राक्षस व इतर जन हे पिशाचांसहवर्तमान वर्णिले आहेत. पण इतर जन कोण समजावयाचे ?

२

या सूक्तांत अर्बुदी न्यर्बुदी यांच्यापेक्षां त्रिषंधीचें महत्व विशेष दिसतें.

६

बाणांची गाय बनवावयाची असें दिसतें. कारण सायणाचार्यां-प्रमाणें शितिपदीपदानें गाय घ्यावयाची.

७

धूमाक्षी व कृधुकर्णी ( कर्णभूषणविरहित. ११--११--७ पहा ) हीं विशेषणें शत्रूस्त्रीची मानून अर्थ करतां येईल.

१०

या मन्त्रावरून त्रिषंधी ही शस्त्रदेवता असावी, असें वाटतें.

१७

हाच मंत्र पांचव्या काण्डांत आहे ( ८--६ ).

१९

पृषदाज्य शब्द या मंत्रांत आल्यामुळें कौ. सूत्रांत पृषदाज्याचा उपयोग सांगितला आहे.

१०२६६

REFBK-0010277